ISSN 2456-656X

# महाराष्ट्र साहित्य पत्रिका

जुलै ते सप्टेंबर २०२०

## लोकमान्य टिळक स्मृतिशताब्दी



## ज्ञानकण वेचणे हाच खरा ज्ञानमार्ग : डॉ. द. दि. पुंडे



**'मसाप'चा डॉ. गं. ना. जोगळेकर पुरस्कार डॉ. द. दि. पुंडे यांना प्रदान**

पुणे : 'बुद्धी आणि स्मृती या दोन गोष्टी फक्त माणसालाच लाभल्या आहेत. जिथे – जिथे ज्ञानकण मिळतील तिथे–तिथे ते वेचून आपले जीवन समृद्ध आणि संपन्न करणे हाच खरा ज्ञानमार्ग आहे.' असे मत डॉ. द. दि. पुंडे यांनी व्यक्त केले. महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे कै. डॉ. गं. ना. जोगळेकर स्मृती पुरस्कार डॉ. द. दि. पुंडे याना मसापचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांच्या हस्ते त्यांच्या घरी जाऊन प्रदान करण्यात आला. यावेळी डॉ. गं. ना. जोगळेकर यांच्या अनेक आठवणींना डॉ. पुंडे यांनी उजाळा दिला. प्रमुख कार्यवाह प्रकाश पायगुडे, कोषाध्यक्ष सुनिताराजे पवार, पराग जोगळेकर आणि डॉ. उज्ज्वला जोगळेकर उपस्थित होते.

पुंडे म्हणाले, 'भाषेच्या अभ्यासक्रमाची पाठ्यपुस्तके तयार करताना विद्यार्थ्यांना केंद्रस्थानी ठेवले पाहिजे. पाठ्यपुस्तके वाचून अवांतर वाचनाची ओढ त्यांच्यात निर्माण व्हायला हवी या दृष्टीने परदेशातील विद्यापीठांत प्रयत्न केले जातात. तसे प्रयत्न आपल्याकडेही व्हायला हवेत.'

प्रा. मिलिंद जोशी म्हणाले, 'मराठीच्या अध्यापनाबरोबरच डॉ. पुंडे यांनी वाङ्मयेतिहासाचे तत्त्वज्ञान या विषयासाठी दिलेले योगदान महत्त्वाचे आहे. त्यामुळे त्यांना जोगळेकर यांच्या नावे स्मृती पुरस्काराने सन्मानित करताना परिषदेला आनंद होत आहे.
प्रमुख कार्यवाह प्रकाश पायगुडे यांनी प्रास्ताविक केले.

महाराष्ट्र साहित्य परिषद

महाराष्ट्र साहित्य परिषदेचे त्रैमासिक मुखपत्र

# महाराष्ट्र साहित्य पत्रिका

अंक क्र. ३७१, जुलै ते सप्टेंबर २०२०

संपादक

**डॉ. पुरुषोत्तम काळे**

संपादन समिती

**डॉ. मनोहर जाधव । डॉ. नीलिमा गुंडी**
**डॉ. भास्कर ढोके । डॉ. रणधीर शिंदे**
**डॉ. वर्षा तोडमल**

प्रकाशक

**प्रकाश पायगुडे**
प्रमुख कार्यवाह

**महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे**
टिळक रस्ता, पुणे ४११०३०.
दूरभाष । ०२०–२४४७५९६३
संकेतस्थळ । www.masapapune.org
ई–मेल । masaparishad@gmail.com

कार्यालयाची वेळ ।
सकाळी ९.०० दुपारी १२.००
दुपारी ४.३० ते रात्री ८.००

महाराष्ट्र साहित्य परिषद

मुद्रक–प्रकाशक
**प्रकाश पायगुडे**
प्रमुख कार्यवाह
महाराष्ट्र साहित्य परिषद,
टिळक रस्ता, पुणे ४११०३०

जाहिरात व्यवस्थापक
**वि. दा. पिंगळे**
९८८१२३५०३३

संपादकीय संयोजन
**संदीप खाडे**

अक्षरजुळणी व सजावट
**लक कलाकल्य**

मुखपृष्ठ
**जयदीप कडू**

मुद्रितशोधन
**आरती देवगांवकर**

मुद्रणस्थळ
**एस. ए. प्रिंटर्स, एल. एल. पी.**
फ्लॅट नं. ५, ३ रा मजला,
सिद्धीविनायक अपा.,
शिवदर्शन, पुणे ४११००९

मूल्य : **१५ रुपये**

प्रकाशन क्र. ३७१
जुलै ते सप्टेंबर २०२०

या अंकात व्यक्त झालेल्या विचारांशी संपादक, संपादन समिती, सल्लागार मंडळ तसेच प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.



# अंतरंग

**मसाप पत्रिका**
**जुलै ते सप्टेंबर २०२० अंक**


- सरकारने त्वरित ग्रंथालये सुरू करावीत । **डॉ. पुरुषोत्तम काळे । ३**
- संघर्षवादी लोकमान्य । **अरविंद गोखले । ६**
- लोकमान्यांचा भाषाविचार । **प्रा. मिलिंद जोशी । १९**
- काव्यातले शब्द । **डॉ. अक्षयकुमार काळे । २२**
- दलितसाहित्य प्रवाहानं अनेक साहित्य प्रवाहांना ऊर्जा दिली । **डॉ. मनोहर जाधव । २८**
- प्रयोगशीलता आणि नव्वदोत्तरी महानगरी कविता । **संतोष पद्माकर पवार । ३४**
- नव्वदोत्तर स्त्री काव्यातील मिथकांचे अर्थनिर्णय । **सरिता सोमाणी । ३८**
- समीक्षा : वास्तव आणि अपेक्षा । **सुरेश देशपांडे । ४९**
- मानवी अस्वस्थपणाचं संयमित व समतोल वास्तवचित्र : निद्रानाशाची रोजनिशी । **डॉ. राहुल पाटील । ५२**
- मायलेकी–बापलेकी– प्रत्येक पालकाला समृद्ध करणारे पुस्तक । **प्रदीप माने । ५९**
- पैलतटावर : भावोत्कट आविष्काराचा प्रत्यय देणारा ग्रंथ । **प्रा. डॉ. विश्वनाथ शिंदे । ६३**
- जाणिवा समृद्ध करणारे तत्त्वचिंतनात्मक लेखन । **अभिजित पाटील । ६६**
- स्वातंत्र्यपूर्व काळातील स्त्रीमुक्तीचा उद्‌गारः ‘हिरवळीखाली’। **अश्विनी दळवी । ६९**
- चौकट वाटोळी : नीती– अनीतीचे गुंते आणि बदलते वास्तव । **डॉ. किशोर सानप । ७२**
- ‘पिपिलिका मुक्तिधाम जागतिक कादंबरी संदर्भात एक तौलनिक वैश्विक विचार । **रामेश्वर सोळुंके । ७७**
- आजच्या ग्रामीण घुसमटीचे प्रत्ययकारी चित्रण : तुडवण । **सुभाष शेकडे । ८६**
- कवितेचा अंतःस्वर । **डॉ. दा. गो. काळे । ९२**
- कोरोनाच्या कृष्णछायेत : तिसरं महायुद्ध । **जुई कुलकर्णी । ९५**
- ‘ड्रॅगनचे करोनास्त्र’–एका जैविक अस्त्राची शोध यात्रा । **डॉ. संदीप श्रोत्री । ९७**
- काळोखाच्या कविता : अस्तित्वाचा अन्वयशोध । **डॉ. चंद्रकांत चव्हाण । १०१**
- आचार्य अत्रे । **निखिल कुलकर्णी । १०७**
- ‘विळखा’ : समस्याप्रधान तरीही कलात्मक ! । **डॉ. विलास राशिनकर । ११२**
- जातीपल्याडची अंतर्मुख करणारी साहित्यकृती । **सत्य चिरंतन । ११७**

संपादकीय

# सरकारने त्वरित ग्रंथालये सुरू करावीत

डॉ. पुरुषोत्तम काळे

मार्च २०२० मध्ये पहिली टाळेबंदी झाल्याला आता सात महिने होतील. करोना महासाथीचे रुग्ण या कालावधीत वेगाने वाढले. देशभरात जवळ- जवळ लाखापर्यंत गेलेली रुग्णसंख्या सध्या दररोजची सत्तर हजारांच्या जवळपास आहे. रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ७९% पर्यंत आहे. महाराष्ट्रामध्ये त्यातही पुणे-मुंबई या शहरांमध्ये रुग्णवाढीचा वेग जास्त होता तो काहीसा कमी होताना दिसतोय, महासाथीच्या प्रसारावर नियंत्रण मिळवण्यात यश येते आहे आणि मुख्य म्हणजे महानगरात रुग्णशय्या उपलब्ध आहेत. राज्याची आरोग्य व्यवस्था उपलब्ध संसाधनांचा परिणामकारक वापर करीत या कोविड महासाथीचा परिणामकारक मुकाबला करीत आहे. डॉक्टर्स, परिचारिका, वैद्यकीय कर्मचारी आणि इतर अहर्निश सवा पुरवणाऱ्या कोविड योद्ध्यांची प्रशंसा करावी तितकी कमीच आहे.

करोना महासाथीचा परिणाम जागतिक आहे भारताच्या अर्थव्यवस्थेवर हा परिणाम तीव्र स्वरूपाचा आहे. रोजगार कमी होताहेत. नवीन रोजगारनिर्मिती नाही. प्रत्येक क्षेत्रात अभूतपूर्व मंदी आहे. टाळेबंदीमुळे उत्पादननिर्मितीवर परिणाम झालाच; परंतु मागणी घटल्याने बाजारात मंदीचे वातावरण आहे. टाळेबंदीमुळे करोना महासाथीच्या प्रसाराचा वेग आटोक्यात ठेवता आला का? याबाबत तज्ज्ञांमध्ये एकवाक्यता नाही, मतमतांतरे आहेत. एक मात्र खरे की, टाळेबंदी नसती तर परिस्थिती अधिक भीषण झाली असती आणि राज्याची, देशाची आरोग्य व्यवस्था कोसळली असती हे नक्की! टाळेबंदी उठवताना जनजीवन पूर्वपदावर यावे यासाठी सरकार टप्प्या-टप्प्याने विविध क्षेत्रे खुली करीत आहे. मद्यालये, हॉटेल्स काही अटींसहित सुरू झालेली आहेत. जनजीवन पूर्वपदावर येत असताना साहित्यक्षेत्र आणि साहित्य व्यवहाराकडे दुर्लक्ष झालेले आहे. राज्यातील ग्रंथालये बंद आहेत. त्यामुळे विद्यार्थी - संशोधकांना आणि वाचकांना ज्ञानार्जनापासून वंचित राहावे लागत आहे. इतर गोष्टींना परवानगी देत असताना ग्रंथालये, महाविद्यालये बंद ठेवण्यामागील कारणे पटणारी नाहीत. ग्रंथालये उघडण्याची मागणी करणारे पत्र महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांनी मा. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना लिहिले आहे. राज्यभरातील ग्रंथालये त्वरित खुली करावीत, करोना प्रसार होऊ नये यासाठी दक्षता घेण्याबाबतच्या अटी-शर्ती घालून ही परवानगी द्यावी ही विनंती आम्ही मा. मुख्यमंत्र्यांना करीत आहोत. ग्रंथालयाबरोबरच साहित्यव्यवहारही पूर्ववत व्हावा यासाठी सरकारने जाणीवपूर्वक प्रयत्न करावेत. दिवाळी अंकाच्या छपाई आणि वितरणाबाबत प्रकाशकांनी एक समिती निर्माण केलेली आहे. यावर्षी वितरणाच्या समस्येमुळे आणि निर्बंधांमुळे दिवाळी अंकांची संख्या रोडावण्याची शक्यता आहे. मराठी साहित्याला समृद्ध करणारी दिवाळी अंकाची शतकोत्तर परंपरा अबाधित राहावी यासाठी सरकारने लक्ष घालून मदत करावी.

गेले सात महिने साहित्यसंस्थांचे कार्यक्रम जवळजवळ बंद झाले आहेत. या कठीण काळातदेखील महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या काही शाखांनी समाजपयोगी काही कार्यक्रम निर्बंधाचे पालन करून

आंतरजालावर घेतले. शाळा - महाविद्यालये बंद असल्याने अनेक विद्यार्थ्यांना दूरस्थ शिक्षणासाठी मोबाईल उपलब्ध व्हावेत यासाठी म.सा.प च्या नाशिक रोड शाखेच्या उन्मेष गायधनी आणि सहकाऱ्यांनी विशेष प्रयत्न केले. याबाबत त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन! येत्या काळात शाळा- महाविद्यालये सुरू होतील अशी अपेक्षा आहे. आंतरजालाद्वारे दूरस्थ शिक्षण ग्रामीण भागामध्ये व्यवहार्य नाही हे दिसून आलेले आहे. महाविद्यालये बंद असण्याचा जास्त तोटा कलाशाखेला होत आहे आवश्यक ती सारी खबरदारी घेऊन शाळा- महाविद्यालये येत्या काही काळात सुरू व्हावीत ही सरकारकडून अपेक्षा आहे .

करोना महासाथीच्या या कठीण काळात महाराष्ट्राचे समाजजीवन प्रदूषित झालेले आहे. हे प्रदूषण केवळ करोनामुळे नाहीतर काही बेजबाबदार वृत्तवाहिन्या आणि समाजमाध्यमांमुळे झाले आहे. जनहिताच्या प्रश्नांवरून जनतेचे लक्ष विचलित करण्यासाठी हा उद्योग चालू आहे याचा संशय येतो. सर्वसामान्य माणसाची परवड वृत्तांमध्ये दाखवून सरकारचे लक्ष वेधण्याचे काम करणाऱ्या वृत्तवाहिन्या अभावानेच आढळतात. एका अभिनेत्याच्या आत्महत्येचे भांडवल करून मुंबई, मुंबई पोलीस आणि महाराष्ट्राला बदनाम करण्याचे कारस्थान केले गेले. हे कारस्थान न कळण्याइतकी महाराष्ट्रीय जनता मूर्ख नाही. खरे तर माध्यमांनी सरकार विरोधीच असले पाहिजे आणि जनसामान्यांच्या मागे उभे राहिले पाहिजे. त्यांचे प्रश्न मांडून सरकारला धारेवर धरले पाहिजे. हे पत्रकारितेचे व्रत अंगिकारणारे आज अल्पसंख्य आहेत; पण लोकशाहीची मदार या अल्पसंख्य- हाडाच्या पत्रकारांवर असते. कोणत्याही लोकशाही राज्य- व्यवस्थेला स्त्रियांवरील अत्याचार, बलात्कार हे लांच्छन आहे. हाथरस येथे एका दलित मुलीवर निर्घृण अत्याचार झाले त्यात तिचा मृत्यू झाला. त्यानंतर जी असंवेदनशीलता राज्यकर्त्यांकडून दिसली ती निषेधार्हच आहे. या घटनेचा आम्ही निषेध करतो. आरोपींना त्वरित जलदगती न्यायालयात खटला चालवून कठोर, जास्तीत जास्त शिक्षा व्हावी. असे अत्याचार देशाच्या कोणत्याही राज्यात घडणे हे निषेधार्हच आहे! करोनाच्या महासाथीला आटोक्यात आणता येईल; परंतु जातीय- विद्वेषाच्या विषाणूला कसे नष्ट करायचे हा प्रश्न भेडसावणारा आहे. या भयाण पार्श्वभूमीवर प्रा. पुष्पा भावे यांचे निधन हे अतीव दुःखदायक आहे. प्रगल्भ लोकशाहीसाठी ठाम भूमिका घेणाऱ्या विचारवंतांनी सामाजिक दिग्दर्शन करणे आवश्यक असते. वंचित, दलित आणि महिलांवरील अत्याचारा विरोधातील आंदोलनाची परंपरा महाराष्ट्रात आहे. राज्याला प्रबोधनाचा वारसा आहे. ही पुरोगामित्वाची परंपरा क्षीण होऊ नये. विचारवंतांचे मौन हे प्रगल्भ लोकशाहीसाठी घातक असते. मराठी साहित्यामध्ये या कृष्णवास्तवाचे चित्रण उमटावे ही अपेक्षा!

या अंकामध्ये महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या स्थापनेत मोलाची भूमिका बजावणाऱ्या लोकमान्य टिळकांच्या स्मृतिशताब्दी वर्षाच्या सांगतेनिमित्त लोकमान्यांचा भाषाविचार हा प्रा. मिलिंद जोशी यांचा आणि अरविंद

गोखले यांचा लोकमान्याचा संघर्ष हे लेख प्रसिद्ध करीत आहोत. मुखपृष्ठावरील लोकमान्यांचे चित्र तसेच लेखातील लोकमान्यांची छायाचित्रे छापण्यास संमती दिल्याबद्दल केसरी ग्रंथालय, पुणे यांचे आभार मानतो. या दोन्ही लेखांमध्ये लोकमान्यांचा भाषाविचार तसेच त्यांची क्रांतिकार्याबाबत भूमिका लेखकांनी स्पष्ट केली आहे. टाळेबंदीमुळे साहित्यचर्चांचे वेबिनार आयोजित केले जात आहेत. यावल (जळगाव) येथील महाविद्यालयाने आयोजित केलेल्या वेबिनारमधील डॉ. मनोहर जाधव यांचे बीजभाषण साहित्यप्रवाहाच्या निर्मितीची कारणे आणि दलित साहित्यप्रवाह निर्मितीमुळे इतर साहित्यप्रवाह निर्मितीला प्रेरक कारणांचा उहापोह करते. ख्यातकीर्त समीक्षक आणि माजी संमेलनाध्यक्ष डॉ. अक्षयकुमार काळे यांचा 'काव्यातले शब्द' हा लेख शब्दांचे काव्यातील उपयोजन कवीने कसे करावे या बाबत मर्मदृष्टी देणारा आहे. चौकट वाटोळी, पिपिलिका मुक्तिधाम, तुडवण आणि विळखा या कादंबऱ्यांवरील लेख, करोना महासाथीवरील दोन पुस्तकांवरील लेख, नव्वदोत्तर महानगरीय आणि स्त्री काव्यावरील दोन समीक्षा लेख, नामदेव कोळींच्या 'काळोखाच्या कविता' या काव्यसंग्रहावरील लेख ही या अंकाची वैशिष्ट्ये आहेत. आचार्य अत्रे आणि द हार्ट माईंड मॅट्रिक्स हा निखिल कुलकर्णींचा ललित लेख एक वेगळा विचार मांडणारा आहे. या लेखात वापरलेल्या आचार्य अत्रे यांच्या छायाचित्रांसाठी जया दडकर यांनी संमती दिली. त्यांची म. सा. पत्रिका आणि परिषद ऋणी आहे. त्यांचे आभार! मराठी समीक्षेचं वास्तव मांडणारा आणि ती अधिक सुलभ आणि वाचकस्नेही व्हावी ही अपेक्षा व्यक्त करणारा सुरेश देशपांडे यांचा लेख समीक्षेबाबत काही निरीक्षणे मांडतो. मायलेकी-बापलेकी (सं. राम जगताप), पैलतटावर या डॉ. विलास खोले यांच्या पुस्तकावरील लेख मूळ पुस्तक वाचण्याची उत्कंठा वाढवणारे आहेत. गेल्या दोन अंकांप्रमाणेच हा अंक ई-अंक स्वरूपात प्रकाशित करण्यात येईल.

माजी राष्ट्रपती भारतरत्न प्रणव मुखर्जी, प्रकांडपंडित मधुकर अनंत मेहेंदळे, विचारवंत-समीक्षक प्रा. पुष्पा भावे आणि ज्येष्ठ विधिज्ञ बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र- गोव्याचे माजी सदस्य आणि महाराष्ट्र साहित्य परिषद पुणेचे विश्वस्त मंडळाचे माजी अध्यक्ष मा. अॅड. भास्करराव आव्हाड यांचे निधन झाले. या थोर व्यक्तींना म. सा. पत्रिकेतर्फे भावपूर्ण आदरांजली!

विजयादशमी आणि दीपावली या येणाऱ्या सणांच्या सर्व वाचकांना, सभासदांना शुभेच्छा देतो. करोना महासाथीमुळे विस्कटलेले समाजजीवन पूर्ववत होवो ही कामना व्यक्त करतो.

**डॉ. पुरुषोत्तम काळे.**
चलभाषः ९४०४९३७७१०
ई-मेलः purshottamdkale@gmail.com

---

हा अंक मसापच्या www.masapapune.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

# संघर्षवादी लोकमान्य

**लोकमान्य टिळकांच्या स्मृतिशताब्दी सांगतेनिमित्त स्वराज्यासाठी लोकमान्यांनी केलेल्या प्रखर संघर्षावर भाष्य करणारा ज्येष्ठ संपादक अरविंद गोखले यांचा लेख**

■ अरविंद गोखले

लोकमान्य टिळक यांनी आयुष्यभर संघर्षच जपला. त्यांचे जीवन संघर्षमयच होते. कायद्याच्या कचाट्यात आपण अडकणार नाही, याची काळजी त्यांच्याकडून घेतली जाणार नाही, हे अशक्य, पण तरी त्यांना काहीही करून शिक्षेस पात्र ठरवायचेच, हे ब्रिटिशांच्या मनात पक्के. टिळक जाहीर सभेत काय बोलतात, केसरी आणि मराठा या त्यांच्या वृत्तपत्रातून काय लिहितात, हे ब्रिटिशांकडून दुर्बिण घेऊनच पाहिले जात असे. त्यांचे हस्तक पुण्यात होते, तसे मुंबईतही होते. टिळकांवर अँग्लो-इंडियन वृत्तपत्रांची बारीक नजर होती. मुंबईचा टाइम्स त्यात आघाडीवर होता. मराठा वृत्तपत्रात काय प्रसिद्ध होई ते ब्रिटिश अधिकाऱ्यांना कळत असे; पण खरे तर त्याची त्यांना धास्तीही नव्हती कारण इंग्रजी वाचणारा वर्ग हा क्रांती करणार नाही, असा त्यांचा समज होता. मराठी वाचणाऱ्याला 'माथेफिरू' बनवायचा कारखानाच केसरीने उघडला आहे, असे समजून त्यांच्या साऱ्या लेखनाकडे बारकाईने पाहिले जात असे. केसरीत जे काही प्रसिद्ध होई, त्याचे इंग्रजीत भाषांतर करून ते टाइम्सकडे पाठवायचे काम काही पुणेकर विद्वानांकडून केले जाई. त्यात काहीजण असे होते की, ज्यांचे डोळे ब्रिटिश सुधारणांनी दिपलेले होते. ब्रिटिशांनी रस्ते बांधले; वाहवा, पूल बांधले; उत्तम, आगगाडी आणली; अप्रतिम, तारायंत्रे उभी केली; पाहा केवढी ही प्रगती, असे गुणगानच त्यांच्याकडून गायिले जात असे. ते त्यावर लिहितही असत. त्यांचे ते भारावलेपण त्यांना स्वराज्यवाद्यांना नावे ठेवायला प्रवृत्त करत असे. काहींनी तर या सुधारणांचे लाभही पदरात पाडून घेतले होते. अस्तनीतल्या या निखाऱ्यांनी शेवटपर्यंत त्यांचा छळ मांडला होता. ब्रिटिश नोकरशहा म्हणजे देशाला लागलेली जळू आहे आणि ती आपले रक्त शोषण करते आहे आणि हा देश लुटायला सोपे जावे यासाठी त्यांच्या या सुधारणा आहेत, हे टिळक सांगायचे म्हणून त्यांचेच रक्त शोषायचे काम या मंडळींकडून केले जात होते. त्यांना टिळक नको होते, त्यांना ब्रिटिश चालणार होते, नव्हे त्यांना ब्रिटिशच हवे होते.

आपल्या देशाला अजून शंभर वर्षे दास्यात राहावे लागले तरी हरकत नाही; पण लोकमान्य ज्याचा सातत्याने पुरस्कार करत राहिले ते स्वराज्य अजिबात नको, असे ठासून सांगणारे मूठभर असले तरी त्यांचे तेवढ्याच मूठभरांकडून ऐकून घेतले जात होते. तिकडे बंगालमध्ये बाँबस्फोट घडले ते लोकमान्यांमुळेच, असे सांगण्यापर्यंत त्यांची मजल गेली होती. १९०५ मध्ये तेव्हाचा व्हाइसरॉय लॉर्ड कर्झनने केलेल्या

फाळणीने संतप्त झालेले असंख्य लोक ब्रिटिशांची मस्ती जिरवायच्या मागे लागले होते. बंगालमध्ये केसरी वाचला जात होता का, तर नाही. तरीही टिळक काय म्हणतात ते बंगालमध्ये कळत होते ही वस्तुस्थिती होती. बंगालमध्ये केसरीचे लिखाण कळण्याची सोय होती. जबलपूरमधून हिंदी केसरी प्रसिद्ध होत असे, माधवराव सप्रे हे त्या वृत्तपत्राचे संपादक होते. त्यांचे सगळे आयुष्यच मुळी लोकमान्यांच्या विचारांना वाहिलेले होते. या वृत्तपत्राचा आवाज खूपच मोठा होता. शिवाय नागपूरहून प्रसिद्ध होणारे देशसेवक हे वृत्तपत्रही जबलपूरसारख्या ठिकाणी पोहोचत होते. देशसेवक हे वृत्तपत्र केसरीचेच रूपांतर होते. तरीही टिळक काय म्हणतात ते उत्तर भारतात किंवा बंगालमध्ये समजा पोहोचले नाहीच, तर अँग्लो इंडियन वृत्तपत्रे टिळकांविरोधात आगीत तेल ओतायला सज्ज असत. मुंबईचा टाइम्स त्यांच्या दिमतीला होता. मुंबईच्या टाइम्समध्ये टिळकांवर सातत्याने टीका होत असे. सांगायचा मुद्दा हा की, मुझफ्फरपूरमध्ये झालेल्या बाँबस्फोटांना आणि केनेडी मायलेकींच्या हत्येला टिळकच कारणीभूत आहेत, असे ब्रिटिश सरकार सांगू शकत नसले तरी टिळकांनी बाँबहल्ल्यांचे समर्थन केल्याचे सांगण्यापर्यंत त्यांची मजल गेली. मुझफ्फरपूरमध्ये मारायचे होते प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट किंग्जफोर्डला; पण त्याच्याऐवजी केनेडी मायलेकी मारल्या गेल्या. त्यांना मारायला कोणीच सांगितलेले नव्हते. लोकमान्यांची लोकप्रियता किती दूरवर जाऊन पोहोचलेली होती ते ब्रिटिशांना उमगले होते म्हणूनच त्यांचा टिळक या नावाने थरकाप होत असे.

टिळकांचे केवळ नाव ऐकून १९०७ मध्ये त्यांना भेटण्यासाठी अमीरचंद बाँबवाल नावाचा एक तरुण सुरतेत पोहोचला होता. त्याने टिळकांना भेटून आपल्याला आग्रा येथून उर्दू केसरी प्रकाशित करायचा आहे, त्यासाठी परवानगी द्या, अशी मागणी केली. टिळकांनी ती तर दिलीच; पण त्याला पुढल्या वर्षी पुण्यात ये, तेव्हा आपण सविस्तर चर्चा करू असे सांगितले. त्याला त्यासाठी आर्थिक मदतही देऊ



केली. त्यानंतरच्या वर्षी तो टिळकांना भेटला; पण उर्दू केसरी सुरू होणापूर्वीच टिळकांना अटक झाली आणि त्या सर्व योजनेवर पाणी पडले. अमीरचंद बाँबवाल हा पेशावरचा आणि खान अब्दुल गफारखानांचा अनुयायी. व्हॉइसरॉय लॉर्ड हार्डिंजच्या हत्तीवरून काढण्यात आलेल्या मिरवणुकीवर २३ डिसेंबर १८९२ रोजी अमीरचंदने बाँब फेकला होता, त्यात हार्डिंज जखमी झाला; पण त्याची पत्नी वाचली. त्या प्रकरणात अमीरचंदला अटक झाली. पाकिस्तानच्या निर्मितीनंतर हाच अमीरचंद जिनांच्या शत्रूस्थानी होता. त्याला त्यांनीही तुरुंगात टाकले; पण जिनांच्या मृत्यूनंतर लियाकत अलींनी नेहरूंच्या सूचनेवरून त्याची सुटका केली.

क्रांतिकारकांबरोबर असलेल्या टिळकांच्या संबंधांबाबत ब्रिटिश हे कायमच संशय बाळगून होते. त्यातूनच टिळकांवर त्यांनी खटला दाखल केला. टिळकांनी बाँबचे समर्थन केले, बाँबस्फोट करणाऱ्यांचे समर्थन केले आणि पुढे ते काय करतील ते सांगता येत नाही, या भीतीतून त्यांनी त्यांच्यावर मुंबई उच्च न्यायालयात देशद्रोहाचा खटला दाखल केला. तो न्यायमूर्ती दिनशा दावर यांच्यापुढे चालला आणि त्यांनी टिळकांना सहा वर्षांच्या काळ्या पाण्याची शिक्षा सुनावली. काळ्या पाण्याची शिक्षा म्हणजे

देशातून हद्दपार करण्याची शिक्षा. तो दिवस होता त्यांच्या वाढदिवसाच्या आदल्या रात्रीचा म्हणजेच २२ जुलै १९०८ चा. विशेष हे की खटल्याचा निकाल लागण्यापूर्वीच त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने १८ जुलै रोजीच देशभर सरकारविरोधी निदर्शने आयोजित करण्यात आली होती; पण सरकारवर त्याचा ढिम्म परिणाम झाला नाही. सरकारनेच प्रसिद्ध केलेल्या राजद्रोहाच्या अहवालात या निदर्शनांची माहिती दिली आहे. (सीडिशन कमिटी रिपोर्ट,१९१८).

या अहवालात म्हटले होते, की नागपूर, कलकत्ता, मुंबई, पुणे, मद्रास, लखनौ, लाहोर, आणि अमृतसर ही शहरे अतिशय संवेदनक्षम आहेत आणि त्याकडे डोळ्यात तेल घालून लक्ष देण्याची आवश्यकता आहे. नागपूरची जी जहाल मतवादी वृत्तपत्रे होती, त्यांपैकी आघाडीवर असलेल्या 'देशसेवक'ने मुझफ्फरपूरच्या बॉंबस्फोट प्रकरणानंतर ११ मे १९०८ रोजी लिहिलेल्या अग्रलेखात बॉंब बनवायचा प्रत्येकाचा अधिकारच असल्याचे प्रतिपादन केले होते. त्यात असेही म्हटले होते की, 'खुदिराम बोसने किंग्जफोर्डची हत्या करण्याचा केलेला प्रयत्न हा योग्य नाही, त्याचे कुणीही अनुकरण करू नये, म्हणूनच आम्ही त्याचा अतिशय जोरदार निषेध करीत आहोत. असे असले तरी प्रत्येकाने बॉंबचे ज्ञान हे प्राप्त केलेच पाहिजे आणि ते सहज प्राप्त व्हावे यासाठी सरकारकडे पाठपुरावाही केला पाहिजे. खुदिराम बोसच्या हल्ल्यातून वाचल्याबद्दल आपण किंग्जफोर्डचे अभिनंदनही करू या; पण किंग्जफोर्डने कलकत्त्याचे प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट या नात्याने जे काही निर्णय घेतले ते भयावह आणि सैतानी पद्धतीचे होते यात शंकाच नाही.'

इतक्या उघड पद्धतीने टिळकांनीही बॉंबचे किंवा तो वापरणाऱ्यांचे समर्थन केले नव्हते. ३० एप्रिल १९०८ रोजी मुझफ्फरपूरमध्ये केनेडी मायलेकींना ठार करण्यात आल्यानंतर १२ मे च्या केसरीत 'देशाचे दुर्दैव' हा अग्रलेख प्रसिद्ध झाला. त्यात 'घरात कोंडलेले मांजरदेखील त्वेषाने कोंडणाऱ्याच्या अंगावर धावून जाऊन त्यास मारण्याचा प्रयत्न करते', असे म्हटले होते. यासंबंधात पुण्यातही प्रतिक्रिया उमटलेल्या होत्या. त्याच सुमारास पुण्यात झालेल्या काही बॉंबस्फोटांचाही उल्लेख प्रख्यात संशोधक साहित्यिक य. दि. फडके यांनी केला आहे. 'लोकमान्य टिळक आणि क्रांतिकारक' या १९८५ मध्ये प्रकाशित झालेल्या पुस्तकात टिळकांच्या क्रांतिकार्याची बरीच माहिती दिली आहे. अ. ज. करंदीकरांनीही 'क्रांतिकारक टिळक आणि त्यांचा काळ' या पुस्तकात तो काळ चांगला चितारला आहे. मात्र टिळकांच्या अनेक चरित्रकारांच्या नजरेतून या गोष्टी कशा सुटल्या याबद्दल फडके यांनी आश्चर्य व्यक्त केले आहे. फडके यांनी पुण्यात त्या काळात झालेल्या बॉंबस्फोटांचेही दाखले दिले आहेत. २ जून १९०८ रोजी पुण्यात तीन ठिकाणी बॉंबस्फोट झाले. पहिला बुधवार चौकातील वंदेमातरम या हरि रघुनाथ भागवत यांच्या वृत्तपत्र कार्यालयासमोर झाला. दुसरा शनिवार पेठेतील दारूगुत्त्यासमोर झाला, तर तिसरा दारूवाला पुलापाशी. २ जूनच्या या बॉंबस्फोटांनंतर केसरीत 'हे उपाय टिकाऊ नाहीत' हा अग्रलेख (९ जून)प्रसिद्ध झाला होता. त्यात म्हटले होते की, 'बॉंबगोळे हे कायद्यांनी किंवा अधिकाऱ्यांच्या देखरेखीने अथवा गुप्त पोलिसांच्या सुळसुळाटाने बंद पाडता किंवा नाहीसे करता येणे आता शक्य आहे काय? बॉंबगोळ्याला ज्ञानाचे स्वरूप अधिक आहे. ही एक जादू आहे, हा एक मंत्र तोडगा आहे... जो माथेफिरू आहे त्याच्यापासून ह्या मंत्राचे ज्ञान लपवून ठेवण्याचे सामर्थ्य आता सरकारी कायद्याचे अंगी उरले नाही... बॉंबगोळे नाहीसे करण्यास खरा व टिकाऊ उपाय म्हणजे स्वराज्याचे महत्त्वाचे हक्क देण्यास आरंभ करणे हा होय.' य. दि. फडके लिहितात, 'पुण्यात बॉंबस्फोट घडवून आणणाऱ्यांमागे टिळक व काळकर्ते शिवराम महादेव परांजपे असावेत असा सरकारला संशय होता; पण तसा भरभक्कम पुरावा जून व जुलै १९०८ मध्ये सरकारला मिळाला नव्हता. त्यामुळे राजद्रोहाचा आरोप ठेवून टिळक व परांजपे यांना पकडणे व

त्यांच्यावर खटला भरणे हा मार्ग सरकारने वापरला. केसरीत प्रसिद्ध झालेल्या लेखातील विधानांची सर्व जबाबदारी संपादक म्हणून टिळकांनी घेतली तरी आक्षेपार्ह ठरवण्यात आलेले लेख टिळकांचे नसून खाडिलकरांच्या ओजस्वी लेखणीतून उतरले होते ही वस्तुस्थिती गुप्त पोलिसांना माहिती होती. ११ जून १९०८ रोजी शिवरामपंतांना पुण्यात आणि २४ जूनला टिळकांना मुंबईत अटक करण्यात आली. मात्र त्यामुळे पुण्यातले बाँबस्फोट थांबले नाहीत.'

'देशाचे दुर्दैव' हा अग्रलेख राजद्रोहाच्या दुसऱ्या खटल्यास कारणीभूत ठरला. तो केसरीच्या १२ मे च्या अंकात प्रकाशित झाला. 'सरकार जर अत्याचारी बनत असेल आणि त्याला त्याच मार्गाने वठणीवर आणायचा कुणी प्रयत्न केला, तर त्याचा दोष त्या कारवाया करणाऱ्यांचा नसून तो सरकारचाच आहे', असे स्पष्ट सांगणारा हा अग्रलेख सरकारची कारवाई ओढवून घेणारा होता; पण टिळक एवढे धाष्ट्र्याचे की, त्यांनी हा अग्रलेख दि. ३० जूनच्या अंकात पुन्हा प्रकाशित केला. फडके यांनी सगळेच्या सगळे अग्रलेख हे टिळकांचे नसून ते सर्व खाडिलकरांचे होते, असे जे म्हटले आहे ते वस्तुस्थितीला धरून नाही. बाँबगोळ्यांचा अनर्थ या शीर्षकाने टिळकांनी १२ मे १९०८ च्या अंकात दोन स्फुट सूचनाही लिहिल्या. ही दोन स्फुटे आणि देशाचे दुर्दैव हा अग्रलेख यांचे लेखन टिळकांनी केले होते, तर उरलेले चार अग्रलेख आणि एक स्फुट सूचना यांचे लेखक खाडिलकर होते. 'हे उपाय टिकाऊ नाहीत', या अग्रलेखाचा उल्लेख दुसऱ्या राजद्रोहाच्या खटल्यात वारंवार केला गेला, तो मात्र खाडिलकरांनी लिहिलेला होता; पण त्यासह एकूण आठही लेखांची जबाबदारी टिळकांनी संपादक या नात्याने स्वत:कडे घेतली. तो काळ अग्रलेख मागे घेण्याचा कदापिही नव्हता. टिळकांनी देशाचे दुर्दैव हा अग्रलेख सरकारला बोचणार हे गृहीत धरून तो ३० जूनच्या अंकात पुन्हा प्रकाशित करायला सांगितले असणार. सहाच दिवसांपूर्वी टिळकांना अटक झालेली होती.

माणिकतोळा बाँबस्फोट प्रकरणानंतरही युगांतरचे प्रकाशन चालू राहिले, असे हा राजद्रोहविषयक सरकारी अहवाल सांगतो. 'युगांतर'ने देश स्वतंत्र होण्यासाठी बाँबस्फोट असल्याचे सांगून या घटनेचे स्वागत केले. दरोडेखोर, चोरटे आणि बदमाश यांच्याविरोधी युद्ध पुकारणे म्हणजे काही कटकारस्थान नव्हे, असे 'युगांतर'चे म्हणणे होते. सप्रे यांच्यावरही राजद्रोहाचे आरोप होते; पण ते आजारी पडल्याने त्यांनी माफी मागितली आणि स्वत:ची सुटका करवून घेतली. तरीही केसरीकडे जसे सरकारचे लक्ष गेले तसे ते या वृत्तपत्रांकडे गेले नाही ही वस्तुस्थिती आहे.

हरि माधव पंडित आणि चिंतामणि रामचंद्र केळकर यांनी १८९१ मध्ये देशसेवक हे साप्ताहिक पत्र सुरू केले. पुढे महादेव कृष्ण तथा माधवराव पाध्ये यांच्याकडे त्या पत्राची मालकी तसेच त्याचे संपादकपद आले. पंडित वा पाध्ये हे गोखलेवादी म्हणजेच नेमस्त पंथाचे असल्याने त्यातून टिळकांचे विचार पुढे येईनात. कलकत्ता काँग्रेस १९०६ मध्ये पार पडल्यावर पुढले अधिवेशन नागपुरात होण्याचे ठरले. अशावेळी पाध्ये यांना मदत व्हावी या उद्देशाने टिळकांनी गोपाळराव ओगले यांना नागपुरात पाठवून दिले. ओगले हे महाविद्यालयीन शिक्षण चालू असतानाच चळवळींकडे वळले. ओगले हे नागपुरात गेले, त्याआधी अच्युत बळवंत कोल्हटकर हेही नागपुरात पोहोचले. अच्युतरावांचे वडील वामनराव कोल्हटकर हे नागपूरच्या न्याय खात्यात अधिकारी आणि सुधारणावादी होते. वामनरावांनी अच्युतरावांना 'देशसेवक'मध्ये लिहायला सांगितले. (अच्युतरावांचे पालनपोषण त्यांचे चुलते बळवंतराव यांनी केल्याने ते त्यांचेच नाव लावत.) आपल्या वडलांप्रमाणे अच्युतरावही मवाळ असतील असे वाटल्याने पाध्ये यांनी देशसेवक पाहायला त्यांना परवानगी दिली; पण त्यांनी नेमस्त पक्षाचे धोरण पुढे न रेटता टिळकांच्या जहाल पक्षाचे धोरण आक्रमकरीत्या मांडले. त्यांना शंभुराव गाडगीळ येऊन मिळाले. नागपूर काँग्रेसचे अध्यक्षपद हे टिळकांना देण्यात यावे, असा आग्रह

नागपूरचेच एक तरुण कार्यकर्ते बा. शि. मुंजे यांनी धरला आणि त्यास 'देशसेवक'ने पाठिंबा दिला. त्यातूनच 'देशसेवक'मध्ये अतिजहाल लिखाण प्रसिद्ध होऊ लागले. त्या वेळी मध्य प्रांतात सर रेजिनॉल्ड कॅडॉक याच्यासारखा कडवा नोकरशहा होता, त्याने नागपुरातल्या सर्व जहालांना संपवायचा विडा उचलला. नागपुरात काँग्रेस अधिवेशन भरविण्यात यावे आणि त्याचे अध्यक्षपद टिळकांना देण्यात यावे यासाठी अरविंद घोष यांनी जी आग्रही मागणी केली, तिला प्रसिद्धी दिल्याबद्दल 'देशसेवक'चे संपादक अच्युतराव कोल्हटकर यांना अडीच वर्षांची शिक्षा झाली. आपले नाव संपादकपदी चुकून छापले गेल्याची भूमिका अच्युतरावांनी न्यायालयात घेतली; पण ती मान्य झाली नाही.

अच्युतरावांना शिक्षा झाल्याने वृत्तपत्राचे संपादकपद गोपाळराव ओगले यांच्याकडे आले, तेही टिळक पक्षाचेच असल्याने पत्राच्या धोरणात काहीही फरक पडला नाही. त्यांच्याही लेखनाविषयी आक्षेप घेण्यात आले. 'ज्या लेखावरून हा राजद्रोहाचा खटला भरण्यात आला तो लेख राजद्रोहाचाच आहे, असा मला हुकूम असल्याने मी तो तसा आहे असे न्यायालयात सांगत आहे', असे लेखाचा भाषांतरकार अब्दुल अझिझ याने सांगितल्याने ब्रिटिश सरकारचा दुष्ट हेतू स्पष्ट झाला. गोपाळराव ओगले यांनी स्वत:च स्वत:चा बचाव केला तेव्हा 'त्यांचा बचाव हा त्यांच्या लेखांपेक्षा अधिक राजद्रोही आहे', असे मत न्यायमूर्तींनी व्यक्त केले आणि ओगले यांना शिक्षा सुनावली. सांगायचा मुद्दा हा की, टिळक पक्षाच्या सर्वांना संपवून टाकायची ही सरकारी धडपड होती.

टिळकांचा वाढदिवस साजरा करण्याच्या मिषाने एक तरुण सैयद हैदर रझा हा दिल्लीहून कलकत्त्यात १८ जुलैलाच धडकला. टिळकांना शिक्षा होणार हे गृहीत धरून त्याने जमवाजमव सुरू केली. संपूर्ण देशाचे नेते आणि राजकीय गुरू म्हणून आपण टिळकांकडे पाहतो आणि त्यांना शिक्षा झाल्यास त्याचा बदला घेतला पाहिजे ही त्याची भूमिका. त्याने ती असंख्य सभांमधून मांडली. त्याच्या सभांना मुसलमानांकडून मिळणाऱ्या प्रतिसादाने सरकार हादरले होते. बंगालच्या फाळणीवरून देशातले ठिकठिकाणचे दंगे जरा कोठे कमी होत असतानाच पुन्हा टिळकांच्या अटकेचे निमित्त करून देशभर दंगे घडवले जाणार, असा सरकारचा समज बनला, आणि त्यांच्या दृष्टीने रझा हा हिंदू-मुसलमानांमध्ये फूट पाडायच्या ब्रिटिशांच्या कूटनीतीला सुरुंग लावायला निघाल्याची भूमिका ब्रिटिशांनी घेतली.

टिळकांना देण्यात आलेल्या शिक्षेविषयी देशातल्या आणि विशेषत: मुंबई प्रांतातल्या वृत्तपत्रांचे मत काय आहे त्याची माहिती गोळा करा, असा आदेशच मुंबईच्या सचिवालयातून देण्यात आला. त्याप्रमाणे प्रांतिक प्रशासन ती माहिती गोळा करायला लागले. काळ वृत्तपत्राचे २४ आणि ३१ जुलैचे अग्रलेख, 'ज्ञानप्रकाश'चा २४ जुलैचा अग्रलेख, 'राष्ट्रमत'चा २४ जुलैचा अग्रलेख, केसरीत २८जुलै आणि ४ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध झालेले अग्रलेख, मराठाचे २६ जुलै, २ आणि ९ ऑगस्टचे अग्रलेख यांची चौकशी सरकारने सुरू केली आणि त्या चौकशीचे प्रमुख होते पी. जी. पर्सिव्हल. केळकर हे मराठाचे संपादक होते आणि त्यांच्याकडे वकिलीची सनद होती. सरकारने त्यांची ही सनद रद्द करण्याविषयी कारवाई सुरू केली. तथापि मराठाविषयीची न्यायालयीन कारवाई सप्टेंबरमध्ये सुरू करण्यात आली. त्या वेळी अस्तित्वात असलेल्या प्रेस ॲक्टनुसार संपादकांना एखाद्या कायद्याच्या उल्लंघनाबद्दल अनंत काळपर्यंत अटकेत ठेवता येत होते. त्यानुसार केळकर यांना अटकही झाली. त्यांची अटक ही मराठाच्या मुळावर आली असती. खाडिलकर आणि केळकर या दोघांनीही टिळक तुरुंगातून परत येईपर्यत कोणतेही प्रक्षोभक लिखाण केले जाणार नाही, असे आश्वासन टिळकांना दिले असल्याने केळकरांनी न्यायालयात दिलगिरी व्यक्त करून आपली अटक टाळली होती.

नाशिकमध्ये टिळकांना मानणारा क्रांतिकारकांचा

एक मोठा वर्ग होता. त्यात एक होता अनंत लक्ष्मण कान्हेरे. नाशिकच्या विजयानंद चित्रपटगृहात नाशिकचा जिल्हाधिकारी जॅक्सन याच्यावर कान्हेरे याने गोळ्या झाडल्या. त्यात जॅक्सन मृत्युमुखी पडला. कान्हेरेला पकडण्यात आले, त्याला फाशीही दिले गेले. तात्याराव सावरकरांनी भारतात पाठविलेल्या पिस्तुलांपैकी एक पिस्तूल वापरून कान्हेरेला मारल्याचे पाहून सरकारने या पिस्तुलांचा छडा लावायचा चंग बांधला. या क्रांतिकारकांपैकी काहीजण टिळकांना शिक्षा होण्यापूर्वी भेटले असता त्यांनी त्यांच्या कारवायांबद्दल नापसंती व्यक्त केली. त्यांनी तेव्हा 'तुम्ही जे काही करू इच्छिता आणि ते करणारच असाल तर हे लक्षात ठेवा, की त्याने अनुकूल काही घडणार नाही. त्याने प्रतिकूल तेच घडेल आणि सरकारच्या छळामुळे लोक भयंकर माघार घेतील. पाड लागल्याखेरीज आंबा पिकवत नाहीत आणि तसाच पिकवला, तर तो नासतो हे ध्यानात ठेवा.' या शब्दांत आपल्या भावना व्यक्त केल्या होत्या. अरविंदांना पाठिंबा आणि रेव्होल्यूशनरी कौन्सिलवर काम असे असताना त्यांनी क्रांतिकारकांना सबुरीचा सल्ला द्यावा याचे आश्चर्य अनेकांना तेव्हाही वाटले होते. एक जुने क्रांतिकारक वासुदेवराव लिमये यांनी दिलेल्या मुलाखतीत या गोष्टीचा उलगडा होतो. लिमये यांनी म्हटले होते, की लोकमान्यांचा क्रांतीच्या तयारीला पाठिंबा असे; पण दहशतवादी कारवायांना ते पाठिंबा देत नसत. अरविंदांजवळ त्यांनी यासंबंधात असे म्हटले होते, की अशा कामासाठी लागणाऱ्या पन्नास टक्के यशाची खात्री असेल, तर उरलेल्या पन्नास टक्क्यांसाठी प्रयत्न करायची आपली तयारी आहे. याचाच अर्थ त्यांना पन्नास टक्के यशाची खात्री तेव्हा नव्हती असा होतो, म्हणूनच ते सावधतेने पावले टाकीत. मात्र असे असूनही अरविंदांच्या अनुयायांच्या क्रांतिकार्यास लोकमान्यांचा पाठिंबा होता. त्यांच्याशी ते सल्लामसलत करत. कर्वे-कान्हेरे गटाच्या कार्यकर्त्यांनी जेव्हा गोऱ्या अधिकाऱ्याच्या खुनाची कल्पना मांडली तेव्हा टिळकांनी यामुळे चळवळीला केवळ बाधाच येईल असे नाही, तर तिला माघार घ्यावी लागेल असे म्हटले होते. १८९७ मध्ये टिळकांनी क्रांतिकारकांच्या संदर्भात 'प्रत्येकाने आपल्या अंत:करण प्रवृत्तीनुसार भूमिका घ्यावी' असे म्हटले. बंगाल पेटला तेव्हा महाराष्ट्राने तरी मागे का राहावे, असे वाटूनही असेल त्यांनी मुझफ्फराबादच्या बॉंबस्फोटांचे एका प्रकारे समर्थनच केले. तुम्ही अशीच मनमानी करणार असाल, तर हे असे बॉंबस्फोट होत राहणारच असे त्यांनी सरकारला बजावले आणि तेच राजद्रोहाच्या दुसऱ्या खटल्याचे निमित्त ठरले.

टिळकांच्या अंगी असलेल्या योजकतेने अरविंदांनाही या संघर्षाला वैचारिक पातळीवर न्यायची आवश्यकता वाटली. त्यांनी देशातल्या सर्व क्रांतिकारकांच्या कार्याचे एकत्रीकरण करण्याच्या हेतूने एक 'ऑल इंडिया रेव्होल्यूशनरी कौन्सिल'ची स्थापना केली. या समितीवर अरविंद, टिळक आणि लाला लजपतराय हे होते. याच काळात नाशिकमध्ये कान्हेरे आणि कृष्णाजीपंत तथा अण्णा कर्वे यांनी आपला एक स्वतंत्र क्रांतिकारी गट तयार केला. स्वातंत्र्यवीर सावरकर हे त्यांचे स्फूर्तिदाते होते. सावरकरांनी मॅझिनीच्या 'यंग इटली' या संघटनेच्या धर्तीवर आपली 'अभिनव भारत' ही संघटना उभी केली. या संघटनेच्या कार्यकर्त्यांचे स्फूर्तिस्थान 'काळ'कर्ते शिवराम महादेव परांजपे हे होते.

केसरीच्या ७ जुलै १९१४ च्या अंकात पुण्याच्या कृष्णाजी दत्तात्रय (कृ.द) भोसेकर यांचे एक सविस्तर पत्र प्रसिद्ध झाले, त्यात पोलिसांकडून होणाऱ्या त्यांच्या छळवणुकीविषयी अतिशय हृद्य कहाणी आहे. ते म्हणतात की, गेल्या पाच वर्षांत मला पोलिसांकडून अति त्रास होत आहे व त्यापासून माझे मनस्वी नुकसान होत आहे. यासंबंधीची हकिकत आपल्या पत्रात प्रसिद्ध करावी असे मला अनेकांनी सांगितले होते; पण असा मार्ग पत्करल्याने पोलिसांचा त्रास वाढवून घेणे होय, असे वाटल्याने मी इतके दिवस

तो पत्करला नाही. अनेकांनी मला यासंबंधी गव्हर्नरास पत्र पाठवून दाद लावून घ्यावी असा सल्ला दिल्याने मी त्यांच्यासाठी पत्रही लिहून ठेवले; पण पुढे मार्च महिन्याच्या ११ तारखेस घातलेल्या छाप्यात ते पत्रही जप्त करण्यात आले. त्या वेळी त्यांनी आपण हे पत्र गव्हर्नरांकडे पाठवू, असे सांगितल्याने मी गप्प बसलो. हा अर्ज त्यांच्यापर्यंत गेला वा नाही ते सांगता येत नाही. अखेरीस कंटाळून ही दाद आपल्यापाशी मागतो आहे'. आपल्यावर छापा घालायचे काय कारण ते सांगताना भोसेकर म्हणतात, '१९०९ मध्ये मी व्ही. ज्यू. टेक्निकल इन्स्टिटट्यूटमध्ये शिकत होतो. त्याच साली मे महिन्याच्या सुटीनंतर मला पोलिसांनी पकडले. माझ्यावर ज्वालाग्रही पदार्थांच्या १९०८च्या कायद्याप्रमाणे खटला केला. खटला चालू असता मला तुरुंगात ठेवण्यात आले. अशा स्थितीत तीन महिने काढावे लागले. नंतर हायकोर्टाने मला सोडून दिले. दोषमुक्त होताच मी माझा शिक्षणक्रम पुरा करण्याच्या प्रयत्नास लागलो. खटल्यामध्ये सापडल्यामुळे माझी शेवटची टर्म भरली नव्हती. माझे हे शेवटचे वर्ष होते म्हणून प्रिन्सिपलांची परवानगी मिळाल्यास त्याच वर्षी राहिलेल्या शेवटच्या परीक्षेस बसावे व नंतर इन्स्टिटट्यूटचा संबंध सोडावा असा माझा विचार होता. मला परीक्षेला बसण्याची परवानगी मिळाली नाही इतकेच नव्हे तर बोर्डाची परवानगी घेतल्याशिवाय इन्टिटट्यूटमध्ये येऊ नका, असे मला सांगण्यात आले. प्रिन्सिपलांच्या सांगण्यावरून मी अर्ज पाठविला; परंतु बोर्डाने परवानगी दिली नाही आणि तसे करण्याची कारणेही सांगितली नाहीत. इन्स्टिटट्यूटमध्ये मी केमिस्ट्री अँड केमिकल टेक्नॉलॉजी हा कोर्स घेतला होता. हा विषय शिकवणाऱ्या संस्था जवळपास कोठेही नसल्याने त्या विचाराखालीच माझे वर्ष फुकट गेले. पुढे बडोदा येथील कलाभुवनमध्ये रसायनशास्त्राची प्रयोगशाळा असल्याने मी तेथे गेलो; परंतु तेथील प्रयोगशाळेचा मला काहीच उपयोग झाला नाही. याच सुमारास बंगलोर येथे 'इंडियन इन्स्टिटट्यूट ऑफ सायन्स' या नावाची संस्था होती, तीमध्ये प्रवेश करून घेण्याकरिता मी अर्ज केला. अर्जासोबत मी टेक्निकल इन्स्टिटट्यूटमध्ये मिळालेले सर्टिफिकेट व आणखी एक सर्टिफिकेट पाठविले होते. मला तेथे शिकण्याची परवानगी मिळाली व एक महिन्याने यावे असे तेथील अधिकाऱ्यांनी मला कळविले. त्याप्रमाणे मी गेलो; पण अखेर काहीही कारण न सांगता तुम्हास घेता येत नाही, एवढेच सांगण्यात आले. मी पाठविलेली सर्व सर्टिफिकेट्स पाहूनच मला परवानगी मिळाली व बोलावलेही. असे असता पुन्हा नाही म्हणून सांगण्यास पोलिसांच्या त्रासावाचून अन्य कारण असेल असे मला वाटत नाही. नंतर पुणे येथील सायन्स कॉलेजच्या प्रिन्सिपलास भेटलो. त्यांनी अर्ज कर मग परवानगी देईन असे सांगितले. अर्ज केला; परंतु परवानगी मिळाली नाही. नंतर मी मुंबईस आलो. येथे गजर, केम्प आणि कंपनी व ट्रेचर आणि कंपनी यांच्या प्रयोगशाळेत दाखल होण्याचा प्रयत्न केला; परंतु सर्वांनाच पर्यायाने नकारार्थी उत्तरे द्यावी लागली.'

भोसेकरांनी छळातून सुटण्यासाठी पोलिसांना सात-आठ कबुलीजबाब लिहून दिले होते, त्यात सत्याचा अंश नव्हता, असे त्यांनी म्हटले; पण पुढे ते न्यायालयात बदलले. त्याआधारे न्यायालयात ते निर्दोष सुटले. त्यांची सुटका पोलिसांना अवमानकारक वाटल्याने त्यांनी भोसेकरांचा छळ सुरू केला आणि त्यांना कोठेही प्रवेश मिळणार नाही हे पाहिले. त्याचबरोबर सलग पाच वर्षे त्यांच्या घरी जाऊन त्यांची कागदपत्रे तपासण्याच्या बहाण्याने त्यांचा हा छळ चालूच ठेवला. त्यातून आणखी पाच-सहा महिन्यांनी तुम्हाला तुरुंगात टाकू, असे मुंबईच्या गुप्तचर पोलिसांनी सांगितल्याने त्यांनी हे पत्र केसरीला लिहिले.

भोसेकर यांनी जे लिहिले ते अर्धसत्य आहे. त्यांनी त्या पत्रात उल्लेख केला नसला तरी ते सेनापती बापट यांना १९०८ मध्ये भेटले होते. त्या वेळी ते पंचविशीचे असावेत. सेनापती बापटांपेक्षा दोन वर्षांनी लहान. भोसेकरांची भेट झाल्यानंतर सेनापती बापट पारनेरला न जाता एप्रिल १९०८ रोजी कलकत्त्याला



गेले. दुसऱ्या दिवशी ते हेमचंद्र दास यांना भेटले. बारीन्द्र घोष आणि उल्लासकर दत्त यांना त्यांनी बॉंब तयार करण्यास मदत केली. बापट वेगळ्याच कारणासाठी कलकत्त्यास गेले होते. बारीन्द्र घोष हे त्यांच्या मित्रांच्या साह्याने बॉंबचा वापर करणार असल्याचे कळल्यानंतर त्यांनी तसे न करता थोडे दमाने घ्यावे, असा सावरकरांचा निरोप देण्यासाठी खरे तर बापट कलकत्त्यास गेले होते. चार-दोन इंग्रज अधिकाऱ्यांना ठार केल्याने काही साध्य होणार नाही, त्यापेक्षा देशव्यापी सशस्त्र उठाव करण्यासाठी ठिकठिकाणी बॉंबचे कारखाने काढावेत आणि गुप्त मंडळींचे जाळे विणून त्यांची एक अभेद्य मोठी संघटना बांधावी, असा सल्ला देण्यासाठी बापट कलकत्त्यास गेले होते; पण त्यांना निराश होऊन परतावे लागले, असे फडके लिहितात. (बंदुकांचा कारखाना उभारायच्या हेतूने खाडिलकरांना टिळकांनी नेपाळमध्ये पाठवलेले होते हे या ठिकाणी लक्षात घ्यायला हवे.) बापट परत यायला निघाले आणि वाटेत धुळे येथे त्यांची व लोकमान्यांची मुंबई प्रांतिक परिषदेच्या निमित्ताने गाठ पडली. कलकत्ता येथे आपल्याला आलेले अनुभव अर्थातच बापटांनी टिळकांच्या कानावर घातले असणार यात शंकाच नाही.

लोकमान्यांच्या आयुष्यात १९१६ या वर्षाला अतिशय महत्त्वाचे स्थान होते. याच वर्षी ते स्वराज्यासाठी सर्वाधिक हिंडले. ४ फेब्रुवारी १९१६ रोजी काशीच्या हिंदू विश्वविद्यालयाची कोनशिला बसली. त्यास हिंदुस्थानच्या विविध विद्यापीठांचे कुलगुरू आणि हिंदुस्थानचे व्हाइसरॉय लॉर्ड हार्डिंज उपस्थित होते. काश्मीर, कोटा, दरभंगा, डोंगरपूर, दातिया, अलवार, बिकानेर, जोधपूर आदी ठिकाणांचे संस्थानिकही हजर होते. या विश्वविद्यालयाच्या कोनशिला समारंभाचे वृत्त ८ तारखेच्या केसरीत सविस्तर प्रसिद्ध झाले. विशेष हे की, या वृत्ताच्या प्रारंभी अंजुमन इस्लामियाचे अध्यक्ष सैयद महफूज यांचा काव्यमय संदेश प्रसिद्ध करण्यात आला होता. 'बनता है काशीजीमें बडा विश्वविद्याशाला:, अब हिंदुओं को विद्या पढनेका सुतार हुआ। असे हे काव्यही मोठे आणि गमतीशीर आहे. याच अंकात 'काशी येथील नवीन विद्यापीठ' हा अग्रलेख आहे. लॉर्ड हार्डिंज येणार असल्याने असेल किंवा टिळकांचे सर्व धर्मियांना एकत्र आणण्याचे प्रयत्न चालले होते म्हणूनही असेल, पंडित मदन मोहन मालवीय यांनी या कोनशिला समारंभास लोकमान्य टिळकांना निमंत्रणच दिलेले नव्हते. लॉर्ड हार्डिंज यांनी आपल्या भाषणात 'येथे आर्यजनांचा मेळा भरला असल्या'चा उल्लेख केल्याचे अग्रलेखात म्हटले आहे.

लखनौमध्ये १९१६ च्या डिसेंबर अखेरीस काँग्रेसचे अधिवेशन भरले असतानाच त्याच परिसरात पण अन्यत्र मुस्लिम लीगच्या अधिवेशनात मात्र जिनांवर कडव्या पुराणमतवाद्यांनी कडाडून टीका केली. टिळकांबरोबर करार करून जिनांनी मुस्लिमांच्या हिताचा बळी दिल्याची ही टीका होती. विशेषत: पंजाबच्या नेत्यांनी त्यांच्यावर अधिक कडवट टीका केली. जिनांनी वकिली पद्धतीनेच काँग्रेसने संमत केलेल्या कराराचे समर्थन केले आणि त्या कराराला मुस्लिम लीगची संमती मिळवली. जिना हे १९१३ मध्ये अखिल भारतीय मुस्लिम लीगचे

अधिकृत सदस्य बनले; पण ते मुस्लिम लीगमध्ये काँग्रेसचे प्रतिनिधी होते. जिना आणि टिळक यांच्यात जो सलोखा झाला होता त्यामागे जिनांनी त्यांचे घेतलेले वकीलपत्र हे कारण नव्हते. मात्र टिळकांविषयी जिनांच्या मनात आदरयुक्त दरारा होता. २ जुलै १९०८ रोजी जेव्हा मुंबई उच्च न्यायालयात टिळकांच्या जामीनकीसाठी न्यायमूर्ती दिनशा दावर यांच्यासमोर जिना उभे राहिले, तेव्हा बद्रुद्दिन तय्यबजी यांनी टिळकांना दिलेल्या जामिनाच्या निकालाचे उदाहरण देऊन त्यांना जामीन मंजूर करण्यात यावा, असा आग्रह त्यांनी धरला, तेव्हा तो फेटाळण्यात आला. टिळकांना शिक्षा करायचीच हा न्यायमूर्ती दावर यांचा डाव होता. तो खटलाच सर्वस्वी अतिशय दुष्टाव्याने चालला होता हे १९१६ च्या राजद्रोहाच्या तिसऱ्या खटल्यात स्पष्ट झाले. याच काळात लोकमान्यांवर अनेक जणांनी बऱ्याच काव्यरचना केल्या; पण १९०८ मध्ये जेव्हा राजद्रोहाच्या आरोपावरून टिळकांना पकडण्यात आले त्या वेळी तेव्हाच्या संयुक्त प्रांताचे एक नेते हसरत मोहानी यांनी टिळकांवर काव्य रचले होते. ते असे,

ऐ तिलक ऐ इफ्तख़ारे जज्बए हुब्बे वतन
हक शनासो, हकपसंदो, हक यकीनो हक सुखन
तुझसे कायम है बिना आजादिये बेबाक की
तुझसे कायम है अहले इख्लासो वफाकी अंजुमन
सबसे पहले तूने की बर्दाश्त ऐ फर्जन्दे हिन्द
खिदमते हिन्दोस्ताँ में कुल्फते कैदे महन
जात तेरी रहनुमाए राहे आजादी हुई
थे गिरफ्तारे गुलामी वरन: याराने वतन
तूने खुद्दारी का फूंका ऐ तिलक ऐसा फुसूँ
यक कलम जिससे खुशामद की मिटी रस्मे कुहन
नाज तेरी पैरवीपर हसरते आजाद को
ऐ तुझे कायम रखे तादेर रब्बे जुलमनन

( हे देशाच्या सुपुत्रा, हे टिळक, हे देशभक्तीपूर्ण भावनेच्या अभिमान्य, संवेदनेच्या स्तरावर अगदी अस्सल, असाधारण सत्यवचनी, श्रद्धेतही परिपूर्ण आणि आपल्या विचारांमध्ये ठाम, तुला सलाम. हे धैर्यवान स्वातंत्र्याच्या पुरस्कर्त्या, तू कीर्तिवान, शुद्ध चारित्र्याचा समाज संघटक आणि प्रामाणिक व्यक्तिमत्त्वाच्या युगपुरुषा, हे भारतभूच्या सुपुत्रा, तुला भारताच्या स्वातंत्र्यासाठी तुरुंगात जावे लागले, तू आहेस म्हणून, अन्यथा असंख्य जीवांना गुलामगिरीच्या जोखडाखालीच राहावे लागले असते. स्वतंत्र प्रज्ञेचा हा हसरत तुझ्या पावलांवर पाऊल टाकून वाटचाल करणार आहे. आपल्या कार्यसिद्धीसाठी परमेश्वर तुला दीर्घायुरारोग्य देवो.)

सैयद फज़ल उल हसन या नावाने परिचित असणाऱ्या या व्यक्तिमत्त्वाने आपल्या शायरीला शोभेलसे हसरत मोहानी हे नाव घेतले होते. त्यांची आपल्या तरुण वयातच टिळकांवर श्रद्धा जडली होती. टिळकांच्या अनेक चरित्रकारांनी टिळक आणि जिना या गुरुशिष्यांच्या जोडीकडे ज्या तऱ्हेने पाहायला हवे होते त्या तऱ्हेने पाहिलेले नाही. टिळकांचा जन्म १८५६ तर जिनांचा १८७६ चा. म्हणजेच टिळक जिनांपेक्षा वीस वर्षांनी मोठे होते. हसरत मोहानी जिनांपेक्षा एक वर्षाने मोठे. म्हणजेच ते टिळकांपेक्षा १९ वर्षांनी लहान. टिळकांच्या बहुतेक चरित्रकारांनी हसरत मोहानी यांच्या टिळकभक्तीकडेही जसे पाहायला हवे होते तसे पाहिलेले नाही. हसरत मोहानी यांनी आपल्या विद्यार्थी दशेतच टिळकांना आदर्श मानले. १९००मध्ये एम. ए. ओ कॉलेजमध्ये बी. ए. ला असताना एकदा त्यांच्या मित्रवर्गात चर्चा झाली. त्यात त्यांना आवडणाऱ्या एका नेत्याबद्दल विचारले होते. तेव्हा काहींनी दादाभाई नौरोजी, तर काहींनी सुरेंद्रनाथ बॅनर्जी अशी नावे घेतली. इतरांनीही त्या काळातल्या अन्य नेत्यांची नावे घेतली. अनेक विद्यार्थ्यांनी सैयद अहमद खान यांची निवड केली. हसरत मोहानी यांनी मात्र टिळकांचे नाव घेतले. ते तत्त्वज्ञ आणि आपले मार्गदर्शक असल्याचे त्यांनी म्हटले. एवढेच नव्हे तर ते आपले राजकीय गुरू असल्याचे त्यांनी जाहीर केले. टिळकांना भेटण्याची त्यांनी एकही संधी सोडलेली नव्हती. आपल्या

गुरुस्थानी असलेला नेता अगदी जवळून कसा दिसतो ते त्यांनी अनुभवले. १९०४ मुंबई काँग्रेसमध्ये, १९०५बनारस काँग्रेसमध्ये आणि कलकत्ता काँग्रेसमध्ये त्यांनी टिळकांबरोबर कामही केले. भारताचे नेतृत्व करण्यासाठी नेता कसा असायला हवा याचे आदर्श उदाहरण म्हणजे लोकमान्य टिळक, असे त्यांनी आपल्या एका लेखात म्हटले आहे. टिळकांवर असलेल्या या श्रद्धेपायीच आपण सुरत काँग्रेसमधून त्यांना बाहेर काढले जाईपर्यंत त्यांच्यासमवेत राहिलो आणि काही वार अंगावरही झेलले असे त्यांनी म्हटले आहे. मौलाना बनलेले हसरत मोहानी हे कृष्णभक्त होते. ते मथुरेला जन्माष्टमीच्या दिवशी न चुकता जात असत. त्यांच्या या गोष्टीचा अनेकांना विसर पडला. त्यांच्या 'चुपके चुपके रातभर आँसू बहाना याद है' या अफलातून गझलेची मात्र सर्वांना याद आहे.

लोकमान्य टिळकांनी याच काळात पंजाबला भेट द्यायचा निर्णय घेतला. एकीकडे लष्करीकरणासाठी प्रचार आणि ध्येय जवळ येत चालले आहे. दुसरीकडे पंजाबचा दौरा, या टिळकांच्या धोरणाने सरकार पेचात पडले. लष्करात जा, सांगण्यासाठी १७ फेब्रुवारी १९१७ रोजी बोलावलेली सभा पार पडताच पुण्याच्या पोलिसांनी टिळकांवर दिल्लीत प्रवेशबंदीचा हुकूम बजावला. त्यानंतर लगेचच त्यांना पंजाबमध्येही प्रवेशबंदी करण्यात आली. १९१५ पासून पंजाबमध्ये गदर पार्टीने जोर धरला. अमेरिकेत आपल्या कार्यक्रमांनी गदर पार्टीने लक्ष वेधून घेतले होते. १९११ मध्ये विष्णू गणेश पिंगळे या तरुणाने हाँगकाँगमार्गे अमेरिका गाठली. गदर पार्टीचा तो क्रियाशील सदस्य बनला. विष्णू गणेश पिंगळे आणि सत्येन भूषण सेन, कर्तारसिंग सराभा या गदर सदस्यांनी एस. एस. सलामिन या बोटीने अमेरिका सोडली आणि ऑक्टोबर १९१४ च्या मध्याला त्यांनी चीनमध्ये प्रवेश केला. त्यांनी डॉ.सन-यत सेन आणि ताहलसिंग यांची भेट घेतली. सन-यत सेन यांची इंग्रजांना नाराज करण्याची तेवढी तयारी नव्हती. मात्र ताहलसिंग यांनी आत्माराम कपूर, संतोषसिंग, शिवदयाळ कपूर यांना पूर्व तयारीसाठी बँकॉकला पाठवून दिले. नोव्हेंबर १९१४मध्ये पिंगळे, सत्येन सेन, कर्तारसिंग कलकत्त्यात पोहोचले. पिंगळेची जतिन मुखर्जी यांच्याशी प्रदीर्घ काळ चर्चा झाली. त्यांनी राशबिहारी यांच्याशी चर्चा करायला त्याला बनारसला पाठवले. त्याचवेळी ब्रह्मदेशाने मेसोपोटोमियात पाठवलेल्या; परंतु तिथून परतलेल्या काही शीख सैन्याबरोबर त्याची गाठ पडली. त्या काळी बनारस हे बंडखोरांच्या कारवायांचे आगर होते. लोकमान्य टिळक यांची १९१४ मध्ये मंडालेतून सुटका होताच बनारसमध्ये देशभक्तीच्या सागराला उधाण आले. तिथे पिंगळेने सुंदरलालची गाठ घेतली. सुंदरलाल हा मुझफ्फरनगरच्या तोतारामचा मुलगा. तोतारामला १९०७ मध्ये शिवजयंती कार्यक्रमात स्फोटक भाषण केल्याबद्दल पकडण्यात आले होते. १९१४ च्या प्रारंभापासूनच बनारसमध्ये असलेले राशबिहारी यांचे पिंगळेशी गुफ्तगु झाले तेव्हा प्रत्यक्षात राशबिहारी हे जखमी अवस्थेत होते. एका बाँबचे कवच हाताळताना झालेल्या स्फोटात ते जखमी झाले. त्यांच्याबरोबरच्या चर्चेनंतर पिंगळे लाहोरमध्ये दाखल झाला. पिंगळे, राशबिहारी बोस, सचिन सन्याल, कर्तारसिंग हे लाहोरच्या सैन्यात बंड घडवून आणायच्या तयारीत होते. जानेवारी १९१५ च्या मध्याला त्यांच्या हाती जर्मन शस्त्रास्त्रे पडली. विनायकराव कपिले यांनी कलकत्त्याहून सोबत आणलेले बाँबही त्यांना दिले. १९ फेब्रुवारी १९१५ रोजी सैन्यात बंड घडवून आणायचे निश्चित झाले. हा दिवस आधी ठरवलेल्या दिवसाच्या बराच अलीकडचा होता. २६ पंजाब, ७ राजपूत आणि बलूच १३० आणि २४ जाट आर्टिलरी या सैन्याच्या तुकड्यांमध्ये हे बंड घडणार होते. त्यासाठी मोठीच तयारी होती. त्या कटाची माहिती सरकारच्या हाती पडली आणि त्याने धरपकड सुरू केली.

मुंबई पोलिसांच्या गुप्तवार्ता खात्याने मिळवलेल्या माहितीनुसार एक अख्खी रेजिमेंट उद्ध्वस्त करता येईल एवढा दारूगोळा वेगवेगळ्या

ठिकाणी पकडलेल्या गदर समर्थकांकडे होता. रावळपिंडी, फिरोझपूर आणि लाहोर या ठिकाणच्या कँटोन्मेंटमध्ये घुसून तिथला दारूगोळा हस्तगत करण्याचाही कट रचण्यात आला होता. तिकडे दिल्लीत लॉर्ड हार्डिंजला मारायला पिंगळेबरोबर १० बाँब होते. त्या वेळी जर ही सशस्त्र क्रांती घडती, तर ती १८५७ पेक्षा अधिक प्रभावी ठरली असती. पिंगळेला मेरठमध्ये, तर इतरांना वेगवेगळ्या ठिकाणी पकडण्यात आले. बनारसहून मेरठला जाताना पिंगळे २३ मार्च १९१५ रोजी सापडला. तेव्हा त्याच्यासमवेत अठरा पेट्या दारूगोळा होता. तो मेरठच्या बराकींमधले अर्धेअधिक सैन्य संपवून टाकण्यास पुरेसा होता. त्या वेळी क्रांतिकारकांनी केलेली ही सज्जता पाहून त्यांना रोखण्यासाठी नेपाळच्या नरेशांनी आपल्या सहा हजार सैनिकांना इंग्रजांच्या दिमतीला दिले. फक्त राशबिहारी बोस जपानमध्ये पळून जाण्यात यशस्वी झाले. पिंगळे, कर्तारसिंग, हरनामसिंग आणि भाई परमानंद यांना लाहोरच्या तुरुंगात १६ नोव्हेंबर १९१५ रोजी फाशी देण्यात आली.

पिंगळेचा दयेचा अर्ज खुद्द लोकमान्यांनी लिहून पिंगळेच्या भावास दिला होता; पण त्याचा उपयोग झाला नाही. त्या वेळी या लाहोर कटाच्या खटल्यात २९१ जणांना गुंतवण्यात आले होते. त्यापैकी पिंगळेसह ४२ जणांना फाशी झाली. ११४ जणांना जन्मठेप तर ९३ जणांना वेगवेगळ्या तुरुंगवासाच्या शिक्षा सुनावण्यात आल्या. आणखी ४२ जण त्या खटल्यात निर्दोष सुटले. हा पहिलाच खटला असेल ज्यात एवढ्या मोठ्या समूहाला फाशीच्या शिक्षेला सामोरे जावे लागले. या खटल्याने अमेरिकेतल्या गदर पार्टीच्या हालचालींकडे लक्ष वेधले गेले. अमेरिकेत गदर पार्टीचे कार्यकर्ते एकदम आक्रमक झाले. त्यांच्या त्या संघर्षात काही जणांचा बळीही गेला. १९१७ मध्ये त्या वेळी झालेल्या या कटाला हिंदू-जर्मन कॉन्स्पिरसी' (इंडो-जर्मन कॉन्स्पिरसी) म्हणून ओळखले गेले. सॅन फ्रान्सिस्कोच्या जिल्हा न्यायालयात १२ नोव्हेंबर १९१७ रोजी या कटाच्या खटल्याची प्रारंभिक सुनावणी झाली. हा कट मे १९१७ मध्ये अमेरिकेत उघडकीस आला. भारतात उठाव घडवून आणण्यासाठी जर्मनीने भारतीय गदर पार्टीच्या समर्थकांना मदत दिली होती. खटला प्रत्यक्षात २० नोव्हेंबर १९१७ ते २४ एप्रिल १९१८ या दरम्यान चालला आणि भारतीय वंशाचे ८ जण त्या कटाच्या खटल्यात दोषी आढळले आणि त्यांना अमेरिकेतून हद्दपार करण्यात आले. या खटल्यादरम्यान एकच दुर्घटना घडली. न्यायालयीन कामकाजाच्या मधल्या सुटीत रामचंद्र या गदर पार्टीच्या कार्यकर्त्यास त्याचाच एक साहायक रामसिंग याने गोळ्या घालून ठार केले. या खटल्यादरम्यान इंग्लंडने सर्व कारस्थान्यांना भारतात पाठवायची मागणी केली होती. त्यावर अमेरिकेच्या जनतेने भारतीयांना पाठिंबा देऊन या दोषी व्यक्तींना इंग्रज राज्यकर्त्यांच्या हाती सोपवण्यास विरोध केला. अमेरिकेच्या न्याय खात्याने जगाच्या इतिहासात पहिल्यांदाच असेल, इंग्लंडची मागणी धुडकावून लावली आणि भारतीयांना इंग्रजांच्या हाती दिले नाही.

अमेरिकेने तेव्हाचे ब्रिटिश राजदूत सेसिल स्प्रिंग राईस यांना सांगितले की, अमेरिकेत राहून ब्रिटनच्या विरोधात कोणतीही हालचाल करू नये, असे अमेरिकेच्या कोणत्याही कायद्यात लिहिलेले नाही. गदर पार्टीपैकी लाला हरदयाळ यांना अमेरिकेने एकदाच अटकाव केला होता; पण त्यांना हद्दपार केले जाण्यापूर्वीच त्यांनी अमेरिकेतून कॅनडात स्थलांतर केले, पुढे काही काळाने ते अमेरिकेत परतले. लाला हरदयाळ हे क्रांतिकारक तर होतेच; पण आयसीएस बनूनही त्यांनी शासकीय सेवा नाकारली. लाला लजपतराय यांचे ते पाठीराखे होते. लाला लजपतराय यांना गदर पार्टीच्या कार्यकर्त्यांशी बोलणी करायला लोकमान्य टिळकांनी अमेरिकेत पाठवले होते, त्याप्रमाणे ते १९१७मध्ये ते अमेरिकेत गेले. १९२०पर्यंत ते तिथेच होते. पांडुरंग सदाशिव खानखोजे हे असेच टिळकभक्तीत वाढलेले

क्रांतिकारक. त्यांचा जन्म १८८३ चा. ते वर्ध्याचे. अवघ्या तेराव्या वर्षी त्यांनी वर्धा येथे बालसमाज स्थापन केला. १८९७ मध्ये टिळक तुरुंगात असताना वर्ध्यास आलेल्या एका मुलाने टिळकांनी एक गुप्त संघटना काढल्याचे सांगताच खानखोजे यांनाही स्फुरण चढले. १८९८मध्ये पांडुरंग यांचा विवाह करायचा घाट घातला असता त्यांनी तिथून पळ काढला. पुढे टिळकांनी त्यांच्यातला उत्साह पाहून त्यांना अमेरिकेला जायला सांगितले. अमेरिकेला जाऊन खानखोजे यांनी गदर पार्टीची स्थापना केली. खानखोजे हे क्रांतिकारकांचे अग्रणी ठरले. केवळ ब्रिटिशांच्या विरोधात त्यांनी संघटन केले असे नाही, तर त्यांनी शेतीमध्येही क्रांतिकारक विचार पेरला.

एकीकडे चुचकारणे, तर दुसरीकडे हडेलहप्पी, हे इंग्रजांचे धोरण चालूच होते. एप्रिल १९१७ मध्ये काँग्रेस पक्षाचे ३२ वे अधिवेशन कलकत्त्यास भरणार होते, त्यासाठी टिळक तिकडे रवाना झाले. गांधीजी, समर्थ, प्रा. काळे आणि देवधर त्यांच्याच रेल्वेत होते. या अधिवेशनाच्या अध्यक्षपदी ॲनी बेझंट या होत्या. कलकत्त्यात आले, की मोतीबाबूंची (मोतीलाल घोष) भेट झाली नाही असे कधीच झालेले नाही. मागल्या वर्षी (तसे सहा महिन्यांपूर्वीच) लखनौ काँग्रेसनंतर मुद्दामहूनच टिळक त्यांना भेटायला कलकत्त्यास गेले. आताही ते त्यांना भेटलेच; पण त्यांच्यासह टिळकांनी कलकत्त्यास तेव्हा असलेल्या कार्लेकर सर्कसला प्रो. कार्लेकरांच्या निमंत्रणावरून उपस्थित राहायचे ठरवले. कलकत्त्याच्या महाराष्ट्र मंडळाने टिळकांचा सत्कार करून त्यांना त्याच दिवशी दिलेले सुवर्णपदकही मोतीबाबूंच्या हस्ते टिळकांनी कार्लेकरांना दिले. कलकत्त्याच्या काँग्रेसमध्ये विलायतेला पाठवायच्या आपल्या शिष्टमंडळाविषयी चर्चा व्हायची होती. (एकोणिसाव्या शतकात विलायत या शब्दाचा वापर सर्वप्रथम आढळतो, असे ऑक्सफर्ड शब्दकोशात म्हटले आहे. मेरि शेरवूड यांनी आपल्या बालसाहित्यात तो केल्याचे त्यांनी म्हटले आहे. उर्दू आणि फारसी या भाषांमध्ये विलायत म्हणजे युरोपचा भाग किंवा इंग्लंड, असेही कोशकर्त्यांचे म्हणणे आहे. भारतात हा प्रयोग टिळकांच्या लेखनात प्रकर्षाने जाणवतो.) ज्यांना त्या शिष्टमंडळात घेण्यात आले होते, त्यांची इंग्लंडला जाण्याची तयारी नव्हती आणि ज्यांना जायची इच्छा होती त्यांना नेमण्यात आले नाही.

टिळकांच्या होमरूल लीगने-स्वराज्य संघाने-बॅ. बॅप्टिस्टा यांना, तर ॲनी बेझंट यांच्या होमरूल लीगने बॅ. अय्यर यांना विलायतेला पाठवायचे निश्चित केले. आता विलायतेत जाऊनच चळवळ उभारावी लागेल आणि आपण पुढेमागे तिथे जाणारच आहोत, तेव्हा सर्वाथाने योग्य व्यक्ती या नात्याने टिळकांनी बॅप्टिस्टा यांचे नाव पुढे केले. तिथे गेल्यावर कोणी कोणती योजना मांडावी याविषयी त्यांच्यात बराच खल झाला. काँग्रेसने आपली आणि लीगची एक स्वतंत्र योजना जाहीर केली; पण त्यांचे शिष्टमंडळ ठरलेले नव्हते. तेव्हा टिळकांनी बॅ. बॅप्टिस्टा यांना काँग्रेसचीच योजना मांडून तिचा प्रसार करावा, असे स्पष्ट केले. कलकत्त्याची काँग्रेस ज्यांच्या अध्यक्षतेखाली भरली त्या ॲनी बेझंट यांना सरकारने अधिवेशनानंतर लगेचच अटक करून त्यांच्याविरोधात खटला भरण्याची तयारी केली. टिळकांनी त्यावर केसरीत 'बेझंटबाईंवर व स्वराज्यावर हल्ला' या शब्दांत अत्यंत तिखट भाषेत अग्रलेख ( १९ जून १९१७) लिहिला. बेझंटबाईंवर सरकारने केलेल्या कारवाईवर एका वर्षात टिळकांनी लिहिलेला हा दुसरा अग्रलेख होय. त्या आधी जेव्हा त्या मुंबईत आल्या, तेव्हा मुंबई सरकारने त्यांच्याविरोधात शांततेचा भंग होईल, या भीतीने 'डिफेन्स ऑफ इंडिया' कायद्यान्वये कारवाई करण्याची धमकी दिली. त्यावर टिळकांनी 'बेझंटबाईंवर हल्ला' या शीर्षकाचा अग्रलेख लिहिला होता ( १८ जुलै १९१६ ). त्यात ते म्हणाले होते की, 'बेझंटबाईंजवळ सैन्य नाही, हत्यारे नाहीत, दारूगोळा नाही, बाँब नाहीत, इतकेच नव्हे तर, त्या जात्या इंग्रज असल्यामुळे इंग्रजी राजसत्ता हिंदुस्थानातून कधी तरी नाहीशी व्हावी अशा तऱ्हेचा स्वल्प विचारही त्यांच्या

डोक्यात नाही. उलट त्यांनी असे प्रसिद्ध केले आहे की, स्वराज्यासंबंधी जो उद्योग त्यांनी आरंभला आहे तो हल्लीच्या प्रसंगी अराजनिष्ठ विचार लोकांच्या मनात न येता राजनिष्ठपणे आणि शांतपणेच आपली स्थिती सुधारण्याच्या उद्योगास लोकांनी लागावे एवढ्यासाठीच होय... मग बेझंटबाईंवर डिफेन्स ॲक्टच्या तलवारीचा जो तीव्र आघात करण्यात आला यातील हेतू काय?'

ब्रिटिशांच्या विरोधात एका बाजूने जेवढा म्हणून संघर्ष करता येईल तेवढा त्यांनी केलाच; पण दुसरीकडे ॲनी बेझंट यांच्यासारख्या नंतरच्या काळात मवाळपणाकडे वळलेल्या महिलेला दोन शब्द सुनवायलाही कमी केले नाही. बेझंटबाईंच्या विरोधात कारवाई करणाऱ्या ब्रिटिश सरकारवरही त्यांनी कडक टीका केली. आपल्याला विरोध करणाऱ्या नामदार गोखले यांनी वेल्बी कमिशनपुढे दिलेल्या साक्षीचे टिळकांनी तोंड भरून कौतुक केले; पण जेव्हा त्यांच्या काँग्रेस प्रवेशास खोट्या सबबी देऊन त्यांनी विरोध सुरू केला तेव्हा 'गोखले काय किंवा टिळक काय, दोघांच्याही गोवऱ्या ओंकारेश्वरी गेल्या असताना आपण कशासाठी भांडत राहायचे?, असा त्यांना सवालही त्यांनी केला. 'देशाचे दुर्दैव' या अग्रलेखात त्यांनी अँग्लो-इंडियन वृत्तपत्रकारांना झोडपायलाही कमी केलेले नाही. ते लिहितात, 'कित्येक अँग्लो-इंडियन वर्तमानपत्रकारांनी 'शंभर बंदुका किंवा दहा-पाच बाँबगोळे केल्याने इंग्रजी राज्य जाते काय?', असा उर्मटपणाने प्रश्न विचारून या तरुण मंडळींचा उपहास केलेला आहे. या पत्रकारांस आमची अशी सूचना आहे की, हा उपहासाचा विषय नव्हे. ज्या बंगाली गृहस्थांनी या भयंकर गोष्टी केल्या, ते काही चोराच्या किंवा बदमाषाच्या वर्गातले नव्हेत. तसे असते, तर त्यांनी हल्लीच्या प्रमाणे पोलिसांपुढे मोकळेपणाने जबाबही दिले नसते. बंगालमधील तरुण पिढीचा गुप्त कट हा जरी रशियातील बंडखोर लोकांप्रमाणे अधिकाऱ्यांचे गुप्त खून करण्याकरिता झाला असला, तरी तो स्वार्थाकरिता नसून अनियंत्रित आणि बलाढ्य अशा गोऱ्या अधिकारीवर्गाच्या एकमुखी सत्तेने उत्पन्न झालेल्या संतापामुळे होय.' टिळकांनी या अग्रलेखाच्या शेवटी जे लिहिले ते नुसते परखडच नव्हे तर ते ब्रिटिशांच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालणारे होते. ते लिहितात, 'राज्यकर्त्या अधिकाऱ्यांचा खून न होण्यास प्रजेने साहाय्य करावे हा प्रजेचा ज्याप्रमाणे धर्म आहे, त्याप्रमाणेच राज्यपद्धती बेजबाबदार न ठेवता सध्याच्या कालमानाप्रमाणे लोकमताचा त्यात समावेश करणे हे राज्यकर्त्यांचेही कर्तव्य होय. हे कर्तव्य विसरून जाऊन किंवा त्याच्याकडे दुर्लक्ष करून राज्यकर्त्या पुरुषांनी प्रजेचा धर्म मात्र त्यांजकडून असिधाराव्रताप्रमाणे पाळवणे शक्य नाही. इतकेच नव्हे तर दोघांपैकी कोणासही फायदेशीर व्हावयाचे नाही, असे राज्यधर्मशास्त्र कंठरवाने सांगत आहे. हा धर्म जेथे सुटला, तेथे कधी ना कधी तरी मुझफ्फरपूरप्रमाणे अनर्थ घडणे अपरिहार्य आहे. हे अनिष्ट प्रकार घडू नयेत, अशी जर राज्यकर्त्यांची इच्छा असेल, स्वत:च्या राज्यपद्धतीसच त्यांनी पहिल्याने आळा घालावा, अशी त्यांस आमची सूचना आहे.' यापेक्षा अधिक स्पष्ट काय लिहावे. ते लिहिले म्हणून तर त्यांना राजद्रोहाच्या आरोपाखाली सहा वर्षांच्या काळ्या पाण्याची शिक्षा ठोठावण्यात आली.

अशा या ज्वलज्जहाल संघर्षपुरुषाचा १ ऑगस्ट २०२० च्या स्मृतिशताब्दीदिनी राज्यकर्त्या वर्गास जो विसर पडला तो तरी दुसरे काय सांगतो? ज्यांच्या सततच्या संघर्षामुळे आपण आज अधिकारी वर्ग म्हणून स्वत:ला म्हणवून घेऊ शकतो आहोत, त्यांचा विसर व्हावा हे लक्षण चांगले नाही.

▣▣▣

लेखक ज्येष्ठ संपादक आणि 'मंडालेचा राजबंदी' या पुस्तकाचे लेखक आहेत.

**अरविंद गोखले**
एन-४, सरस्वती, निरंत वसाहत, बिबवेवाडी, पुणे-३७
चलभाष : ९८२२५५३०७६
ईमेल : arvindgokhale@gmail.com

# लोकमान्यांचा भाषाविचार

**महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या स्थापनेत मोलाची भूमिका बजावणारे लोकमान्य टिळक यांच्या स्मृतिशताब्दीच्या सांगतेनिमित्त मसापचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांचे 'लोकमान्य टिळकांचा भाषाविचार' या विषयावरील भाषण आकाशवाणीच्या सर्व केंद्रांवरून प्रसारित करण्यात आले ते भाषण लेखरूपात..**



**प्रा. मिलिंद जोशी**

ज्या वेळी भारत निर्धन, नि:शस्त्र, नि:सैनिक आणि परतंत्र होता आणि ब्रिटिशांच्या साम्राज्यावर सूर्य मावळत नव्हता तेव्हा ब्रिटिश साम्राज्यशाहीला जबरदस्त हादरा देणारे आशिया खंडातील पहिले पुढारी म्हणून लोकमान्य टिळकांचा उल्लेख करावा लागेल. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी लोकमान्यांचा गौरव करताना म्हटले होते, 'महाराष्ट्राच्या विभूषणाला, आर्यधर्माच्या अभिमानाला, नीतिमत्तेच्या निपुणतेला, स्वदेशप्रीतीच्या उद्धवाला, त्या लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांना त्रिवार वंदन! टिळकांच्या निधनानंतर महात्मा गांधींनी त्यांना श्रद्धांजली वाहताना म्हटले होते'– A giant among men has fallen. The voice of a lion is hushed. He was the idol of the people. His word was law among thousands' ज्यांचा शब्द हजारो देशवासियांसाठी प्रमाण होता असे टिळकांचे व्यक्तिमत्त्व होते क्रांतिकारकांचे स्फूर्तिदाते असणारे आणि नंतर योगी झालेले अरविंद घोष यांनी टिळकांसंदर्भात म्हटले होते, 'ज्या वेळी जगातल्या साऱ्या शक्ती निष्प्रभ होतात तेव्हा जी शक्ती उभी राहते तिचे नाव लोकमान्य बाळ गंगाधर टिळक.' लोकमान्य टिळक हे भारतीय असंतोषाचे जनक होते. ते कोसळत्या आभाळाला सावरणारे नरकेसरी होते.


वासुदेव बळवंत यांच्या व्यायामशाळेत तरुण वयात टिळक जात होते. वासुदेव बळवंतांच्यावर खटला

चालू असताना तो ऐकण्यासाठी टिळक आणि आगरकर जात. वासुदेव बळवंत या देशभक्ताला यश मिळाले नाही कारण या देशभक्ताच्या पाठीशी लोक नावाची शक्ती उभी राहिली नाही, असे टिळकांना वाटत होते. टिळक आगरकरांना म्हणाले, 'लोकांना जागे करण्याचा उद्योग केला पाहिजे. जोपर्यंत लोकशक्ती जागृत होत नाही. तोपर्यंत क्रांतिकारकांच्या बलिदानाने प्रश्न सुटणार नाहीत. विचारांचे बंड निर्माण केले पाहिजे. राष्ट्राभिमान जागविणाऱ्या शिक्षणाच्या माध्यमातून हे बंड निर्माण करता येईल. कलाकार विष्णुशास्त्री चिपळूणकर नवीन शाळा काढण्याच्या तयारीत होते. टिळक आणि आगरकर त्यांना जाऊन मिळाले. १ जानेवारी १८८० रोजी 'न्यू इंग्लिश स्कूल' ची स्थापना झाली. त्याच्या पाठोपाठ आर्यभूषण नावाचा छापखाना काढण्याचे ठरले. टिळकांच्या मनात विचार आला, शाळेत एक विशिष्ट वयोगटातलेच विद्यार्थी येऊ शकतील; पण असा एक मोठा वर्ग आहे जो वयामुळे, व्यापामुळे आणि गावी शाळा नसल्यामुळे शिक्षण घेऊ शकणार नाही. त्यांच्यासाठी एखादी बिनभिंतीची शाळा काढली पाहिजे. लोकशिक्षण, लोकजागरण आणि लोकसंस्करण केले पाहिजे. वृत्तविद्येची पहाट झाल्याशिवाय लोकजीवनात ज्ञानाचा अरुणोदय घडणार नाही. त्यासाठी त्यांनी 'केसरी' हे मराठी वृत्तपत्र आणि मराठा हे इंग्रजी वृत्तपत्र सुरू केले. ब्रिटिश राजवटीचे स्वरूप लोकांना समजावून सांगणे, त्या राजवटीबद्दल असंतोष निर्माण करणे आणि स्वातंत्र्यप्राप्तीसाठी त्याग करायला देशबांधवांना तयार करणे हा त्यांचा हेतू होता.

एकीकडे अग्रलेखातून स्वातंत्र्यासाठी लोकजागरण करणाऱ्या लोकमान्यांनी मराठी भाषेचा विकास, व्याकरण, वापर, राजदरबारी असलेले तिचे महत्त्व असे अनेक विषय अग्रलेखांतून हाताळले. त्या विषयी डॉ. विश्वास मेहेंदळे यांनी अग्रलेखकार लोकमान्य टिळक या पुस्तकात अभ्यासपूर्ण विवेचन केले आहे. टिळकांनी मराठी भाषेसंदर्भात दै. केसरीत नऊ अग्रलेख लिहिले. 'मराठी भाषेची लेखनपद्धती' या पहिल्याच अग्रलेखात लोकमान्य लिहितात, 'इंग्रजांचे आमच्यावर राज्य झाले म्हणून ते आमच्या भाषेतील ऱ्हस्व, दीर्घ, काना-मात्रा-वेलांट्यांवर झालेच पाहिजे असा कायदा नाही. काही लोक सरकारचे साहाय्य घेऊन आपल्या मताचा शिरजोरपणा भाषेवर चालवू पाहणार असतील, तर आम्ही ते कदापिही खपवून घेणार नाही.

साने, गोडबोले, हातवळणे यांनी 'मराठी भाषेची लेखनपद्धती' हा जो ग्रंथ लिहिला त्याच्या प्रकाशनाच्या निमित्ताने लिहिलेल्या अग्रलेखात लोकमान्य सांगतात, 'ज्याप्रमाणे उच्चार करायचा त्याप्रमाणे शब्द लिहायचा ठरवले, तर अनागोंदी होईल. उच्चार प्रमाण धरायचा तो कोणाचा? सुशिक्षित वर्गाचा की अशिक्षित वर्गाचा? सुशिक्षित वर्गाचा म्हटले, तर भाषा बोलण्याचा अधिकार त्यांनाच आहे अशिक्षितास नाही असे म्हणता येणार नाही. सुशिक्षित वर्गात तरी बोलण्याची पद्धत एक कुठे आहे? कोकण, देश, वऱ्हाड, खानदेश, मराठवाडा उच्चाराच्या पद्धती वेगवेगळ्या आहेत. जिभेपेक्षा लेखणी जात्याच स्थिर असल्यामुळे एखाद्या भाषेतील लेखनपद्धतीत जितके स्थैर्य असते तितके उच्चार पद्धतीत असत नाही म्हणून सर्व भाषा लेखन पद्धतीस महत्त्व देतात. प्रांतोप्रांती उच्चाराचा भेद असतो. एवढीच या प्रकारच्या लेखन पद्धतीची अडचण नाही. मुखाने जितके शब्द उच्चारले जातात ते लिहिण्यासाठी अक्षरसामग्रीही हवी. बोली भाषा आणि प्रमाण भाषा लेखनपद्धतीला केंद्रस्थानी ठेवून लोकमान्यांनी केलेले विवेचन किती सडेतोड होते याची आपल्याला साक्ष पटते.

भाषा 'केवळ संवादाचे माध्यम नसते, ती लोकशक्तीचा श्वास असते. ती भाषा बोलणाऱ्या लोकांचाच त्या भाषेवर अधिकार असतो हे विशद करताना लोकमान्य सांगतात,' वैयाकरणी हे भाषेचे शास्ते खरे; पण त्यांचा अधिकारदेखील मर्यादित आहे. कोणतीही भाषा बोलणारे लोक हेच त्या भाषेचे कर्ते असतात असे असले तरी त्यांना व्याकरणशास्त्र किंवा व्युत्पत्तीशास्त्र झुगारून देता येणार नाही.' ती भाषा बोलणारे लोक आणि व्याकरणाचे जाणकार या दोघांनीही विचार समन्वयातून मार्ग काढला पाहिजे अशी अपेक्षा ते व्यक्त करतात. 'मराठी भाषा ही संस्कृतची मुलगी असली तरी तिचे म्हणून एक स्वतंत्र रूप आहे हे आम्हास मान्य आहे' असं टिळक सांगतात. 'मराठीतील



कोणती लेखनपद्धती ग्राह्य आणि कोणती अग्राह्य याचा विचार हळूहळू लोकांनीच केला पाहिजे. वैयाकरण्यांनी आपली मते प्रसिद्ध करावीत, वादविवाद करावेत. भवति न भवति चर्चा करावी. यातून जी सयुक्तिक पद्धत असेल तीच पुढे येईल आणि तिचा प्रघात लोकात पडेल आणि इतर पद्धती लुप्तप्राय होतील.' असे टिळकांनी सांगितले. 'मराठी भाषेचा उत्कर्ष' या शीर्षकाच्या अग्रलेखात लोकमान्य लिहितात, 'जी मराठी भाषा एकेकाळी महाराष्ट्रातच काय पण कर्नाटक, हैद्राबाद, बडोदा, मळवा, मध्यप्रदेश येथे राजभाषा म्हणून प्रचलित होती, ती आता त्या ठिकाणी हुसकून मराठी प्रांतातही पोरकी होत आहे. ही गोष्ट मराठी भाषेच्या सुपुत्रांस अत्यंत लाजिरवाणी आहे.' लोकमान्यांची स्मृतिशताब्दी साजरी होत असताना भाषेच्या या स्थितीत काहीही फरक पडलेला नाही ही खेदाची बाब नाही?

'मराठी भाषेची वाढ' या अग्रलेखात लोकमान्य भाषेची महत्ता वाढविण्यासाठी त्या भाषकांच्या हातात सत्ता येणे किती महत्त्वाचे आहे याची जाणीव करून देताना सांगतात 'नाडीवरून ज्याप्रमाणे शरीरातील रोगाची अथवा स्वास्थ्याची परीक्षा होते तद्वत भाषेवरून राष्ट्राची बरी वाईट स्थिती तज्ज्ञ लोक ताडतात. छत्रपती शिवाजी महाराज जन्मण्यापूर्वी पोवाडे का झाले नाहीत? हे सांगण्याची गरज नाही. छत्रपती शिवाजी महाराजांचा अभ्युदय म्हणजे मराठी भाषेचा अभ्युदय. इंग्रजी भाषा इतर पाश्चात्त्य भाषांत प्रबळ झाली त्याचे मुख्य कारण म्हणजे इंग्रजी साम्राज्य. ती भाषा बोलणारे लोक राज्यकर्ते झाले, की लेचीपेची असणाऱ्या भाषेलाही बळ प्राप्त होते. राज्यकर्त्यांकडे इच्छाशक्ती असली, की भाषेबाबत खूप काही चांगले घडू शकते याची जाणीव ते करून देतात.

भाषेची वाढ होण्यासाठी तिचा दैनंदिन जीवन व्यवहारात अधिकाधिक वापर झाला पाहिजे. भाषा नुसती ओठातून येऊन चालणार नाही ती पोटातून यायला हवी. त्या भाषेत ती भाषा बोलणाऱ्या माणसाचे पोट भरण्याचे सामर्थ्य निर्माण झाले पाहिजे. त्यासाठी ती उद्योगाची भाषा झाली पाहिजे अशी अपेक्षा लोकमान्य व्यक्त करतात.

भाषा आणि संस्कृतीची स्पंदने प्रथम मनात उमटतात आणि नंतर ती उच्चारातून आणि कृतीतून प्रकटतात. आपल्यातली मराठीपणाची ज्योत तेवत ठेवणे महत्त्वाचे आहे. आपले भाषाप्रेम दिखाऊपणासाठी नको. ते आंतरिक जाणिवेतून प्रकट होत राहिले, तर भाषा आणि संस्कृती कधीही मरणार नाही. हे लक्षात ठेवून सर्व जण आपल्या कृतीतून मराठी भाषेवर मनापासून प्रेम करण्यासाठी कटिबद्ध झाले, तर ती लोकमान्यांना स्मृतिशताब्दीच्या निमित्ताने वाहिलेली खरी आदरांजली ठरेल.

▣▣▣

**प्रा. मिलिंद जोशी**
ए/ १००४, सुवन क्रेस्टा,
दहावा मजला, महेश सोसायटी,
बिबवेवाडी, पुणे ४११०३७
चलभाष : ९८५०२७०८२३
ईमेलः joshi.milind23@gmail.com

# काव्यातले शब्द

**काव्यातील शब्दांचे उपयोजन, प्रयोजन आणि महती प्रतिपादन करणारा लेख.**

डॉ. अक्षयकुमार काळे

शब्द शब्दकोशातही असतात आणि काव्यातही असतात. शब्दकोश त्या शब्दांचा प्रमाण अर्थ सांगण्याचा आटोकाट प्रयत्न करीत असतो. काव्याला त्याची क्षिती बाळगण्याचे कारण असतेच असे नाही. काव्याच्या संदर्भात तरी शब्द व्यापाराची स्थिती 'अनन्तपारं किल शब्दशास्त्रं' (शब्दशास्त्राला मर्यादा नाही, ते अपार आहे) अशीच असते. त्या अपार शब्दसागरातील कोणते शब्द कवी आपल्या अर्थाभिव्यक्तीसाठी निवडतो, ह्यावर त्याचे प्रतिभासिद्ध मोठेपण अवलंबून असते. काव्याच्या व्याख्येतच संस्कृत काव्यशास्त्रज्ञांनी शब्दांचे असणारे महत्त्व वारंवार अधोरेखित केले आहे. 'रसगंगाधरा'त जगन्नाभाने काव्याला, 'रमणीयार्थ प्रतिपादकः शब्द (रमणीयार्थाचे प्रतिपादन करणारा शब्द) असे, तर भामहाने काव्यालंकारा'त 'शब्दार्थो सहितौ काव्यम' (शब्द आणि अर्थ यांचे सहितत्व म्हणजे काव्य) असे, तर विद्यानाथाने 'प्रतापरुद्रयशोभूषणा'त 'शब्दार्थो मूर्तिराख्यातौ' (शब्दार्थ म्हणजे काव्याची मूर्ती) असे म्हटले आहे. विभूतीने 'उत्तररामचरिता'त साधूच्या (कवीच्या) वाणीचे सामर्थ्य स्पष्ट करताना म्हटले,

**लौकिकानां हि साधूनामर्थं वागनुवर्तते**
**ऋषीणां पुनराद्यानां वाचमर्थोऽनुधावति**

मर्ढेकरांनी हे श्रेय, 'शब्द अर्थाआधी यावा । हे तो ईश्वराचे देणे', असे ईश्वरार्पण केले तरी कवीच्या वाणीमध्ये असे सामर्थ्य निर्माण होणे. कवी हे कोणता शब्दांना आवाहन करतो आणि ते किती आणि कसे, प्रसन्न होताच, यावरच अवलंबून असते. ही स्थिती प्राप्त व्हावी म्हणूनच केशवसुतांनी, 'शब्दांनो। मागुते या ।' असे आवाहन केले, आणि शब्दकूजितात धुंद होऊन लौकिक जग तुच्छतेने दूर लोटले.

शब्दासंगे तदा मी निजहृदयवनामाजि
 संचार केला,
तेथे मी कल्पपुष्पे खुडुनि
नमुनि ती वाहिली शारदेला,
शब्दांच्या कूजिताने सहजचि
मम हृत्प्रान्त गुंगूनि गेला;
मी त्या स्वप्नात गद्यग्रथित
जग मुळी लोटिले तुच्छतेला!

सभोवतालच्या लौकिक जगातूनच प्राप्त झालेल्या अलौकिक आणि विलक्षण जीवनानुभूतीने कवीचे अंतःकरण जेव्हा पूर्णपणे ग्रासून जाते, तेव्हा शब्दमाया त्याला आपोआपच कवळून घेत असते. महानोर ही अनुपम मनोवस्था रेखाटताना लिहितात,

गुंतलेले प्राण ह्या रानात माझे
फाटकी ही झोपडी काळीज माझे
मी असा आनंदुन बेहोष होता
शब्दगंधे तू मला वाहून घ्यावे

ही शब्दगंधा अर्थाच्या अनंत वलयांना कवेत घेऊनच वावरत असते. ती एका अर्थाने शब्दगंगाही होय. विशिष्ट शब्द विशिष्ट अर्थाचा किंवा अर्थच्छटेचा वाहक असतो. त्याला स्वतःचे रूप, कांती आणि नाद असतो. कवितेचे सौंदर्य त्याच्या उचित, अचूक आणि चित्यपूर्ण वापराने वाढते

इब्न खालदून म्हणतो, शब्द अर्थाचा अंकित असल्यामुळे खरे महत्त्व शब्दांचेच असते. अर्थ प्रत्येकाच्या मनात असतोच. त्या करिता परिश्रमाची आवश्यकता नसते. मनात असलेला अर्थ योग्य रीतीने प्रगट करता यावा, यासाठी शब्दांची योजना करावयाची असते. **अर्थ पाण्यासारखा असतो आणि शब्द पाण्यास धारण करणाऱ्या पात्रासारखे असतात. सोन्याच्या, चांदीच्या किंवा मातीच्या कोणत्याही पात्रात पाणी भरले तरी पाण्याच्या गुणधर्मात बदल होत नसतो हे खरे असले तरी पाहणाऱ्याच्या दृष्टिकोनाप्रमाणे सोन्याचांदीच्या पात्रातील पाणी जास्त मोलाचे ठरते व मृत्तिकापात्रातील पाणी कमी प्रतीचे गणले जाते. अर्थाचेही असेच असते. अभिजात कलावंताने निवडलेल्या शब्दांच्या योगाने अर्थाचे वैभव वाढते तर कलाहीन शब्दयोजनेमुळे अर्थ मातीमोल होतो.**

नुसते विचार किंवा नुसत्या कल्पनांना कवितेत काही महत्त्व नसते कारण त्याच्या साहाय्याने केवळ कविता लिहिली जात नाही, ती लिहिली जाते शब्दांच्या साहाय्याने, म्हणून मलार्मेने म्हटले, आहे ''पोएट्री इज नॉट रिटन् वुईथ आयडियाज बट बुइथ वर्डस्.''

शब्दच त्या कल्पनांचे वाहक असले तरी त्यातला कोणता कच्चा शब्द कवितेचा घात करेल, ते सांगता यायचे नाही. शब्दसागरात विलीन होणे हा कवीचा काव्यधर्म आहे; पण त्या विलिनत्वातील सजगता अधिक महत्त्वाची आहे एरवी,

**मी शब्दांच्या घालुनि बसतो अमाप राशी**
**जखमी होता धावत जातो शब्दांपाशी**
**शब्दच झाले मालक आता सर्व जिण्याचे**
**जनावराने काबिज केला हा दरवेशी**

असे म्हणण्याची, कवीवर पाळी येते. शब्द कवितेसाठी ओठंगून उभे असतात, गर्दी करतात; पण त्याच्या अनुप्रवेशाचा परवाना कवीने फार विचारपूर्वक दिला पाहिजे. भावनांच्या प्रचंड आवेगात कुणी कवी कविता लिहीत असेल, तर कवी शब्दांचा मालक राहू शकेल की शब्दच कवीचे मालक बनतील, असा पेच सततच कवीला पडत असला तरी इतके मात्र खरे की, शब्दाच्या अचूक निवडीतून कवीचे निर्मितीसामर्थ्य प्रतीत होत असते. काव्यातील शब्दांची निवड त्याने ते शब्द त्याला अभिप्रेत असणाऱ्या अर्थनिष्पत्तीला अनुकूल होतील अशीच केली पाहिजे. अभिप्रेत अर्थनिष्पत्ती हे नियामक कारण नसेल, तर कवीने ते विशिष्ट शब्दच का निवडले ह्याचे कोणतेच स्पष्टीकरण देता येणार नाही. विशिष्ट अर्थाच्या प्रकटीकरणासाठी वेगवेगळ्या अर्थच्छटा प्रकट करणारे अनेक शब्द उपलब्ध असतात.

अक्षरशः हजारो शब्दांनी तुडुंब भरलेल्या या शब्दरत्नाकरातील कोणता शब्द आपल्या अर्थाभिव्यक्तीसाठी निवडून कवितेच्या चिमुकल्या चरणामध्ये कसा प्रयुक्त करायचा यातच तर कवीची खरी कसोटी असते; पण हा शब्दरत्नाकर कवीच्या डोक्यात सततच कल्पनांच्या खडकांना धडकी देत अगदी उधाणलेला असला पाहिजे; एरवी काही कवी समकालीन किंवा पूर्वकालीन कवींच्या काव्यातून किंवा शब्दकोशातून शब्द उचलतात, उसने घेतात किंवा चोरतात. काही शब्दांवर पूर्वकवींची नाममुद्रा अशी काही उमटली असते की नव्या कवीने; त्या शब्दाचा मोह पडून बेसावधपणे तो वापरला, तर

अर्थनिष्पती तर दूरच; त्याचे हसे होण्याचीच शक्यता अधिक असते. 'इवलेसे रोप', 'अचपळ मन', 'जे का रंजले', 'काठोकाठ भरु द्या', 'ह्या गंगेमधि', भय इथले' अशा अर्धचरणांतूनही काही घेऊन त्यावर आपला मुलामा चढवतो म्हटले तरी या शब्दसंहतीवर या कवींच्या नाममुद्रा अशा काही कोरल्या गेल्या असतात, की त्या अशा क्षीण मुलाम्याच्या आवरणाखाली कशा बरे दबून राहतील? खरे तर त्यांची क्षमता वरच्या कठीण कवचालाही भेदून बाहेर येण्याची असते. मग पुष्कळदा असा प्रश्न पडतो, की जुन्या कवींकडून त्यांच्या शब्दसंपत्तीतून नव्या कवींनी काही घेऊ नये की काय? मुक्तेश्वरासारख्या श्रेष्ठ पंडित कवीने,

**एकेक अक्षराची भीक ।**
**जीर्ण कविते मागुनि देख**
**सर्वज्ञ कविनायक । म्हणविले मियां**
किंवा
**व्यास वाढिता जगाते ।**
**ग्रास लाधला जीर्ण कवींते**
**त्यांचे मुखींची उच्छिष्ट शिते ।**
**म्या दुर्बळे वेचिली**

असे अतिशय विनयाने म्हटले आहे व शब्दांचा ऋणभारही बऱ्यापैकी स्वीकारला आहे. आधीच्या पिढीतील कवींच्या शब्दसंपत्तीवर नव्या पिढीचा हक्क असतोच; पण नवे कवी तो कसा बजावतात हाच प्रश्न मुळात महत्त्वाचा असतो. ते शब्द कवीच्या व्यक्तिमत्त्वात मुरून मग काव्यात प्रकटले असतील तर कवीच्या भावनाशयाला पेलून धरतात. भावविकसनाची अपूर्व क्षमता त्यांना प्राप्त होते; एरवी एखाद्या सम्राटाचा अंगरखा जरी चोरून आणून अंगात घातला तरी नेत्र दिपण्याऐवजी हसून हसून मुरकुंडी वळण्याची पाळी येते. अपरिग्रही संत गाडगेबाबा अनेक वस्त्र तुकड्यांची कफनी बनवून अंगावर घालीत; पण त्यांना कुणी खंडवस्त्रांकित म्हणून हिणवले नाही. त्यांच्या अनासक्त समाजसमर्पित व्यक्तिमत्त्वाच्या तेजाने त्या कफनीला राजवस्त्रापेक्षाही अधिक झळाळी प्राप्त झाली होती. या एकात्म बहुजनवस्त्रातून बहुजनांच्या दिशादर्शक मानसिक एकात्मतेची अपेक्षा निर्माण झाली. लिलावात विकल्या गेलेल्या कुण्या राजपुरुषाच्या स्वनाम मुद्रांकित शट्कॉलरच्या सुटापेक्षा अशा वस्त्राची किंमत कितीतरी अधिक असणार, किंबहुना तिचे मापन करताच येणार नाही अशी ती असणार हे उघड आहे. तेव्हा शब्दांच्या स्वीकारात कवीच्या व्यक्तिमत्त्वाचा मुद्दा निर्णायक आहे. मग ते शब्द त्याच्या मनाने अबोधपूर्व पातळीवर कुठूनही स्वीकारलेले का असेनात.

संतां इतकीच उज्ज्वल शब्दशक्ती जमलेल्या मर्ढेकरांनी,

**कुठे ज्ञानेश्वर श्रेष्ठ । कुठे तुकाराम पवित्र**
**कुठे समर्थ धीरोदात्त । संत सर्व**
**संत शब्दांचे नायक । संत अर्थाचे धुरंदर**
**एक शब्दाचा किंकर । डफ्फर मी**

असे अतिशय विनयशील उद्गार काढले ते संतांच्या व्यक्तिमत्त्वाच्या धगीतून तावूनसुलाखून बाहेर पडलेल्या शब्दशक्तीच्या दर्शनामुळेच. कवीच्या व्यक्तिमत्त्वातील शब्दांचे नायकत्व आणि किंकरत्व त्यातील फरकही त्यांना यामुळेच अचूकपणे कपणे दाखवता आला. हे नायकत्व जेवढे विस्तार पावणारे असते, तेवढाच प्रमाणाचा आणि श्रेणीचा फरक कवींमध्ये पडत असतो. मर्ढेकर–तुकाराम–ज्ञानेश्वर–व्यास अशी श्रेष्ठ कवींचीही चढती श्रेणी यामुळेच दाखवता येते. 'व्यासोच्छिष्टं जगत् सर्वम्' या विधानाला आक्षेप घेण्याचे कुणाला काही कारणच उरत नाही. 'यदिहास्ति तदन्यत्र यन्नेहास्ति न तत्क्वचित्।', ही त्या अपूर्व ग्रंथाची महती त्या महाकवीच्या विलक्षण शब्दशक्तीमुळेच त्याला लाभली असते. व्यासांच्या शब्दशक्तीने तो ग्रंथ

अभिमंत्रित झाला नसता, तर अशी महती मग जगाची तगडी माहिती देणाऱ्या विश्वकोशाचीही गाता आली असती. **काव्याशय आर्त भावनेने भिजलेला असो की संवेदनेने नटलेला; चिंतनाने घनत्व पावलेला असो की विचाराने गंभीर झालेला; त्याच्या आविष्कारात अखेरीस महत्त्व असते ते शब्द आणि शब्दक्रमालाच. खरोखरीच कविता ही या आशयाला पेलून वृद्धिंगत करणाऱ्या शब्दांची पैंजणे घालून रेखीव पदन्यास करीत करीतच मनोहर अर्थनृत्य सादर करीत आहेत. पण त्यासाठी कवीला शब्दांच्या सूक्ष्म अर्थच्छटांचे आणि व्याकरणाचे अचूक ज्ञान असले पाहिजे.**

पुष्कळदा कवी शब्द तर निवडतो; पण प्रत्यक्ष रचनेत प्रयुक्त करताना व्याकरणाची क्षिती बाळगतोच असे नाही. जाणीवपूर्वक केलेल्या बंडखोरीतून ही बेपर्वा किंवा हेतुगर्भ अन्य वृत्ती त्याने स्वीकारली असेल, तर त्याचे समर्थन करता येते. एरवी रचनेत काव्यदोष निर्माण होतो. संस्कृत काव्यशास्त्रज्ञ शिष्टमान्य आणि व्याकरणशुद्ध शब्दप्रयोगाच्या **बाबतीत अतिशय आग्रही होते.**

**'केवळ काव्यच नव्हे तर शब्दांच्या
शुद्ध उच्चारणाचा आग्रह आमच्या
प्राचीनांनी जाणीवपूर्वक धरला आहे.
साक्षेपाने आणि व्याकरणशुद्ध पद्धतीने
उच्चारलेला एकच शब्द मनुष्यमात्राची
स्वर्लोक आणि मृत्यूलोक या दोहोंची कामना
पूर्ण करण्यास समर्थ असल्याचे मत
पतंजलीने व्यक्त केले आहे.
एक : शब्दः सम्यग ज्ञानः सुष्ठ प्रयुक्त :
स्वर्गे लोके च कामधुग् भवति ।'**

अभिजातवादी काव्यसंकल्पनेला उराशी घट्ट धरून ते विचार करीत असल्यामुळे त्यांचा तो आग्रह समजून घेता येतो; पण आजच्या वास्तववादाच्या काळात काव्यसंकल्पनेमध्ये इतके बदल झाले आहेत की, शिष्ट आणि अशिष्ट असे शब्दांच्या संदर्भातील वर्गीकरण कालबाह्यच ठरावे. मर्ढेकर आणि नामदेव ढसाळ यांच्या काव्यातील कितीतरी शब्द जुन्या संकल्पनेप्रमाणे अशिष्ट या सदरातच घालावे लागतील. टोकदार वास्तव जीवनदर्शनार्थ उपयोजिलेले हे शब्दप्रयोग प्रत्यक्ष रचनेत काव्यमय झाले नाहीत, असे कुणी म्हणू शकणार नाही; पण व्याकरणावर कवीचे कोणत्याही काळात प्रभुत्व असलेच पाहिजे यात शंका नाही; एरवी शिष्ट काय किंवा अशिष्ट काय; कोणत्याही शब्दाचा उपयोग कवीला आपल्या अचूक भावाभिव्यक्तीसाठी करताच येणार नाही. सर्कशीतील झोपाळ्यावरच्या विदुषकालादेखील मुळात उत्तम कसरतपटू असावेच लागते. अर्थाचा स्फोट, शब्दांचे व्याकरण आणि शब्दांच्या प्रयुक्तीकरणाची पद्धत जाणून घेतल्याशिवाय करता येणार नाही. केशवसुतांसारखा बंडखोर कवीदेखील होतकरू कवींना, 'चारचौघांत जावयाचे तर आपले कपडे स्वच्छ व नीटनेटके असणे जरूर असते. त्याप्रमाणे पद्यलेखन प्रसिद्धीस आणावयाचे तर जपून शुद्ध लिहिले पाहिजे. त्यात ऱ्हस्वदीर्घाची ओढाताण होईल तितकी करून टाळलेली पाहिजे. व्याकरणाचे नियम पूर्णपणे पाळलेले पाहिजेत. भाषासंप्रदाय आणि छंद शास्त्राचे नियम यांची हेळसांड केलेली असणे उपयोगाचे नाही. ज्यात वृत्तनियम पाळले आहेत. ज्यात व्याकरणाची चूक नाही, शब्दांची रूपे शुद्ध आहेत अशी पद्ये असतील तर ती वाचण्यास लोक हाती तरी धरतील. मग त्यात शब्दसौष्ठव किती आहे किंवा रसपरिपाक कसा उतरला आहे हा पुढला विचार.' असा उपदेश करतो. आज कविता फारशी कुणी वृत्तात लिहीत नाही, तेव्हा वृत्तविचार जरी बाजूला ठेवला तरी शब्द, त्याची रूपे आणि व्याकरण धाब्यावर बसवून चालणार नाही. भामहाने आपल्या काव्यालंकारात व्याकरणकारांनी प्रमाण मानलेले शब्दप्रयोगच काव्यात प्रयोज्य आणि शोभादायक ठरतात. तद्व्यतिरिक्त सर्व प्रयोग शब्दहीन दोषाने डागाळले जातात म्हणून अभ्यास करून हा व्याकरणार्णव पार केल्यावाचून कवीस शब्दरूपी

रत्नाकर आत्मसात करता येत नाही, अशी भूमिका घेतली.

नवकाव्यनिर्मितीकरिता, कवींना पुष्कळदा व्याकरणालाही टांग मारावी लागते; पण ती आशयकंदाचे संरक्षण करण्यासाठी. प्रसंगी ती मारलीच पाहिजे पण व्याकरणाविषयक अज्ञानातून त्यांनी ती मारू नये इतकेच. कवितानिर्मिती केवळ व्याकरणाचे यमनियम सांभाळण्यासाठी करायची नसते. 'मै जो गुस्ताख़ हूँ आइन-ए गजलख़्वानी में', असे गालिब म्हणतो तो यामुळे. गणमात्रेची क्षुल्लकशी चूक दाखवून दिल्यानंतर कविवर्य बींनी म्हटले, ''गणमात्रा मला मोजता येत नाहीत का, पण त्याहीपेक्षा काही अधिक मोलाचे असते, त्याला मी महत्त्व देतो.'' क्रिकेटमध्ये फलंदाजाच्या फूटवर्कला फार महत्त्व असते. फूटवर्क म्हणजे बॅटिंगचे व्याकरणच म्हणा ना. म्हणून फलंदाजांचे प्रशिक्षक त्यांच्या फूटवर्ककडे करडी नजर ठेवून असतात. क्रिकेटचे व्याकरणशास्त्रीच ते. आपल्या बेमुर्वतखोर स्वभावाबद्दल प्रसिद्ध असणारा जुन्या जमान्यातला खेळाडू डब्लू. जी. ग्रेस प्रॅक्टिस करीत असताना फटका मारताना त्याचे चुकलेले फूटवर्क बघून त्याचा प्रशिक्षक (कोच) त्याच्यावर वसकन ओरडून म्हणाला, ''तुझा पाय कुठे आहे ते बघ !'' त्यावर तेवढ्याच त्वेषाने; सीमेपार गेलेल्या चेंडूकडे अंगुलिनिर्देश करीत ग्रेस म्हणाला, ''आधी तो चेंडू कुठे गेला आहे ते बघ'' तेव्हा काव्यातही आशयचेंडू प्रसंगी अगदी झेपावत सीमेपार गेला आहे किंवा नाही हेच अखेरीस महत्त्वाचे असते. शब्द आणि व्याकरण त्याकरिताच कवीने सामर्थ्याने तडकवायचे असते.

आशयाचा स्फोट करणे हे काव्यातील शब्दांचे प्रमुख कार्य आहे. कवीने प्रयुक्त केलेल्या विशिष्ट शब्दामुळे त्याने ध्वनित केलेला आशय तर रसिकाच्या लक्षात येतोय, पण तो आशय तेवढ्यापुरताच म्हणजे स्थितिशील न राहता त्यातून अर्थाच्या अनंत लहरी उत्पन्न होतात. त्यालाच आपण शब्दाची प्रसरणशीलता म्हणतो. म्हणूनच मर्ढेकरांनी शब्दांना परमाणूंची संज्ञा दिली.

शब्दांबद्दल ते म्हणतात, ''ते वाङ्मयातले परमाणू किंवा ॲटम्स आहेत. शब्दांच्या या परमाणूंवरच ललित वाङ्मयाची सृष्टी आधारलेली असते. त्यामुळे जड सृष्टीत परमाणूंना जे महत्त्व, तेच काव्यसृष्टीत शब्दांना आहे. हे परमाणू खरोखरच फार बहुमोल आहेत. आजच्या भाषेत म्हणजे ते युरेनिअमच्या परमाणूंइतके बहुमोल आहेत. एखाद्या कवीला मराठी वाङ्मयाचे क्षेत्र हादरून टाकणारा ग्रंथगोल तयार करायचा असेल, तर त्याला त्या परमाणूंचाच योग्य असा उपयोग करायला हवा.''

सुट्या शब्दाला कवितेत मोल प्राप्त होते ते, जेव्हा कवी त्याच्यावर संस्कार करतो तेव्हाच. मर्ढेकरांना अभिप्रेत असणारा योग्य असा उपयोग शब्दसंस्काराशीच संबंधित आहे. त्याकरिता कवीला फार कष्ट करावे लागतात. मर्ढेकर म्हणतात,

रखड रखड जरी फाटते तुमान  
ठिगळाविण वसन इथे नच नभासमान  
स्नायूंचा पीळ तुटे  
घामाचे पेव फुटे;  
फुरसत नच लाज तरी वाटल्या जवान  
पोटांतील स्निग्ध भाव  
नैसर्गिक ज्यां न वाव,  
वितळतील विष्ठेमधि; आपणां तमा न  
मरणाची कळ न फार;  
तंग असे जरि विजार  
शब्दांची आशयास, राख तरि इमान

आशयाची लाज राखणारी शब्दांची विजार तंग जरी असली तरी कवीने आशयप्रकटीकरणाच्या संदर्भातले आपले इमान कायम राखले पाहिजे. आत्मनिष्ठा किंचितही न गमावता डोळ्यात तेल घालून आपल्या प्रयुक्तीकरणाच्या प्रक्रियेत शब्दांच्या अति नाजूक अलवार कडा किंचितही झिजणार नाहीत ना, याची दक्षता घेतली पाहिजे. विरामचिन्हांच्या

उपयोगात थोडीशी जरी गफलत झाली तरी ओळीचा अर्थ आणि सूर बदलून जातो, मग अनुचित वा अनावश्यक शब्द केवढा उत्पात घडविल बरे? काव्यशिल्प घडवायचे तर पुनःपुन्हा शोधन करणे अपरिहार्यच असते. मर्ढेकर– पु. शि. रेग्यांनी सहेतूकपणे केलेली चिन्हांची योजना या दृष्टीने किती लक्षणीय आहे!

वारंवार परिष्करण करणे हा शब्दसंस्कार करण्याचाच प्रकार आहे. असे म्हणतात की, रोमचा विख्यात कवी व्हर्जिल सकाळी आपली कविता लिहित असे आणि दिवसभर तिच्यावर संस्कार करण्याचे त्याचे काम चाललेले असे. 'अस्वली आपल्या कुरूप अपत्याला चाटून चाटून डौलदार बनवीत असते. तशातलाच हा प्रकार आहे.' असे तो म्हणत असे. काव्य असे डौलदार बनविण्याकरिता शब्दशब्दांवर फार नाजूक हाताने संस्कार करावे लागतात. सोनार जसा रात्रभर परिश्रम करून सोन्याच्या तुकड्यावर संस्कार करीत करीत कलाकुसरीचा दागिना घडवीत असतो, तसा कवी शब्दांवर संस्कार करीत कविता लिहीत असतो. एक फार्सी कवी म्हणतो, ''कवितेतील शब्द घासून घडविण्यात रात्रीचा दिवस करावा लागला. पक्षी निद्राधीन झाले. पाण्यातील मासेदेखील निद्रासुख अनुभवू लागले, कवी मात्र जागृतच राहिला.''

'या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी' (सर्व लोकांची जेव्हा रात्र असते तेव्हा स्थितप्रज्ञ जागृत असतो) हे वचन कवींच्या बाबतीत वेगळ्या अर्थाने खरे आहे. शब्दांच्या संदर्भातील अहर्निश असणारी जागरुकता शब्दाच्या अचूक पर्यायाची निवड करण्यात कवीला साह्यकारी होत असते व अशा शब्दांनी साकार झालेली कविता पाहूनच,

**'केषा नैषा कथय कविताकामिनी कौतुकाम्'**

(अशी ही कवितासुंदरी कोणाच्या कौतुकाचा विषय होणार नाही!), असे उद्गार रसिकाच्या तोंडून आपसूकच बाहेर पडत असतात.

संदर्भ :

१) इब्न खालदून, अल्ताफ हुसेन हाली ह्यांच्या मुकद्दमा शेर–ओ–शायरी या ग्रंथाच्या श्री. रं. कुलकर्णी यांनी केलेल्या, 'काव्य आणि कविता' या अनुवादातून उद्धृत. साहित्य अकादमी, नवी दिल्ली १९७१. पृ. क्र. ४०

२. सिद्धेश्वरशास्त्री चित्राव, प्राचीन चरित्रकोश, प्रथम खंड दुसरी आवृत्ती, पुणे, १९६८, पृ. ५५०

३. केशवसुत, समग्र केशवसुत, संपा. भ. श्री. पंडित, दुसरी आवृत्ती, पुणे, १९७०, पृ. ३८२

४. बा. सी. मर्ढेकर, सौंदर्य आणि साहित्य, तिसरी आवृत्ती, मुंबई, १९७५, पृ. ९९

५.व्हर्जिल, अल्ताफ हुसेन हाली, उ. नि. पृ. ३९

६. अल्ताफ हुसेन हाली, उ.नि. पृ. ३९

(लेखक अ. भा. म. सा. संमेलनाचे पूर्वाध्यक्ष आहेत.)

**डॉ. अक्षयकुमार काळे**
प्रतिक्षा, ५७, नरकेसरी लेआऊट पूर्व,
जयप्रकाशनगर, नागपूर– ४४००२५
चलभाष : ९३२५००५८७१

# दलित साहित्य-प्रवाहानं अनेक साहित्य-प्रवाहांना ऊर्जा दिली

**यावल, जि. जळगाव येथील महाविद्यालयाने आयोजित केलेल्या साहित्यातील नवे प्रवाह या विषयावर १० जून २०२० रोजी झालेल्या आंतरराष्ट्रीय वेबिनारमध्ये डॉ. मनोहर जाधव यांनी प्रमुख अतिथी म्हणून दिलेले व्याख्यान.**

**■ डॉ. मनोहर जाधव**

मित्रहो, 'मराठी साहित्यातील नवीन प्रवाह' असा विषय मला दिलेला आहे. या विषयाच्या अनुषंगाने काही मुद्दे मी आपणासमोर मांडणार आहे. नवीन साहित्यप्रवाह जेव्हा आपण म्हणतो तेव्हा येऊ घातलेले काही साहित्यप्रवाह किंवा सद्यःस्थितीमध्ये ज्या साहित्यप्रवाहांची चर्चा आहे ते प्रवाह विचारात यायला हवेत. ज्या साहित्यप्रवाहांनी एक पार्श्वभूमी तयार केली त्यांचीही चर्चा अपेक्षित आहे. असे प्रवाह साधारणतः साठोत्तरी कालखंडामध्ये आपल्याला उदयाला आलेले दिसतात. साठोत्तरी कालखंड असे म्हटले जात असले तरी साधारणतः सत्तरच्या दशकामध्ये प्रवाह निर्माण झालेले आहेत. त्यातला सगळ्यात महत्त्वाचा आणि प्रारंभीचा प्रवाह म्हणजे दलित साहित्याचा प्रवाह.

प्रवाह कसे निर्माण होतात? वाङ्मयीन प्रवाहाच्या निर्मितीची मीमांसा कशी केली जाते? हा एक स्वतंत्र विषय आहे. आपल्याकडे वेळ कमी असल्यामुळे त्या विषयाकडे मला जाता येणार नाही; पण आपण एक समजून घेतलं पाहिजे की, केवळ वाङ्मयीन कारणामुळे वाङ्मयीन प्रवाह निर्माण होत नसतात. आपल्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक जीवनामध्ये जी काही उलथापालथ होते, जी काही स्थित्यंतरे होतात, ज्या चळवळी होतात, आंदोलनं होतात, काही राजकीय धोरणं ठरवली जातात या सगळ्यांची जेव्हा घुसळण होते तेव्हा त्याचा परिणाम म्हणून जीवनातल्या वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये आपल्याला बदल दिसायला लागतात, आणि म्हणून साहित्य, कला, संस्कृतीच्या आणि जीवनातल्या अनेकविध क्षेत्रांतदेखील त्याचे काही पडसाद उमटत असतात. दलित साहित्यप्रवाहाच्या निर्मितीला अर्धशतक उलटून गेलेलं आहे. दलित साहित्याच्या प्रवाहानंतर साहित्यप्रवाह आला. नंतर स्त्रीवादी साहित्यप्रवाह आणि त्याच्यानंतर आदिवासी साहित्याचा प्रवाह आला.

या सगळ्या प्रवाहांचा कालक्रम जर आपण पाहिला, तर आपल्या असं लक्षात येईल की, दलित साहित्यप्रवाहाने आपल्या समाजजीवनाच्या संदर्भात आणि वाङ्मयीन दृष्टिकोनाच्या संदर्भात काही नवीन गोष्टी आणलेल्या आहेत. नवीन संकल्पना आणलेल्या आहेत, आणि त्या दृष्टीने हा प्रवाह फार महत्त्वाचा आहे. आपल्याकडे आत्मचरित्र हा वाङ्मय प्रकार जवळपास शतकभरापासून लिहिला जातोय; पण दलित साहित्याने आत्मचरित्र ही संकल्पना अस्तित्वात असताना आत्मकथन ही संकल्पना

आणली. त्याला वेगवेगळ्या पद्धतीने समीक्षकांनी प्रतिसाद दिला. या साहित्यप्रवाहाने अनेक प्रदेशातील, वेगवेगळ्या समाजातील अलक्षित नवीन भाषा समोर आणली. दुर्लक्षित जीवनदर्शन आणलं. परिघावरचे जे समाज घटक होते त्यांना प्रवाहात आणले. त्याच्यावर प्रकाश झोत टाकला. आपल्याला प्रश्न पडतो की, दलित साहित्यप्रवाहानंतर ग्रामीण साहित्यप्रवाह निर्माण होण्याचं कारण काय? आपल्याला असं दिसेल की, जे समाजवास्तव आपण पाहिलेलं आहे किंवा आपली ग्रामीण संस्कृती वा गावगाडा पाहिला, तर यातल्या काही गोष्टी लक्षात येतील. दलित साहित्य आणि ग्रामीण साहित्यप्रवाहातील विषय एका व्यापक अशा ग्रामीण संस्कृतीतून आलेले आहेत. दलित साहित्यप्रवाहातील जे लेखक आहेत, ते गावगाड्याबाहेरचे होते, आणि ग्रामीण साहित्यप्रवाहातील लेखक गावगाड्यातीलच होते आणि ते थेट कृषिसंस्कृतीशी संबंधित होते. या समाजजीवनाचे बारकावे नीट पाहिले, तर आपल्या असं लक्षात येतं की, दलित साहित्यिकांनी बाबासाहेब आंबेडकरांचा विचार आणि चळवळ प्रमाण मानून लेखन केलं. वाटचाल केली, आणि त्यांच्या पूर्ण जीवनशैलीतच बदल झाला. या मागे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचं तत्त्वज्ञान, चळवळ, विचार हा पायाभूत स्वरूपाचा होता. नंतर ग्रामीण लेखकांना वाटलं की, आपणदेखील ग्रामीण साहित्याची चळवळ सुरू केली पाहिजे. त्याप्रमाणे ती सुरू झाली. त्यानंतर स्त्रीवादी साहित्यप्रवाह आला, आदिवासी साहित्यप्रवाह आला.

आपल्या असं लक्षात येईल की, आदिवासी साहित्यप्रवाहामध्ये सुरुवातीच्या कालखंडामध्ये जे लेखक, कवी होते, ज्यांनी काही भूमिका मांडली ते लेखक-कवी दलित साहित्यप्रवाहामध्येही सक्रिय होते. एवढंच नव्हे तर ग्रामीण साहित्यामध्ये सक्रिय असलेले कितीतरी लेखक हे सुरुवातीच्या काळात दलित साहित्य चळवळीत सक्रिय होते. ग्रामीण साहित्याची आणि नंतर आदिवासी साहित्याची चळवळ सुरू झाली. त्यातील भुजंग मेश्राम आणि अन्य लेखक 'अस्मितादर्श त्रैमासिका'च्या माध्यमातून पुढे आलेले आहेत. या सगळ्या मंथनातून झालं काय? तर आत्मशोधाची प्रक्रिया सुरू झाली. आत्मसन्मान मिळाला पाहिजे अशा प्रकारचा आग्रह सुरू झाला. आत्मशोधाच्या प्रक्रियेमुळे लेखक आपले जीवनानुभव लिहायला लागले. म्हणजे मराठी साहित्यामध्ये अत्यंत दुर्लक्षित असंजीवन, अपमानित जीवन हे या लेखकांनी आविष्कृत केलं. मी मघाशी सांगितलं की, दलित साहित्यानं नवीन संकल्पना आणल्या. उदाहरणार्थ वयाच्या चाळिशीमध्ये जे लिहिलं जातं त्याला आत्मचरित्र म्हणायचं का? किंवा काय म्हणायचं? असे नवीन प्रश्न निर्माण झाले. आता अलीकडे आपल्याला असं दिसतं की, मराठीमध्ये भटक्या-विमुक्तांचा साहित्यप्रवाहही सुरू झालेला आहे. चांगल्या पद्धतीने ही लेखकमंडळी आपला जीवनानुभव व्यक्त करताहेत. आपल्या असं लक्षात येईल की, दलित साहित्यप्रवाहापासून सुरू झालेले हे प्रवाह आहेत. दलित साहित्यप्रवाहात हे लेखक सक्रिय होते. त्यामध्ये लक्ष्मण माने, लक्ष्मण गायकवाड अशी मंडळी होती. गायकवाड आणि माने तर अस्मितादर्श साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झाले होते. सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठामध्ये आम्ही एक राष्ट्रीय सेमिनार घेतला होता. त्याचा विषय होता 'भटक्या- विमुक्तांचे मराठी साहित्य.' अनेक लेखक आणि समीक्षक असे म्हणत होते की, हा स्वतंत्र वाङ्मयीन प्रवाह आहे. त्याच्या स्वतंत्र निर्मिती प्रेरणा आहेत. हे सगळं पाहत- ऐकत असताना माझ्या असं लक्षात आलं की, नंतरच्या कालखंडामध्ये खूप लेखकांना असं वाटायला लागलं की, आपण आपल्या अस्मितेचा, आपल्या परंपरांचा शोध घेतला पाहिजे, आपली मुळं कुठं आहेत, कोणती आहेत याचा शोध घेतला पाहिजे, आणि या शोधाच्या प्रक्रियेतून लेखक लिहायला लागले. त्यामुळे त्याला साहित्यप्रवाहाचं स्वरूप आलेलं आहे. खरं तर

भटक्या-विमुक्तांचं लेखन दलित साहित्यप्रवाहातून पुढं आलेलं आहे. एवढंच नव्हेतर, ग्रामीण साहित्य, स्त्रीवादी साहित्य, आदिवासी साहित्य या प्रवाहांना आणि पुढे निर्माण झालेल्या साहित्यप्रवाहांनाही दलित साहित्याने ऊर्जा दिल्याचे स्पष्ट झालेले आहे. कोणालाही वाटलं आणि साहित्यप्रवाह निर्माण केला असं होत नाही. साहित्यप्रवाहाच्या मागे एक पायाभूत तत्त्वज्ञान असतं. एक विचारप्रणाली असते. विचारप्रणाली नसेल, तत्त्वज्ञान नसेल तर हे साहित्याचे प्रवाह तत्कालिक ठरतात. ते दीर्घकालीन वाटचाल करीत नाहीत. दलित साहित्यानं डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचं क्रांतिकारी तत्त्वज्ञान स्वीकारलं आणि आपली अर्धशतकाची वाटचाल पूर्ण केली; ग्रामीण साहित्यानं काही प्रमाणात परिवर्तनाचा विचार स्वीकारला आणि वाटचाल केली; परंतु व्यवस्था परिवर्तनाचा विचार त्यात प्रतिबिंबीत झाला नाही. तो का झाला नाही, त्याची स्वतंत्रपणे चर्चा करावी लागेल. भटक्या-विमुक्त लेखकांनी फुले-आंबेडकरांचाच परिवर्तनाचाच विचार स्वीकारलेला आहे, आणि आपल्या परीने त्याचा अंगीकार करून ते लेखन करीत आहेत.

अलीकडे दोन-तीन साहित्यप्रवाहांची चर्चा होते, पण त्याला काही पुरेसं स्पष्ट स्वरूप आलेलं नाही. त्याचं कारण असं की, वाङ्मयीन प्रवाह कोणताही असो त्याचं एक सिद्धांतन करावं लागतं. त्याची मांडणी करावी लागते. त्या मागची वैचारिक भूमिका स्पष्ट करावी लागते. आपल्याला वाटलं म्हणून अमूक एक साहित्यप्रवाह आहे असं आपण म्हणू शकत नाही.

दोन हजार सालानंतर मराठी विज्ञान साहित्याची चर्चा मोठ्या प्रमाणात सुरू झाली. खरं तर स्वातंत्र्यपूर्व कालखंडापासून काही प्रमाणात मराठीत विज्ञान साहित्य लिहिलं जात आहे. अनुवादित होत आहे; पण साहित्यप्रवाह या दृष्टिकोनातून मांडणी अलीकडच्या काळात होताना दिसते आहे. विज्ञान लेखकांची संख्या वाढते आहे, महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागांतून हे लेखक आले आहेत. या प्रवाहात आशय-विषयाचं वैविध्य दिसत असलं तरी विज्ञान कथा या वाङ्मय प्रकारातील लेखन विपुल दिसते. त्या खालोखाल कादंबरी व अन्य वाङ्मय प्रकार दिसतात. अनेक विद्यापीठांत विज्ञान साहित्याच्या अनुषंगाने प्रबंध सादर होताना दिसतात. या साहित्य प्रवाहासंदर्भात नजिकच्या भविष्यात आशादायी चिन्हे स्पष्टपणे दिसू लागतील, अशी खात्री बाळगायला जागा आहे.

काही संशोधक नव्याने संशोधन करीत आहेत. ते असं म्हणताहेत की, पर्यावरणीय साहित्य हा एक नवीन वाङ्मयीन प्रवाह होऊ शकेल. त्या अनुषंगाने काही अभ्यासक मांडणी करताहेत. तो प्रवाह पूर्णपणे दृष्टिपथात आलेला नाही. त्याची चौकट अजून स्पष्ट झालेली नाही; पण त्या दृष्टीने प्रयत्न सुरू आहेत. मारुती चित्तमपल्लींसारखा लेखक ज्या प्रकारचं लेखन करतो, त्या लेखनाचा विचार आपण कसा करणार? ते वेगळं ललित लेखन आहे. ते निसर्गासंबंधीचं, पर्यावरणासंबंधीचं लेखन आहे. पर्यावरणाचं आणि निसर्गाचं महत्त्व काय आहे हे ललित साहित्यातून ते सगळ्या मानवी समूहाला सांगताहेत. हे दोन प्रकारचं लेखन दिसतं. एक माहितीपूर्ण आणि दुसरं वाङ्मय प्रकाराच्या अनुषंगाने निसर्गाची माहिती देणारं ललितगद्य लेखन. अशा प्रकारचं लेखन आज अनेक लेखक करताना दिसतात. येणाऱ्या काळात पर्यावरणीय साहित्यप्रवाह अशी मांडणी अभ्यासकांनी केली, तर आपल्याला नवल वाटायला नको. मघाशी चर्चेत असा उल्लेख झाला की, ''दिव्यांगांचं जे साहित्य आहे त्याचा वेगळा साहित्यप्रवाह होऊ शकेल का?''मी आधी म्हटल्याप्रमाणं कोणालाही किंवा आपल्याला वाटतं म्हणून तो साहित्यप्रवाह होऊ शकत नाही. त्यामागच्या निश्चित प्रेरणा, वाङ्मयीन दृष्टिकोन, वाङ्मयीन भूमिका या नीटपणे आणि स्पष्टपणे मांडल्या गेल्या पाहिजेत. त्यांचं नीट सिद्धांतन झालं पाहिजे. सिद्धांतन झाल्याशिवाय आपल्याला साहित्यप्रवाहासंबंधी कोणतीही गोष्ट ठामपणे सांगता

येत नाही कारण त्यातून खूप प्रश्न निर्माण होतात. शंका निर्माण होतात. त्या प्रश्नांची उत्तरं दिली पाहिजे. शंकांचं निरसन झालं पाहिजे. मधल्या काळात डॉ. सुनिलकुमार लवटे या प्राचार्य मित्राशी चर्चा करीत असताना त्यांनी असं सांगितलं की, मराठीमध्ये वंचितांचे साहित्य असा एक साहित्यप्रवाह निर्माण होऊ शकतो. ते म्हणाले, ''आपल्या समाजात वंचित समूह आहेत. ते दुर्लक्षित आहेत, आणि ते जे काही लिहिताहेत त्याच्याकडे फारसं कोणाचं लक्ष जात नाही.'' त्यांचं स्वतःचंच आत्मचरित्र आहे, 'खाली जमीन वर आकाश.' त्यांनी उदाहरण दिलंय की, अरुण खोरे यांचं 'पोरके दिवस' पुस्तक, किंवा इंदुमती जोंधळे यांचं 'बिनपटाची चौकट' आत्मचरित्र, अशी अनेक उदाहरणं त्यांनी दिली. मला बरं याचं वाटलं की, त्यांनी या वंचितांच्या साहित्याचं सिद्धांतन करायला घेतलेलं आहे आणि बऱ्यापैकी मजकूर लिहिलेला आहे. त्यामध्ये वंचितांचं साहित्य कशाला म्हणायचं? त्याच्या प्रेरणा काय आहेत? या साहित्याचा विचार कोणत्या पद्धतीनं करायचा? म्हणजे वंचितांचं साहित्य म्हणताना त्यांना जबाबदारीची जाणीव होती, आणि त्यांना हेही माहीत आहे की, साहित्याच्या क्षेत्रात कुठलाही एखादा सिद्धांत आणून, कुठलंतरी एखादं संबोधन निर्माण करून काही साहित्यप्रवाह फार होत नाहीत. ते गंभीरपणे करावं लागतं. मला वाटतं, वंचितांच्या साहित्याबद्दल ते जे लिहिताहेत, जे सिद्धांतन करताहेत त्याचं पुस्तक लवकरच येईल.

मधल्या काळामध्ये मराठी साहित्यामध्ये अनेक प्रवाह निर्माण झाले होते; पण नंतर ते क्षीण झाले. ते तसे का झाले त्याची स्वतंत्रपणे चर्चा करता येईल. ख्रिस्ती मराठी साहित्यप्रवाह होता. जे ख्रिस्ती लेखक आहेत, यात धर्मांतरीत लेखकांचं प्रमाण बरंच आहे. त्या लेखकांनी आपले जीवनानुभव मांडलेले आहेत. यामध्ये अनेक लेखक होते; पण पुढे या साहित्यप्रवाहाचा जोम ज्या पद्धतीनं असायला पाहिजे होता तसा तो राहिला नाही.

मुस्लीम मराठी साहित्य हा एक साहित्यप्रवाह आपल्याला सांगता येईल. या प्रवाहाची अनेक संमेलनंही झालेली आहेत. या संमेलनांमध्ये चांगल्या पद्धतीनं मुस्लीम मराठी साहित्यावर लेखकांनी चिंतन-मंथन केलं आहे. आता हा साहित्यप्रवाहही क्षीण होतोय की काय अशी अवस्था आहे. हे प्रवाह सशक्त होण्यासाठी त्या-त्या साहित्यप्रवाहाचं स्वतःचं मुखपत्र असणं गरजेचं आहे. मुखपत्र असल्याशिवाय त्या-त्या प्रवाहातील लेखक आपली भूमिका नीटपणे मांडू शकत नाहीत. म्हणजे आपलं स्वतःचं स्वतंत्रपणे व्यासपीठ असलं पाहिजे. आपल्याच व्यासपीठावरून, आपल्याच मंचावरून आपण ती भूमिका नीट मांडू शकतो. आपली भूमिका मांडण्यासाठी व्यासपीठ नसेल, तर आपण ती मांडू शकत नाही. याला फार मोठा इतिहास आहे. आपण सगळ्या चळवळी पाहिल्या किंवा प्रबोधन कालखंड पाहिला, तर त्या काळात जी वर्तमानपत्रं निघाली होती, त्याला कारण आपापल्या भूमिका आहेत. त्या भूमिका मांडण्यासाठी मंच निर्माण केले गेलेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'मूकनायक', 'बहिष्कृत भारत' ही नियतकालिके सुरू केली होती, कशासाठी तर भूमिका मांडण्यासाठी. त्या काळामध्ये इतर वर्तमानपत्रांमध्ये बाबासाहेबांना भूमिका मांडता येत नव्हती. त्या काळापासून आपण पुढे आलो आहोत. एकविसाव्या शतकात आपण आहोत. आता असं लक्षात येईल की, प्रत्येक चळवळीने आपलं स्वतःचं मुखपत्र निर्माण केलेलं आहे. त्यातून आपली भूमिका त्यांनी मांडलेली आहे. मग ते राजकीय पक्ष असतील, सामाजिक चळवळी असतील किंवा साहित्य चळवळी असतील. 'अस्मितादर्श' हे त्रैमासिक नसतं, तर दलित साहित्यप्रवाहाची चळवळ, जिचं वय ५०-५५ वर्षे आहे तेवढं वय तिला लाभलं नसतं. केवळ 'अस्मितादर्श' त्रैमासिक असल्यामुळे दलित साहित्याची चळवळ पुढे गेली. इतरही अनेक नियतकालिकं निर्माण झाली; पण अल्पजीवी ठरली. ग्रामीण साहित्य चळवळीला मुखपत्र मिळालं नाही,

त्यामुळे ज्या जोमानं, ज्या ताकदीनं चळवळ पुढे जायला पाहिजे होती तशी ती गेली नाही. नंतर ती क्षीण होत गेली. आता आपल्याला असं दिसतं की, सगळ्याच चळवळी, परिवर्तनाच्या चळवळीही क्षीण होत चालल्या आहेत.

साहित्यप्रवाहाच्या चळवळी सशक्त होण्यासाठी मुखपत्राबरोबर त्यांचा एक मोठा हितचिंतक वर्गही असावा लागतो. आदिवासी समूहातून आलेल्या व्यक्तीला आदिवासी साहित्याबद्दल आस्था असते. आदिवासी लेखक असेल, तर तो त्या साहित्यासंबंधी भूमिकाही मांडेल. दलित साहित्यप्रवाहातील लेखक असेल, तर त्याला त्या साहित्यासंबंधी आस्था असते. मुस्लिम लेखकाला मुस्लिम मराठी साहित्यासंबंधी आस्था असते. त्यात वावगं काही नाही कारण ते त्या त्या जीवनानुभवातून आलेलं असतं. हे सगळे व्यवस्थेच्या एका शोषित कप्प्यातून आलेले आहेत. व्यवस्थेचे ते बळी आहेत. या व्यवस्थेमुळं त्यांना दुःख काय असते, छळ काय असतो, अपमान काय असतो, भूक नावाची गोष्ट काय असते, हे सगळं कळलेलं आहे म्हणून हे लेखक त्यांच्या साहित्यप्रवाहाची तरफदारी करणार, त्याच्याशी आपलं नातं सांगणार. हे स्वाभाविक आहे.

या लेखकांनी आपले हितचिंतक मित्रदेखील आपल्या चळवळीशी जोडून घेतले पाहिजेत. एक उदाहरण सांगतो म्हणजे हा मुद्दा नीट लक्षात येईल. दलित साहित्याचा प्रवाह सुरू झाला तेव्हा या प्रवाहावर प्रचंड टीका झाली. प्रस्थापित लेखक आणि समीक्षक म्हणत, ''साहित्य कुठं दलित असतं का? दलित साहित्य हा काय प्रकार आहे? साहित्य हे साहित्य असतं. '' आणि ही टीका होत असताना या टीकेचा प्रतिवाद कोणी केला, या प्रवाहाचं सिद्धांतन कोणी केलं? या सगळ्या टीकेला सुरुवातीच्या काळामध्ये प्रतिवाद करणारे जे अभ्यासक होते, जे लेखक –समीक्षक होते त्यात डॉ. भालचंद्र फडके, प्रा. रा. ग. जाधव, सदा कऱ्हाडे, प्रा. प्र. श्री. नेरूरकर होते. ही सगळी मंडळी दलित साहित्यप्रवाहाशी संबंधित असली तरी ती 'त्या' अर्थानं दलित समाजातून आलेली नव्हती; पण दलितांच्या सामाजिक आणि साहित्यविषयक चळवळीबद्दल त्यांना आस्था होती. त्याचं कारण असं की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीचे, तत्त्वज्ञानाचे ते अभ्यासक होते. प्रा. रा. ग. जाधव आणि प्रा. भालचंद्र फडके हे तर औरंगाबादला मिलिंद महाविद्यालयातच प्राध्यापक होते. हे दलित साहित्याचा प्रतिवाद करणारे लेखक होते. आज चित्र बदललं आहे. आपल्याला असं दिसतं की, बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीमध्ये त्या काळात कोकणस्थ, कायस्थ मंडळी होती. महाडच्या चवदार तळ्याच्या सत्याग्रहामध्ये सहस्रबुद्धे, चित्रे, चिटणीस ही मंडळी होती. नंतरच्या काळात हा सहवास कमी म्हणजे जवळजवळ नाहीसा झालेला दिसतो. हे उदाहरण तुम्हाला सांगितलं, त्याचं कारण असं की, प्रा.रा.ग.जाधव, प्रा.भालचंद्र फडके हे दलित साहित्यप्रवाहाचे अभ्यासक-प्रवक्ते होते. ही महत्त्वाची गोष्ट आहे, म्हणून मुस्लीम मराठी साहित्य असेल, आदिवासी साहित्य असेल, ग्रामीण साहित्य असेल, भटक्या-विमुक्तांचं साहित्य असेल, या साहित्यप्रवाहातील लेखकांनी आपल्या जातीचे नसलेले; पण आपले समानधर्मी, समविचारी असे जे लेखक आहेत त्यांना आपल्या चळवळीशी जोडून घेतले पाहिजे. असे लेखक जोडले गेल्यानंतर एक व्यापक भूमिका तयार होते. आपल्याला आपल्या प्रवाहामध्ये मग्न राहून लेखन करणं हे अपेक्षित नसतं कारण साहित्यप्रवाह हा आपल्याला चिंतनाची दिशा देत असतो. साहित्यासंबंधी काही एक भान देत असतो, आणि हे भान व्यापक स्वरूपाचं असलं पाहिजे, असं मला वाटतं. एखादा साहित्यप्रवाह असेल, चळवळ असेल, आंदोलन असेल हे विशिष्ट प्रश्नाच्या अनुषंगाने निर्माण होत असलं तरी त्याला जेव्हा व्यापक स्वरूप येतं, ते स्वरूप माझ्या दृष्टीनं महत्त्वाचं आहे कारण समाजातले अनेक घटक त्याच्यामध्ये जोडले जातात. एका विशिष्ट वर्तुळामध्ये

तो साहित्यप्रवाह राहत नाही. तो भलेही एका विशिष्ट वर्तुळातून सुरू झालेला असला तरी तो व्यापक होत जातो. साहित्यप्रवाहानं व्यापक होणं फार महत्त्वाचं असतं.

दलित साहित्यानं पुढच्या साहित्यप्रवाहांना एक प्रकारचं आत्मभान दिलेलं आहे. आदिवासी साहित्यप्रवाहातील लेखक असो, भटक्या-विमुक्त प्रवाहातील लेखक असो किंवा स्त्रीवादी साहित्यप्रवाह असो या सगळ्या लेखकांना एक दृष्टिकोन, भान, एक तीव्र जाणीव ही दलित साहित्यप्रवाहाने दिलेली आहे. मराठी लेखकांना, मराठी साहित्याला दलित साहित्याने जागतिक ओळख दिली आहे. मराठी दलित साहित्य हे अनेक भारतीय भाषांमध्ये भाषांतरित झालं आहे. अनुवादित झालेलं आहे. अनेक भारतीय भाषांमध्ये दलित साहित्याचा प्रवाह सुरू झालेला आहे. त्याला मराठी दलित साहित्य कारणीभूत आहे. आज आपण पाहिलं, तर हिंदीमध्ये, मल्ल्याळममध्ये, गुजरातीमध्ये, तेलुगुमध्ये असेल, अनेक दलित लेखक लिहिताहेत. त्यांच्यासमोर मराठीतल्या दलित लेखकांचा आदर्श आहे. मराठी दलित साहित्य हे अनेक विदेशी भाषांमध्येही अनुवादित झालेलं आहे. ते इंग्लिशमध्ये गेलं. फ्रेंचमध्ये गेलं. जर्मनमध्येही गेलं आहे. त्यामुळे या लेखकांना जागतिक ओळख मिळालेली आहे. एवढं मोठं काम दलित साहित्य प्रवाहामुळे झालेलं आहे. या सगळ्यांचा विचार करताना माझ्या असं लक्षात येतं की, या साहित्यामध्ये जे दुःख आहे, जी वेदना आहे, अश्रूंची जी भाषा आहे ही जगभर तंतोतंत सारखी आहे. सगळ्या जगामध्ये अश्रूंची भाषा एकच असते. माणूस आणि मानवी मूल्य केंद्रस्थानी असतात, त्या ठिकाणचं साहित्यमूल्य, वाङ्मयीन मूल्य, सामाजिक मूल्य हे व्यापक स्वरूप धारण करतं. हे व्यापक स्वरूप महत्त्वाचं आहे म्हणून दलित साहित्य हे केवळ मराठी पुरतं राहिलं नाही. ते जागतिक पातळीवर गेलं ही लक्षात घेण्यासारखी गोष्ट आहे. एका अर्थानं दलित साहित्यप्रवाहानं अनेक साहित्यप्रवाहांचं नेतृत्व केलेलं आहे. अनेक लेखकांनी मान्य केलंय की, आत्मशोधाने स्वतःची ओळख शोधता येते, आणि मला त्यांचा हा आत्मशोध महत्त्वाचा वाटतो. दलित साहित्यप्रवाहाचं हे महत्त्वाचं वैशिष्ट्य आहे. महत्त्वाचं लक्षण आहे. मला वाटतं या दृष्टिकोनातून आपण सगळ्या साहित्यप्रवाहांचा विचार केला पाहिजे. या वेबिनारमध्ये मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल संयोजकांचे आभार मानतो. धन्यवाद!

(यावल, जि. जळगाव येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाने 'साहित्यातील नवे प्रवाह' या विषयावर दि.१० जून २०२० रोजी इंग्रजी, मराठी आणि हिंदी साहित्याच्या संदर्भात आंतरराष्ट्रीय वेबिनारचे आयोजन केले होते. या वेबिनारमध्ये मराठी साहित्यातील नवे प्रवाह या संबंधी डॉ. मनोहर जाधव यांनी प्रमुख अतिथी म्हणून दिलेले व्याख्यान.)

-डॉ. मनोहर जाधव सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागात वरिष्ठ प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत.

▣▣▣

शब्दांकन : **प्रा. भिकचंद लांडे, ज्योत्स्ना खंडागळे**

**डॉ. मनोहर जाधव**
मराठी विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे ४११००७
चलभाष : ९८२२८५०२९०
ईमेलः manohar2013@gmail.com

नव्वदोत्तरी महानगरी कवितेतील प्रयोगशीलतेचा शोध घेणारा लेख

# प्रयोगशीलता आणि नव्वदोत्तरी महानगरी कविता

प्रा. संतोष पद्माकर पवार

**प्रास्ताविक**

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये नव्वदोत्तरी महानगरी कवितेतील प्रयोगशीलतेचा शोध घेतला जाणार आहे. त्यासाठी प्रयोगशीलता म्हणजे काय, तिचे स्वरूप तसेच नव्वदोत्तरी महानगरी कवितेतील आशयसापेक्ष व रचनासापेक्ष प्रयोगशीलता शोधली जाणार आहे

**प्रयोगशीलता म्हणजे काय ?**

कवितेतील प्रयोगशीलतेबद्दल वसंत आबाजी डहाके म्हणतात की, प्रयोग करणं म्हणजे नवीन काही करू पाहणं, नव्या गोष्टींचा शोध घेणं अज्ञात प्रदेशात वाट काढणं... प्रयोगशीलता म्हणजे सर्जनशील प्रयोगशीलता. खरं तर सर्जनाच्या क्रियेतच प्रयोगशीलता अनुस्यूत असते (डहाके, वसंत आबाजी : २००६:३३६ )

याचा अर्थ कवी कवितेत नव्याने जे करतो ते प्रयोगशील बनत असते. ते सर्जनशीलतेच्या अंगाने असणे म्हणजेही प्रयोगशीलता होय. कविता हा वाङ्मयप्रकार तुलनेने प्रचंड लवचिक असून त्यातील प्रत्येक कविता ही त्या कवीसाठी प्रयोगस्वरूप असू शकते. कवीला दरवेळी नवी रचना करायची असते. त्यामुळे तो दरवेळी नवे काहीतरी शोधतो, नवे मांडतो, आधी पाहिले गेले नसेल असे विविध प्रयोग साकार करतो. प्रयोगशीलतेबाबत वसंत पाटणकर यांनीही 'कवितेचा रूपशोध' या समीक्षाग्रंथात आपली भूमिका मांडून प्रयोगशीलतेबाबत पारंपरिक विचारांचा प्रतिरोध केला आहे. वाचा- (कवितेचा शोध-लेखक- वसंत पाटणकर) पाटणकर यांची चिकित्सा प्रयोगशीलतेच्या प्रयोजनासंदर्भाने तात्त्विक पातळीवर झालेली असून डहाके यांनी ती उपयोजनाच्या पातळीवर मांडली आहे.

कवितेतील प्रयोगशीलता ही त्यातील शब्द, शब्दबंध, शब्दक्रम, वाक्यरचना, कवितेची रचना व मांडणीतूनही आकाराला येते. शिवाय लयीच्या आणि नादतत्त्वाच्या माध्यमातूनही साकारली जाते. शब्दनिष्ठ शैली, रचनानिष्ठ शैली, अर्थनिष्ठ शैली अशा शैली उपायांनीदेखील कवितेत प्रयोग करता येतात. रचनेतील प्रयोगशीलता ही कवितेच्या भौमितिक आकारमानानुसारही बघता येऊ शकते.

**प्रयोगशीलतेचे स्वरूप**

कवितेतील प्रयोगशीलतेमागे अनेक कारणे असतात. कवीचे असमाधान, दृश्यकला व उपयोजित कला प्रभाव, परंपरा व काही पूर्वसुरी कवींबद्दल नकार, कवीची प्रातिभ उर्मी, तसेच फॅशन किंवा चूष म्हणून प्रयोग करणे या कारणाने कवी प्रयोगाकडे वळत असतो. वरील कारणे ही प्रयोग करण्यामागे प्रेरणाही ठरतात. कवी आपल्या भाषेतूनच व्यक्त होतो. शब्द हेच त्याच्या सर्जनक्रियेतील मुख्य साधन असते. तथापि कवी त्या

शब्दांसोबतच तो आशय, रचना या दृष्टीने कवितेत प्रयोगशीलता साकारत असतो.
वसंत आबाजी डहाके यांनी कवितेच्या प्रयोगशीलतेचे तीन स्तर कल्पिले आहेत.
१. भाषिक स्तर : शब्द, शब्दक्रम, वाक्यविन्यास, परिच्छेद, शब्द-नाद, लय, छंद- वृत्त- उपयोजन इत्यादी.
२.कथन-निवेदन- अर्थात्मक स्तर: अलंकार, प्रतिमा, प्रतीक, कल्पनाबंध, आशयसूत्र इत्यादी.
३. उपयोजनलक्ष्यी स्तर : रचनाबंध- सुनीत, गझल, भावकविता, दीर्घकविता, खंडकाव्य वगैरे प्रकार( डहाके, वसंत आबाजी :२००६:३३७ )

याचाच अर्थ कवी आपल्या कवितेत प्रयोगशीलता आणण्याच्या दृष्टीने भाषिक स्तर, कथन- निवेदन स्तर, उपयोजनलक्ष्यी स्तर यांना अग्रक्रम देऊन कवितेत प्रयोगशीलता आणण्याचा प्रयत्न करत असतो. कवितेतील प्रयोगशीलता भाषेच्या, लयीच्या, नादतत्त्वाच्या साहाय्याने येते. भाषा ही एक नियमबद्ध व्यवस्था आहे. प्रयोगशीलता नियमांचा भंग करून साकारली जाते. कवितेतील प्रयोग हे चित्रकलेप्रमाणे मांडणी आणि सादरीकरण पातळीवर साकारले जातात.

**नव्वदोत्तरी महानगरी कवितेतील प्रयोगशीलता**

नव्वदोत्तरी मराठी कविता म्हणजे १९९० नंतरच्या काळातील जागतिकीकरणाचे प्रत्ययाला आलेले संवेदन होय. जागतिकिकरण ही एक अर्थशास्त्रीय घटना असल्याने साहजिकच ते बाजारवाद व वस्तू उपभोगाशी जवळीक असणाऱ्या महानगरात सर्व प्रथम अवतरले. या कवितेत जागतिकीकरणाचे चित्रण येऊ लागले. त्यामुळे परंपरेची कविता टाळत नवे जग मांडताना कवींनी प्रयोग करणे साहजिक होते. त्यामुळे नव्वदोत्तरी महानगरी कवितेत प्रयोगशीलतेच्या प्रवृत्तीचा फार मोठा वाटा आहे. नव्वदोत्तरी कवितेत रचनेच्या पातळीवर आढळून आलेली प्रयोगशीलता उल्लेखनीय अशी आहे. हे लक्षात घेऊन नव्वदोत्तरी महानगरी कवितेच्या आशयसापेक्ष, व प्रयोगशीलतेची चर्चा करू.

**१.आशय स्तरावरची प्रयोगशीलता**

जागतिकीकरणातील बदलांनी जगाची संपूर्ण भौतिक रचना बदलली. भोवती उभी राहिलेली अत्याधुनिक दळणवळण यंत्रणा उदा. टीव्ही, संगणक, मोबाईल, चॅनेल्स, मॉल्स, ग्लो-साईन्स, होर्डींग्ज, चकचकीत रस्ते, हाय मास्ट दिवे, गाड्यांची नवनवी मॉडेल्स, गगनचुंबी इमारती, टाऊनशिप्स अशा साऱ्या जगात वावरणाऱ्या कवीने आपल्या कवितेत हे सर्व जग आणताना त्याबद्दलचे अनेक इंग्रजी शब्द जसेच्या तसे आणून ठेवले. आशय व रचनास्तरावरील अनेक प्रकारचे बदल या कवितेने आपलेसे केले.

आयुष्य हे ब्रँडेड झाले हा युगाचा घोष होतो. माणूस विकाऊ वस्तू बनला आहे. माणुसकी संपली आहे. उपभोगवादी वस्तूंची गर्दी माणसाला बाजूला सारून त्याला दुय्यम करते आहे. वस्तू आणि माणसे यांची दृश्यातील अदलाबदल अर्थपूर्ण ठरवून टाकणारी ही कविता आहे. मंगेश काळेंच्या कवितेतही हे अमानवीकरण आकाराला येते.

हेमंत दिवटे, संजीव खांडेकर यांच्या कवितेत बाजारव्यवस्थेचे सर्वव्यापी जग, पछाडलेल्या जगण्यातील कलह, कॉर्पोरेट संस्कृतीने आध्यात्मिकतेचे झालेले व्यावसायीकरण, चंगळवादी चढाओढ, मध्यमवर्गीय जीवनाला संपविणारा ग्राहकवाद, लैंगिक जाणिवांचा मुक्त संवाद अशी आशयसूत्रे येतात, तर सलील वाघ यांच्या कवितेत आयटी (माहिती व तंत्रज्ञान) क्षेत्रातील परिभाषा येते. लोकल- ग्लोबल संघर्ष, स्थानिकांचा आवाज, भाषाभिमानी भूमिका, बहुभाषिकांचा गलबला येतो.

श्रीधर तिळवे यांच्या कवितेत मीडिया केंद्रित संवेदनशीलता, माणसाचे वस्तूकरण, स्थानिक अभिमान व स्वभाषेची महती, सांस्कृतिक, साम्राज्यवाद विरोधी लढा, जागतिक घडामोडी, नव्या जगातील उदासपणा, कंटाळा, शून्यवादी प्रत्यय, स्वचे अतिव्याप्त रूप, चिन्हीय संवेदन असा आशय आढळतो. सचिन केतकर यांच्या कवितांत मार्केटने आणलेले बधीरपण, जून परंपरेची अखेर, संगणकीय वैविध्य व रचना, माहितीजालावरील समस्या, काळाच्या रेट्यात संपणाऱ्या गोष्टी, गुजरातचे अस्वस्थ दशक दिसते. मन्या जोशी यांच्या कवितेतील आशयसूत्रात एकटेपणा,

मीडियाकेंद्री मानसिकता, व्यक्तिवाद, अमूर्त भावना, परंपरेची चेष्टा, आदर्शवादाला नकार, सामाजिक दृष्टिकोनाबद्दल तुच्छता, उपरोधिक मानसिकता यांचा समावेश होतो.

नव्वदोत्तरी महानगरीय कवितेतील एकूण आशयविश्व - महानगरातील गिचमिड, गर्दी अशा असुरक्षित जगण्यातून एक अनिश्चितपणाची जाणीव वाढीस लागते. त्यातून व्यक्तीचा संवाद तुटल्याने संवादशून्यता, माणसाला त्यातून वाटणारे निराधारपण, मोठ्या गर्दीत आपण हरवून गेल्याची जाणीव सतत होत राहून आपले अस्तित्व क्षुद्र बनले असल्याची सल निर्माण होते. जीवन वैयर्थ असल्याचा भास, ही एक प्रकारची अर्थशून्यता महानगरी जीवांचे अंग बनून गेली आहे.

परात्मता, संवादशून्यता, माणसाचे निराधारपण, नगण्यता, त्याची अर्थशून्यता, आधुनिक जीवनातील विरुपता, भयावहता नव्वदोत्तरी महानगरी कवितेत येते. उत्तरआधुनिक काळात मोडणारे जवळपास सर्व जीवनसंदर्भ कवितेचे विषय आहेत. जागतिकीकरणात व्यक्तीच्या जीवनात नवनव्या समस्या व माध्यमांनी व्यापलेला अवकाश यांचे संदर्भ या कवितेला आहेत.

एकूणच आधुनिक मराठी कविता आणि साठोत्तरी कविता यांच्या विश्वापेक्षा अत्यंत वेगळे विश्व या कवितेत असल्याने ही प्रयोगशीलता साकारात गेलेली आहे.

**२. रचना स्तरावरची प्रयोगशीलता**

रचना स्तरावर दीर्घता ही प्रयोगशीलता नव्वदोत्तरी कवितेत दिसते. दोन-तीन पानांपासून पुढे सत्तर-ऐंशी पानांपर्यंत दीर्घकविता मराठीत आढळू लागल्या आहेत. श्रीधर तिळवे-मंगेश नारायणराव काळे (सर्व कवितासंग्रह), हेमंत दिवटे ( थांबताच येत नाही, या रूममध्ये आलं की लाईफ सुरू होतं ), संजीव खांडेकर (सर्चइंजिन, ऑल दट आय वान्ना डू, स्मायलीज), संतोष पद्माकर पवार (भ्रमिष्टाचा जाहीरनामा), प्रवीण दशरथ बांदेकर (खेळ- खंडोबाच्या नावानं), शंकरराव दिघे ( या शतकाचा सातबारा होईल कोरा), अजय कांडर (हत्ती इलो, युगानुयुगे तूच ), नीरजा (मी माझ्या थारोळ्यात), कविता महाजन (समुद्रच आहे एक विशाल जाळं), गणेश आत्माराम वसईकर ( मधल्या मध्ये), वर्जेश सोलंकी (ततपप) असे कवी व त्यांच्या दीर्घकविता नव्वदोत्तरी काळातील असून पवार, दिघे, बांदेकर, कांडर वगळता जवळपास सर्व कवी महानगरी संवेदनेचे आहेत.

महानगरी कवितेत श्रीधर तिळवे, सलील वाघ, मन्या जोशी, मंगेश नारायणराव काळे, दिनकर मनवर, संजीव खांडेकर, नितीन अरुण कुलकर्णी, नितीन वाघ, उत्पल वनिता बाबुराव, रवी पवार, नीरजा, कविता महाजन, हे प्रयोगशील कवी असून त्यांनी आशय व रचनेच्या पातळीवर अनेक प्रयोग केले आहेत. शब्द, वाक्य, अर्थ या तिन्ही स्तरांवरचे त्यांचे निरनिराळे प्रयोग आहेत. तसेच कवितासंग्रहाच्या नावांपासून प्रयोगाला सुरुवात करून आशय, आशयसूत्रे यांच्यापासून प्रयोग करीत करीत त्यात एकसूत्री आशयाच्या कविता गुंफण्याची कामगिरी या कवींनी केली आहे. भूर्जपत्र कविता, आयटीतील संगणक संज्ञावली, मराठी, इंग्रजी, भाषेतले शब्द वापरून तयार केलेले श्लोक वाटतील अशा संस्कृत धाटणीच्या रचना व त्याखाली येणारे मराठी भाषेतील निरूपण असा हा प्रयोग आहे. सलील वाघ यांनी केवळ पाच शब्दांत बैठकीची लावणी लिहिली आहे.

अवं राया

लॉगीन करताय न्हवं... (रेसकोर्स आणि इतर कविता :३६)

लावणीच्या या मुखड्यात लावणीची नजाकत, तिचा ठसकेबाजपणा, तसेच लावणीचे द्वैअर्थी असणे या सर्व लावणी वैशिष्ट्यांचा त्यात प्रत्यय येतो. तसेच स्फुट कवितांमध्ये असलेले रचनेच्या पातळीवर होणारे असंख्य प्रयोग आहेत. रचनेतील प्रयोगशीलता ही भौमितिक आकारमानानुसारही म्हणजेच शब्दांचा क्रम, विशिष्ट अंतर, समास यानेदेखील अधोरेखित करता येते. उदाहरणादाखल- गणेश वसईकर यांच्या कवितेत अशी दृश्यप्रयोग रचना आढळते.

पुढच्याच स्टेशनवर उतरायचंय म्हणून मी लोकलच्या दारात लोंबकळत उभा ... ( मधल्या मध्ये :

६४ )

या कवितेत चित्र व दृश्यमांडणी यांचेही अनेक प्रयोग आहेत. मीनाक्षी पाटील सुळका नावाची कविता लिहिताना शब्दरचनाही सुळक्याप्रमाणे करतात. वरील रचनाप्रकार/मांडणी इतरही महानगरी कवींच्या कवितेत आढळते.

मंगेश नारायणराव काळे (सर्व कवितासंग्रह), दिनकर मनवर (roots) , रवी पवार, नितीन भरत वाघ यांनी आपल्या चित्र व कवितेची सांगड घालून नव्वदोत्तरी प्रयोगशील कवितेत दृश्यमांडणीची मोठी भर घातली आहे. दिनकर मनवर आपल्या कवितेत लिहितात–

अभंग भंगावे । ओवी फुटावी । मुक्तछंदातून लय ओघळावी। चित्रातून कविता, कवितेतून चित्र बहरावे । एका ओळीची कविता अन्य एका सरळ रेषेचे चित्र व्हावे । ( मनवर,दिनकर :२००४ :०७)



(दिनकर मनवर यांची एक रेखाचित्र  कविता)

कविता मांडणी अनोख्या पद्धतीने करणे, त्यात आकृत्या काढणे, अनुवाद समाविष्ट करणे, शब्द, अर्थ विचलन घडविणे, शब्द, वाक्य अदलाबदलीचे तत्त्व अनुसरणे असे भाषिक स्तरावरचे प्रयोगही नव्वदोत्तरी महानगरी कवितेत आढळून येतात.

**निष्कर्ष व समारोप**

नव्वदोत्तरी महानगरी कवितेत परंपरेच्या असलेल्या असमाधानातून कवी प्रयोगशीलतेकडे वळताना दिसतात. ही प्रयोगशीलता शब्द, शब्दबंध, शब्दक्रम, तसेच त्यांच्या विचलनातून आकाराला येते. या कवितेत  मोठ्या प्रमाणावर आशयसापेक्ष व रचना सापेक्ष अशा स्तरावर प्रयोगशीलता आलेली आढळते. मीडिया केंद्रित संवेदनशीलता, माणसाचे वस्तूकरण, स्वअभिमान व स्वभाषेची महती, सांस्कृतिक गळचेपी, साम्राज्यवाद विरोधी लढा, जागतिक घडामोडी, नव्या जगातील उदासपणा, कंटाळा, शून्यवादी प्रत्यय, स्वचे अतिव्याप्त रूप, चिन्हीय संवेदन असा आशय प्रयोगस्वरूप आढळतो. रचनास्तरावर दृश्यमान कविता, चित्रस्वरूप कविता, मांडणीची शैली अशा अंगाने कवींनी प्रयोगशीलता आणली आहे. या महानगरी कवितेतील प्रयोगशीलतेने समकालीन आशयाला अधोरेखित केले आहे. महानगरी कवितेतील प्रयोगशीलता  या पुढील काळात एकूण नव्वदोत्तरी कविता प्रवाहाला बळकटी देणारी असेल.

संदर्भ

**१. डहाके, वसंत आबाजी.** २००६ आधुनिक मराठी कवितेतील प्रयोगशीलता(ed) रवींद्र शोभणे. मराठी कविता: परंपरा आणि दर्शन. नागपूर : विजय प्रकाशन , २००६, पृष्ठ क्र. ३३६–३३७

**२. पाटणकर, वसंत.** २०११ कवितेचा शोध. मुंबई : मराठी विभाग, मुंबई विद्यापीठ, २०११

**३. मनवर, दिनकर.** २००४.roods मुंबई, श्याम गोसावी,२००४

**४. वसईकर, गणेश आत्माराम. २०१५** मधल्यामध्ये. मुंबई : लोकवाङ्मय प्रकाशन, २०१५. पृष्ठ क्र. ६४

**५. वाघ, सलील. २००८** रेसकोर्स आणि इतर कविता . पुणे : टाईमस्पेस कम्युनिकेशन प्रकाशन ,२००८

**प्रा. संतोष पद्माकर पवार**
मराठी विभाग प्रमुख, अण्णासाहेब आवटे महाविद्यालय,
मंचर, ता. आंबेगाव, जिल्हा पुणे–४१०५०३
चलभाष : ९४२२७९६६ ७८

# नव्वदोत्तर स्त्री काव्यातील मिथकांचे अर्थनिर्णयन

**नव्वदोत्तर स्त्री– काव्यातील– पुराणकथांमधील मिथकांचे उपयोजन आणि अर्थ उलगडून दाखवणारा समीक्षा–लेख**

सरिता सोमाणी

मिथके समाजाच्या नेणिवेच्या पातळीवर जिवंत असतात. लोककथा, लोकगीते यांमधून जनमानसात रुजवली जातात. मिथकांचा व्यक्तीच्या घडणीवर व सामाजिक रूढींवर प्रभाव पडतो. प्रत्यक्षात बहुविध मानवी पैलू असणारी वास्तवातली मानवी पातळीवरील स्त्री मिथकांमधून साचेबद्ध केली जाते. स्त्रीमिथकांमधून स्त्रीप्रतिमेचे उदात्तीकरण केलेले आढळते. त्याग, प्रेम, समर्पण, पातिव्रत्य या गुणांच्या कालातीत, एकमेवाद्वितीय आदर्शरूपात, तर कधी अशारीर अशा अमूर्त कल्पनांच्या रूपात स्त्री कशी असावी याविषयीच्या पुरुषांच्या अपेक्षा स्त्रियांच्या गळी उतरवण्यासाठी मिथक या साधनाचा सोयीस्कर वापर केला जातो. पुरुषसत्ता अबाधित राखण्यासाठी मिथके अपरिवर्तनीय मानण्याची प्रवृत्ती जोपासली जाते. वास्तवातील स्त्रीविषयक जीवनानुभव, तिचे शारीर अस्तित्व, तर्कनिष्ठ नीतिनियम डावलून भ्रामक आदर्शवाद, कर्मठ रूढींचे बळकटीकरण मिथकांद्वारे केले जाते. स्त्रीची स्वाभाविक निसर्गसुलभ वर्तणूक सदोष म्हणून दडपली जाते. तथाकथित पुरुषी आदर्श व कल्पनांचा तिच्या मूळ प्रवृत्तीवर मुलामा देऊन तेच जणू नैसर्गिक असल्यासारखे मिथकांच्या रूपाने भासवले जाते, समाजमनात रुजवले जाते.

नव्वदोत्तर कालखंडातील स्त्रीकाव्यात स्त्रीमिथके म्हणजे स्त्रीसुलभ गुणविशेषांचा साचा या गृहीतकास छेद देऊन स्त्री ही सक्षम व्यक्ती आहे हा दृष्टिकोन स्त्री–कवींनी बाळगलेला दिसतो. स्त्रीचे स्वाभाविक जगणे पुरुषप्रधानतेने कसे संकुचित केले; सोयीस्कररीत्या तिचे जिवंत अस्तित्व डावलले व पितृप्रधानतेला पूरक, पुरुषांना सोयीस्कर असे स्त्रीत्वाचे सर्वसमावेशक सारतत्त्व दंतकथांमधून पेरले; त्या दंतकथा आधारभूत मानून समाजाचे नीतिनियम ठरवले. सत्तासंबंधांवर आधारलेले हे पुरुषसत्ताक राजकारण उघड करून स्त्रियांनी आपल्या अनुभवांच्या आधारे बुद्धिनिष्ठतेने मिथकांचा समकालीन अन्वयार्थ लावण्याचा यत्न कवितेतून केला. धर्म, पुराणकथा, रूढीपरंपरेतील स्त्रीविषयक अपसमज दूर झाले, तर वास्तवातल्या स्त्रीला माणूस म्हणून स्वीकारले जाईल, स्त्री–पुरुष संबंध सत्यावर आधारित असतील, साचेबद्धपणातून दोहोंची मुक्तता दोघांनाही सुखावह ठरेल ह्यासाठी स्त्रीकाव्यातील मिथकांच्या नवअर्थनिर्णयनाकडे लक्ष वेधणे उचित ठरते.

**यशोधरा**

गौतम बोधिसत्त्वाच्या कथेनुसार राज्यपद, पत्नी, नवजात पुत्र असे लौकिकार्थाने अत्युच्च सुखी जीवन

लाभलेला सिद्धार्थ जरा, व्याधी व मृत्यूच्या दर्शनाने विरक्त होतो. जन्ममृत्यूच्या चक्रातून सुटण्याचा, मानव जातीला दु:खमुक्त करण्याचा मार्ग शोधण्यासाठी तप करायचा, बुद्ध होण्याचा निश्चय करतो. परंपरा प्रलोभनांवर मात करणाऱ्या सिद्धार्थाचे गौरवीकरण करते व यशोधरा दुर्लक्षितच राहते. बुद्धाचे जीवनदर्शन, तत्त्वज्ञान मान्य करूनही यशोधरेच्या बाईपणाचे, तिच्या ऐहिक दु:खाचे भान प्रज्ञा लोखंडे बाळगतात. 'ती समजावत राहिली / अवघ्या शरीराला...मनाला / घट्ट अडसर घातला तिनं / आयुष्यातल्या उजाड ऋतुंना' (सिद्धार्थास, अंतस्थ, पृ. ५८ ) जीवनमृत्यूचे कोडे उलगडून तृष्णेवर विजय मिळवणाऱ्या प्रेषिताच्या पत्नीचा त्याग प्रचलित व्यवस्था गृहीतच धरते. तथागताची पत्नी म्हणून तिची ओळख व्यवस्थेला पुरेशी वाटते. यशोधरेचे सोसणे, भोगणे, तिच्या दु:खाचे चित्रण करताना माणूस म्हणून मिथकाकडे पाहण्याची स्त्रीविशिष्ट दृष्टी अपारंपरिक आहे. पती वियोगाचे दु:ख पचवणाऱ्या यशोधरेची बुद्ध होऊन देवपदवीला पोहोचलेल्या सिद्धार्थाशी भेट होते, गौतम बुद्ध तिच्याकडे प्रथम भिक्षा मागायला येतो, तो प्रसंग रेखाटताना प्रज्ञा लोखंडे लिहितात, 'तू परतून आलास / आभाळाएवढा उंच अथांग होऊन / उभा राहिलास तिच्यासमोर / असीम करुणेचे हात पसरून / देणार होती का यशोधरा / तुझ्याकडून अव्हेरल्याची ठसठसती वेदना? / रक्तातून जखडलेलं तुझं अस्तित्व? / न संपणाऱ्या दु:खाच्या अटळ शोधात / तू निघालास तेव्हा / तुला दिसली का? सिद्धार्था / यशोधरेच्या लख्ख डोळ्यांतून / निथळणारी अपार तृष्णा!' (तत्रैव) यशोधरेला न संपणारे दु:ख देऊनच मृत्युंजयी तत्त्वज्ञान प्राप्त करून बुद्ध सिद्धावस्थेला पोहोचला. या मार्गावर निघताना सिद्धार्थाने प्रपंचाकडे पाठ फिरवली होती. यशोधरा मात्र त्या दु:खाला पचवून जीवनाला सामोरी गेली; तिने मुलाला मोठे केले; गौतम बुद्धाची आयुष्यात पुन्हा भेट झाल्यावर ती रडली नाही; त्याने दिलेल्या दु:खाला ती उगाळत बसली नाही; तिनेही संन्यासदीक्षा घेऊन तृष्णेचा त्याग केला; स्वअस्तित्वाच्या अर्थपूर्ण शोधासाठी सिद्ध झाली. म्हणूनच, 'कवयित्रीला कधीच मोह होत नाही / सिद्धार्थ होण्याचा / कवयित्रीला मोह होतो / यशोधरेच्या हातांचा, / सिद्धार्थाला बुद्धत्व बहाल करणाऱ्या / यशोधरेच्या / लसलसत्या विराट / तृष्णेचा / कवयित्रीला मोह होतो / यशोधरेचा काळोख मोजण्याचा / पारंपरिक / दैहिक / दार्शनिक' (कवयित्रीला मोह होतो, मी भिडवू पाहते समग्राशी डोळा, पृ. १२ ) विश्वभानाच्या पातळीवर स्वअस्तित्वाचे अंतिम सत्य शोधणे; जीवनमृत्यूचे चिंतन मांडणे; ज्ञानप्रक्रियेतून हाती येणारे निखालस, शाश्वत ज्ञान प्राप्त करणे हा बुद्धाइतकाच यशोधरेचाही हक्क होता. तिलाही परमशांतीची ओढ होती. इतिहासाने ती संधी तिला द्यायला हवी होती. यशोधरेच्या निमित्ताने सार्वत्रिक भगिनीभावातून स्त्री-कवी भूतकाळाचे नवेच आकलन मांडते, 'हवी होती यशोधरेच्या चेहऱ्यावर / तीच परम शांतता / किंवा / माझ्याही किंवा / पृथ्वीवरच्या / कुठल्याही / रंगाच्या, / कातडीच्या, / धर्माच्या, / जातीच्या, / वर्गाच्या / बाईच्या चेहऱ्यावर / तुझ्याइतकं शाश्वत / प्रगाढ बुद्धस्मित' (बुद्धस्मित, तत्रैव, पृ.११ ) दु:खातून तारून नेणारा आत्मप्रत्यय, मानवी जीवनाची सार्थकता, समष्टीबद्दल सहृदय कल्याणप्रद मैत्रभाव, धर्मदर्शन या व्यापक मूल्यगर्भ अवकाशापासून जाणीवपूर्वक स्त्रियांना दूर ठेवले गेले हे वास्तव यशोधरेच्या या मिथकाच्या पुनर्वाचनातून प्रज्ञा लोखंडे निदर्शनास आणून देतात.

**सावित्री**

मृत्यूदेवता यमराजाकडून वरदान मागणारी, पती सत्यवानाचे प्राण परत मिळवून त्याला पुन्हा जिवंत करणारी सावित्री हे मिथक आदर्श पत्नीरूपात पुन्हा स्त्रीस साचेबद्ध करते. वटसावित्रीचे व्रत करून पुढील सात जन्म हाच पती मिळावा ही अभिलाषा विवाहित स्त्रियांनी मनात बाळगावी अशी साचेबद्ध मानसिकता 'सावित्री' ह्या स्त्रीमिथकामधून दृढ केली जाते. समाजातील स्त्री-अत्याचाराच्या घटना व वाढता

हिंसात्मक स्त्रीद्वेष ह्या पार्श्वभूमीवर नीरजा सावित्रीला उद्देशून विचारतात, 'माझ्या बाये, / सत्यवानाने डागले असते / तोंडावर / आणि जाळले असते तुला / तुझ्या बापाच्या राज्यासाठी / तर किती घातल्या असत्यास / प्रदक्षिणा / वठलेल्या बुंध्याला?' (सावित्री, वेणा, पृ.४८ ) पुरुषवर्चस्ववादी मानसिकतेतून स्त्रियांशी गैरवर्तणूक करणाऱ्या पुरुषासाठी स्त्रीने दीर्घायुष्याची कामना करायची का? हा गंभीर प्रश्न सावित्रीच्या निमित्ताने स्त्री-कवी उपस्थित करते. 'सावित्री! बाई, पुन्हा एकदा येऊन जा. / ह्या मतलबी सत्यवानांनी / केली आहे होळी / आमच्या आयुष्याची; / त्यांचे वाढू द्यायचे / हे अनाठायी तण / की संपवायच्या ह्या वेदना / जिवंत मरणाच्या, / ते एकदा सांगून जा, / ते एकदा सांगून जा.' (तत्रैव, पृ. ४९ ) लैंगिक गैरवर्तनातून स्त्रीदेहाचे धिंडवडे काढणे; तिच्या मानवी प्रतिष्ठेची पायमल्ली करणे; उपभोग्य व प्रेक्षणीय वस्तुरूपात स्त्रीदेहाचे चित्रीकरण करणे; त्याचा बाजार मांडणे या हिंसक बीभत्सतेचा निर्देश करून अशा विकृत मानसिकतेने पछाडलेल्या पुरुषाच्या पत्नीने सात जन्म त्याची अभिलाषा मनी बाळगावी का? त्याला परमेश्वर समजून पत्नी म्हणून तिने त्याच्या दुष्कृत्यांकडे दुर्लक्ष करणे योग्य आहे का? नीलम माणगावे या वास्तवाचा जळजळीत निषेध करून लिहितात, 'सांग सावित्री तू ही सांग / ते लिंगपिसाटही / असतील कुणाचे तरी पती / सात जन्मी त्याच पतींच्या प्राप्तीसाठी / पुजावा का वटवृक्ष त्यांनी?' (सांग द्रौपदी, सांग सावित्री, शतकाच्या उंबरठ्यावर, पृ. ५३) मिथकांमधून रुजवलेले प्रस्थापित संस्कार नाकारून प्रचलित व्यवस्थेला प्रश्न विचारणारी व बंडाची भाषा उच्चारणारी धिटाई उपरोक्त कवितांमधून दिसते. 'सावित्री' या मिथकाभोवती गुंफलेले पातिव्रत्याचे भावनिक वलय छेदून त्याकडे तर्काधारित बुद्धिनिष्ठ नवदृष्टीने जया गायकवाड लक्ष वेधतात. 'वडसत्यवान' हे कवितेचे शीर्षकही अपारंपरिक आहे. त्या लिहितात, 'मला हवा आहे वडसत्यवान / 'पत्नीव्रता' व्रत धरणारा / मी सावित्री नव्या युगाची! /...मातीचे घोडे बनविणाऱ्या / जंगलातून कंदमुळे गोळा करून जगणाऱ्या सत्यवानाला / प्राण आणि राज्यही का म्हणून मिळवून द्यावे? / त्याला हवेच असेल गतवैभव / तर / किमान त्याला बनू द्या वडसत्यवान पत्नीव्रता! / सात जन्माचा घाट्यातला सौदा / साफ नामंजूर!! / मी सावित्री नव्या युगाची!!!' (वडसत्यवान, नारीजातक, पृ.१६-१७) राज्यविहीन, हतप्रभ, अल्पायुषी सत्यवान जन्मोजन्मी पती म्हणून लाभावा ह्यासाठी सावित्रीने व्रत करण्याऐवजी संसाररथाची सूत्रे स्वतःच्या ताब्यात ठेवणारी, यमराजाकडे वरदान मागून सत्यवानाचे राज्य, प्राण व सासू-सासऱ्यांना दृष्टी मिळवून देणारी सावित्रीसारखी पत्नी लाभावी म्हणून सत्यवानानेच व्रत करायला हवे. सावित्रीच्या पुराणकथेचे हे पुनर्वाचन अधिक तर्कशुद्ध आहे, असे म्हणता येते.

**कुंती**

महाभारत या महाकाव्यात 'कुंती' या व्यक्तिरेखेचे पांडवांची माता म्हणून ठळकपणे चित्रण आढळते; परंतु समाजमनावर विवाहापूर्वीच कर्णाला जन्म देणारी व जननिंदेच्या भयाने नवजात कर्णाला करंड्यात घालून अश्व नदीत सोडणारी कुमारी माता कुंतीचे चित्र अधिक प्रभावीपणे उमटलेले दिसून येते. नीतिमत्तेच्या बाबतीत स्त्रियांवर सामाजिक व राजकीय दडपणे अधिक असतात. कुमारी मातेला सामाजिक अवहेलना सोसावी लागते त्यामुळे न्याय-अन्याय, सद्सदविवेकबुद्धी, मानवतावाद सारे बाजूला सारून कुमारी मातेने आपल्या नवजात अर्भकाचा त्याग करणे अपरिहार्य आहे हा समज कुंतीच्या वर्तणुकीतून दृढ केला गेला. जन्मभर पुत्रवियोगाचे दुःख व स्वतःहून कर्णाचा त्याग केल्याचे शल्य कुंतीने मनात बाळगले, त्यासाठी तिने स्वतःस दोषी ठरवले. पुरुषसत्ताकतेला पूरक स्त्रीविषयक अपसमज रुजवण्यासाठी 'कुंती' हे मिथक अशा प्रकारे उपयोगात आणले गेले. कर्णाच्या मृत्यूनंतर कुंतीने त्याचे जन्मरहस्य युधिष्ठिराला सांगितले, तिच्या गौप्यवृत्तीमुळे युधिष्ठिराने कुंतीच्या

रूपाने अखिल स्त्रीजातीला शाप दिला. कर्णाची आई म्हणून कुंतीला कधी जगताच आले नाही, कुंतीपुत्र म्हणून कर्णालाही समाजमान्यता मिळाली नाही. कुंतीच्या अंतर्मनात चोरून ठेवलेल्या वात्सल्याची, ठसठसणाऱ्या या वेदनेची आच अंजली कुलकर्णी यांना जाणवते. वास्तविक पाहता औरस मुलांच्या हितसंबंधांचे संरक्षण करण्यासाठी तिने कर्णाचे रहस्य गुपित ठेवले होते तरीही गुपित मातृत्वाचे शल्य उरीपोटी जपणाऱ्या दुर्दैवी स्त्रियांसाठी समाज-संस्कृतीचे भय झुगारून नवनैतिकतेची घडण करताना 'कुंती' या मिथकाला नवे भान स्त्री-कवी देते. 'झिरझिरीत या पडद्यामागे / दिसे न कोणी कशी आकृती / आजवरी मी तिच्या भयाने / जगण्याला जणू दिली स्वीकृती / मी पडद्याचे भान झुगारित / आज अनावर जगणे झोकिन / अस्तित्वाच्या ठिकऱ्यांमधुनी / वाट स्वतःची शोधून काढिन...' (संबद्ध, पृ.८० ) सामाजिक नीतिमत्तेच्या भयाने स्त्रीने दुभंगलेले आयुष्य जगण्यापेक्षा स्त्रीनिष्ठ नैतिकता घडवण्यासाठी स्त्रियांनी प्रयत्न केले पाहिजेत, त्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे, असे स्त्री-कवी सुचवते.

**गांधारी**

गांधारी ही कुरुवंशातील अंध धृतराष्ट्राची पत्नी. अव्यंग असूनही दृष्टिहीन पतीसाठी स्वतःच्या डोळ्यांवर पट्टी बांधून जाणीवपूर्वक तिने अंधत्व स्वीकारले. अंध धृतराष्ट्राला आधार नाकारून आपणही पूर्णत्वाने कधी जगायचेच नाही हा गांधारीचा निश्चय म्हणजे तत्कालीन पुरुषप्रधान राजकारणाविरुद्ध घेतलेला निषेधाचा पवित्राही असेल; परंतु पतीची अनुगामिनी म्हणून तिने अंधत्व स्वीकारले असा भ्रामक आदर्शवाद तिच्या निमित्ताने जपला गेला. गांधारी या मिथकाकडे स्त्रियांनी सावध दृष्टिकोनातून पाहावे म्हणजे इतिहासाची पुनरावृत्ती टाळता येईल. स्त्रीला पतीनिरपेक्षही अस्तित्व आहे; तिच्या जीवनावर पूर्णत्वाने तिचाच अधिकार आहे; पतीच्या मर्यादांमुळे सदा संभ्रमित, परावलंबी, अपुरे, दुबळे अस्तित्व स्वीकारण्यात स्त्रीच्या स्वयंसिद्ध अस्तित्वाचे अवमूल्यन आहे ही जाणीव स्वाती शहा व संध्या रंगारी प्रकट करतात. स्वाती शहा लिहितात, 'चल गांधारी, / घटका भरलीय आता! / काळाला तुझी प्रतीक्षा आहे / इतिहासाची पुनरावृत्ती घडू नये म्हणून आता जागी हो! / सावध हो...सजग हो!! / आणि या पुढे कधीही विसरू नकोस / तू सुनयना आहेस...अनयना नाहीस' (अनुभूती, पृ. ५६) तर संध्या रंगारी म्हणतात, 'प्रिय, / तुझ्या नजरेतूनच / बघावं मी जग / अशी तुझी इच्छा / असेलही कदाचित / पण मला डोळे आहेत / हे कसं विसरू मी / गांधारीने केला होता त्याग / की उगवला होता सूड? / माहीत नाही / पण / आलीच तशी वेळ / तर / गांधारी व्हायचं / नाकारीनच मी अगदी ठामपणे' (संध्यारंग, पृ. २२२) प्रस्तुत कवितांमधून स्त्रीने स्वतंत्र जीवनदृष्टी बाळगून स्वतःच्या आयुष्याला सामोरे जाण्याचे भान दिसते तसे स्त्रीमिथकांमधून रूढ केलेल्या आदर्श स्त्रीप्रतिमांवरील मुलामा उतरवताना पारंपरिक मूल्यदृष्टीविषयीचे असमाधानही त्यामधून व्यक्त होते.

**द्रौपदी**

कौरवसभेत द्यूतात हरलेल्या पांडवांची पत्नी, कौरवांची दासी म्हणून द्रौपदीला ओढून भर सभेत आणले जाते, वस्त्रहरणाने तिची विटंबना केली जाते. 'कृष्णाने तिचे लज्जारक्षण केले' एवढ्याच प्रसंगाचे उदात्तीकरण करून परंपरा तिच्या पावित्र्याने भारलेल्या स्त्रीत्वाचे गोडवे गाते; परंतु स्त्रियांच्या कवितेत तडफडणाऱ्या अशांत मनाचे प्रतीक म्हणून 'द्रौपदी' या स्त्रीमिथकाचे उपयोजन झालेले आढळते. वादविवादाच्या वेळी स्त्रीमनात जागृत होणारी मानुषी प्रतिमा या दृष्टिकोनातून द्रौपदीचे चित्रण सुहासिनी इर्लेकर करतात. 'नपुंसकांच्या वंशवेलीसाठी / मांडव बांधणाऱ्या हे धर्ममार्तंडानो।/ आणि मान म्यान करून / गुडघ्यात वाकणाऱ्या नतदृष्ट आर्यपुत्रांनो / भारतातील हे महाभारत / अखेरचे नाही. नसेलही.' (गाथा, पृ.३१ ) शोकक्षोभाने व्याकुळ मानिनी स्त्री स्वतःच्या अपमानाने पेटून उठते; धर्म, सत्य, न्याय सर्वांवर आसूड ओढत स्त्रीवर मालकी हक्क प्रस्थापित

करून, तिला स्वतःची मालमत्ता समजून द्यूतात पणाला लावणाऱ्या पुरुषवर्चस्ववादी वृत्तीचा निषेध करते. द्रौपदीची वेदना, तिचा आकांत, संताप साक्षीभावाने जाणून घेत त्या पुढे लिहितात, 'भविष्यातील प्रत्येकच स्त्री असेल / वस्त्रहरित द्रौपदी सती, / पदोपदी दिसतील तसेच / दु:शासन आणि दुर्योधन भूपती / असेल मूक येथील न्यायदेवता / नि बहिरी असेल राजसभा-तीही षंढांची / असतील अंकुशहीन पुंडांचे हात / नि विराजतील सिंहासनावर / जन्मांध लाचार महिपती...' (तत्रैव, पृ.३२ ) पुरुषसत्ता व राजसत्ता यांच्या युतीपुढे न्याय, धर्म, सभ्यता संपून जाते; पुरुषवर्चस्ववादी मानसिकतेमुळे स्त्रीवर अन्याय होतो; तिच्या व्यक्तिगत स्वातंत्र्याचा लोप करून तिला गृहीत धरले जाते; वस्तुरूपात तिला पणाला लावले जाते; माणूस म्हणून तिच्यातील जिवंत चैतन्याचा विचार न करता तिची विटंबना केली जाते. 'द्रौपदी' या मिथकातून काळाचे संदर्भ बदलले तरी पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेत समस्त स्त्रीजातीच्या वाट्याला चिरकालीन दु:ख, अवमान, विटंबनाच येते हे स्त्री-कवी मांडते. प्रचलित व्यवस्थेविषयीचा संताप, चीड व्यक्त करताना स्त्रीमनात उफाळून आलेला विद्रोह कवितेत दृग्गोचर होतो. 'महाभारत-युद्धानंतर' (निरर्थकाचे पक्षी, पृ. ८९-९७) या कवितेत विटंबनेचे व पुत्रमरणाचे दु:ख सोसून, युद्धाचे भीषण परिणाम भोगून नवा धडा गिरवणारी द्रौपदी जेत्यांसाठी सन्मानजनक उद्गार काढत नाही', तर ती म्हणते, 'तसा सगळा प्रवासच / शिडाशिवाय भरकटणाऱ्या जहाजासारखा / आता मात्र आपणच हाकारायची / आपली नाव / आपलाच किनारा केला की / वादळातूनही पोचता येतं / थेट आपल्यापर्यंत.' (द्रौपदी, तत्रैव, पृ.९४ ) कुरुक्षेत्रावरील युद्धाचा, संघर्षाचा केंद्रबिंदू द्रौपदी नव्हती', तर भाऊबंदकीतला द्वेष, राजसत्ता व पुरुषांची युद्धखोर वृत्ती यातून ते विध्वंसनाट्य घडले. द्रौपदीचे वस्त्रहरण, भीमाने सर्वांसमक्ष केलेली प्रतिज्ञा हे उपनाट्य साहित्यातील पुरुषसापेक्ष मानदंडामुळे तिला युद्धास कारणीभूत ठरवते. द्रौपदीच्या प्रतिमेतील पारंपरिक स्त्रीस्वभावाचे अवगुंठन दूर करून आत्मशोधास प्रवृत्त झालेल्या स्वतंत्र स्त्रीचा आदर्श स्त्री-कवी प्रस्थापित करते.

**अहल्या**

रामायणकाळातील हे स्त्रीमिथक. गौतम ऋषींच्या शापाने शिळा होऊन पडलेली अहल्या रामाच्या पदस्पर्शाने सजीव झाली, तिच्या जारकर्माचे पापक्षालन झाले, परंपरेने पतिव्रता म्हणून तिला मान्यता दिली. जनमानसातील या रूढ प्रतिमेपेक्षा 'अहल्या' या स्त्रीप्रतिमेचा तारा वनारसे वेगळा विचार करत नव्या दृष्टीने वेध घेतात. गौतम ऋषींच्या असिधाराव्रताचे गौरवीकरण करण्यासाठी तिच्या शारीर भावनांचा अनादर केला गेला. स्त्री ही पुरुषाच्या सुखोपभोगाचे साधन आहे असे गृहीत धरणाऱ्या पुरुषसत्ताक व्यवस्थेला अहल्येच्या रतिभावाचा, नैसर्गिक कामप्रेरणांचा स्वतंत्र विचार करावासा वाटला नाही. गौतम ऋषींसोबत विवाहपश्चात पहिल्या रात्रीच स्त्री म्हणून तिच्या लैंगिक इच्छांचा कोंडमारा 'सुहागरात' या कवितेत सूचित केला आहे. 'कुसुमकोमल शय्या, / चुरमळलेले मन, / तळमळणारी काया, /...अवघडल्या झोपेत ती कुशीला वळली; / हात सहजगत्या शेजारी पडला; / आणि / असह्य वेदनेने ती कळवळून गेली /...शेजेवर मधोमध / लख्ख धारेचे उपसलेले पाते / उताणे पडले होते, / पलीकडे / असिधाराव्रत घेतलेले तिचे पती / छताकडे सताड डोळ्यांनी पाहात पहुडले होते.' (सुहागरात, बारा वाऱ्यांवर घर, पृ.४६) स्त्री ही मायाविनी, रतिविलासिनी, स्त्रीजन्म म्हणजे मूर्तिमंत पाप असे म्हणत 'संयमनाच्या यज्ञकुंडासाठी तारुण्याच्या समिधा व्हाव्या' अशी अहल्येला आत्मश्लाघेची शिकवण देणे, पुरुषाच्या तपश्चर्येचे उदात्तीकरण करण्यासाठी रुक्ष आयुष्य स्त्रीवर लादणे हा व्यवस्थेचा दांभिकपणा आहे. हे ढोंग उघडकीस आणून त्या लिहितात, 'तुझे मोहिनी रूप, केतकीत दडलेला साप / अनावर कामना पाप, अशरण उपभोग पाप / पतीची तपस्या उग्र व्हावी याकरता केवळ /

तुला रूप लावण्याचा शाप / अमंगल दुर्भाविनी तू, / काबाडकष्टांनी, उपासतापासांनी / सतत झिजवावी काया / संयमनाच्या यज्ञकुंडासाठी / तारुण्याच्या समिधा व्हाव्या' (तू मायाविनी, तत्रैव, पृ.४७ ) गौतम ऋषींचे मायावी रूप घेऊन आलेल्या इंद्राच्या अस्तित्वात अहल्या विरघळून जाते. ऐंद्रिय सुखाचे तृप्त संवेदन कवितेत व्यक्त करताना अहल्येचा अपराधभाव स्त्री-कवी वगळते. 'माझे 'मी' पण मला कळो आले. / अंतर्यामीचे दाह शमले तेव्हा / राखेतून पाखरू जिवंत झाले / जिवाशिवाच्या भेटीमध्ये माझे / देह-देहधारियाचे द्वंद्व मिटले' (तत्रैव, पृ. ५२) मायापटलाखाली सनातन पुरुषी वासना दडवून कपटाने अहल्येचा उपभोग घेणाऱ्या इंद्राला कवितागत अहल्या जाब विचारते. त्याने तिच्या आत्मसन्मानाला धक्का लावला; तिच्या संमतीशिवाय मायावी रूपात तिची वंचना केली म्हणून आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करून ती म्हणते, 'तुझे निखळ स्वरूप मला दाखवलेच नाहीस / उजळ माथ्याने, विजेत्या पावलांनी / का आला नाहीस? / एक खंत उरात सलत राहिलेली: / तुझ्या कपट-लाघवाने / माझी दुहेरी वंचना केली' तरीही स्वतःच्या वर्तनाचा स्वीकार करून शरीराची तृप्ती स्त्रीसाठी पाप नाही हे तिला उमगले आहे. संस्कृतीने स्त्रीवर लादलेले निर्बंध झुगारण्याची बंडखोरी ती जाणूनबुजून करते. 'एक निर्वाळा मात्र निर्वेध आहे: / याउपर मायापटलाचे प्रयोजन नाही / पुन्हा वेळ आली तर / त्या एकेका डोळ्याच्या कटाक्षावर / मी माझे सहस्त्र जन्म ओवाळून टाकीन, / एकेका जन्मात सहस्त्र वेळा शिळा होईन' (मंथन, तत्रैव, पृ.५२ ) शरीरमनाच्या नैसर्गिक आवेगाला स्वाभाविक प्रतिसाद दिल्यावर अहल्येच्या प्रापंचिक जीवनात पडलेला पेच 'पती परमेश्वर' या परंपरागत धारणेनुसार स्त्रीने शरणागताची भूमिका घेऊन ती सोडवत नाही उलट गौतम ऋषींबरोबर प्रतिवाद करण्याचे तिचे धाडस उल्लेखनीय आहे. ती म्हणते, 'तो एक प्रश्न मला विचारू नका / मी त्याचे उत्तर देणार नाही /...पाप घडले असेल वा नसेल / मी ते नाकारत नाही याकरता / माझी निर्भर्त्सना करता; / पळवाटेची सोय करून दिलीत / ती मी पत्करीत नाही यासाठी / माझ्यावर आग पाखडता /...मी तर जाणिवेची कक्षा केव्हाच ओलांडली आहे / तुम्ही शापवाणी उच्चारण्यापूर्वीच / मी शिळा होऊन पडले आहे / कशासाठी मी शरणागतीस येऊ? / तुमच्या शापाला मला उःशाप नकोच आहे!' (तो प्रश्न विचारू नका, तत्रैव, पृ. ५३) स्त्रीत्वाच्या सांस्कृतिक 'रचिता'नुसार स्त्रीस साचेबद्ध दगडी मूक अस्तित्व स्वीकारण्याच्या सक्तीवर तारा वनारसे अहल्येच्या निमित्ताने उपहासात्मक प्रतिक्रियाही नोंदवतात. त्या लिहितात, 'सुघड असे टाकाऊ दगड म्हणून वाळीत पडणे, / जनसंसारी असून नसणे; / जाणीव गुंडाळून निसुक होणे... / बरे असते शिळा होऊन पडणे.' (बरे असते शिळा होऊन पडणे, तत्रैव, पृ. ५४) गौतम ऋषींच्या असिधाराव्रताचे, तपश्चर्येचे उदात्तीकरण करण्यासाठी अहल्येला अलौकिक रूपसौंदर्याचे लेणे म्हणून घडावे लागले; कपटाने विषयोपभोग घेणारा इंद्र निमित्तमात्र ठरला; इतर देवांच्या मदतीने तो सहजपणे निसटला; अर्थातच पुरुषांच्या एकजुटीतून अहल्येवर अन्याय झाला; ती बळी ठरली व तिलाच जारिणी म्हणून शिळारूपात जखडबंद व्हावे लागले; रामाला देवपण लाभावे म्हणून त्याच्या पदस्पर्शाने पतितेची पतिव्रता होण्यासाठी तिलाच उद्धरणाचे साधनही व्हावे लागले हा घटनाक्रम नीट समजून घेत पुरुषी मूल्यव्यवस्थेचे, सत्तासंबंधांमधील श्रेष्ठत्वाचे छुपे राजकारण स्त्री-कवी उघडकीस आणते. 'अयाचित करुणास्पर्शाने / अचेतन शिळा सजीव झाली / मानिनी पतिता ती निरुपायाने / उद्धरणाचे साधन होऊन गेली / शापक्षालनाच्या पुण्यकर्माने / वनवासी पावलांना देवपण लाभले; / शिळाव्रती स्खलितेला / पंचकन्यांचे अग्रस्थान प्राप्त झाले.' (उद्धार, तत्रैव, पृ.५७) वास्तविक पाहता 'अहल्या' स्त्रीवरील अन्यायाचे, तिच्या व्यथेचे प्रतीक आहे. तिला गृहीत धरणाऱ्या पुरुषप्रधान व्यवस्थेतील पारंपरिक

मानसिकतेत बद्ध रामास तिचा उद्धार करणे शक्य नाही. स्वअस्तित्वाला अर्थपूर्णता देण्यासाठी स्त्रियांना स्वतःच प्रयत्न करावे लागतील, त्यासाठी पुरुषांवर अवलंबून राहणे निरर्थक आहे. अंजली कुलकर्णी म्हणतात, 'मला माहित आहे / राम नाही करू शकणार / अहल्या स्वतःचा उद्धार / स्वतःच करणार आहे...' (मी : एक स्त्रीजातीय अस्वस्थ आत्मा, पृ. २०) तारा वनारसे व अंजली कुलकर्णी या दोघींही 'अहल्या' या स्त्रीमिथकाचे पुनर्वाचन करताना पारंपरिक संकेत पूर्णपणे नाकारतात, स्त्रीकेंद्री दृष्टिकोन बाळगत घटना प्रसंगातील नव्या पैलूंकडे लक्ष वेधून नवअर्थाचे, न्याय्य शक्यतांचे ससूंचन करतात. 'पुरुषसत्ताक अधिकारी चौकटीने निर्माण केलेल्या आदर्शांचे उल्लंघन करणे, त्यासाठी सर्जनशीलतेच्या मिथकांशी आणि चिरंतन अशा स्त्रीत्वाच्या आदर्श अशा भूतकालीन प्रतिमेशीही झुंजणे हे करावे लागते. ही चिरंतन आदर्शतत्त्वाची भूतकालीन प्रतिमा पुरुषाच्या दृष्टीने स्फूर्तिदायी आणि पूरक म्हणून उदासीन, पडखाऊ, स्वार्थनिरपेक्ष अशी चित्रित केलेली असते. या प्रतिमेतील स्त्रीचे आयुष्य मृतवत, गोठलेले व कहाणी नसलेले असे होते.' स्त्री म्हणून असणारी साहित्यिक सर्जनशीलता या अनुषंगाने सॅन्ड्रा गिल्बर्ट व सुझान गुबर यांचे हे मतप्रतिपादन 'अहल्या' या मिथकाबाबत विशेषत्वाने लक्षात घेता येते. अहल्या या मिथकाबाबत पुरुषांनी केलेले स्त्रीचित्रण व स्त्रियांनी केलेले स्त्रीचित्रण व नवअर्थनिर्णयन यातील फरक स्पष्टपणे निदर्शनास येतो.

**सीता**

वाल्मिकी रामायण या संहितेतील सीता ही आदर्श पतिव्रता स्त्री म्हणून जनमानसात पूजनीय मानली जाते. स्त्रीची शुचिता, पावित्र्य व निष्ठा एकाच पुरुषाशी जोडलेली असणे हा या मिथकाचा मान्यताप्राप्त मूलगाभा आहे. पितृवचनासाठी वनवास पत्करणाऱ्या रामाबरोबर वनवासाला जाणे; लंकेत रावणाच्या बंदिवासातही पतिव्रताधर्माचे पालन व रक्षण करणे; लंकादहनानंतर अग्निदिव्य करून स्वतःचे पातिव्रत्य सिद्ध करणे; रामराज्याचा व धर्माचा त्रिलोकात डंका वाजवण्यासाठी, कुणा निंदकाच्या मनातील शंकानिरसनासाठी गर्भारपणी पुन्हा वनवास पत्करून लव-कुश या राजपुत्रांना जन्म देणारी; त्यांना पराक्रमी बनवणारी कर्तव्यतत्पर राजस्त्री म्हणून लौकिक प्राप्त करणे व शेवटी भूमीत स्वतःस विसर्जित करणे या घटनाप्रसंगांतून अलौकिक आदर्शांचे वलय सीता या प्रतिमेभोवती निर्माण झालेले आहे. पुरुषांच्या प्रतिष्ठेची खूण म्हणून स्त्रीने निजअस्तित्व पणास लावणे असा पोकळ आदर्शवाद व लैंगिक पातळीवरील निष्ठा हा स्त्रीच्या दृष्टीने प्रमुख गुण मानत अग्निदिव्यासारख्या चमत्कारिक कल्पनांमधून पावित्र्य सिद्ध करण्याची स्त्रीवर लादलेली सक्ती व दडपण 'सीता' या प्रतिमेतून पोसले गेले आहे, हे लक्षात घेऊन समकालीन संदर्भान्वये नव्या चौकटीतून सीता या मिथकाकडे अंजली कुलकर्णी पाहतात. राजसत्तेच्या व धर्मसत्तेच्या बुरख्याआडचा पुरुषरचित न्याय दांभिक ठरवून अग्निपरीक्षेला नकार देणाऱ्या सीतेचे चित्रण त्यांच्या कवितेत केलेले आहे. 'आणि मी निःशंक तरीही अशांत /...मी करणार नाही अग्निप्रवेश / देणार नाही कसलीही परीक्षा / तुझ्या या तथाकथित न्यायाधीशांचे / ओरबाडून काळे कोट / मी वसवणार आहे नवा गाव / नवी संस्कृती / आज बागडणाऱ्या रानपऱ्यांच्या / मुक्त उद्यासाठी' (संबद्ध, पृ. २३) स्वतःच्या जीविताचे नियंत्रण स्वतःकडेच ठेवता येण्याचे सामर्थ्य, आत्मप्रतिष्ठेसाठी स्वयंनिर्णयाचा अधिकार व प्रसंगी प्रचलित अन्यायकारक व्यवस्थेला ठाम नकार देण्याचे धाडस बाळगता येईल अशी माणूस म्हणून स्त्रीच्या सन्मानाची नवी स्त्रीनिष्ठ संस्कृती प्रस्तुत कवितेत अभिप्रेत आहे. राम नामक पुरुष नायकाच्या प्रतिष्ठेसाठी पावित्र्य, पातिव्रत्य, वनवास, अग्निदिव्य, भूगर्भात विसर्जित होणे यांसारखे आदर्शात्मक दंडक सीतेच्या निमित्ताने रचले गेले. वाल्मिकी रामायणात रामाला 'पुरुषोत्तम' म्हणून गौरवान्वित केले. पुरुषी मूल्यव्यवस्थेला पूरक आदर्श प्रस्थापित करताना सीतेवर अन्याय झाला; तिची उपेक्षा केली गेली; पुरुषी

दृष्टिकोनातून स्त्रीची अस्मिता साचेबद्ध पद्धतीने घडवली गेली; स्त्रीचा दृष्टिकोन वगळून राजसत्ता, धर्म, न्याय, कला व साहित्य यांतील मूल्यांवर पुरुषप्रधानतेचा प्रभाव दृढ केला गेला. केवळ रामाच्या संदर्भात सीतेला बघण्याऐवजी सीतेच्या दृष्टिकोनातून तिच्या जीवनाकडे पाहण्याची आवश्यकता शैला लोहिया जाणवून देतात. त्या लिहितात, 'दगडी वृंदावनाचे चिरे फोडून / पुन्हा एकदा जन्माला येतेय / 'भूमिकन्या' सीता / नवे रामायण लिहिण्यासाठी' (कविता गजाआडच्या, पृ. ७४-७५) पुरुषरचित स्त्रीप्रतिमेला वास्तव मानण्याऐवजी स्त्रियांवर मर्यादा घालणाऱ्या स्त्रीमिथकांमागील वास्तव शोधले पाहिजे, स्त्रीकेंद्री दृष्टिकोनातून साहित्यकृतींचे पुनर्वाचन करण्याची निकड निर्माण झाली आहे, मिथकांच्या नवअर्थनिर्णयनाद्वारे नवा विचार मांडला पाहिजे, हेच स्त्री-कवी सुचवत आहेत. प्रस्तुत कवितेत सीतेच्या जीवनातील 'सीता भूमिगत होते' ही घटना म्हणजे विद्रोहाची, निषेधाची कृती होय. आत्मप्रतिष्ठेने जीवन जगण्याचा हक्क मिळवण्यासाठी रामाची निर्भर्त्सना करून सीता त्याला अव्हेरते. तिचे भूमिगत होणे म्हणजे आत्मविनाश नाही तर तत्कालीन पुरुषप्रधान व्यवस्थेविरुद्ध तिने केलेले बंड आहे अशा वेगळ्या परिमाणातून 'सीता' मिथकाची पुनर्मांडणी केलेली दिसते. 'सीते मला तुझा खूप खूप अभिमान वाटतो / कारण तू पुन्हा पुन्हा केलीस निर्भर्त्सना कौसल्यानंदनाची / केलीस समीक्षा त्याच्या नीतीची / त्याचा विजयी अश्वमेधीय अश्व / अडविण्याचे सामर्थ्य भरलेस तू लव-कुशात / आणि शेवटी / केलास त्याग पतिपरमेश्वराचाच / घेतलास आश्रय भूमातेच्या कुशीत / हे स्वाभिमानी, अपराजित / भूमिकन्ये सीते, / इतका विद्रोह तू कोठून शिकलीस? / की / हे विद्रोहाचे कोंभ आहेत आपल्या रक्तातच! / थांब, / मीही जरा शोधून पाहते स्वतःमध्ये / अजून / धनुर्धारी रघुवंशजांची दहशत संपली नाही' (भूमिकन्या सीता, नारीजातक, पृ. १५)

**अक्क महादेवी**

शिमोग्याजवळच्या उडतडी गावातील निर्मल शेट्टी व सुमती या शैव दांपत्याची रूपवती कन्या महादेवीशी संबंधित विविध दंतकथा जनमानसात प्रचलित आहेत. शिवस्वरूपात रममाण महादेवीने राजा कौशिकाबरोबरचा ऐहिक पातळीवरील संघर्ष संपुष्टात आणताना स्वतःच्या नेसत्या वस्त्रांचाच त्याग केला. इसवी सनाच्या बाराव्या शतकात वस्त्रहीन महादेवीने देहाचे द्वंद्व झुगारून नि:शंक माणूसपणाचा प्रत्यय घेत आध्यात्मिक परमपद प्राप्त केले. आध्यात्मिक पातळीवर देह कितीही गौण मानला तरी व्यावहारिक पातळीवर स्त्रीच्या चारित्र्याच्या सर्व कल्पना तिच्या देहाशी निगडित असल्याने देहभाव झुगारणे सर्वसामान्य स्त्रीसाठी अशक्यप्राय गोष्ट वाटते तथापि देहभाव निमाला, तरच पारंपरिक स्त्रीत्वातून मुक्त होऊन माणूसपणाच्या वाटेवर भक्कमपणे पाय रोवता येतील या अनुषंगाने उषा परब लिहितात, 'ती मादी जशी गादी / अंथरूण किंवा पांघरूण / पूर्वापार... /...आता एक एक वस्त्र / ती उतरेन म्हणते / आवरणे फेडून मुक्त करीन / देहाची वळणे नी उंचवटे म्हणते / गाळून टाकेन म्हणते / अवघा देहभाव नी / होईन म्हणते अक्क महादेवी' (होईन म्हणते अक्क महादेवी, तिचं आभाळ, पृ. ७९-८०) पारंपरिक स्त्रीत्वाच्या मुशीत घडलेल्या स्त्रीला तिचे शारीर अस्तित्वच तिच्या निर्भरशील उन्नयनात आडकाठी आणते, असे वाटते. स्त्रिया स्वसामर्थ्यावर आत्मसन्मानाची वाट शोधू पाहतात, त्यासाठी प्रसंगी जनमर्यादांचे उल्लंघन करावे लागते तेव्हा त्यांना अक्क महादेवीचे मिथक प्रेरक ठरावे यादृष्टीने ते कवितेत उपयोजिले आहे असे दिसते.

**रुक्मिणी**

महाराष्ट्राचे लोकदैवत असलेल्या विठ्ठलाची राणी रुक्मिणी. पंढरपुरात दोघांची देवळे वेगळी आहेत. एका लोककथेत विठ्ठल रुक्मिणीच्या चिरविरहाचे कारण सापडते. पूर्वी विठोबा हा मल्हारीदेवाचा मांडलिक होता. माळशिरसच्या या वत्सल व दक्षप्रजापालक राजाची पद्मावती ही राणी. एकदा विठोबाने सोमा

प्रधानाच्या हस्ते भक्त माळीरायाच्या पाहुणचारासाठी सज्जतेचा निरोप राणीला पाठवला. सारी कामे उरकून विसावा घेणाऱ्या पदूबाईने तिच्या सर्व बाया दमल्या-भागल्याचे सांगितले, तर सोमाने त्याच्या पदरचे अधिक उणे जोडून विठोबाला पदूबाईचा नकार कळवला. गृहस्थधर्माचे पालन करता न आल्याने प्रायश्चित्त म्हणून विठोबाने संसारच मोडला; पदूबाईला शाप दिला; समर्थ विठोबाची ही राणी तिच्या मायेच्या माणसांना अंतरली; रानात मरून पडली; घारीगिधाडांनी तिचे प्रेत खाल्ले; घनघोर पावसाने तिच्या अस्थी समुद्रात वाहून गेल्या. माळीरायाला वाटले, एवढे सगळे घडायला आपण निमित्त झालो म्हणून त्याने समुद्रकाठी तप आरंभले. बारा वर्षांच्या घोर तपानंतर समुद्राने पदूबाईच्या अस्थी माळीरायाला दिल्या आणि त्या चंद्रभागेत टाकायला सांगितल्या. त्यातून पद्मतीर्थ तळ्यात एक कमळ उगवले. विठोबाने संसार मोडला; राज्य सोडले; त्याचा शाप फळला; पद्मावती गेली; तडफड असह्य होऊन तोही भटकू लागला; चंद्रभागेच्या तीरावर आला; त्याला ते सुंदर कमळ दिसले. विठोबाने कमळ तोडले त्याबरोबर कमळ गेले व त्याठिकाणी पदूबाई उभी राहिली. पंढरपुरात आता ती रुक्मिणी झाली; पण विठोबाने पुन्हा संसार सांधला नाही तेव्हापासून त्यांची देवळे वेगळी झाली. पारंपरिक पुरुषप्रधान समाजजीवनात विठोबाचे भक्तांप्रति कर्तव्य श्रेष्ठ ठरले. पदूबाईची गोष्टच लुप्त झाली. रुक्मिणीच्या मिथकाआड दडलेली पदूबाईची गोष्ट 'दिंडीरवनातील रखुमाबाई' या कवितेत जया गायकवाड पुनर्जीवित करून म्हणतात, 'हे रखुमाबाई / माझे पंढरीचे आई; पदूबाई / आजही गैरसमजातून कित्येक संसार मोडतात / अविश्वासाच्या एका क्षणात सौभाग्यवती सुहासिनी होते बेघर / सावळ्या विठ्ठलाला काय गं / रखुमाई नसली तर राही! / पण साध्वी रखुमाईनं कुणाचं तोंड बघायचं / कधीतरी तू याचा जाब / त्या सावळ्या विठ्ठलाला विचारायलाच हवास!' (दिंडीरवनातील रखुमाबाई, नारीजातक, पृ. २३ ) गैरसमजातून, अविश्वासातून विठोबाने एकतर्फी निर्णय घेतला; शापवाणी उच्चारताना, संसार मोडताना त्याने पदूबाईला गृहीत धरले; ती सोमा प्रधानाला काय म्हणाली? भक्तांच्या पाहुणचाराला तिने खरंच नकार दिला का? दिला तर त्यामागचे कारण काय? काहीही समजून घेणे; तिचे म्हणणे ऐकून घेणे विठोबाला गरजेचे वाटले नाही. नियतीने पुन्हा भेट घडवून आणली तरी वेगळे राहण्याचा निर्णय घेऊन तो मोकळा झाला; राही त्याच्या सोबतीला आणि रखुमाबाई पुन्हा एकटीच राहिली. पारंपरिक मिथकाचा गाभा सोलताना स्त्री-कवी रुक्मिणीला विठ्ठलाला जाब विचारण्याचे, विद्रोहाचा पवित्रा घेण्याचे सुचवते. विठ्ठल-रुक्मिणीच्या नात्याचे मानुषीकरण करताना समकालीन स्त्रीजीवनाच्या संदर्भांशी जोडून घेते. एकनिष्ठ पुरुषावलंबन व पातिव्रत्याच्या संस्कारामुळे रुक्मिणीच्या वाट्याला येणारे एकटेपण अरुणा ढेरे व्यक्त करतात. 'रंगमहाली विठूच्या वाट पाहते रुक्मिण / ...एका विठ्ठलावाचून तिला आता कोणी नाही / कुठे गेला वनमाळी, कुणी पाहिला का बाई / दीठ शिणली सईची, तिला ठाउकेच नाही / दूर हलते तुळस तिथे जनीच्या दाराशी / दिसे विठ्ठलाचा शेला गुंतलेला मंजिरीशी' (रंगमहाली विठूच्या, निरंजन, पृ.९) काळाचे अंतर मिटवून लौकिक पातळीवर रुक्मिणीशी जुळलेले स्त्रीमनाचे भावबंध स्त्रीकेंद्री कवितेतील मिथकयोजनाची संवेदनशीलता मुखर करतात.

**जनाबाई**

आत्मसखा विठ्ठलाशी तादात्म्य साधून संतपदापर्यंत पोहोचलेल्या तेराव्या शतकातील जनाबाईंशी अरुणा ढेरे यांच्या कवितेचा घट्ट सांधा जुळलेला आढळतो. विठ्ठलभक्तीत रंगलेल्या जनाबाईच्या अलौकिक अनुभवाखाली दडलेल्या लौकिक दु:खाची आच त्यांच्या कवितेत उमटते तसे तिच्या अंतरीचे एकटेपणही कारुण्यभावासह व्यक्त होते. 'जनी' या कवितेत त्या लिहितात, 'सुख हसून सांडले, हाती निखारे घेतले / तिने बाईपण एका

विठूनामाशी तोलले / अगे जनाबाई माझे, तुला ठाउकेच नाही / रुक्मिणीच्या शेजेवर विठू निजलाहे बाई / अशी एकटी तू उभी, तुझा मोकळा पदर / आणि नीज त्याची गाढ, त्याचे बंद आहे दार' (जनी, निरंजन, पृ. ८ ) जनाबाईच्या 'देवा मी झाले वेसवा / रिघाले केशवा घर तुझे' या अभंगातील पुरुषसत्ताक व्यवस्थेशी उघड संघर्षाचे पारंपरिक सूत्र आधुनिक कालभान व समकालीन युगजाणिवेशी संगती राखून कवितेत प्रकटते. 'जनी म्हणते, निर्दया तुझ्या देहभाराखाली / काळ्या कुवारपणाची हाडमोळी चिरडली /... जनी म्हणते, नात्यांना लाव चूड, फास राख / उघडी मी तुझ्यापुढे मला ओलांडून देख / जनी म्हणते, 'पुरुषा माझी वेसवेची कूस / तुझ्या पापाने फळते नीट समजून ऐस' (जनी म्हणते विठ्ठला, जावे जन्माकडे, पृ. ८७) पुरुषप्रधान नीतिमूल्यांमधील लिंगभावविषयक विषमता निदर्शनास आणून देत जनाबाईच्या मिथकाच्या माध्यमातून समाजपुरुषाला खडसावण्याचा, थेट आव्हान देण्याचा उपरोक्त कवितेतील पवित्रा लक्षणीय ठरतो.

**कृतज्ञभावाने नवमिथकांचे उपयोजन**

पुरुषसत्ताक व्यवस्थेची तर्कशुद्ध चिकित्सा करून स्त्रीदास्याच्या अंतासाठी पुरोगामी आचार-विचारांच्या मार्गाचा अवलंब करणाऱ्या ताराबाई शिंदे व स्त्रीशिक्षणाला चालना देणाऱ्या सावित्रीबाई फुले या सुधारक स्त्रियांचे नवे मिथक स्त्री-कवी समाजमनात रुजवत आहेत.

**ताराबाई शिंदे**

इ. स. १८८२मध्ये 'स्त्री-पुरुष तुलना' ह्या निबंधातून धर्मशास्त्र, नीतिव्यवहार व रूढीपरंपरा यांच्यासंदर्भात विषम मूल्यव्यवस्थेततून होणारे स्त्रीशोषण व प्रस्थापित समाजव्यवस्थेतील पुरुषी दुटप्पीपण ताराबाई शिंदे यांनी उघड केले. समाज, साहित्य, संस्कृती, धर्म आदी क्षेत्रांतील विषम नैतिक मूल्यांची परखड चिकित्सा केली, पुरुषी मूल्यव्यवस्थेविरुद्ध निषेध नोंदवला. ताराबाईंविषयीचा कृतज्ञता भाव 'तुम्ही तुमच्या शब्दांचे शस्त्र केले / म्हणून तर आमच्या हाती चळवळीचे अस्त्र आले!' (ताराबाई शिंदेसाठी, बाई, पृ. १) असा सीमा साखरे यांच्या कवितेतून व्यक्त झाला आहे.

**सावित्रीबाई फुले**

पुराणातील 'सावित्री' हे मिथक आदर्श पत्नीरूपात साचेबद्ध केलेले दिसते. या प्रस्थापित मिथकास प्रतिवादात्मक असे नवे मिथक 'सावित्रीबाई फुले' यांच्या कार्याच्या व कर्तृत्वाच्या अनुषंगाने स्त्री-कवींनी निर्माण केले आहे. आधुनिक सामाजिक चळवळींच्या अंगाने ते महत्त्वपूर्ण ठरते. जोतिराव फुले यांच्या समाजसुधारणेच्या चळवळीत सहभागी होत स्त्री-पुरुष समतेचे मूल्य अंगीकारणाऱ्या सावित्रीबाई फुले यांनी स्त्रीदास्य व जातीवर्ण विषमतेविरुद्ध लढा दिला, सामाजिक विरोधास न जुमानता स्त्रीशिक्षणाचे व तत्कालीन स्त्रीप्रश्नांच्या निराकरणाचे कार्य केले. जया गायकवाड म्हणतात, 'सावित्री / तू गिरविलीस अक्षरे / धूळपाटीवर / जोतीच्या संगतीने / आणि त्यांनी हजारो वर्षे/ स्वतःच्या तिजोरीत लॉक केलेला सूर्य / खुला झाला' (क्रांतिमाता सावित्री, नारीजातक, पृ. ७), 'सावित्री / संस्कृतीच्या मुखवट्यावर / तू ठोकलीस गिर्रेबाज सही 'सावित्री जोतिबा' / त्याच दिवशी मनुस्मृतीला ग्रहण लागले' (आम्ही सावित्रीच्या लेकी, तत्रैव, पृ. १०) स्त्रीच्या माणूसपणाचा उच्चार करणारी, जोतिराव फुले यांच्या कार्यांत सहभागी होत स्त्रीशिक्षणाची दारे खुली करणारी, दांभिक कर्मविपाकांना नकार देणारी ही स्त्री नवमिथकरूपात घडवताना प्रज्ञा लोखंडे स्त्रीमनात विद्रोहाची ठिणगी चेतवतात. स्व-अस्तित्वाला अर्थ देताना सामाजिक भान बाळगणे व चळवळीतील कृतिशीलतेतून परिवर्तनाच्या शक्यता निर्माण करणे; सामाजिक अवकाशात ही प्रक्रियाही गतिमान करणे हे हेतू बाळगून प्रज्ञा लोखंडे लिहितात, 'तू तोडलंस / पुराणातल्या सावित्रीचं गुळगुळीत मिथक / शिरोभागी चाललीस नवऱ्याच्या अंत्ययात्रेत / हाती टिटवं धरून / तरी तू नाहीस

माझ्यासाठी / निव्वळ नवं मिथक / नव्या परिवेशातलं / ... सावित्रीमाय, / तू फोडून टाकलास एकदाचा / तो सनातन मायावी आरसा / किंचाळत बाहेर आल्या / पटापटा कितीतरी बाया / शोधू लागल्या / पाळामुळांना... / रचत राहिल्या स्वतःला / तुकड्या तुकड्यातून / अखंडित / माझ्यासकट!' (सावित्रीबाई जोतिराव फुले, मी भिडवू पाहतेय समग्राशी डोळा, पृ. १४) जात, वर्ग, लिंगभाव या तीनही संदर्भात निरपेक्षभावाचे दांपत्यजीवन अनुभवलेल्या सावित्रीबाईची जडणघडण समजून घेत आधुनिक स्त्रीरूपात हे मिथक स्त्री-कवी उपयोजितात.

**समारोप**

नव्वदोत्तर कालखंडात स्त्रीकाव्यातील मिथकांतून स्त्रीजीवनाचे तीव्र शोकात्म दुःखभान, त्या दुःखाचे अथांगपण व एकूण मानवी जीवनाशी त्याचा अन्वयार्थ लावताना निर्माण होणारी गुंतागुंत, प्रस्थापित समाजव्यवस्थेतील स्त्रीच्या स्थानबद्धतेची चिकित्सा, तिची नैतिक घुसमट, परंपरा व आधुनिकता या द्वंद्वातील ओढाताण, स्त्री-पुरुष नातेसंबंधाचा शोध, प्रस्थापित समाजव्यवस्थेची चिकित्सा यांसारख्या अनेक मुद्द्यांचा ऊहापोह आढळतो. प्रचलित सामाजिक व्यवस्थेची चिकित्सा करताना पुरुषसत्तेची व्याप्ती व त्यातून निर्माण झालेले सामाजिक सांस्कृतिक लिंगभावाचे रचित मिथकांमधून स्त्रीला कसे अनुभवास येते, तिच्या जगण्याची कशी कोंडी करते, त्याने स्त्रीमन कसे अस्वस्थ होते याचे परिणामकारक दर्शनही घडते. लिंगभाव नैसर्गिक व मूलभूत नसून सांस्कृतिक आहे. 'स्त्री' हे सोयीस्कर समाजसंरचित आहे त्यामुळे प्रस्थापित रूढ स्त्रीत्वाचे आकलन करणे; पुरुषसत्ताक समाजाच्या विचारप्रणालीचा स्त्री-मानसावर कसा आणि काय परिणाम झाला हे मिथकांतून निदर्शनास आणणे; नवअर्थनिर्णयनातून स्त्रीजीवनात बदलाच्या संभाव्य शक्यता मुखर करणे ह्यातून स्त्री-कवींच्या वैशिष्ट्यपूर्ण प्रतिभासामर्थ्याची प्रचिती येते.

संदर्भ


१. थारू, सुझी. आणि के. ललिता. प्रस्तावना, 'भारतातील स्त्रियांचे लेखन, ख्रिस्तपूर्व ६०० ते वर्तमानकाळ' भागवत, विद्युत. (स्वैर अनु.२०११), 'लिंगभाव अभ्यास, भारतातील सिद्धांकन', क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्त्री अभ्यास केंद्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे, पृ.५५

२.अधिक माहितीसाठी पाहा. 'पंढरीचा विठोबा', भागवत, दुर्गा २००८., पैस, मौज प्रकाशन, मुंबई, पृ. ३२-४३


आधारभूत काव्यसंग्रह


१. लोखंडे, प्रज्ञा. १९९३, अंतस्थ, डिंपल पब्लिकेशन,

२. पवार, प्रज्ञा दया.२००७, मी भिडवू पाहतेय समग्राशी डोळा, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई.

३. धुळेकर, नीरजा.१९९४, वेणा, नीलकंठ प्रकाशन, पुणे.

४. माणगावे, नीलम.१९९७, शतकाच्या उंबरठ्यावर, मनोदय प्रकाशन, पुणे.

५. गायकवाड, जया. २००८, नारीजातक, नागनालंदा प्रकाशन, इस्लामपूर.

६. कुलकर्णी, अंजली.१९९७, संबद्ध, ग्रंथाली प्रकाशन,

७. शहा, स्वाती. २००१, अनुभूती, नीलकंठ प्रकाशन, पुणे.

८. रंगारी, संध्या.२०१०, संध्यारंग, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाउस, पुणे.

९. इर्लेकर, सुहासिनी. १९९७, गाथा, साधना प्रकाशन,

१०.धुळेकर, नीरजा. २०१०, निरर्थकाचे पक्षी,पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

११. वनारसे, तारा. १९९७, बारा वाऱ्यांवर घर, मौज प्रकाशन गृह, मुंबई.

१२. कुलकर्णी, अंजली.१९९५, मी: एक स्त्रीजातीय अस्वस्थ आत्मा, मानसन्मान प्रकाशन, पुणे.

१३. लोहिया, शैला.२००२, कविता गजाआडच्या, पवन प्रकाशन, परभणी.

१४. परब, उषा.२००४, तिचं आभाळ, मधुश्री प्रकाशन,

१५. ढेरे, अरुणा. १९९४ , निरंजन, सुरेश एजन्सी, पुणे.

१६. ढेरे, अरुणा.१९९८, जावे जन्माकडे, सुरेश एजन्सी,

१७. साखरे, सीमा.२००३ , बाई, सीमा प्रकाशन, नागपूर.



**सरिता सोमाणी**

इ-४/७०२, सिम्प्लीसिटी, प्लॉट नं.२, सर्व्हे नं. १०/११, औताडे हांडेवाडी, ता. हवेली, जि. पुणे-४१२३०८

मराठी साहित्य समीक्षेबाबत
निरीक्षणे नोंदवणारा
सुरेश देशपांडे यांचा लेख

# समीक्षा: वास्तव आणि अपेक्षा

## सुरेश देशपांडे

'समीक्षा' ही साहित्य व्यवहारातील एक अतिशय महत्त्वाची अशी बाजू आहे. लेखकाने निर्माण केलेले साहित्य मग ते कोणत्याही प्रकारचे असो, कवीची कविता असो, चित्रकाराचे चित्र असो किंवा मूर्तिकाराची मूर्त असो या सर्व कलाप्रकारातील सौंदर्य उलगडून दाखविण्याचे शास्त्र म्हणजे सौंदर्यशास्त्र म्हणजेच समीक्षा!

साहित्यातील सौंदर्य, त्यातला घाट, त्यातील वळणं, त्यातले प्रवाह, विषय आणि आशयात झालेले कालानुरूप बदल या सर्वांतील अंतर्भूत असलेले अर्थ किंवा साहित्यकाराची भूमिका वाचकांपर्यंत पोहोचविण्याचे काम समीक्षेने करावे, निदान तशी अपेक्षा आहे. कलाकृतीच्या गुणदोषांचे सम्यक दिग्दर्शन त्यात असावे अशीही अपेक्षा आहे; पण प्रश्न असा आहे की आजची समीक्षा आपल्या या अपेक्षा पूर्ण करते का? याचे उत्तर स्पष्टपणे 'नाही' असेच आहे.

धुळे येथे भरलेल्या समीक्षा संमेलनात अध्यक्षस्थानावरून बोलताना डॉ. रेखा इनामदार साने यांनीही काही प्रमाणात अशा प्रकारचा उल्लेख केला होता.

आजची समीक्षा वाचकांची अपेक्षा पूर्ण करत नाही असे म्हणण्याचे कारण तिचे बटबटीत स्वरूप! या समीक्षेचे स्वरूप अत्यंत अगम्य, शब्दबंबाळ, विद्वत्‌जड, ओढूनताणून आणलेली वाक्यरचना, संज्ञाप्रवाही, संरचनावादी, व्यामिश्रता, अंतराळाचा अवकाश वगैरे बोजड शब्दांची पेरणी असंच असतं. मग ते ऐकणाऱ्याला कंटाळवाणे आणि वाचणाऱ्याला झोप आणणारं असतं. (अशाच प्रकारचे विधान प्रा. हरिश्चंद्र थोरात यांनी सातारा येथील समीक्षा संमेलनात व्यक्त केले होते.) ही समीक्षा एव्हढी बोजड आणि वाचकस्नेही नसण्याचे मुख्य कारण म्हणजे आज महाविद्यालयात समीक्षाशास्त्र शिकविणारे प्राध्यापक काम किंवा अन्यत्र लिहिणारे सर्वच समीक्षक, आपल्या भाषणात किंवा लिखाणात फक्त आणि फक्त पाश्चात्त्य समीक्षकांचेच दाखले, उदाहरणे देतात, त्यामुळे परकीय भाषांतील संज्ञा आणि संकल्पना आपल्या भाषेत आणताना भाषेची ओढाताण होते. जणू काही आपल्या भारतीय साहित्यात समीक्षा किंवा समीक्षक नाहीतच! कदाचित या सर्वांना असे वाटत असावे, की जर पाश्चात्त्य विद्वानांची नावे घेतली नाहीत, तर आपली विद्वत्ता किंवा मोठेपण सिद्ध होणार नाही.

माझे म्हणणे असे, की सगळी म्हणून जी काय समीक्षा आहे ती फक्त पाश्चात्त्यांनाच सुचली काय? भारतीय साहित्यशास्त्रातील किती ग्रंथांचा किंवा नावांचा उल्लेख हे समीक्षक करतात? वानगीदाखल भारतीय साहित्यशास्त्रातील पुढील काही नावे पाहा :

'मम्मट (काव्यप्रकाश), भरतमुनी(नाट्यशास्त्र), विश्वनाथ (साहित्य दर्पण), श्रीआनंदवर्धनाचार्य (ध्वन्यालोक), क्षमेंद्र (औचित्यसिद्धांत, औचित्यविचारचर्चा), कणाद (वैशषिक शास्त्र), विश्वनाथ न्यायपंचानन भट्टाचार्य (न्यायसिद्धांत मुक्तावली किंवा कारिकावली), गौतम (न्यायशास्त्र), अभिनव गुप्त ('लोचन'ध्वन्यालोकवरील टीका तसेच भरताच्या नाट्यशास्त्रावरील टीका अभिनव भारती), उद्भट (भामह विवरण), भट्ट लोलद, श्री शंकु (नाट्यशास्त्रातील रससूत्रावरील टीका), भट्ट नायक (हृदयदर्पण/चंद्रिका मध्वन्यालोकवरील टीका) भट्टतौत (काव्यकौतुक) रुद्रट (काव्यालंकार), हे मचंद्र (काव्यानुशासन), अनंत (दुर्बोदार्थ विमर्शिनी टीका 'लोचन'), भट्टाचार्य श्री महेश्वरतकलिंकार (विज्ञप्रिया), रामचरण तर्कवागीश (विवृत्ती), हरिदास सिद्धांतवागीश भट्टाचार्य (कुसुमप्रतिमा), शिवदत्त कविरत्न(रुचिरा), श्रीकृष्णमोहन शास्त्री (लक्ष्मी), रुय्यक (अलंकारसर्वस्व), मल्लिनाथ (कालिदास साहित्यावरील टीका) ही काही नावे वानगीदाखल दिली. अजून काही उदाहरणे देता येतील. या किती ग्रंथांचा आणि ग्रंथकर्त्यांचा उल्लेख आमचे समीक्षक करतात? लिखाणात किंवा भाषणात? असा उल्लेख न होण्याचे कारण म्हणजे त्यांचा अभ्यास नाही किंवा पूर्वसुरींनी त्यांना शिकविलेच नाही. नाही म्हणायला माधव आचवल, रा. भा. पाटणकर, दि.के.बेडेकर यांसारख्या समीक्षकांचा उल्लेख होतो; पण या समीक्षकांच्या लेखनातही भारतीय समीक्षकांना फार स्थान नाही! आणि म्हणून मला म्हणावेसे वाटते, की आपली आजची समीक्षा ही परपोषित आहे.

आपण परकीयांच्या फूटपट्टीने आपल्या साहित्याचे मोजमाप करतो. मग समीक्षक म्हणून ज्यांचा आपण उदोउदो करतो त्यांचे स्वत:चे काही आहे की नाही? भारतातील ७०% प्रबंध आणि शोधनिबंध हे 'आधारित' असतात असे जे 'नेचर' नावाच्या आंतरराष्ट्रीय नियतकालिकाने म्हटले आहे तेच समीक्षकांच्या बाबतीतही लागू पडते.

आपल्या समीक्षकांनी स्वत:भोवती एक मर्यादा घालून घेतली आहे, त्या मर्यादेतच ते फिरत बसतात! आणि म्हणूनच जेव्हा इतरांच्या विचारांवर डोलारा उभा करायचा असतो तेव्हा मग आपली सहज भाषा न येता क्लिष्टता, दुर्बोधता, किचकटपणा, कंटाळवाणेपणा यामुळे बटबटीतपणा येतो. सौंदर्यशास्त्र असे सुंदर नामाधिधान लाभलेल्या या शास्त्राला समीक्षेच्या दुर्बोधतेने काठिण्य प्राप्त करून दिले आहे. शिवाय कथा, काव्य, कादंबरीसारख्या प्रातिभ आविष्काराबरोबर शिल्पशास्त्र, नृत्य, नाट्य संगीत या कलासंबंधी फारसे काही लिहिले जात नाही, फारच कमी दखल घेतली जाते. की आंतरशाखीयता म्हणतात ती यात नाहीच?

एक महत्त्वाचा मुद्दा, समीक्षाशास्त्रात संस्कृतीचाही विचार असतो असे म्हणतात, मग भारतीय संस्कृती आणि पाश्चात्त्य संस्कृती यातील संकल्पना, समजुती वेगळ्या असू शकतात याचे कितीसे भान समीक्षकांना असते? ('ऑस्कर' या चित्रपट विभागातील उच्चतम पुरस्कारासाठी भारतीय सिनेमा पाठविला होता, त्यातील नायिका नायकाच्या मद्यपानाला विरोध करते असे दृश्य होते; तेव्हा परीक्षकांनी असे नोंदविले, की मद्यपानात वाईट काय आहे? कारण मद्यपान हा त्यांच्या संस्कृतीतील शिष्टाचार आहे! हा संस्कृती संकल्पनांतील फरक!)

परकीय संस्कृतीतील वागण्याबोलण्यातील, आचारविचारातील मोकळेपणा, त्यांच्या वर्तनाचे तेथील साहित्यात पडणारे प्रतिबिंब आणि आपल्याकडील एकूणच वर्तन संदर्भातील नैतिक अनैतिक समजुती यातील प्रचंड तफावत लक्षात न घेतल्यामुळेच कदाचित महाभारतादी लोकप्रिय साहित्य समीक्षकांना चांगले वाटत नसावे, आणि तसंही समीक्षेला लोकप्रिय साहित्याचे वावडे आहेच की!

विद्यापीठीय चौकटीत बंदिस्त झालेल्या आजच्या समीक्षेला मोकळेपणाचे वारे लागायला हवे. समकालीन साहित्याला समीक्षेने भिडायला हवे, अगदी मनोरंजनवादी साहित्य म्हणून हेटाळणी केल्या गेलेल्या, सर्वसामान्य वाचकांच्या आवडत्या लेखकांच्या (बाबा कदम, सुहास शिरवळकर ते कुमुदिनी रांगणेकर इथपर्यंत!) साहित्यावरदेखील समीक्षेची मोहर

उमटायला हवी! भले तुम्ही त्यावर टीका करा; पण दखल ही घ्यायलाच हवी. केवळ मनोरंजनवादी म्हणून बोळवण करणे हा त्या लेखकांचा आणि साहित्याचादेखील अपमान आहे. याचे कारण आज महाराष्ट्रातील खाजगी आणि सरकारी वाचनालये याच आणि यांसारख्या लेखकांच्या पुस्तकांवर उभी आहेत, वाचन संस्कृती टिकवून ठेवण्याचे अतिशय महत्त्वाचे काम या लेखकांनी केले आहे! मर्ढेकर, ग्रेस, पठारे किंवा जी.ए., श्याम मनोहर यासारखे लेखक घ्यायचे किंवा मोठ्या प्रकाशकांच्या दबावाला वचकून त्यांचीच पुस्तके परीक्षणासाठी घ्यायची नि इतरांना अनुल्लेखाने मारायचे असे व्हायला नको.

आणखीन एक अतिशय महत्त्वाचा मुद्दा; वर्तमानपत्रीय परीक्षण म्हणजे खरं तर समीक्षा नव्हेच, फार तर धावती ओळख म्हणता येईल; पण अलीकडील परीक्षणात तुझ्या पुस्तकाला चांगले म्हणतो, उद्या माझ्या पुस्तकाला तू चांगले म्हण, अशी परस्पर प्रशस्ती (अहो रूपं अहो ध्वनीं) किंवा एखादे पुस्तक मोठ्या प्रकाशकाचे आहे, गाजलेल्या लेखकाचे आहे मग त्यावर टीका कशी करायची अशी भीड, आणि त्या प्रकाशकाला का दुखवा, अशा प्रकारचे दृष्टिकोन दिसतात! ही चुकीची प्रथा पडत चालली आहे. (बाराव्या शतकातल्या 'काव्यप्रकाश' या ग्रंथाचा कर्ता मम्मट याने आपला भाचा कवी श्री हर्ष याच्या नैषधीय महाकाव्यावर टीका केली होती!)

इथे मला आवर्जून माधव मनोहर यांच्या सोबत साप्ताहिकातील 'पंचम' या सदराचा उल्लेख करावासा वाटतो. 'पंचम' मध्ये माधव मनोहर नाटकांवर विस्तृत परीक्षण लिहित असत आणि त्यात दिग्दर्शन, प्रकाशयोजना, संगीत, नेपथ्य या सर्व तांत्रिक अंगासह अभिनय आणि संहिता यावर खणखणीत लिहीत असत. ते वाचताना कंटाळा तर येतच नसे; पण नाटक कसे पाहावे हा दृष्टिकोन मिळून वाचक नाट्यसाक्षर होत असत. अलीकडे रवींद्र पाथरे असे परीक्षण मर्यादित जागेत का होईना लिहीत आहेत. मुकुंद संगोराम यांची संगीत समीक्षा इतकी छान असते, की त्यामुळे वाचकाला शास्त्रीय संगीतातले राग, रागांची माहिती, बांधणी कळून वाचक काही प्रमाणात संगीत साक्षर होऊ शकतो.


आजच्या समीक्षकांनी वाचकांना साहित्य साक्षर करावे, समीक्षेची परिभाषा वापरूनही सामान्य लोकांना समजेल अशा भाषेत लिहिलं, तर समीक्षक म्हणजे कोणी हस्तिदंती मनोऱ्यात राहणारा, अशी समजूत नाहीशी होईल. शेवटी मी असे म्हणेन की, समीक्षाशास्त्राचे उपयोजन हे केवळ आपल्यासारखे अवघड बोलणारे प्राध्यापक निर्माण करणे हे नसून साहित्य आणि समीक्षा यांची सुंदर सांगड घालणे हे आहे त्यामुळे समीक्षेचे 'सौंदर्यशास्त्र' हे नाव सार्थ होईल. एखाद्या सुंदर देहाची चिरफाड करून आत रक्तामासाचा चिखल कसा आहे हे दाखविण्यापेक्षा निसर्गाने आत कशी सुंदर रचना केली आहे, हे वैद्यकाने दाखवावे त्याप्रमाणे समीक्षेने कलाकृतीतील त्रुटी दाखवताना कलाविष्काराने मानवी जीवन कसे आनंदी होईल हे दाखवावे.

आजच्या साहित्याच्या प्रेरणा या कालसापेक्ष आहेत, जागतिकीकरणाच्या तडाख्यात साहित्यही सुटलेले नाही. जीवन जगण्याचे उद्देश, प्रेरणा आणि व्यक्त होण्याची माध्यमे ही बदलली आहेत, तंत्रस्नेही झाली आहेत, या परिवर्तनाची नोंद समीक्षाशास्त्राने घ्यायला हवी. कौतुक करण्यात कोणत्याही कंजूषी न करता, त्यात कमीपणा न मानता गतानुगतिकतेत अडकलेल्या समीक्षेने कात टाकायला हवी.

**सुरेश देशपांडे**
बी -१२, आसावरी सोसायटी, गुप्ते रोड, विष्णुनगर,
डोंबिवली (पश्चिम) - ४२१२०२
चलभाष: ८३५६०३१७१०
ईमेल : scd2000@gmail.com

कवी महेश लोंढे यांच्या 'निद्रानाशाची रोजनिशी' या काव्यसंग्रहावर डॉ. राहूल पाटील यांनी लिहिलेला लेख.

# मानवी अस्वस्थपणाचं संयमित व समतोल वास्तवचित्रः निद्रानाशाची रोजनिशी–




काव्यसंग्रह : **'निद्रानाशाची रोजनिशी'**
कवी : **महेश दत्तात्रय लोंढे**
प्रकाशक : **बारलोणी बुक्स, पुणे**
प्रथमावृत्ती : **जुलै २०१७**
पृष्ठे : ८० मूल्य : **१२० /–**

## डॉ. राहूल पाटील

**आजच्या कवितेविषयी:**

कविता ही संवेदनशील मनाचा उत्स्फूर्त आविष्कार असते. काळजाला जाऊन भिडते, अस्वस्थ करते, अंतर्मुख करते ती खरी कविता! आधुनिक काळातील व्यामिश्र आणि अस्वस्थ जगण्याचे प्रतिबिंब आजच्या मराठी कवितेत जागोजागी उमटताना दिसते. या भावनेतूनच मराठीमध्ये एक संपूर्ण पिढी या नव्या जाणिवांसह समर्थपणे व्यक्त होत आहे. प्रातिनिधीक स्वरूपात नामोल्लेख करायचा झाल्यास संतोष पद्माकर पवार, पी. विठ्ठल, सुशीलकुमार शिंदे, स्वप्निल शेळके, प्रणव सखदेव, सत्यपालसिंग आधारसिंग राजपूत, ऐश्वर्य पाटेकर, पद्मरेखा धनगर, संघमित्रा खंडारे, बालिका ज्ञानदेव, विनायक येवले, अजित अभंग, महेश दत्तात्रय लोंढे, सुदाम राठोड, कृपेश महाजन आणि इतर काही कवींचा उल्लेख करता येईल; जे आपापल्या पद्धतीने समर्थपणे कवितेतून व्यक्त होत आहेत. या सर्वच कवींची कविता वेगवेगळ्या अर्थाने व विशिष्ट शैलीत आधुनिक आणि मानवी जीवनमूल्ये पडताळत आहे. आजची आधुनिक कविता केवळ वाचनानंद देत नाही तर ती वाचक मन, बुद्धी आणि शरीरावरही खोलवर परिणाम करते. या निकषांवर

**‘निद्रानाशाची रोजनिशी’चा आशय आणि विश्लेषण : कवी व एक माणूस म्हणून आपल्या जगण्याला असलेल्या मर्यादांची जाणीव महेश लोंढ्यांना आहे. त्यामुळे आपल्या ‘आपण उच्चारलेल्या कोणत्याच शब्दांनी’ या कवितेत कवी माणसाचे क्षुद्रत्व– अर्थहीन जगणे मांडतो. शेवटी जेव्हा उडून जातो आपला प्राण तेव्हा त्याला कुणीही/म्हणणार नसतं महानिर्वाण (पृ.१३) ही माणसाच्या सामान्यत्वाची जाणीव महत्त्वाची आहे. ही मर्यादा मान्य करून कवी आपले जगणे, बोलणे, राग, अश्रू, कष्ट, निरर्थक संताप आणि मृत्यूविषयक दृष्टिकोनाची मांडणी करतो.**

महेश लोंढे यांची कविता महत्त्वपूर्ण ठरते. जगण्यातील शेकडो प्रश्न– वैचारिक द्वंद्व मांडत ती वाचकाला अंतर्मुखही करते.

**कवी महेश लोंढेविषयी :**

सोलापूर येथे जन्मलेल्या महेश दत्तात्रय लोंढे शिक्षणाच्या निमित्ताने पुण्यात आले. एस.पी. महाविद्यालयातून त्यांनी विज्ञान शाखेतून अकरावी आणि बारावी पूर्ण केले. पदवी शिक्षण घेण्यासाठी ते पुन्हा गावाकडे परतले. श्रीशिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथून त्यांनी इंग्लिश साहित्यातून पदवी घेताना विद्यापीठात प्रथम क्रमांक मिळविला. पदव्युत्तर पदवीसाठी पुन्हा पुणे विद्यापीठ गाठले. शिक्षणक्षेत्रात विशेष आवड असल्याने त्यांना प्राध्यापक व्हायचे होते. त्यादृष्टीने आवश्यक पात्रता संपादन करतानाच इंग्लिश साहित्याचे वाचन आणि आकलन वाढविले. नोकरीसाठी प्रयत्न सुरू झाले; पण तिथे पैसे मागण्यात आले आणि अशा पद्धतीने मिळणारी नोकरी नको म्हणून त्यांनी ती संधी नाकारली. तिथून पुढे तीन– चार वर्षे नोकरीसाठी संघर्ष नशिबी आला. एक सुशिक्षित व वैचारिक भूमिका असणारा बेरोजगार तरुण म्हणून आजूबाजूच्या परिस्थितीसोबतच मनातील शेकडो विचारांनी सातत्याने अस्वस्थ केले. यातून मानवी जीवन आणि जगण्याचा वेगवेगळ्या पातळ्यांवरचा विचार सुरू झाला. एकीकडे अंतर्मुख होता आले, तर दुसरीकडे अंतर्बाह्य संघर्षही सुरू राहिला. आयुष्यात संघर्ष नसेल, तर पुढे जाता येणार नाही आणि यशाची किंमतही कळणार नाही, असे समजून मरगळ झटकून त्यांनी नव्या दमाने स्पर्धा परीक्षेची तयारी सुरू केली. अथक परिश्रमानंतर ‘नागरी सेवा परीक्षा’ उत्तीर्ण होऊन ते भारतीय राजस्व सेवेत (आय.आर.एस.) अधिकारी म्हणून रूजू झाले. नोकरी लागल्यानंतर भौतिक सुखांच्या मागे न लागता किंवा सुखवस्तू जीवन न जगता संघर्षाची दिशा व पातळी बदलली मात्र अंतर्बाह्य संघर्ष सुरूच राहिला. पूर्वीपासून पडत राहणारे प्रश्न वेगवेगळ्या रूपात पडतच राहिले. आपला गाव, शेती– माती आणि एकूणच निसर्गाशी असलेले नाते तुटू नये यासाठी कवी आतून बाहेरून अस्वस्थ होत राहिला. यातूनच त्यांची वैचारिक जडणघडण होत त्यांचे व्यक्तिमत्त्व अधिक चिंतनशील आणि समृद्ध बनले.

दरम्यान, गावाकडून पुण्यात आल्यावर अकरावीपासूनच त्यांनी आपला एकटेपणा व न्यूनगंड घालविण्यासाठी डायरी (रोजनिशी) लिहायला सुरुवात केली. या लिहिण्यातून त्यांना मनातील खंत मांडता आली, व्यक्त होता आले आणि महत्त्वाचे म्हणजे लिहिणे सापडत गेले. सवयीने मनातले मांडता येऊ लागले. अस्वस्थतेच्या काळात रात्र– रात्र केलेली जागरणे, यातून निद्रानाश व आजूबाजूच्या घडामोडींमुळे हतबल होणे वाट्याला येत गेले. एकीकडे ते गद्य स्वरूपातील डायरी लिहिताना दुसरीकडे सकस मराठी व इंग्लिश कविता– साहित्य वाचू लागले. या वाचन आणि लेखनामुळे त्या प्रतिकूल परिस्थितीत ते तग धरू शकले आणि संधी मिळताच नव्या ऊर्जेसह ठामपणे उभे राहू शकले.

त्यामुळे विचार, चिंतन करताना वाचन- लेखन यांच्याशी एकरूप होणे, ही कवी महेश लोंढे यांची व त्यांच्या काव्यनिर्मितीमागची पार्श्वभूमी आहे.

**'निद्रानाशाची रोजनिशी' या संग्रहाविषयी :**

पुणे येथील बारलोणी बुक्स यांनी जुलै, २०१७ मध्ये 'निद्रानाशाची रोजनिशी' हा काव्यसंग्रह प्रकाशित केला. ८२ पानांत मांडलेल्या ४८ कविता यात समाविष्ट आहेत. या संग्रहाचे एक वैशिष्ट्य म्हणजे संग्रहाचे मुखपृष्ठ आणि आतील रेखाटने ही स्वतः कवी महेश लोंढे यांनीच केलेली आहेत. हा संग्रह कवीने आजी फुलाबाई यांना अर्पण करताना 'आजीचा प्रेमळ धाक आजही कायम असल्या' बाबतची भावना त्यात नोंदविलेली आहे. आजच्या आधुनिक जगण्याची शोकांतिकाच ही आहे की, दिवसेंदिवस असे प्रेमळ धाक हरवत चालले आहेत आणि यापेक्षा दुःखद गोष्ट म्हणजे आजच्या आत्ममग्न माणसाला त्याविषयी काहीच वाटेनासे झाले आहे. कवीने मात्र यानिमित्ताने आवर्जून घेतलेली ही दखल त्यांच्यातील संवेदनशीलतेचा प्रत्यय देते.

या संग्रहात दोन विभाग असून पहिला 'भरदिवसाचे साक्षात्कार' ज्यात २२ कविता आणि दुसरा 'निद्रानाशाची रोजनिशी' यात २६ कविता आहेत.

**'निद्रानाशाची रोजनिशी'चा आशय आणि विश्लेषण :**

कवी व एक माणूस म्हणून आपल्या जगण्याला असलेल्या मर्यादांची जाणीव महेश लोंढे यांना आहे. त्यामुळे आपल्या 'आपण उच्चारलेल्या कोणत्याच शब्दांनी' या कवितेत कवी माणसाचे क्षुद्रत्व- अर्थहीन जगणे मांडतो.

**शेवटी जेव्हा उडून जातो आपला प्राण**

**तेव्हा त्याला कुणीही/ म्हणणार नसतं महानिर्वाण** (पृ.१३)

ही माणसाच्या सामान्यत्वाची जाणीव महत्त्वाची आहे. ही मर्यादा मान्य करून कवी आपले जगणे, बोलणे, राग, अश्रू, कष्ट, निरर्थक संताप आणि मृत्यूविषयक दृष्टिकोनाची मांडणी करतो. 'जोपर्यंत मी घरात राहणार' या कवितेतूनही कवी मानवी मर्यादांची जाणीव आपणास करून देतो. या कवितेच्या शेवटच्या ओळीत 'मी निघून आलो बाहेर...' (पृ.१५) अशी निसर्गाकडे परतण्याची, मूळ आदिमतेकडे जाण्याची भूमिका स्वीकारतो. एकूणच मानवी मर्यादांची मांडणी कवी एका बाजूला करत असला तरी दुसरीकडे त्याला सकारात्मक घडण्याची अपेक्षाही आहे. त्यासाठी स्वतःच्या क्षमता पणास लावण्याची तयारी प्रत्येकाने ठेवली पाहिजे, असा सकारात्मक विचार 'बेडापार' कवितेतून व्यक्त होतो. 'जोवर डोंगरांना कवटाळता येत नाही तोवर'मधून पुन्हा एकदा आत्मपरीक्षण करून कवी मानवी मर्यादांची रोखठोक नोंद करतो. माणसाने प्रेम- आपुलकी व आत्मसंवाद राखला पाहिजे. त्यासाठी साप, पक्षी, माती, जलचर प्राणी, झाड- रोपटे यांच्याकडून काही ना काही शिकायला हवे, ही साधी अपेक्षा व्यक्त करतो.

'पाणी'सारख्या कवितेतून कवी मानवी अपेक्षा, कुतूहल, भय, एकांत, धीर धरण्याची आवश्यकता याविषयी वर्णन करून धैर्य नसल्यास फारसे धाडस करू नये कारण आजचा माणूस मृत्यूच्या शक्यतेत वावरणारा आहे, असे सूचन करतो. जगणे कधीही एका सरळ रेषेत किंवा वाटते तितके साधे- सोपे नसते. त्यामुळे एका दुःखातून दुसऱ्या दुःखात अशा पद्धतीने मानवी आयुष्याची वाटचाल सुरू असते. यात मानवाचा सुरू असलेला निरर्थक प्रवास कवी 'दुखऱ्या पानावरून पुढे चालू' या कवितेतून

**ही ठणकणारी नस आलटून पालटून/ दाबत राहील कोणी**

**दुखऱ्या पानावरून पुढे चालू राहील/ ही श्वासांतील आणीबाणी** (पृ.१७)

अशा शब्दांत वर्णन करतो. संग्रहातील इतर काही कवितांमधूनही आयुष्य म्हणजे काय याचा शोध घेण्याचा प्रयत्न कवी सातत्याने व तितक्याच

जाणीवपूर्वकतेने करतो. सुरुवातीला त्याला जमीन म्हणजे आयुष्य वाटते, नंतर जमीन म्हणजे पाणी असल्याचे जाणवते. पाणी म्हणजे जमीन, आकाश म्हणजे पाण्याची वाफ याची जाणीव झाल्यावर आयुष्य सरळ रेषेत नसून ते एखादे वर्तुळ किंवा एखादा बिंदू व्यापणारे अवकाश क्षेत्र असते, अशी मानवी जीवनाची मांडणी करतो. पुन्हा एकदा मानवी आयुष्यातील निरर्थकता कवी सहजतेने सांगतो. कधीकधी आपल्याही नकळत आपल्या हातून घडणाऱ्या काही चांगल्या गोष्टी, चांगले सृजन 'खुली किताब'मधून व्यक्त करतो. आयुष्य अवघड असले तरी मनुष्य समाजशील प्राणी असल्याने तो एकटा जगू शकत नाही. त्याने परस्पर सहकार्य ठेवले पाहिजे, परस्परांजवळ असले पाहिजे, मानवी नातेसंबंध दृढ केले पाहिजे आणि शक्य त्या प्रत्येक ठिकाणी माणुसकी जपली पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त करताना 'एकमेकां साहाय्य करू अवघे धरू सुपंथ' असा विचार 'शेजारी शेजारी उगवून यावे'मधून देतो. माणुसकी मानणारा व ती व्यक्त करणारा हा कवी मानवाच्या अति- उत्साहामुळे प्रकटीकरणाचे प्रस्थ वाढून सर्वत्र वाद- भांडणे होत आहेत, याकडे लक्ष वेधतो. आज मोकळेपणाने आनंद वा दुःख व्यक्त करणेच आपण विसरून गेलो आहोत, ही वस्तुस्थिती लक्षात आणून देताना अजूनही वेळ हातातून गेली नसल्याची सकारात्मक भावना 'पसारा'मधून व्यक्त करतो. याच पद्धतीने समजुतीच्या चार गोष्टी 'म्हटले तर' कवितेतून येतात. आपल्या जगण्यातल्या बहुतांश गोष्टी या मानण्यावर आहेत. मानवी दृष्टिकोनावर बरेच काही अवलंबून असून आयुष्यात योग्य वेळी योग्य निर्णय घेणे महत्त्वाचे असल्याचे निरीक्षण काही उदाहरणांच्या माध्यमातून पटवून देतो. जगताना माणसाने माणूस जोडला पाहिजे, परस्परांना साथ दिली पाहिजे आणि यात संवाद- बोलणे अधिक महत्त्वाचे आहे. जीभ ही दुधारी शस्त्र असून ती माणसाला उभे करू शकते तसे क्षणात आडवेही करू शकते हे समजावताना कवी टकमक टोकाचा ऐतिहासिक संदर्भ कौशल्याने वापरत 'जिभेच्या टकमक टोकावर' ही अवघ्या दहा ओळींची रचना प्रस्तुत करतो.

आयुष्याच्या वाटेवर माणसाला त्याच- त्याचपणाचा कंटाळा येतो. सवयीचा झालेला जीवनाचा अविभाज्य भाग, विचारांचं ट्रॅफिक, घुसमट, त्यातून पुढे न सरकणे आणि तरीही नाईलाज म्हणून जगणे सुरूच राहते. या जगण्यात मूल्यमापन नाही, आत्मपरीक्षण नाही; आहे ती केवळ साचलेली निरर्थकता... प्रेरणा व आशीर्वाद नसल्याची खंत उराशी बाळगून आपले दैनंदिन जगणे सुरू असते. यासंदर्भात कवी स्वतःशी संवाद साधतो आणि 'जे सांगून झालंय सगळं' या ९९ ओळींच्या दीर्घ कवितेतून

**मागच्या सगळ्या पिढ्यांना झाली तीच/ तशीच सर्दी डोकेदुखी होत राहतेय आपल्याला...** (पृ.३०)

या परंपरांमधील फोलपणाकडे आपले लक्ष वेधतो.

**परंपरेनं वारसाहक्काने जे पदरात दिलंय/ तेच पवित्र मानतोय प्रश्न न विचारता...**

**जे म्हणून झालंय सगळं पूर्वी कधीतरी/ तेच म्हणत राहतोय**

**मंत्र म्हणावेत ठरावीक वेळी तसे/ अंगवळणी पडलेल्या लयीत**

**जे सांगून झालंय सगळं/ तेच आपण सांगतोय पुन्हा पुन्हा** (पृ.३१)

अशा निरीक्षणांतून जुन्या परंपरांकडे आज चिकित्सक दृष्टीने पाहण्याची गरज परखडपणे विशद करतो.

आधुनिक जगण्यातील नासाडी व एक प्रकारचा ऊत- मात रेखाटताना जुन्या पिढीने अनुभवलेली भयानकता मांडायला कवी विसरत नाही. ''१९७२ च्या दुष्काळात जनावरांसोबत सराटा- इचका- गवत खायला मिळाले तरी जीव शांत व्हायचा'' ही

चुलत्याने सांगितलेली आठवण मन हेलावून टाकते. ग्रामीण भागातील दुष्काळाची भयाण परिस्थिती कवीच्या नजरेतून सुटत नाही.

**माहेरून येणाऱ्या भावाची वाट बघावी/ तशी टँकरची वाट बघत बसायच्या**

**पाण्याला आलेल्या बायका/ आणि बडबडत राहायच्या चुलीबद्दल/ कोरड्या तोंडानी** (पृ.३२)

ही वस्तुस्थिती अनुभवल्यानंतर दुसरीकडे शहरात 'सहा लिटर पाणी एकदम फ्लश करताना' धडकीच भरते. त्या वेळी हंडाभर पाण्यासाठी चाललेला मैल आणि चिखलाचा बैल आठवल्याशिवाय राहात नाही.

'भय जिंदाबाद'सारखी एक सुंदर दीर्घ कविता म्हणजे या संग्रहाचे संचित आहे. कवी व्यापक पातळीवर विचार करताना जगण्यातील सूक्ष्म स्पंदने किती बारकाईने टिपतो, याची अनुभूती ही कविता देते. वेगवेगळ्या प्रकारच्या हजारो अनुभवांचे बारा तुकडे या कवितेत कवीने कौशल्याने पेरलेले आहेत. ज्यात प्रेम, सामाजिक जीवन, भीती, मिलन, भेदरलेला माणूस, त्यावर तात्पुरता उपाय, आजचे भौतिक जगणे प्रगत आहे का हा प्रश्न, गुंतागुंत, अस्तित्वाचा प्रश्न, त्यातून निर्माण झालेली भीती, पुन्हा या भीतीची विविध रूपे, त्यातून निद्रानाशाकडे होणारी वाटचाल, एकेक वर्ष म्हणजे एकेक भीती, त्यानुसार शंभर भीती जगणारा माणूस, श्रीमंतांची एअर कंडिशन्ड भीती, तीस मजली भीती, भीतीची पाल, भीतकट घाम, भीतीची जात, भीतीमुळे होणाऱ्या घोषणा आणि एकूणच भीतीने व्यापलेले आजचे जगणे आविष्कृत होते. उपरोधिक स्वरूपात कवीने भीतीचे वेगवेगळे प्रकार इथे प्रयोगशीलतेचा आधार घेत सविस्तर पद्धतीने व तितक्याच नावीन्यपूर्णतेने मांडलेले आहेत. या कवितेतून महेश लोंढे हे मोठ्या ताकदीचे कवी असल्याची प्रचिती येते.

'एकदा' या कवितेतून कवी प्रथांविरुद्ध मनाविरुद्धचे वागणे याविषयी बोलतो. बंद डोळे, कानावर हात, सहीच्याऐवजी अंगठा देणे, अर्ज- विनंत्या- प्रार्थना करणे, भूक नाकारणे, करार व नोंदी मिटविणे, स्पष्ट- रोखठोक वागणे, गाणी- गाऱ्हाणे- रडणे थांबविणे, व्यवस्थांचा टोकदारपणा सांभाळणे, देव्हारे- तुळशी सोडणे, उलटे वागणे, सावल्यांशी हातमिळवणी करून दिवसांची सेवा करणे, रात्र- रात्र जागून स्वहट्ट पूर्ण करणे याविषयी लिहितो. 'नॉस्टॅल्जिक वर्तमानाच्या उंबरठ्यावर'मधून कवी अस्वस्थ वर्तमानाचा शोध घेत विविध शक्यता पडताळतो. आयुष्यातील अवास्तवता, अडखळलेले- संथ झालेले आयुष्य याचा वेध घेऊन कवी भूतकाळ, त्यातील अवशेष आणि मातीपासून दूर जाण्याची खंत व्यक्त करतो. आत्मक्लेश करवून घेताना जीवनाचा शोध घेण्याचा प्रयत्नही येथे आहे. आयुष्यात भरपूर अंतर कापून आल्यावर शेवटी भरकटणे, फिरून- फिरून पुन्हा मूळ जागी येणे, बीज रुजणे, नव्या घडणीची तयारी करत उरातील जखमा मोजत राहणे हा कवितेतील अनुभव बरेच काही शिकवून जातो. 'उभे अठ्ठावीस'सारख्या कवितेतून कवी आपल्या पाच- सहा दैनंदिन कृतींची नोंद घेतो. त्यात ठरविणे, यादी करणे, मुक्काम निश्चित करणे, रांग करणे, रस्ता मुक्रर करणे आणि शेवटी काहीच न करता सगळं लख्खं पाहत राहणे ही कृतिशून्यता नोंदवितो. कवीला भविष्य किंवा हस्तरेषा यावर भरवसा नाही. चिंतामुक्त होण्यासाठी तो 'अंजाम क्या होगा..?' याची चिता रचत न बसता धाडसी प्रयत्न करतो. भौतिक संघर्ष करतो आणि पूर्वग्रहांचे प्रक्षेपण रोखून आत्मशक्तीने कुजत जाण्याचा प्रवास 'आतल्या आत काहीसा'मधून व्यक्त करतो. शीर्षक कवितेतून 'हा न वाजणारा संबळ... हे स्वतःशी वाद तुंबळ!' असे संत तुकारामांशी नाते सांगणारी परंपरा व्यक्त होते. या कवितेतून प्रकटणारा समकाळ इथे केंद्रस्थानी आहे. आजूबाजूच्या 'कातडीचं पांघरूण ओढून झोपलेला ढाराढूर वर्तमान...' कवीला अस्वस्थ करतो आणि कवी 'डोळे गच्च घ्यावेत झाकून' असे म्हणत 'वर्तमानाचे यक्ष' शोधण्याचा

प्रयत्न करतो.

या संग्रहातील 'जितका उभारलो तितकाच' (यांत्रिक अतिरेक व पडझड), 'तळपायावर नोंदल्या टीपा' (फाटलेपण, गाडून घेणे, पसरणे), 'सिक्रेट ओढत बसलो आत' (संकोच, मर्यादा व शेवट), 'विराटाला सामोरे जाताना' (नाकर्तेपण, सत्ता शून्यता), 'आपापल्या डोळ्यांच्या उजेडात' (समृद्धी, संयम, संवेदना आणि जगकल्याणाची प्रार्थना) अशी सर्वहारांचे प्रतिनिधीत्व असलेली भूमिका व्यक्त होते.

**'निद्रानाशाची रोजनिशी'ची भाषाशैली :**

'न संपणारा उखाणा'मध्ये ''हा दिवस इतका संथ जसा न संपणारा उखाणा'' अशी उपमा येते. 'सहा लिटर पाणी फ्लश करताना' कवितेतील ''काठोकाठ पाण्याची स्वप्ने'' ही कल्पना सुंदरतेने प्रकटते. 'अश्रूंवरील आयोगाचा अहवाल' ही कविता मराठी कवितेने यापूर्वी कधीही न पाहिलेला- अनुभवलेला एक नवीनच फॉर्म मांडते. यात कवितेच्या प्रारंभी निरीक्षणे मांडून शेवटी त्यावरील उपाय- सूचना 'अहवाल स्वरूपात' नोंदविलेल्या आहेत. 'फुलं उमललीएत टवटवीत' या कवितेत 'बगावत गीता', 'शर्कराचार्याशी भांडण' आणि 'नव्याने फुटलेले तुरे झेंडे' ही वर्णने नावीन्यपूर्ण उपमांची प्रतीके ठरतात. 'जगण्याचा मोसम ठेवला भरात' या कवितेत कवीने पत्रे- सत्रे, पाणी- वाणी, वाढलो- गाडलो, वाळून- पाळून, उरात- भरात ही यमके योजली आहेत. 'रक्तहीन कांती' या कवितेतून झालो, मांडली, अंकुरलो, भोगली या शब्दांनी कडव्यांची सुरुवात केली असून शेवट भिजवली, सजवली, सळाळलो आणि झळाळलो या शब्दांनी केलेला आहे.

'निद्रानाशाची रोजनिशी'मधील कवितांची शीर्षके सूचकत्वासह नावीन्यपूर्ण पद्धतीने व काहीशी दीर्घ स्वरूपात येतात. उदा. 'जोपर्यंत मी घरात राहणार', 'दुखऱ्या पानावरून पुढे चालू', 'जोवर डोंगरांना कवटाळता येत नाही तोवर', 'आपण ज्याला आयुष्य म्हणतो', 'शेजारी शेजारी उगवून यावे', 'जिभेच्या टकमक टोकावर', 'न संपणारा उखाणा', 'जे सांगून झालंय सगळं', 'अश्रूंवरील आयोगाचा अहवाल', 'कुठेही छापून न येता हे शब्द', 'कुठल्याच व्यासाने लिहू नये आपले महाभारत', 'जगण्याचा मोसम ठेवला भरात', 'रात्र सातव्या मजल्यावरून', 'नॉस्टॅल्जिक वर्तमानाच्या उंबरठ्यावर', 'कुठल्या मातीत रुतून बसावे म्हणजे', 'डोळे गच्च घ्यावेत झाकून', 'जितका उभारलो तितकाच', 'तळपायावर नोंदल्या टीपा', 'सिक्रेट ओढत बसलो आत', 'विराटाला सामोरे जाताना', 'आपापल्या डोळ्यांच्या उजेडात' इ. समर्पक व अंतर्मुख करणारी शैलीदार शीर्षके यांचा समावेश या संग्रहात आहे.

**'निद्रानाशाची रोजनिशी'चे वेगळेपण :**

महेश लोंढे हे स्वभावाने बरेचसे अबोल, मितभाषी; पण तितकीच परखड वैचारिक भूमिका असलेले अभ्यासू व्यक्तिमत्त्व आहे. त्यामुळे बोलण्यापूर्वी ते अनेकदा विचार करतात, आणि मोजके बोलतात. त्यांचे हेच स्वभाव वैशिष्ट्य त्यांच्या कवितेतूनही प्रकटते. मनात आलेला प्रत्येक शब्द ते कागदावर घाईघाईने न उतरवता वेगवेगळ्या पातळ्यांवर त्याला पडताळून पाहतात. त्यातून काटछाट व चिंतन करत मोजक्या स्वरूपात तितक्याच नेमकेपणाने व्यक्त होतात. वैचारिक स्वरूपात आपल्या कवितांची मांडणी ते करतात. कुठेही प्रेम, हळुवार भावना, सहज वर्णने व मनोरंजन त्यांच्या कवितेत येत नाहीत. याउलट जाणीवपूर्वक समाज समूहातील अभावग्रस्तता मांडताना ते सर्वहारा समूहास बरेच काही सुचवून जातात. कवी आजूबाजूच्या समकाळाचा वेध घेताना त्यातील हतबलता, कळण्यापलीकडचे झपाट्याने होणारे बदल, क्षणभंगुरता, त्यातून निर्माण होणारे भयगंड, जगण्याच्या बाजारामुळे निर्माण झालेले मनाचे आजार, परंपरांची अधोगती, वाढलेले भौतिकीकरण यातून घडणाऱ्या मानवी असंतुलनातून निर्माण होणारे अपरिहार्य संघर्ष केंद्रस्थानी ठेवून आपली भूमिका मांडतात. आपल्या लेखणीने फार मोठे बदल होतील,

**माहेरून येणाऱ्या भावाची वाट बघावी/ तशी टँकरची वाट बघत बसायच्या पाण्याला आलेल्या बायका/ आणि बडबडत राहायच्या चुलीबद्दल/ कोरड्या तोंडानी (पृ.३२) ही वस्तुस्थिती अनुभवल्यानंतर दुसरीकडे शहरात 'सहा लिटर पाणी एकदम फ्लश करताना' धडकीच भरते. त्या वेळी हंडाभर पाण्यासाठी चाललेला मैल आणि चिखलाचा बैल आठवल्याशिवाय राहात नाही.**

व्हावेत अशी अपेक्षा न बाळगता मानसिक गरज म्हणून प्रामाणिकपणे व्यक्त होणे यावर ते अधिक लक्ष केंद्रित करतात. त्यांची कविता एकसूत्री व एकसुरी मात्र अजिबात नाही. संग्रहातील अगदी एक- एक कविता पाहिली तरी त्यात अनुभवाचे वेगवेगळे मौलिक तुकडे विशिष्ट पद्धतीने पेरलेले आहेत. मराठीत एकाच संग्रहात क्वचितच इतक्या वैविध्यपूर्णतेने अभिव्यक्ती झालेली दिसते. एक विशिष्ट प्रकारची समृद्ध बहुस्तरीय कविता यानिमित्ताने आलेली दिसते.

**समारोप व निष्कर्ष :**

आजच्या आधुनिक मराठी कवितेतील एक महत्त्वाचे कवी म्हणून महेश दत्तात्रय लोंढे यांची नोंद घ्यावी लागते. मनातील विविध संघर्ष, बदलते शहर- मनातील गाव यांच्याशी असलेले नाते, माणसाचे बदललेले जगणे, भौतिक व सामाजिक प्रश्न, नातेसंबंधांतील दुराव्यांमुळे निर्माण झालेले मानवी अस्तित्वाचे प्रश्न, वेगवेगळ्या पातळ्यांवर होणारा जगण्यातील त्रास, जगण्यातील संदिग्धता याचा शोध ते प्रामाणिकपणे घेत आहेत. समाजातील विविध घटकांशी संबंध, व्यापक वैचारिक भूमिका, तटस्थता आणि चिंतनशीलता यामुळे एक प्रगल्भ समज घेऊन कवी जाणिवांसह संवेदनशील पद्धतीने व्यक्त होतो. व्यक्त होणे ही त्यांच्या जगण्याची व लेखनाची प्रेरणा असल्यामुळे या कवितांमध्ये रूढार्थाने क्रम नाही, नियोजन नाही, कारागिरी नाही, पुरस्कार वा लोकप्रियतेची आस नाही किंवा काही निष्कर्षांपर्यंत पोहोचण्याची घाईसुद्धा नाही. ही कविता म्हणजे सतत सोबत असणाऱ्या व अस्वस्थ करणाऱ्या निद्रानाशाचा शोध आणि वेध आहे, जो वाचकमन व जगणं समृद्ध करणारा आहे. अशी निद्रानाश व चिंतनातून येणारी समृद्धता प्रत्येकाला लाभावी, अशी अपेक्षाही कवी बाळगून आहे. म्हणूनच संग्रहातील शेवटच्या कवितेत तो लिहितो,

**जोवर रस्ता आहे तोवर/ देहात प्राण उरोत**
**डोक्यावर ऋण असेपर्यंत/ पायात त्राण उरोत**
**मीट्ट राहो अंधार वाटेवर/ अंधारात एकमेकांचे डोळे दिसोत/ आपापल्या डोळ्यांच्या उजेडात/ प्रत्येकाला सापडत राहो/**
**आपापला रस्ता**
**जागत्या रात्रींचा वारसा/ सर्वांना मिळो**
(पृ.८२)

एकूणच, जगणे आणि भूमिकेशी एकनिष्ठ राहून कवितेतून मानवी जगण्यातील चढ- उतार, वैचारिक द्वंद्वे यांचा शोध घेण्याचा कवीचा वैविध्यपूर्ण प्रयत्न अखंडपणे सुरू राहो आणि त्यातून मराठी साहित्यात विशेषतः कवितेत मोलाची भर पडो, या सदिच्छांसह वैचारिक व दर्जेदार वाचणाऱ्यांनी 'निद्रानाशाची रोजनिशी' वाचली पाहिजे, असे निःसंदिग्धपणे सुचवावेसे वाटते.


▣▣▣

**डॉ. राहूल अशोक पाटील**
फ्लॅट नं १०१, अशमिका हाईटस्- बी विंग, काळे नगर-२, आनंदवल्ली, श्री गुरुजी रुग्णालयामागे १०० मीटर अंतरावर, गंगापूर रोड, नाशिक -४२२०१३
चलभाष : ९८९०८७२४२६
ई- मेलः rpatil766@gmail.com

मुलीची आई होणे– बाप होणे कसे असते, याबाबत मान्यवरांनी लिहिलेल्या 'मायलेकी–बापलेकी' या पुस्तकाचे परीक्षण करणारा लेख.

# मायलेकी–बापलेकी प्रत्येक पालकाला समृद्ध करणारे पुस्तक

## प्रा. प्रदीप माने




काव्यसंग्रह : **मायलेकी–बापलेकी**
संपादक : **राम जगताप, भाग्यश्री भागवत**
प्रकाशक : **डायमंड पब्लिकेशन्स, पुणे**
पृष्ठे : **२४०** मूल्य : **२९५ /–**

जे पुस्तक वाचल्यानंतर आपण पहिल्यासारखे राहत नाही, जे पुस्तक वाचल्यावर आपण बदलून जातो ते पुस्तक म्हणजे चांगले पुस्तक, अशी एक व्याख्या एका पाश्चात्त्य लेखकाने केलेली आहे. पुस्तकाच्या या व्याख्येविषयी कुणी असहमत होईल असे वाटत नाही. पुस्तकानुभव जेव्हा वाचकानुभव बनून जातो, तेव्हा वाचले जाणारे पुस्तक यशस्वी ठरते, असे म्हणावे लागेल.

अलीकडेच एका वेगळ्या विषयावरचे पुस्तक वाचनात आले. माय आणि बापाचा आपल्या लेकीशी असणारा हृदयसंबंध सांगणारे 'मायलेकी–बापलेकी' हे या पुस्तकाचे नाव. राम जगताप–भाग्यश्री भागवत यांनी हे पुस्तक संपादित केले आहे. मराठी साहित्यविश्वात विशेष चर्चिले न गेलेले माय–बापाचे लेकीशी असणारे नाते उलगडण्यात हे पुस्तक यशस्वी झाले आहे, हे सुरुवातीलाच सांगायला हरकत नाही. या पुस्तकाचे वाचन हा आपणाला समृद्ध करणारा अनुभव आहे.

विविध क्षेत्रांतील माय–बापांची लेकीविषयीची कथने ही आज बदललेल्या नातेसंबंधांची कथने आहेत. लेकीची 'माय' होणे किंवा लेकीचा 'बाप' होणे म्हणजे काय याचा अर्थ सांगणारी नातेसंबंधांची

प्रवासवर्णने आहेत. ही प्रवासवर्णने वाचताना आपणही नकळतपणे माय–लेकीच्या आणि बापलेकीच्या नात्यातला हळुवारपणा आत्मसात करू लागतो.

स्पंज जसा एखादा द्रव शोषून घेतो, त्याप्रमाणे लेखक आपल्या अनुभवांना शोषत असतो. हा अनुभव जेव्हा तो शब्दरूपात मांडतो, तेव्हा घेतलेला अनुभव पाझरतो. ही प्रक्रिया फक्त इथेच थांबत नाही. वाचक ज्या वेळी हा अनुभव वाचतो, तेव्हा तोही लेखकाच्या अनुभवातील पाझर शोषून घेतो. तो या वेळी आस्वादक बनतो. इथे तो स्वत:ला समृद्ध करतो. 'मायलेकी–बापलेकी' हे पुस्तक आपणाला असेच समृद्ध करते.

सदर लेख हा या पुस्तकाचा घेतलेला आस्वाद आहे. पुस्तक वाचताना आलेला अनुभव आपल्यासमोर मांडणे, हा लेखाचा हेतू आहे. आस्वाद हा अनुभवात आलेला प्रतिसाद असतो. नऊ आया आणि आठ बापांनी आपल्या लेकीच्या जन्मापासून ते तिला वाढवताना आलेला अनुभव, या पुस्तकात मांडलेला आहे. या आया आणि बाप विविध क्षेत्रांतले आहेत. त्यामुळे त्यांचे लेकीला वाढवण्याचे अनुभव विविधांगी आहेत. विविध क्षेत्रांत काम करणाऱ्या आया आणि बापांना लेकींना वाढवताना आलेले अनुभव, समस्या आणि त्या त्यांनी कशा हाताळल्या, यांचा परिचय या पुस्तकामुळे होतो. एक गोष्ट आपण निश्चितपणे म्हणू शकतो, ती म्हणजे या पुस्तकातील माय–बाप आजच्या काळात विविध क्षेत्रांत काम करत असणारे असले तरी संवेदनशीलता हा या सर्वांना जोडणारा धागा आहे.

पुस्तकाची सुरुवात आपण संपादकांच्या मनोगतापासून करू. संपादक राम जगताप यांनी आपल्या मनोगतात पुस्तकनिर्मितीची संकल्पना आणि त्याचा प्रवास मांडलेला आहे. २००४ साली संपादकाने पद्मजा फाटक, दीपा गोवारीकर आणि विद्या विद्वांस यांनी संपादित केलेले 'बापलेकी' हे



पुस्तक वाचले आणि त्यांना बापलेकीच्या नात्यासारख्या दुर्लक्षित नात्याचा पहिल्यांदा साक्षात्कार झाला. २०१३ साली अरुण शेवते यांनी संपादित केलेले 'एकच मुलगी' हे पुस्तकही त्यांच्या वाचनात आले. या दोन्ही पुस्तकांनी माझा दृष्टिकोन घडवला, असे संपादकांनी म्हटले आहे. सदर पुस्तक याच जातकुळीतले आहे. संपादकांनी हे मायबाप आणि लेकीच्या नातेसंबंधांवरील पुस्तक आहे, असे म्हटले आहे. हे पुस्तक बालसंगोपनावरील पुस्तक नाही, असेही स्पष्टपणे म्हटले आहे. पुस्तक वाचल्यावर या गोष्टींचा अनुभव येतो; पण हेही आवर्जून सांगावे लागेल की, बालसंगोपनासारख्या विषयाला नकळतपणे स्पर्श करत जाते.

या पुस्तकातील लेखक लेखिकांची लेकी–विषयीची कथने इतकी संवेदनशील आणि उत्कट आहेत की, मुलाचे संगोपन कसे करावे हा विषयही या पुस्तकाचा 'बायप्रॉडक्ट' समजायला हरकत नाही.

संपादकीय मनोगतानंतर येतो ते डॉ. आशुतोष जावडेकर यांनी पुस्तकाच्या अनुषंगाने लिहिलेला बीजलेख. त्यामध्ये जावडेकर पालकत्व हे जाणीवपूर्वक करायचे काम आहे, हे अधोरेखित करतात, या विषयाच्या अनुषंगाने चर्चा करत

**स्पंज जसा एखादा द्रव शोषून घेतो, त्याप्रमाणे लेखक आपल्या अनुभवांना शोषत असतो. हा अनुभव जेव्हा तो शब्दरूपात मांडतो, तेव्हा घेतलेला अनुभव पाझरतो. ही प्रक्रिया फक्त इथेच थांबत नाही. वाचक ज्या वेळी हा अनुभव वाचतो, तेव्हा तोही लेखकाच्या अनुभवातील पाझर शोषून घेतो. तो या वेळी आस्वादक बनतो. इथे तो स्वत:ला समृद्ध करतो. 'मायलेकी-बापलेकी' हे पुस्तक आपणाला असेच समृद्ध करते.**

असताना त्यांनी काढलेला निष्कर्ष चिंतनीय आहे. 'चांगल्या घरात बाप 'अर्धा आई' आणि आई 'अर्धी बाप' असते' हा जावडेकरांनी काढलेला निष्कर्ष संपूर्ण पुस्तक वाचल्यानंतर पूर्णपणे पटतो. आजच्या काळात मायबापांच्या भूमिका पहिल्यासारख्या राहिलेल्या नाहीत, एकमेकांच्या भूमिकांची अदलाबदल होत आजचे पालकत्व विकसित होत आहे.

आता येऊ आपण पुस्तकातील माय-बापांच्या लेकीविषयीच्या कथनांकडे. सदर पुस्तकात अभिनेत्री सोनाली कुलकर्णी, पत्रकारितेच्या क्षेत्रातील भक्ती चपळगावकर, कीर्ती परचुरे, अमिता दरेकर, सीमा शेख-देसाई; पोलीस अधिकारी नयना जाधव, गृहिणी अश्विनी काळे, प्राध्यापिका प्रिया सुशील, संपादिका ममता क्षेमकल्याणी या आयांनी लेकींवर लिहिले आहे.

याचबरोबर लेखक हृषिकेश गुप्ते, कवी दासू वैद्य, 'किशोर' मासिकाचे संपादक किरण केंद्रे, मनोरंजन क्षेत्रातील योगेश गायकवाड, इतिहास अभ्यासक सरफराज अहमद, पत्रकार आसिम बागवान, व्यावसायिक किशोर रक्ताटे आणि राम जगताप या बापांची लेकीविषयीची कथने यांचा समावेश आहे. ही सर्व कथने वाचनीय आहेत.

अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांच्या कथनात चित्रपटक्षेत्रात काम करत असताना आई होणे आणि लेकीला सांभाळणे कसा पेचात पाडणारा अनुभव असतो, हे समजते. कथन करत असताना त्या एका महत्त्वपूर्ण गोष्ट सांगून जातात. ते म्हणजे 'मूल झाल्यानंतर आपले अनेक विचार पुस्तकी ठरतात.' ही गोष्ट एकदम खरी आहे!

पत्रकारितेच्या करिअरमध्ये व्यग्र असताना आपल्या मुलीला सुंदरपणे वाढवणाऱ्या भक्ती चपळगावकर यांचे अनुभवही वाचनीय आहेत. मुक्त बागडू दिल्यावर आपल्या लेकीच्या बहरलेल्या व्यक्तिमत्त्वाचा उलगडा चपळगावकर यांनी करून दिला आहे. आपल्या लेकीच्या रूपाने मिळालेल्या लाजऱ्याबुजऱ्या बालपणाचा परिचय आपणास होतो, असे ममता क्षेमकल्याणी यांना वाटते. पालक हा एक सतत शिकणारा माणूस असतो, या भूमिकेतून त्यांनी आपल्या लेकीला कसे वाढवले याचा अनुभव त्यांच्या लेखनातून येतो. लेकीने स्वतंत्र आणि जबाबदार व्हावे, यासाठी प्रयत्न करणारी आई कीर्ती परचुरे यांच्यात दिसून येते. स्वत:ला मुलांच्या ठिकाणी कल्पून आईपण निभावयास हवे, असे अमिता दरेकर यांनी मांडले आहे. त्यांनी त्यासाठी केलेले प्रयत्न आपणाला त्यांच्या लेखातून दिसून येतात. आपल्यातील पालकत्वाचा शोध लावणाऱ्या, जबाबदारीचे भान देणाऱ्या आणि जीवन बदलून टाकणाऱ्या लेकीचा परिचय प्राध्यापिका प्रिया सुशील यांनी अत्यंत समरसपणे करून दिला आहे. पत्रकार सीमा शेख-देसाई यांना 'पालकत्व हा पृथ्वीवरचा सर्वांत अवघड जॉब' वाटतो. तरीही सातत्याने लेकीला घडवताना स्वत: घडत राहणे त्यांना महत्त्वाचे वाटते. पोलीस अधिकारी असताना खाकी वर्दीतल्या संवेदनशील आईचा प्रवास नयना जाधव आपल्या कथनातून मांडतात.

या मायलेकीत शेवटचा प्रवास येतो गृहिणी अश्विनी काळे यांचा. एक अपंग आई जेव्हा लेकीला

**अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांच्या कथनात चित्रपटक्षेत्रात काम करत असताना आई होणे आणि लेकीला सांभाळणे कसा पेचात पाडणारा अनुभव असतो, हे समजते. कथन करत असताना त्या एका महत्त्वपूर्ण गोष्ट सांगून जातात. ते म्हणजे 'मूल झाल्यानंतर आपले अनेक विचार पुस्तकी ठरतात.' ही गोष्ट एकदम खरी आहे!**

जन्म देते आणि वाढवते, तेव्हा तो प्रवास एखाद्या साहसकृत्यापेक्षा कमी नसतो, ही गोष्ट त्यांच्या लेखातून प्रतिबिंबित होते. या अपंग आईचे अनुभव अंगावर शहारे आणतात.

मायलेकींच्या अनुभवानंतर दुसरा विभाग सुरू होतो– बापलेकींचा. या विभागातली कथने वाचल्यानंतर एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते, ती म्हणजे आजचा संवेदनशील बाप जावडेकर 'अनुषंग'मध्ये म्हणतात त्याप्रमाणे 'अर्धा आई' बनलेला आहे.

बापलेकीच्या विभागाची सुरुवात होते कादंबरीकार हृषीकेश गुप्ते यांच्या लेखापासून. मुलीचे आपल्या जीवनात येणे आपल्याला कसे बदलून टाकते, याचा अनुभव त्यांनी मांडला आहे. मुलगी असण्याची भावना त्यांनी शेवटी एका उर्दू शेर मधून मांडली आहे –

'लडकियाँ बैठी थी पाँव डालकर
रोशनीसी हो गयी तालाब में'

कवी दासू वैद्य यांनी लेकीचा जन्म झाल्यावर आपण दुसऱ्यांदा कसे प्रेमात पडतो, याची आपली अनुभूती मांडली आहे. कवितेतली मुलगी शोधणारा बाप म्हणून जरी यशस्वी झालो असलो तरी खरा बाप म्हणून कायम चिंताक्रांतच असेन, असे वाक्य वैद्य लिहून जातात. एका आयपीएस आईची लेक सांभाळणे अन तेही स्वत:चे करिअर सांभाळत म्हणजे काय याचा अनुभव किशोर रक्ताटे यांच्या लेखातून येतो. सदर पुस्तकाचे संपादक राम जगताप यांचाही या विभागात एक लेख आहे. आपल्या बापासारखा 'मारकुटा बाप' न होता 'चांगला बाप' होण्याचा प्रवास त्यांनी त्यात मांडला आहे. 'किशोर' मासिकाचे संपादक किरण केंद्रे यांनी आपल्या मुलीला आपल्या जीवनातले 'आनंदाचे झाड' म्हटले आहे. मुलगी असणे ही भावनाच मुळी काव्यमय आहे, अशी त्यांनी आपल्यातल्या बापाची भावना व्यक्त केली आहे. आपल्या बुद्धिनिष्ठ आणि कलात्मक जीवनशैलीत जगत असताना स्वतंत्र मार्ग निवडून स्वतंत्र लेक घडवण्याचा प्रवास योगेश गायकवाड यांनी मांडला आहे. स्वत:च्या संघर्षपूर्ण जीवनात आपल्या लेकीने आपले जीवन सुंदर कसे केले, याचा परिचय इतिहास अभ्यासक सरफराज अहमद करून देतात. पत्रकार आसिम बागवान यांनी आंतरधर्मीय लग्न असलेल्या आपल्या जीवनात लेकींना वाढवण्याचा प्रवास मांडला आहे.

या सर्व मायांचा आणि बापांचा स्वत:तील मायबाप घडवण्याचा प्रवास वाचणे, हा एक समृद्ध करणारा अनुभव आहे. नातेसंबंधांतील विशेष चर्चिला न गेलेला हा विषय समजून घेण्यासाठी हे पुस्तक निश्चितच उपयुक्त ठरेल. बालसंगोपन हा जरी या पुस्तकाचा प्रत्यक्ष विषय नसला तरी त्याबाबतीतही 'इन्स्ट्रक्शन मॅन्युअल' ठरावे असे हे पुस्तक आहे.

▣▣▣


(लेखक गरवारे महाविद्यालयामध्ये तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक आहेत.)

**प्रदीपकुमार माने**

फ्लॅट नं २०१, मधुसुदन अपार्टमेंट, सर्व्हे नं.६०/२/१, चांदणी गार्डन हॉटेल मागे, वडगाव बुद्रुक पुलाजवळ,
वडगाव बुद्रुक, पुणे–४११०४१
चलभाष : ९८२३७३४०४२
ईमेल– pradeeppolymath@gmail.com

# पैलतटावरः भावोत्कट आविष्काराचा प्रत्यय देणारा ग्रंथ

**प्रा. विलास खोले यांच्या आयुष्यात आलेल्या वाङ्मयविश्वातील प्रतिभासंपन्न व्यक्तींवरील 'पैलतटावर' या पुस्तकाचा प्रा. डॉ. विश्वनाथ शिंदे यांनी करून दिलेला परिचय**




पुस्तकाचे नाव : **पैलतटावर**
लेखक : **प्रा. विलास खोले**
प्रकाशकः **मॅजेस्टिक पब्लिशिंग हाऊस**
प्रथमावृत्ती : **डिसेंबर २०१९**
मूल्य : **२५०/-**

**प्रा. डॉ. विश्वनाथ शिंदे**

प्रा. विलास खोले यांना आपण अत्यंत शिस्तीचे व्यासंगी संशोधक, वीसहून अधिक ग्रंथाचे साक्षेपी संपादक आणि विचक्षक समीक्षक म्हणून ओळखतो. त्यांचा इतका लेखक-परिचय पुरेसा नाही. ते संवेदनाशील मनाचे विलोभनीय शैलीचे ललित लेखकदेखील आहेत. 'अमेरिका व्हाया लंडन' या प्रवासवर्णनपर ग्रंथामधून 'सुहृदगान' आणि 'पैलतटावर' या त्यांच्या व्यक्तिचित्रणात्मक पुस्तकातून त्यांच्या लालित्यपूर्ण लेखन कौशल्याचा मनोज्ञ आविष्कार झालेला दिसतो. त्यांची उपरोक्त दोन्ही व्यक्तिचित्रणपर पुस्तके मॅजेस्टिक या नामवंत प्रकाशन संस्थेने प्रकाशित केली आहेत.

वाङ्मयीन क्षेत्रात भरीव कामगिरी करणारी माणसे वेगवेगळ्या निमित्ताने प्रो. खोले यांच्या आयुष्यात आली. त्यांचे खोले यांच्याशी आत्मीय नाते निर्माण झाले, त्यांच्या सहवासात वावरताना प्रो. खोले यांच्या जीवनाला समृद्धता प्राप्त झाली. त्या वाङ्मय विश्वातील प्रतिभासंपन्न व्यक्तींच्या स्वभाववैशिष्ट्यांचा अन् त्यांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाचा अत्यंत गुणग्राहक दृष्टिकोनातून चरित्रचित्रण करण्याचा अनोखा प्रयत्न प्रा. विलास खोले यांनी त्यांच्या 'सुहृदगान' या २०१३ मध्ये प्रकाशित झालेल्या ग्रंथातून केला. पु. ग.

सहस्त्रबुद्धे वि. रा. करंदीकर, मधु मंगेश कर्णिक, राजेंद्र बनहट्टी, वि.शं. चौगुले, सुभाष भेंडे, ग्रेस, नागनाथ कोत्तापल्ले, अशोक कोठावळे यांच्यासह महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री-अभिरुची संपन्न समंजस राजकारणी अशा एकूण तेवीस व्यक्तिमत्त्वांचा वेध सुहृदगान या ग्रंथात घेतला आहे. या मान्यवरांच्या कौटुंबिक जीवनचित्रणाबरोबरच त्यांच्या वाङ्‌मयीन जडणघडणीचा पुढे त्यांनी केलेल्या समृद्ध-संपन्न कामगिरीचा आणि त्यांच्या अनोख्या स्वभाव विशेषांमधील अनेक पैलूंचा आलेख लेखकाने प्रस्तुत ग्रंथात रेखाटला आहे. म्हणूनच प्रा. खोले यांचा 'सुहृदगान' ग्रंथ वाचकांना अनुभवसंपन्न अनुभूतीचा प्रत्यय देणारा आहे असे मला वाटते.

पाच डिसेंबर हा प्रा. खोले यांचा जन्मदिवस. यावर्षी त्यांनी वयाची पंच्याहत्तरी पूर्ण केली. हा योग साधून आपले नातेवाईक, मित्रमंडळी, साहित्यिकांच्या समवेत प्रा. खोले यांच्या मुलांनी खोले यांच्या 'पैलतटावर' या ग्रंथाचे प्रकाशन ५.१२.२००९ रोजी करून ७५ वा वाढदिवस साजरा केला.

'पैलतटावर' हा प्रो. खोले यांचा ग्रंथ त्यांच्या दिवंगत स्नेहीजनांच्या व्यक्तिमत्त्वाचा अत्यंत आपुलकीने परिचय करून देणारा आहे. ज्या व्यक्ती आपली संगत सोडून न परतण्याच्या वाटेने निघून गेल्या, त्यांचे दुःख या ग्रंथात आहेच; पण त्या व्यक्तींच्या हृदय आठवणींना उजाळा देताना प्रा. खोले यांनी मराठी साहित्य-संस्कृतीत घडून गेलेल्या अनेक घटना प्रसंगांचा आलेख या ग्रंथात रेखाटला आहे. गेल्या पन्नास वर्षांतील वाङ्‌मयाच्या क्षेत्रामधील अनेक गोष्टी समजून घ्यावयाची इच्छा असणाऱ्या वाचकांची अपेक्षा या ग्रंथाच्या वाचनाने बऱ्याच प्रमाणात पूर्ण होते.

म. वि. गोखले, अनुराधा पोतदार, म. द. हातकणंगलेकर, शंकर वैद्य, द. भि. कुलकर्णी, रा.ग. जाधव, दिगंबर पाध्ये, वि.बा. प्रभुदेसाई, के.ज. पुरोहित, ल. रा. नसिरावादकर, सु.रा. चुनेकर, गो. मा. पवार, जे.व्ही. नाईक यांच्या दुःखद निधनाने आपल्या जीवनात न भरून निघणारी पोकळी निर्माण झाली, लेखकांच्या मनात या व्यक्तींविषयी जिव्हाळा, आपुलकी, आदर, प्रेम असल्याने त्या व्यक्तींच्या जाण्याने लेखक स्वतःच्या भावनांना आवर घालू शकत नाही. या अनावर भावनांना त्यांनी त्या त्या वेळी कागदावर मांडून भावनांची वाट मोकळी केली. त्या उत्कट भावनांचा ओघवता भावावेग या साऱ्या लेखनातून प्रगट होतो.

त्या त्या व्यक्तीची आणि आपली पहिली कशी आणि कधी झाली, आपण त्या व्यक्तींच्या व्यक्तिमत्त्वाकडे कसे आकर्षित कसे झालो. पुढे वारंवार भेटी कशा होत गेल्या, त्यात सातत्य कसे राहिले आणि अतूट नातेसंबंध त्या व्यक्तींशी कसे निर्माण झाले. या नातेसंबंधाचा विस्तार एकमेकांच्या कौटुंबिक सुखदुःखाशी कसा निगडित होत गेला हे खोले अत्यंत अंतःकरणपूर्वक समरसून सांगतात. अनेक वेळा यांपैकी चार-दोन मित्रांची एकत्र मैफिल जमते. त्या बैठकीत एकमेकांची चेष्टामस्करी करण्यापासून ते एखाद्या वाङ्‌मयीन प्रश्नाची तड लावण्यापर्यंत ही चर्चा कशी रंगतदार होत असे. यासंबंधीच्या आठवणी खोले मोठ्या खुबीने वर्णन करून सांगतात. गो. मा. पवार आणि हातकणंगलेकर एकमेकांचे मित्र ते नाते एकमेकांचे व्याही झाल्यानंतरही कसे टिकून राहिले. किंबहुना त्यात प्रेमवृद्धी कशी झाली. गो. मा. पवार किरकोळ दुखले-खुपले तरी स्वतःची काळजी इतरांना घ्यायला लावत. किंवा अनुराधा पोतदार स्वतःच्या देखणेपणाबद्दल अधिक सजग कशा होत्या, द. भि. कुलकर्णी यांच्या स्वभावातील हेकेखोरपणा, विद्यार्थ्यांच्या मनावर त्यांचे असणारे गारुड, सुभाष भेंडे यांच्या मैत्रीमधला निखळपणा अशा अनेक बारीक-सारीक गोष्टी खोले तपशिलाने सांगतात. सभासंमेलने, चर्चासत्रे, बैठका यातील गमती-जमतींची ते आवर्जून नोंद करतात. खोले यांची स्मरणशक्ती मोठी तल्लख असल्याचा अनुभव सांगणारे अनेक घटना-प्रसंग या पुस्तकात

आहेत. सु. रा. चुनेकरांनी सूचीकार्यात स्वतःला वाहून घेतले. हे त्यांचे काम कारकुनी स्वरूपाचे असल्याचा हेटाळणीचा सूर उमटत असे; पण खोले त्यांच्या कामाचे महत्त्व अधोरेखित करतात. काही व्यक्तींच्या कामाची दखल मराठी वाङ्‌मयीन जगताने पुरेशी घेतलेली नाही अशा व्यक्तींच्या वाङ्‌मयीन कार्याकडे खोले अत्यंत सकारात्मक दृष्टिकोनातून बघतात. गो. मा. पवार यांच्या कामामुळे त्यांच्या प्रोफेसर पदाला प्रतिष्ठा कशी प्राप्त झाली; म. द. हातकणंगलेकरांची केवळ उपस्थिती उत्साहवर्धक वातावरण निर्माण करणारी असायची; प्रा. रा. ग जाधवांचा संकोची स्वभाव; पण त्यांच्याकडे असणारी वाङ्‌मयीन विश्लेषणाची मर्मदृष्टी; के. ज. पुरोहित यांचे भारदस्त, करारी व्यक्तिमत्त्व, त्यांच्या मनातील सहकाऱ्यांविषयीचा जिव्हाळा, श्रेष्ठ कथाकार म्हणून त्यांच्याकडे असणारी गुणवता; जे. व्ही नाईक यांची वेळोवेळी प्रत्ययाला येणारी उच्चकोटीची बौद्धिक उंची; प्रा. दिगंबर पाध्ये यांची कामाविषयीची बांधिलकी आणि सहज मिस्किलपणे एखाद्याच्या गुणदोषावर ते करीत असलेली टिपण्णी; प्रा. म. द. हातकणंगलेकरांचा दरारा, अशा अनेक व्यक्तींच्या स्वभाववैशिष्ट्यांचा आणि त्यांच्या वाङ्‌मयीन कार्यकर्तृत्वाच्या नेटक्या नोंदी प्रा. विलास खोले यांनी प्रस्तुत ग्रंथात केल्या आहेत. येथे केवळ आधी उल्लेख केलेल्या १२-१३ व्यक्तींच्या संबंधी खोले लिहीत असले तरी त्यांच्याशी संबंधित अनेक शेकडो व्यक्तींविषयीही त्यांनी प्रसंगपरत्वे ठिकठिकाणी लिहिलेले आहे. व्यक्ती सुटी कधीच जगत नसते. हा नात्याचा गुंता अनेकांच्या नात्याशी जोडलेला असतो त्यामुळे महाराष्ट्रातील अनेक लेखक, विचारवंत सामाजिक कार्यकर्ते, कवी, कथाकार यांच्याविषयी प्रा. खोले ओघात लिहितात आणि त्यांच्या स्वभाववैशिष्ट्यांचे मार्मिक विश्लेषण करतात.

प्रा. खोल्यांनी या ग्रंथात ज्यांच्याविषयी लिहिले आहे त्यांचे स्वभाव परस्परांहून भिन्न आहेत. त्यांचे स्वतंत्र गटतट आहेत. एकमेकांविषयी मतभेदही आहेत; पण खोले स्वतःला या सर्व वृत्तीप्रवृत्तींच्या माणसांशी जोडून घेतात आणि आपले नाते अधिक विशाल करतात. ते परस्परविरोधी स्वभाव असणाऱ्या साऱ्यांशी जिव्हाळ्याचे नाते निर्माण करतात. हे खोले यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वेगळेपण म्हणून नमूद करावे लागेल. किती भिन्न प्रवृत्तीच्या व्यक्तींशी खोले यांनी जिव्हाळ्याचे नाते निर्माण केले आणि ते जपण्यात ते यशस्वी झाले हे या ग्रंथातील लेख वाचताना आपल्या अनुभूतीस येते. खोले इतरांविषयी लिहितात हे खरे; पण या साऱ्या लेखनातून स्वतः खोले यांच्या स्वभावाचा, त्यांच्या सकारात्मक, विधायक विचारसणीचा प्रत्यय पुस्तकाच्या पानापानांवर येतो. त्यातून त्यांचेही दिलदार व्यक्तिचित्र आपल्या नजरेत भरते. एकूणच प्रस्तुत ग्रंथातून मराठी-साहित्य-संस्कृतीत गेल्या पन्नास वर्षांतील घडामोडींचा चढउतारांचा एक मनोज्ञ आविष्कार या ग्रंथात दिसतो.

ह्या ग्रंथातील लेख त्या त्या व्यक्तींच्या मृत्यूनंतर लिहिलेले असले तरी ते रूढ स्वरूपाचे मृत्युलेख नाहीत. एका संवदेनाशील मनाचा वाङ्‌मयीन आविष्कार आहे. दुःखदायक अनुभवांचा आविष्कार असला तरी तो वाचकांना अंतर्मुख होऊन विचार करायला लावून त्यांना आनंदाचा प्रत्यय देणारा भावाविष्कारही आहे. अत्यंत हळव्या मनाने लालित्यपूर्ण शैलीतून प्रकट होणारी ही अनुभूती आहे. त्यामुळे हे लेख वाचताना वाचकांचे हृदय व्याकूळ होते तसेच खोले यांच्या लालित्यपूर्ण भाषाशैलीच्या प्रत्ययाने ते मन आनंदितही होते. हे खोले यांच्या लेखणीचे सामर्थ्य आहे, असे आपण म्हणू शकतो.


▣▣▣

**डॉ. विश्वनाथ शिंदे**
फ्लॅट नं ४०१, बी. बिल्डींग, साई अँबियन्स, गोविंद गार्डन जवळ, पिंपळे सौदागर, पुणे-४११०३७
चलभाषः ९८९०४१८०२८

**विविध विषयांवरील चिंतनपर लेख असलेल्या प्रा. मिलिंद जोशी लिखित 'पाहावे आपणासी आपण' या पुस्तकावरील अभिजीत पाटील यांचा लेख.**

# पाहावे आपणासी आपण: जाणिवा समृद्ध करणारे तत्त्वचिंतनात्मक लेखन

## अभिजीत पाटील



पुस्तकाचे नाव : **पाहावे आपणासी आपण**
संपादकः **प्रा. मिलिंद जोशी**
प्रकाशकः **मंजूल प्रकाशन, भोपाळ**
पृष्ठेः **१४१** मूल्य : **१९९ /-**

प्रसिद्ध लेखक, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष आणि वक्ते प्रा. मिलिंद जोशी यांचे 'पाहावे आपणासी आपण' हे पुस्तक मंजुल प्रकाशनाने प्रकाशित केले आहे. वाचकांचे विचारविश्व समृद्ध करणारे चिंतनशील लेखन असा या पुस्तकाचा उल्लेख करावा लागेल.

अध्यात्म काय किंवा तत्त्वज्ञान काय शेवटी जीवनातून उदयाला येत असते. याचा बोध करून देणारा हा लेखसंग्रह आहे. जन्म-मृत्यूच्या अवकाशात नानाप्रकारचे अनुभव घेता घेता माणूस जगण्याचा अर्थ शोधत राहतो आणि आपापल्या मर्यादेत त्या अर्थवतीने जगणं सुफळ करण्याचा प्रयत्न करत राहतो. या प्रयत्नात त्याला जे गवसले त्याचीच वेचक मांडणी प्रा. मिलिंद जोशी यांनी 'पाहावे आपणासी आपण' या पुस्तकातील लेखांमधून केली आहे. या पुस्तकातील लेखन मोठ्या जीवनाशयाकडे जाण्याच्या दिशा सूचित करणारे आहे. अशा शब्दांत प्रसिद्ध कवयित्री डॉ. अरुणा ढेरे यांनी प्रस्तावनेत या पुस्तकाचा गौरव केला आहे.

या पुस्तकात श्रद्धा, अनुभव, एकांत, हास्ययोग, वक्तृत्व कला, खेळ स्मृतीचा, मी, ॐकार स्वरूप, साधेपणा, तो राजहंस एक, मनाचे व्यवस्थापन, मन करा रे प्रसन्न, बोला चांगभलं, जॅक ऑफ ऑल, वारी आणि

जीवन, संतसाहित्य आणि युवाविश्व, तमाच्या तळाशी दिवे लागले रे अशा माणसाच्या जीवनाशी निगडित विविध विषयांवर प्रा. मिलिंद जोशी यांनी अभ्यासपूर्ण लेखन केले आहे. प्रा. जोशी यांचा दांडगा व्यासंग, त्यांच्याकडे असलेली संदर्भांची श्रीमंती, तर्कशुद्ध विवेचन, त्याला दिलेली उदाहरणांची जोड, रसाळ भाषा आणि अवघड विषय सोपा करून सांगण्याची हातोटी, वाचकांना खिळवून ठेवणारी लेखनशैली यामुळे हे पुस्तक वाचकांच्या जाणिवा समृद्ध करते. वाचकांना विचारप्रवृत्त करणारे नवी जीवनदृष्टी देणारे हे लेखन आहे.

माणूस श्रद्धेवरच जगत असतो. प्रयत्नवादाची कवाडे बंद करणारी कोणतीही श्रद्धा माणसाला उत्कर्षाच्या वाटेने घेऊन जाऊ शकत नाही. श्रद्धेमुळे माणसाची तौलनिक विचारशक्ती कुंठित होता कामा नये. माणसांना जसे भावभावनांचे व्यवस्थापन करता येते तसेच आपल्या श्रद्धाभावाचेही व्यवस्थापन करता आले पाहिजे, असा मौलिक विचार त्यांनी श्रद्धा या पहिल्याच लेखात मांडला आहे. विचारांची वारी विवेकाच्या वाटेवरून चालत राहिली तरी श्रद्धेचे मोल कमी होत नाही. हे ज्याला समजले त्याच्याच जीवन मंदिरात आनंदाचा आणि समाधानाचा अखंड घंटानाद होत राहतो, अशांसाठी श्रद्धा ही प्रेरकशक्ती ठरते, याकडे प्रा. जोशी यांनी नेमकेपणाने लक्ष वेधले आहे.

हजारो पुस्तके वाचून मिळणाऱ्या ज्ञानापेक्षा एखादा अनुभव जीवनाला श्रीमंत करून जातो असे म्हटले जाते. प्रत्येकाने आपल्या वाटेला येणारे अनुभव आणि त्यातून मिळणाऱ्या समाधानाची प्रत तपासून पाहिली पाहिजे. अनेकदा जे दुय्यम दर्जाचे असते तेच सर्वश्रेष्ठ वाटू लागते. सर्वोत्तम अनुभवाविषयीचे अज्ञान हेच त्याचे कारण असते. जीवनाची गुणवत्ता वाढविण्यासाठी अनुभवाच्या इयत्ताही चढत्या क्रमाने पार करणे गरजेचे असते. हे ज्यांना जमते त्यांना शांततेच्या, आनंदाच्या आणि समाधानाच्या शोधार्थ वणवण करीत भटकावे लागत नाही, असं सांगत शब्दांपेक्षाही प्रभावी असलेल्या निःशब्द जाणिवांचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले आहे.

**आजच्या धांदलीच्या आयुष्यात सर्वत्र फक्त गोंगाटच आहे. या गोंगाटामुळे आणि गोंधळामुळे माणसांच्या वाट्याला एकांत येत नाही. अनेकांचा असा समज असतो, की एकांत म्हणजेच एकटेपणा. एकटेपणात कोणीच आपल्या बरोबर नाही याची खंत मनाला सतावत असते. तसे एकांताचे नसते. माझ्याबरोबर मी आणि माझ्या सर्व अंतःप्रेरणा आहेत याची जाणीव माणसाला एकांतात आत्मविश्वास देत असते, असा वेगळा विचार मांडत एकांत हे नितांत सुंदर विचार पर्यटनस्थळ आहे याची जाणीव प्रा. जोशींनी करून दिली आहे.**

सुख पाहता जवा पडे। दुःख पर्वता एवढे ।। असे संत तुकारामांनी म्हटले आहे. आयुष्य साधे, सोपे आणि सरळ कधीच नसते. संकटे, संघर्ष, यातना, दुःख यांनीच भरलेले असते. या साऱ्यातून सहीसलामत बाहेर पडण्याचा एकच मार्ग तो म्हणजे आशावाद. या सकारात्मक दृष्टिकोनाचे आणि आशावादाचे महत्त्व 'आशावाद' या अप्रतिम लेखात प्रा. जोशींनी सांगितले आहे. आपण जे बोलत असतो त्याची स्पंदने आपल्या अंतर्मनात उमटत असतात. त्यानुसार आपली बुद्धी आणि कर्मेंद्रिये काम करीत असतात म्हणून सतत आशावादी विचारांचा जागर करीत राहा, असे लेखकाने या लेखात सांगितले आहे.

आजच्या धांदलीच्या आयुष्यात सर्वत्र फक्त गोंगाटच आहे. या गोंगाटामुळे आणि गोंधळामुळे माणसांच्या वाट्याला एकांत येत नाही. अनेकांचा असा समज असतो, की एकांत म्हणजेच एकटेपणा. हा समज कसा चुकीचा आहे हे पटवून देत एकटेपणात कोणीच आपल्या बरोबर नाही याची खंत मनाला सतावत असते. तसे एकांताचे नसते. माझ्याबरोबर मी आणि माझ्या सर्व

अंतःप्रेरणा आहेत याची जाणीव माणसाला एकांतात आत्मविश्वास देत असते, असा वेगळा विचार मांडत एकांत हे नितांत सुंदर विचार पर्यटनस्थळ आहे याची जाणीव प्रा. जोशींनी या लेखात करून दिली आहे.

हटयोग, कर्मयोग, ज्ञानयोग, भक्तियोग, राजयोग या सर्व योगांमध्ये हास्ययोग श्रेष्ठ कसा आहे  हे त्यांनी हास्ययोग या लेखात सांगितले आहे. भूक, निद्रा आणि मैथुन हे सर्व प्राण्यांच्या जीवनाचे अविभाज्य घटक आहेत; पण हास्य आणि विनोदबुद्धी याचे वरदान केवळ माणसांनाच लाभले आहे. हास्य हे निसर्गाने माणसाला दिलेले औषध आहे. आज माणसे ताणतणावांनी गंभीर झाली आहेत. अशा काळात हास्य लोपले आहे आणि विनोदबुद्धी क्षीण होत आहे. या विषयीची खंत व्यक्त करीत प्रा. जोशींनी हास्ययोगाची मांडणी केली आहे.

वक्तृत्व कला या लेखात त्यांनी बोलण्याच्या सामर्थ्याविषयी लिहिले आहे. आपल्या आयुष्यातील आठवणींचे कितीतरी सोनेरी पक्षी आपल्या गजबजलेल्या आयुष्यात आनंदाच्या लहरी निर्माण करण्यासाठी उत्सुक असतात. त्यांच्यासाठी आपल्याकडेच वेळ नसतो, असं सांगत 'स्मृतींचा खेळ' कसा चालतो याविषयी त्यांनी मार्मिकपणे लिहिले आहे. मी, ॐकार स्वरूप, तो राजहंस एक हे लेख आत्मस्वर आणि आत्मसामर्थ्याची जाणीव करून देणारे आहेत. मनाची प्रसन्नताच तुमच्या जीवनात सुखसमाधानाच्या राशी निर्माण करीत असते. या मनाचे व्यवस्थापन कसे करावे, ते प्रसन्न कसे ठेवावे, निराशेला कसे पळवून लावावे याविषयीचे विवेचन वाचकांच्याही मनात नवा प्रकाश निर्माण करणारे आहे. वारी आणि जीवन, संत साहित्य आणि युवाविश्व या लेखातून वारी आणि संत साहित्याकडे पाहण्याचा एक वेगळा दृष्टिकोन वाचकांना मिळतो. तमाच्या तळाशी दिवे लागले रे हा लेख 'दिवाळी' ही संकल्पना समजून सांगणारा आहे. चोखंदळ वाचक या पुस्तकाचे स्वागत करतीलच.

▣▣▣

**अभिजीत पाटील**
दूरभाष : ०२१८४२६३६५६६

**'महाराष्ट्र साहित्य परिषदे' चा  महत्त्वाकांक्षी प्रकल्प**

## भारतीय भाषांतील स्त्रीवादी साहित्य

संपादक : **डॉ. अश्विनी धोंगडे**




**ग्रंथाची वैशिष्ट्ये**

- मराठीसहित हिंदी, इंग्रजी, तेलुगू, कन्नड, गुजराती, तामिळ, मल्याळम, उडिया, बंगाली, पंजाबी, उर्दू, आसामी या भारतीय भाषांतील स्त्रीवादी साहित्याचा मागोवा घेणारा एक महत्त्वपूर्ण ग्रंथ.
- त्या त्या भाषांतील अभ्यासक-संशोधकांचे सखोल अभ्यासपूर्ण लेख.
- दर्जेदार मांडणी, छपाई व उत्तम बांधणी.
- महत्त्वाच्या लेखकांच्या छायाचित्रांचा विशेष विभाग.
- अभ्यासकांसाठी एक महत्त्वाचा संदर्भमूल्य असलेला ग्रंथ!

किंमत : ८०० रुपये

**संपर्कः प्रमुख कार्यवाह, महाराष्ट्र साहित्य परिषद, टिळक रस्ता, पुणे ४११०३०. दूरध्वनी : ०२०-२४४७५९६३**

# स्वातंत्र्यपूर्व काळातील स्त्रीमुक्तीचा उद्‌गार: ‘हिरवळीखाली’

**गीता साने यांच्या ‘हिरवळीखाली’ या कादंबरीतील स्त्रीवादी जाणिवा प्रगट करणारा लेख**

अश्विनी दळवी


गीता जनार्दन साने (दि.३ सप्टेंबर १९०७ ते १२ सप्टेंबर१९९१) या प्रामुख्याने ‘चंबळची दस्यभूमी’ आणि ‘भारतीय स्त्रीजीवन’ या संशोधनात्मक ग्रंथांच्या लेखिका म्हणून मराठी वाचकाला माहीत आहेत. मात्र या आधी गीता साने यांनी आपल्या लक्षणीय कादंबरी लेखनाने मराठी वाचकांचे लक्ष वेधून घेतले होते. इ.स.१९३६ ते इ.स.१९४७ या कालावधीत गीताबाईंनी एकूण दहा कादंबऱ्या लिहिल्या. गीताबाई आपल्या कादंबरी लेखनात सामाजिक आणि स्त्रीप्रश्नांना प्राधान्य देतात. त्यांनी सुरुवातीच्या कादंबऱ्यांमध्ये वेगवेगळ्या स्त्री प्रश्नांना प्राधान्य दिले आहे. स्त्रीशिक्षण, कुटुंबसंस्था, विवाहसंस्था, विवाहपद्धती, रूढीपरंपरा, चालीरीती, पती-पत्नी नाते संबंध, आर्थिक स्वातंत्र्य, नैतिक मूल्य या संदर्भात परखड व उपरोधपूर्ण भाष्य केले आहे. नंतरच्या कादंबऱ्या राजकीय चर्चा करून समाज जीवनाच्या आर्थिक विश्लेषणाची चर्चा करतात. समाजाच्या घडणीची, त्याच्या परंपरेची आणि त्यातील संघर्षाची जाण गीताबाईंना आहे. कोणीही एक व्यक्ती सामाजिक शक्तीपुढे असह्य ठरते. असे असले तरी त्यातून समाज बदलाची काही एक आशा निर्माण होऊ शकते, ही गोष्ट त्यांच्या कादंबऱ्यांतून पुन्हा पुन्हा दिसते. ‘हिरवळीखाली’ ही त्यांची तिसरी कादंबरी आशयाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरते. ‘हिरवळीखाली’ ही कादंबरी सर्वांगाने स्त्रीमुक्तीचा विचार करणारी आहे. हिंदू विवाह व्यवस्थेची दांभिक वृत्ती या कादंबरीच्या माध्यमातून गीताबाई दाखवतात. त्याचबरोबरच स्त्रियांच्या कुचंबणेच्या विविध तऱ्हा या कादंबरीच्या माध्यमातून व्यक्त होतात.

‘स्त्री ही जन्मत नाही ती घडवली जाते’ याचा प्रत्यय या कादंबरीतून वाचकाला येत राहतो. या कादंबरी विषयी कुसुमावती देशपांडे म्हणतात की, ‘‘हिरवळीखाली (१९३६) ही कादंबरी पुरुषांकडून स्त्रियांना लावण्यात येणारा नैतिक मानदंड व त्यांची स्वतःची वागणूक यातील विसंगतीवर आधारलेली आहे’’ [१] पुरुषसत्ताक भारतीय समाज रचनेत स्त्री कनिष्ठ आणि पुरुष श्रेष्ठ, असा भेद केला जातो. पूर्वापार स्त्रीला रुढी परंपरेत अडकवून ठेवण्यात आले आहे. संस्कृती रक्षणाचा भार तिच्यावर लादला गेला आहे. एकीकडे देवी म्हणूनच स्त्रीला मखरात बसवली जाते, तर दुसरीकडे वेश्या म्हणून तिची हेटाळणी केली जाते, असा विरोधाभास समाजात पाहायला मिळतो. स्त्रीबाबत योनिशुचितेच्या भ्रामक समजुतींमुळे समाजात तिला अनेक बंधनांना सामोरे जावे लागते.

त्यातून समाजात स्त्रीविषयक नैतिक मानदंड निर्माण झाले आहेत. मात्र असे नैतिक मानदंड समाजात पुरुषांना नाहीत. स्त्री-पुरुष संबंधात स्त्रीच्या केवळ एका गर्भाशयामुळे निसर्ग तिला सोडत नाही मात्र पुरुष यातून सहीसलामत सुटताना दिसतो. त्यामुळे स्त्रीचे प्रश्न हे स्त्रीचेच राहतात. याउलट पुरुषांच्या प्रश्नाला त्यांना लावण्यात येणाऱ्या नीतिनियमांना सामाजिकता लाभते, यावर ही कादंबरी भाष्य करते.

'हिरवळीखाली' या कादंबरीत मधू या व्यक्तिरेखेभोवती कथानक फिरते. लहानपणापासून तिला घरातून एक मुलगी म्हणून मिळणारी विषम वागणूक, तरुण वयात तिचा पाय घसरू नये म्हणून अनेक बंधनांत ठेवणारे तिचे आई-वडील, मधूला मंगळ असल्यामुळे आणि विवाह हीच स्त्रीच्या आयुष्याची इतिश्री अशा संस्कारामुळे मधूने बिजवर बापूसाहेबांशी केलेला विवाह आणि वनितेच्या सहवासात राधाला झालेली स्वत्वाची जाणीव, यातून कथानक पुढे जाते.

वनिता ही स्वतंत्र विचारांची, तिला पटेल ते करणारी आहे. याउलट मधू ही खूप भित्री, समाज निंदेला घाबरणारी, शिकलेली असूनही स्वतःचे स्वतंत्र मते, विचार नसलेली आहे. मधूचे असे व्यक्तिमत्त्व होण्यामागचा संदर्भ देताना गीताबाई थेट आपल्या पुरुषसत्ताक समाज रचनेकडे लक्ष वेधून घेतात. मधूच्या भावाला जे स्वातंत्र्य घरातून मिळे ते स्वातंत्र्य मधूला केवळ मुलगी असल्याकारणाने कधी मिळाले नाही. दोघांना वाढवताना होणारे भेदभाव कादंबरी उघड करत नेते. मधूच्या आई-वडिलांना मुलगी नको होती असं नाही तर मुलगा हा वंशाचा दिवा, म्हातारपणाची काठी, मुलगी काय परक्याचे धन या संस्कारामुळे ते मधूला सातत्यपूर्ण दुय्यम पातळीवर वागवत. मधूच्या भावाला शिकलेली बहीण म्हणून मधूची लाज वाटते. लहानपणापासून आई-वडिलांचे घर तिचे नाही असे मधूवर बिंबवण्यात आले होते, त्यामुळे आपलेही लग्न लवकर व्हावे असे मधूला वाटते.




लग्नानंतर संसारात शिक्षणाचा काही फायदा नाही असा सासरच्या मंडळींकडून तिला सल्ला देण्यात येतो. याबाबत वहिनी मधूला म्हणतात की, ''माझी एकच गोष्ट ध्यानात ठेव, अशी वाग, की तिऱ्हाइताला शिकलेली सून घरात असल्याची शंका नाही येता कामा! त्यांच्याकडून वाहवा म्हणवून घे.'' (पृ.क्र.५८) मधूही पडत्या फळाची आज्ञा समजून आदर्श गृहिणी होण्याचा आटापिटा तिच्या परीने ती करते. त्यात तिला आनंद वाटत असे. मधूकडे हेवा वाटावा असे सर्व लौकिक सुख होते. सोनेनाण्याने ती मढलेली होती. हाताखाली नोकर, भरलेले घर, प्रेमळ नवरा, घरासमोर गाडी या सर्व गोष्टी तिच्याकडे होत्या तिचा स्वतःचा जो एक पैस असतो त्याचा मात्र अभाव होता.

एका घटनेने मधूचे पूर्ण आयुष्य बदलून जाते. दिराबरोबर एक रात्र बाहेर घालवण्याच्या संशयावरून बापूसाहेब तिच्याशी अबोला धरतात. मात्र

बापूसाहेबांना स्वतःला मात्र अनैतिक संबंध ठेवण्यास हरकत नव्हती. बापूसाहेबांच्या बुद्धीची भूक मधू भागवू शकत नाही हे मधूला समजल्यावर मधू थेट सेवासदनाचा रस्ता धरते. मधू खऱ्या अर्थाने अनाथ झाली होती. माहेरी तिला आधार नव्हता आणि सासरी समाजरीतीप्रमाणे वागूनही ती हरली होती. ज्या पुरुष व्यवस्थेने तिला स्वतःची बुद्धी गहाण ठेवायला लावली होती त्याने बुद्धिवादी नाही म्हणून नाकारले होते. या कादंबरीविषयी विद्या देवधर म्हणतात, ''स्त्रीमुक्तीचा सर्वांगाने विचार करणारी कादंबरी म्हणून 'हिरवळीखाली' या कादंबरीचे नाव घ्यावे लागेल. गीताबाईंच्या वैचारिक प्रतिभेची झेप पेलणारी ही एक प्रभावशाली कादंबरी आहे.''[२] देवधर यांनी 'हिरवळीखाली' या कादंबरीबद्दल केलेल्या वरील विधानाची प्रचिती कादंबरीत प्रत्यक्ष अनुभवास येते. स्त्रीच्या व्यक्तीविकासाला, स्वातंत्र्याला बंधने घालणाऱ्या पुरुषप्रधान समाज व्यवस्थेबद्दल तीव्र विरोध गीताबाई व्यक्त करतात. प्रणयापेक्षा स्त्रीचे स्वातंत्र्य व स्वतंत्र व्यक्तीविकास मोठा आहे असे गीताबाईंना वाटते. कादंबरीच्या माध्यमातून लैंगिक स्वातंत्र्याची मागणी गीताबाई करताना दिसतात. वनिताचा समलैंगिक पुरुषाशी विवाह होतो. त्यामुळे ती देविदासशी विवाहबाह्य संबंध ठेवते आणि आपला आई होण्याचा हक्क बजावते. वनितेच्या या विवाहबाह्य मातृत्वाला निराळा संदर्भ आहे. वनिता सुशिक्षित, विचारपूर्वक बंडखोरी करणारी स्त्री आहे. गर्भवती झाल्यावरती जरासुद्धा डळमळलेली दिसत नाही. याचे कारण तिची स्वतंत्र विचार करण्याची वृत्ती एवढेच नाही; तर तिची सासरकडची पार्श्वभूमी हेही एक कारण आहे. तिचा नवरा समलैंगिक आहे म्हणून वनितेच्या दुसऱ्या प्रेम प्रकरणाला त्याचे प्रोत्साहन आहे. शिवाय आपल्या घराण्याला वंश मिळेल ही एक सोय वनितेच्या सासरकडचे पाहत होते. वनितेच्या गर्भवती होण्यातले रहस्य गावाला माहिती असताना गाव तिला कोणताही त्रास देत नाही कारण ती थोरा मोठ्यांची सून आहे. श्रीमंतांचे रूढीबाह्य वर्तन समाज खपवून घेतो मात्र गरिबांना रूढी परंपरा मोडण्याचे स्वातंत्र्य नसते, हेही इथे अधोरेखित होते. या कादंबरीविषयी भालचंद्र फडके म्हणतात की, '''हिरवळीखाली' या आत्मकथेतून एकच सूर दिसतो तो स्त्री स्वातंत्र्याचा.''[३] या कादंबरीतील इतर स्त्री व्यक्तिरेखांमधूनही गीताबाईंनी तत्कालीन स्त्रियांच्या परिस्थितीचे व मनोवृत्तीचे दर्शन घडवलेले आहे. परिस्थितीच्या हातचे बाहुले झालेल्या या व्यक्तिरेखा; रूढी परंपरा, पुरुषसत्ताक यांमुळे स्त्रीचे जीवन किती कारुण्यपूर्ण झाले होते, या तत्कालीन स्थितीचे भान आणून देतात. स्त्री हे परधन मानण्याच्या समाज प्रवृत्तीवर गीताबाई ताशेरे ओढतात. स्त्रीला आर्थिक स्वातंत्र्य असावे कारण स्त्री परावलंबी असल्याने स्त्रीचे दुय्यमत्व अधिक अधोरेखित होते. तिला निर्णय प्रक्रियेत सहभागी होता येत नाही. स्त्रीला जर आर्थिक स्वातंत्र्य मिळाले, तर तिच्यावर रुढी परंपरेने होणाऱ्या अन्यायाला ती ताकदीने प्रतिकार करू शकेल, असे गीताबाईंना वाटते.

संदर्भग्रंथ

१. देशपांडे कुसुमावती, 'मराठी कादंबरीः पहिले शतक १८५०-१९५०', मराठी साहित्य संघ, मुंबई, द्वि.आ., १९७५, पृ.३००.

२. देवधर विद्या, 'स्त्रीलिखित कादंबऱ्याः प्रेरणा आणि प्रवृत्ती', प्रतिमा प्रकाशन, पुणे, १९९२, पृ.११२.


३. फडके भालचंद्र, 'मराठी लेखिका :चिंता आणि चिंतन', श्री विद्या प्रकाशन, पुणे, १९८०, पृ.१८२.

▣▣▣

**अश्विनी दळवी**
७/२ रायगड कॉलनी, गल्ली क्र. १०,
महालक्ष्मी मंदिरासमोर, कर्वेनगर, पुणे- ४११०५२
चलभाष : ७०५७९९३२२४
ईमेल : dalvi.aashwini@gmail.com

**अविनाश कोल्हे यांच्या 'चौकट वाटोळी' या पहिल्या कादंबरीवरील डॉ. किशोर सानप यांचा लेख.**

# चौकट वाटोळी : नीती-अनीतीचे गुंते आणि बदलते वास्तव




पुस्तकाचे नाव : **चौकट वाटोळी**
संपादकः **अविनाश कोल्हे**
प्रकाशकः **विश्वकर्मा पब्लिकेशन**
पृष्ठेः **२६४** मूल्य : **३५० /-**

## डॉ. किशोर सानप

अविनाश कोल्हे विद्याक्षेत्र व सामाजिक-राजकीय-साहित्य क्षेत्रातील एक प्रख्यात असे शोधक व्यक्तिमत्त्व आहे. आहे ते न लिहिता, त्यामागे दडलेल्या वास्तवाचा व आंतरिक प्रेरणांचा सूक्ष्म वेध घेऊन, नवनवीन शक्यतांची अपारंपरिक शैलीच्या माध्यमाने मांडणी करणे, हीच त्यांच्या लेखनाची बैठक आणि प्रेरणाही आहे. ते राज्यशास्त्राचे निवृत्त शिक्षक असून त्यांनी प्रदीर्घ काळ साप्ताहिक माणूसचे संपादनही केलेले आहे. विविध नियतकालिकांतून आजवर त्यांनी भरपूर लेखन केले आहे. डॉ. मनमोहनसिंग यांचे चरित्र व भारताची फाळणी ह्या दोन पुस्तकांचे भाषांतर तसेच गोपाळ गणेश आगरकर यांचे चरित्र त्यांनी लिहिले आहे. चीनमधील मुस्लीम समाजातील अलगतेची भावना या विषयाचा अभ्यासही करीत आहेत. रंगदेवतेचे आंग्लरूप : मुंबईतील अमराठी रंगभूमी हा इंग्रजी व हिंदी नाटकांच्या परीक्षणांचा संग्रह तसेच सेकंड इनिंग हा दोन दीर्घकथांचा संग्रह प्रकाशित झाला आहे. चौकट वाटोळी ही त्यांची पहिलीच कादंबरी विश्वकर्मा पब्लिकेशन्स, पुणे यांनी सन २०१८ मध्ये प्रकाशित केली आहे. दुसरी कादंबरी मॅजेस्टिकने घेतलेल्या हिंदू कादंबरी स्पर्धेतील प्रथम पुरस्कारप्राप्त 'पंगतीतलं पान' ही कादंबरी मॅजेस्टिकतर्फे २०२० मध्ये प्रकाशित होणार आहे. ललित साहित्यात कथा-कादंबरीकार म्हणून एक नवाकोरा; परंतु नावीन्याचा ध्यास घेतलेला एक सशक्त शैलीदार लेखक

अविनाश कोल्हेंच्या निमित्ताने उदयाला आलाय, असे म्हणता येईल.

**अर्पण पत्रिकेचे मनोगत–चौकटी बाहेर**

अविनाश कोल्हे कलाकृतीच्या अर्पणपत्रिकेपासूनच नावीन्याचा व कलाकृतीच्या पार्श्वभूमीचा शोध घेतात. पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमध्ये शिकताना प्रा. स. शि. भावे यांच्या सहवासात जडणघडण झाली. 'जगात खरे लेखक दोनच. एक आपल्याकडचे महर्षी व्यास व दुसरा म्हणजे इंग्लंडचा शेक्सपियर. या दोघांना कधीही त्यांच्या कोणत्याही पात्राबद्दल सहानुभूती वाटत नाही. तू इतर कोणताही लेखक घे. त्याची दोन–चार पानं वाचली की, लेखक कोणाच्या बाजूने उभा आहे, कोणाची बाजू घेतोय, हे लक्षात येते. लेखकाने जीवनाच्या जास्तीत जास्त बाजू समजून घेतल्या पाहिजेत, अनुभवाचा परिघ सतत वाढवत नेला पाहिजे, नेहमी नवनवीन वाचत, बघत राहिले पाहिजे. आपले मराठी साहित्य थिटे आहे, याचे एक कारण म्हणजे सर्व भावजीवन ब्राह्मणी व मध्यमवर्गीय आहे. ही कोंडी दलित साहित्य, लिटल मॅगझीन व ग्रामीण साहित्याने फोडली खरी; पण लवकरच त्यातही तोचतोपणा आला.' ऐन उमेदीत मराठी साहित्याचे मर्म लेखकाला कळले. भाव्यांचे हे निरीक्षण एकूणच आधुनिक मराठी ललित साहित्याचे खुजेपण लक्षात आणून देणारे आहे. आज चाळीस वर्षांनंतरही त्यात खूप बदल झाल्याचे दिसत नाही. लेखक स. शि. भाव्यांच्या तालमीत तयार झाल्यामुळे, नावीन्याचा शोध व शैलीची स्वतंत्र जडणघडण ह्या दोन गोष्टींनी कोल्हेंच्या लेखनाला नवतेचे आयाम मिळत गेले. चौकट वाटोळी ही कादंबरी भावे–संस्काराची साक्ष आहे.

**वाटोळ्या व वेटोळ्या द्वंद्वांची कौटुंबिक कथा**

चौकट वाटोळी या शीर्षकावरून ही कादंबरी चौकट मोडणारी व काहीतरी नवीन कथावस्तूची मांडणी करणारी असावी, असे कुण्याही वाचकाला वाटेल. आदि आणि अंत अशा दोन भागांत कादंबरीच्या कथानकाची मांडणी लेखकाने केली आहे. आदि–मध्य–अंत या कथेच्या तीन पारंपरिक बाजूंपैकी मध्य ही बाजूच लेखकाने चौकट वाटोळी? असे प्रश्नचिन्ह वाचकांसमोर उपस्थित करून, मध्यमवर्गीय जीवनात झपाट्याने होणाऱ्या बदलांचे बदलते संदर्भ कथाशयात मांडून, पारंपरिक नीती–अनीतीचे गुंते समाजासमोर स्पष्ट करत नेले आहेत. कथानक अत्यंत सरळ रेषेत त्रयस्थ निवेदन पद्धतीने लेखकाने हाताळले आहे. तीन मुख्य पात्रे आहेत. सुखवस्तू सहाय्यक आयुक्त सुभानराव कलाल, मध्यमवर्गीय पापभीरू कुटुंबातील नोकरदार सून वासंती जोगळेकर, पारंपरिक व तितकीच तडजोडवादी असलेली व शाळेत शिक्षिकेची नोकरी करणारी वासंतीची हुशार सासू. याशिवाय उमेश हा मेडिकल रिप्रेझेन्टेटीव्ह, शांत व आईच्या छायेत वाढलेला वासंतीचा नवरा. राणू ही उमेश–वासंतीची शाळकरी मुलगी. मध्यमवर्गीय पांढरपेशा कुटुंबातील पारंपरिक वातावरण व सासू–सुनेचे तेच ते वाद–तंटे–भानगडी–उचापती–अहंभाव–चढाओढ वगैरे सर्व काही रुटीन.

जोगळेकरांच्या कुटुंबात घडणारे संवाद–विसंवाद आयुष्याच्या अंतालाच पुरलेले असतात. पुण्यातील आप्पा बळवंत चौकातल्या टिपिकल गर्दीच्या वस्तीत राहणारं व भाड्याच्या घरावर हक्क सांगणारं हे सर्वसामान्य मध्यमवर्गीय कुटुंब. आसपास ब्राह्मणी संस्कृतीचे वलय व त्यातच चढाओढ करून, जगायला भाग पाडणारी कुटुंबातील म्हातारी माणसं आणि त्यांच्या आज्ञा पाळण्याचं नाटक वठवून, बदलत्या जगातील सुखांची प्रलोभनं शोधणारी मानवी मनं; जीवनाचा सर्वसामान्य परिघ कथाशयातून साकारत जातो. नीती–अनीती व पाप–पुण्याच्या परिप्रेक्ष्यात; धर्म तसेच जातींचे कोष भेदून साचलेल्या जीवनाला गती देणाऱ्या नव्या तरुण पिढीची होणारी तगमग व मानसिकदृष्ट्या संस्कारातून मनात उचंबळून येणाऱ्या भीती व पाप–पुण्याच्या लाटांवर आरूढ असलेल्या कुटुंबातील, नव्या पिढीच्या भावावस्था व द्वंद्वावस्थांना जाणीवपूर्वक घडवलेल्या कादंबरीच्या चौकटीत, दैनंदिन जीवनात वाटोळ्या व वेटोळ्या घालणाऱ्या द्वंद्वांची ही खरेतर मनोरंजक आणि उद्‌बोधक दीर्घकथा आहे.

खरेतर आपल्या भवतालात जगणारी कलाल–वासंती–उमेश–वासंतीची सासू–रघू–ज्युली–पाटील ही व अशी अनेक माणसे आहेत. कथानकाचा आवाका हा कादंबरीपेक्षा दीर्घकथेलाच पोषक आहे. वासंती–कलाल या दोघांतील प्रेम आणि वासनांचे द्वंद्व व तृप्तीचा

आनंद याच चौकटीत ही कथा पूर्वार्धात घटनांची पुनरावृत्ती करीतच पुढे पुढे सरकत जाते. आदि या भागात तर गंभीर वाचकांवर उलट परिणाम होईल असेच कथानक आकारत राहते. अंत हा उत्तरार्ध मात्र या कथेचा आत्मा आहे. आदिमध्ये जे आहे ते मुळात तसे नाहीच. वासना आणि प्रेम ह्या जीवनाच्या दोन प्रभावी बाजू आहेत. खरे कथासूत्र व मानवी मनातले द्वंद्व यातून हळूहळू उलगडत जाऊन, नकळतच प्रेम–वासना या द्वंद्वातले बदलते वास्तव आणि बदलत्या मध्यमवर्गीय तडजोडीच्या परिसीमांचाच उलगडा होत जातो. धर्म–जाती–परंपरा–संस्कृती–कौटुंबिक चौकटीच्या भिंती हळूहळू ढासळत असल्याचे जीवन–वास्तव झपाट्याने आकाराला येत असल्याची चाहूल लेखकाने दिली आहे. सुखासाठी तडजोडवादी बनलेला पांढरपेशा–मध्यमवर्गीय समाज जागतिकीकरण व सुखलोलुप जीवनाला बळी पडतो आहे. जुन्या पिढीच्याही धारणा तडजोड व अनीतीकडे डोळेझाक करीत आहेत. समकालातील जीवन वास्तवाच्या कौटुंबिक द्वंद्वात्मक बाजू लेखकाने या कथेतून प्रभावीपणे उलगडत नेल्या आहेत. वाचनीयता व शैली व भाषेचा खुबीने शैलीनिष्ठ वापर करण्याची कसोटीही लेखकाला साधली आहे.

**चौकट वाटोळी : नीती–अनीतीचे गुंते आणि बदलते वास्तव**

सासूच्या कटकटींना कंटाळून वासंती घर सोडून जाते. जीवनात केवळ अंधार असून जीवन संपविण्याच्या विचारात मग्न असताना, माहेरी जाण्यासाठी बस स्टँडवर एका कोपऱ्यात रडत बसते. अचानक कलाल तिला धीर देतात व परत घरी जाण्यासाठी प्रवृत्त करतात. पहिल्याच भेटीत दोघांनाही एकमेकांचा आधार जाणवतो. विश्वासही निर्माण होतो. दोघांचेही भावविश्व बदलते. दोघांच्याही स्वखुशीनेच लैंगिक सुखात दोघेही रत होतात. अधीरता व आकर्षण वाढत जाते. कलालांना आपल्या पत्नीकडून व वासंतीला उमेशकडून जे लैंगिक सुख मिळालेलं नसतं ते आपल्याला मिळत असल्याची खात्री वाटू लागताच प्रेम–वासना–आकर्षण या गुंत्यात त्यांचं भावविश्व गुंतत जाते. दोघांनाही व्यभिचार हा सुखाचा–अतृप्त–अतूट प्रेमाचा साक्षात्कार वाटू लागतो. महाराष्ट्रीय मध्यमवर्गीय कौटुंबिक संस्था बदलत्या वास्तवात व उपभोगप्रधान जागतिकीकरणाच्या काळात कमालीची तडजोडवादी झाल्याचे वास्तव उजागर होत जाते. काही नैतिक–अनैतिक गुंते कसे बदलत आहेत? याचाही उलगडा लेखकाने या कृतीतून केलेला आहे.

कलाल दलित व वासंती ब्राह्मण तरी दोघांच्या प्रेम व वासनेच्या मिलनात जात–धर्माचा अडसर येत नाही. सासूलाही जात–धर्म महत्त्वाचा घटक वाटत नाही. रूपसौंदर्य व देहाकर्षण हा स्त्री–पुरुष आंतरिक संबंधाचा व कलहाचाही धागा असतो. तो जितका मजबूत तितकी परंपरा–संस्कृती–जात–बंधनं–रूढी यातून उगम पावलेली व कौटुंबिक चौकट सांभाळणारी व्यवस्थाच समकालीन बदलत्या आर्थिक व उपभोगप्रधान चौकटीत मोडून पडल्याचे वास्तव साधारणतः १९७५ ते २०१५ च्या काळात सार्वत्रिक प्रत्ययाला आले आहे. यातून मध्यमवर्गीय पापभीरू तसेच सर्वहारा वंचित समाजही हळूहळू बंधमुक्त तडजोडवादी होत असल्याचे वास्तव लेखकाने उजागर केले आहे. नवी मध्यमवर्गीय व वंचितांची स्वीकृतीची संस्कृती उदयाला येत असल्याच्या शक्यताही लेखकाने सूचित केल्या आहेत.

कुटुंबव्यवस्थेत सासू–सूनेचे नाते विळा–भोपळ्याचे राहिले आहे. बदलत्या परिस्थितीत त्यात बदलही होत गेले. सास भी कभी बहू थी आणि बहू भी कभी सास होगी, हा अनुबंध भारतीय कौटुंबिक संस्कृतीत स्त्रीशोषणाचा मजबूत पाया आहे. तो आता ढासळू लागल्याचे वास्तवही समोर येत आहे. वासंतीची सासू आणि वासंती या अनुबंधाचे बदलते वास्तव आहे. वासंती–कलाल सबंधाचा संपूर्ण गुंता नीट उलगडल्यावरही सासू पापपुण्याच्या कल्पनांनी वासंतीला छळते, मारहाण करते, अपमानीत करते. जगणेच नकोसे करते, तर अंतर्मनात कलाल–वासंती भेटीत ती सुनेशी लग्न कर किंवा कायमचा पिच्छा सोड, हा धूर्त–चालाखीचा डाव टाकून दोघांनाही विभक्त करण्यात यशस्वी होते. कलालने लावून दिलेली बड्या पगाराची नोकरी, कंपनीच्या हॉलिडे होम्सचे बुकिंग सुनेला करायला लावून सिमला सहलीचे सहकुटुंब पूर्ण होणारे स्वप्न, कलालांच्या कृपेने निगडी प्राधिकरणात घेतलेला फ्लॅट ह्या आजच्या मध्यमवर्गीय गरजांची पूर्ती, वासनापूर्तीच्या बदल्यात झाल्याचे वास्तव वरवर

आगपाखड करून, आतल्याआत पचवतच वासंतीची सासू सुनेच्या व्यभिचाराचे प्रकरण शांतपणे निस्तरते.

एकुलता एक मुलगा उमेश व दोघींच्या नोकरीच्या मिळकतीत केवळ कुटुंब चालवता येते. स्वतःची जागा, सहल, भरपूर पगाराची संधी दवडू न देता, कौटुंबिक विघटनाला जबाबदार ठरू शकेल, अशा व्यभिचाराला ती मनातून हद्दपार न करताही स्वीकारते. मुलालाही सुगावा लागू देत नाही. अनीतीच्या मोबदल्यात भविष्यातली सुखस्वप्नं सासूला मौलिक वाटतात. आपल्या स्वप्नांची पूर्ती सुनेच्या वागण्यातून होत असल्याने तिच्यावर धाक व वचक निर्माण करणेही शक्य होईल व सुखांचाही उपभोग आयताच घेता येईल, ही सासूची मानसिकता बदलत्या नीती-अनीती कल्पनांची ग्वाही देते. मध्यमवर्गीय मानसिकता स्वार्थपरायण व आपमतलबी असून, कमालीची तडजोडवादी असल्याचेही सूचित होते. सुनेलाही सासूची अभिलाषा जाणवताच ती सासूवर हावी होते. सासूही मुकाट्याने भविष्यातील सुखासाठी सुनेचा छद्मी मारा सहन करते. नीतीचं भांडण आणि अनीतीची स्वीकार्यता अशा घनघोर द्वंद्वात आजची मध्यमवर्गीय व्यवस्था अडकून पडली आहे. मुखवटे कायम ठेवून मुखवट्याखाली पशुत्व जोपासण्याची नवी मानसिकताही बदलत्या मूल्यविहीन जगात अस्तित्वात येत आहे.

कलाल आणि वासंतीचं नातं इतकं एकजीव घनिष्ट असतं, की दोघांनाही प्रेम व वासनेतील सुखाचा दुरावा असह्य होतो. कलाल वरची कमाई बायकांवर खर्च करून सुखाचा व प्रेमाचा शोध घेतात. अनेक बायकांना त्यांनी आपल्या आकर्षक रूपाने व बेडरूममधील पौरुषत्वाने जिंकलेले असते. नोकरी भटकंतीची म्हणून बायकोपासून सततचा दुरावा अनुभवण्यापेक्षा त्यांनी व्यभिचाराचा मार्ग स्वीकारला. बायकोपासून प्रेम व सुख मिळाले नाही ते इतर स्त्रियांना अनुभवत, शेवटी वासंतीच्या सहवासात त्यांना हवी तशी स्त्री आणि हवी तशी मादीही मिळालेली असते. वासनेची जागा प्रेमाने घेतलेली असते, तर वासंती मात्र प्रेमापेक्षा हवं तसं वासनेतलं सुख कलालांकडून मिळाल्यानं तृप्त असते. ह्या स्त्री-पुरुष लैंगिक संबंधांची चौकट क्षणभंगूर व अल्पकाळातच नीती व कुटुंबातील मुलाबाळांच्या नात्यांच्या असुरक्षिततेमुळे घरी कळल्यावर घराची राखरांगोळी करीत असते. सासूला सुगावा लागणे व वासंतीवर राणू, उमेशचे दडपण येणे अस्वाभाविक नाही. अशा प्रकरणात स्त्री ही एकटी भरडली जाते आणि अखेरीस ताण असह्य झाला, की नीतीचे इतके दडपण वाढते, की त्यांना आत्महत्या करून जीवनाचाच नाश करण्यास भाग पाडले जाते. खरेतर नीती सुसंस्कृत तर अनीती असभ्य व विनाशाचे द्योतक मानली जाते. विशेषतः हा नीती-अनीतीचा ताण स्त्रीलाच सहन करावा लागतो. तो वासंतीलाही सहन करावा लागला. वासंतीची सासू ज्या चतुराईने, सराईतपणे कलाल-वासंती व्यभिचार प्रकरणाचा छडा लावते, हे तिचे वागणे उचित की अनुचित? नीतीचे की अनीतीचे? या द्वंद्वाचा बंदोबस्त शिताफीने करणारे आहे. तिने भविष्यात वाढून ठेवलेल्या सुखाच्या तुलनेत अनीतीवर पडदा टाकणे ही तडजोड, मनातील अतृप्तीचे समाधान तृप्तीच्या भविष्यातील साकार होऊ पाहणाऱ्या स्वप्नात, शोधणारी आहे.

मध्यमवर्गीयांच्या दोन पिढ्यांच्या जीवनातील बदल व त्यासाठी नीती-अनीतीच्या बदलत जाणाऱ्या कल्पनांची सूचक व अर्थपूर्ण मांडणी लेखकाने केलेली आहे. यादृष्टीने कुटुंबातील ज्येष्ठांच्या बदलत्या व हव्याहव्याशा जीवनशैलीचे वास्तव वासंतीच्या सासूच्या निमित्ताने लेखकाने समाजासमोर मांडले आहे. वासंतीच्या जीवनात सुख मिळालेले असताना अचानक सुखाशी फारकत होणे व कौटुंबिक दडपणाखाली तिचा कोंडमारा होणे, हीसुद्धा अनीतीने सुखाच्या दारावर दिलेली दुःखाची चाहूलच असते. हीसुद्धा कौटुंबिक घडी विस्कटू नये यासाठीचीच भ्रांत अवस्था असते. तीही अटळपणे भोगावीच लागते. वासंतीचे पात्र अनेक डायमेन्शनने लेखकाने चितारले आहे. वरवर ती अनीती व भाबडेपणाचा बळी वाटत असली तरी अंतर्मनातील दुःखांवरचा तो उतारा असतो. नीती-अनीतीच्या सापळ्यात नेहमी कलालसारखे कलाकार सुटतात, तर वासंतीसारख्या स्त्रिया समाजाच्या अनीतीच्या रिंगणातील आरोपांना नेहमीच बळी पडतात. सासूचा तडजोडवाद मात्र वासंतीला या कोलाहलातून मुक्त करणारा सुखमंत्र ठरतो. तो उचित की अनुचित? हा प्रश्न ज्याचा त्यानेच सोडवायचा असतो.

वासंती ही मध्यमवर्गीय कौटुंबिक व्यवस्थेत सतत सासूरवासाने पिचत राहणारी स्त्री. स्वातंत्र्याचा व मुक्तीचा मार्ग शोधताना तिला कलालांसारखा देखणा, समंजस, निगर्वी, हुशार, व्यवहारी, स्त्रैण वृत्तीचा मित्र अचानक जीवनाच्या एका निराश थांब्यावर भेटतो. दोघेही देहसमर्पणासाठी शृंगारोत्सुक असतात. विवाहित असूनही दोघांना शृंगार हा सुखसागर वाटतो, व्यभिचार वाटत नाही. धुंदीत रमलेले असताना अचानक सासू मिठाचा खडा सुखाच्या दुधात टाकून दोघांचेही भावविश्व हादरवते. दोघेही खडबडून जागे होतात. कलाल धीट असतात. वासना आणि प्रेम यांची जोडगोळी त्यांना अस्वस्थ करते. रघूचा सल्ला आणि नोकरीची जागा बदली करून, कलाल कायमचे वासंती प्रकरणातून मुक्त होतात. कलाल व्यभिचारी असतात; परंतु वासंतीशी संबंध आल्यावर मात्र वासंती इतर बायकांपेक्षा निराळी व हवं तसं सुख देणारी बाई असल्याचं अनुभवतात. वासनेची जागा प्रेमाने घेतल्यावर वासंतीपासून दूर जाताना कलालांना यातनाही खूप होतात. अर्थातच कलालांसारखे वरची कमाई करणारे अनेक अधिकारी लपूनछपून व्यभिचार करतात. कलाल मात्र वासंतीशी संबंध ठेवताना घाबरत नाहीत. प्रेमाचे आत्मिक बळ त्यांना वासंतीशी जोडून ठेवते. जितकी वासंती बिंग फुटल्यावर घाबरते तितके कलाल घाबरत नाही. तरीही कलालांच्या वरच्या कमाईचे व ती बायकांवर उधळण्याचे समर्थन करता येत नाही. वासना की प्रेम की विकृती? याचेही समर्थन करता येत नाही. तसेच वासंतीच्याही व्यभिचाराचे समर्थन करता येत नाही. मध्यमवर्गीय समाज व्यभिचाराचे समर्थन, प्रेम या पवित्र भावनेशी करायला लागला आहे, हा सामाजिक बदल कौटुंबिक स्वास्थ्यासाठी हानिकारकच मानावा लागतो.


कलालांना वासंतीचा शारीरिक उपभोग घेणे गैर वाटत नाही; तर ते प्रेम आहे, असे वाटते. दुसऱ्या बाजूला कलाल आपल्या कुटुंबाशी प्रतारणा करतात. मुलाबाळांचा विचार न करता आपल्या पत्नीचीही फसवणूक करतात, ही बाबही लेखक अप्रत्यक्षपणे सूचित करतो. वासंतीचे बिंग फुटताच तिला सासूने स्वीकारलेल्या तडजोडीचा व कलालांनी असे अर्ध्यातच निघून जाण्याचा तसेच राणूसारख्या मुलीवर काय परिणाम होईल? हा एक मोठा ताण असह्य होतो. सासूने तर प्रकरण दाबले. सासूला भविष्यातील सुखस्वप्नांसमोर अनीतीचा ताण सुसह्य होतो, तर वासंतीला मात्र अनीतीचा ताण असह्य होतो. शेवटी, धुंदीत जगणारं मन, धुंदी आणि धुकं विरल्यावर, अनीतीच्या असह्य चटक्यांनी पोळून निघतं. यात कलाल पूर्णपणे पुरुष असल्याने त्यांना व्यभिचाराचे लायसन्सच मिळालेले असते, तर वासंतीसाठी कलालांचे लायसन्स जीवघेणे ठरते. बरेचदा जगण्याच्या रहाटगाडग्यात नीती-अनीती, पाप-पुण्य, धर्म-जाती, रूढी-परंपरा बदलत्या काळात धूसर होऊन, लक्षणीय बदलत जातात. कधीकधी नीती अनीतीत तर अनीती नीतीत परावर्तीत होते. शेवटी माणूस महत्त्वाचा असतो. त्याचे जगणे हेच सर्वोच्च मूल्य असते. बाकी सर्व संकेत व कल्पना काळाच्या रेट्यात टिकत नाहीत. होणारे बदलही जाणवत नाहीत. जीवनाच्या गतीत खूपसं वाहून जातं. मागं उरतात ती न सुटणारी कोडी, न सुटणारे गुंते, द्वंद्वात्मकता आणि मानसिक गुंते वगैरे. जीवनाच्या गतीत आदिही उरत नाही आणि अंताचीही जाणीव होत नाही.

तात्पर्य, कथानक, पात्ररचना, वातावरणनिर्मिती, संवाद व निवेदन, परिस्थिती व घटना-प्रसंग, नीती-अनीतीचे कौटुंबिक गुंते; कथेच्या अनेक पातळ्यांवर लेखकाने भाषा व शैलीची स्वतंत्रपणे जडणघडण केल्यामुळे, चौकट वाटोळी या पहिल्याच दीर्घकथारूपी कादंबरीने कथानकाच्या रूपबंधात, अनेक नवेनवे प्रयोग केल्यामुळे मराठी कादंबरीच्या क्षेत्रात, अविनाश कोल्हे यांच्या निमित्ताने एक सशक्त कादंबरीकार समकालात पुढे आला आहे. हा कादंबरीकार मराठी कादंबरीचे साचलेपण काही प्रमाणात तरी निश्चितच दूर करू शकेल, अशा शक्यता चौकट वाटोळीतून निदर्शनास येतात...

**डॉ. किशोर सानप**
२४९/अ, दिविशा, माने वाडा, बेसा रोड, शाहू नगर,
नागपूर-४४००३४ चलभाष-९५१९३६८९७६
ईमेल : dr.kishorsanap@gmail.com

**बाळासाहेब लबडे लिखित 'पिपिलिका मुक्तिधाम' या कादंबरीची डॉ. रामेश्वर सोळुंके यांनी केलेली तौलनिक समीक्षा.**

# 'पिपिलिका मुक्तिधाम' जागतिक कादंबरी संदर्भात एक तौलनिक वैश्विक विचार




कादंबरीः **पिपीलिका मुक्तिधाम**
लेखक: **बाळासाहेब लबडे**
प्रकाशकः **ग्रंथाली प्रकाशन**
प्रथमावृत्ती : डिसेंबर २०१९
पृष्ठे : **३७६** मूल्य : **५००/–**


## डॉ. रामेश्वर सोळुंके


'पिपिलिका मुक्तिधाम' ही ग्रंथाली प्रकाशनाने प्रकाशित केलेली कादंबरी आहे. माझा पीएचडी अभ्यासाचा विषय 'जागतिक कादंबरीतील मेटाफर' असा असल्यामुळे या कादंबरीच्या वाचनाकडे वळलो. कादंबरी वेगळी आहे. तिचा परिदृश्य वेगळा आहे. तिच्या स्वरूपामध्ये गेले, तर वास्तववादी जीवन प्रतीकात्मक माध्यमातून नव्या पद्धतीने या कादंबरीमध्ये लेखक बाळासाहेब लबडे यांनी व्यक्त केले आहे. अतिशय सखोलपणे वैश्विक जीवन रेखाटन आलेले दिसून येते. नव्या जाणिवांच्या माध्यमातून मानवमुक्तीचे वास्तव रेखाटणारी ही कादंबरी आहे. लेखकाने व्यक्तिरेखांचे रेखाटन करण्यासाठी चार मुंग्यांचा वापर केलेला आहे. त्यातून तो जगाचे अतिसूक्ष्म पद्धतीने रेखाटन करतो आहे. ही कादंबरी एकसंध अशी पण अनेक, एका पात्राची नाही. बहुमुखी आहे. पैलू बहुमुखी आहेत. लिखाण तुटक–तुटक कोलाज असल्यामुळे या कादंबरीचा रूपक या अर्थाने अभ्यास केला आहे. लेखकाला जे सांगायचे आहे ते प्रत्यक्ष न सांगता प्रातिनिधिक स्वरूपामध्ये प्रतीके वापरून वाचकापुढे बहुविध प्रकारचा अर्थ प्रकट लेखक करतो आहे. जगात अशा प्रकारे व्यक्त होणारे लेखक मोजके आहेत. अमेरिकन

साहित्यात रूपकात्मक कादंबऱ्या आहेत; परंतु त्यात ट्रान्सफॉर्मेशन आहे. या कादंबरीत ट्रान्सफारमेशन नाही. त्यामुळे ही स्वतंत्र व वास्तववादी कादंबरी आहे. ती केवळ फॅन्टसी किंवा भय कादंबरी होत नाही. जगातल्या मोजक्या कलाकृतींमध्ये एक उत्कृष्ठ कलाकृती म्हणून हिचे स्थान अधोरेखित करावे लागेल. ते तिच्यातील असणाऱ्या नावीन्यपूर्णतेमुळे. प्रतिमांमुळे रूपकाच्या मोडतोडीमुळे कथानकाला अनेक अर्थ प्राप्त होतात. ही रूपके भारतातील धगधगत्या घडामोडींविषयी भाकीत करत जातात. भाष्य करत जातात. कादंबरीत कथानकासाठी ज्या मुंग्यांचा वापर करण्यात आलेला आहे त्या मुंग्या खऱ्या अर्थाने या जगात वावरणारी माणसे आहेत. त्यांचे अनुभव म्हणजे जगत राहणारे असंख्य जनसमुदाय होय. हे अनुभव सर्वस्तरीय सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, इ. दमनशाहीचे आहेत. जे आहे त्या सगळ्यांची मोडतोड करून नवीन ही कादंबरी मांडते आहे. 'ॲनिमल फार्म' ही जॉर्ज ऑरवेल याची रूपकात्मक कादंबरी आहे; परंतु ती फक्त राजकीय कादंबरी आहे. ज्याप्रकारे फ्रान्स काफ्काने 'द मेटॉमॉरफिसिस' मध्ये 'ग्रॅगॉर सॅम्सा' चे एका किड्याच्या रूपात निर्माण करून त्याचे असंख्य समुदायाशी नाते जोडले आहे; त्याची अस्तित्ववादी विचारधारा, बेकारी, असाह्यता, निराशा, मांडली आहे; जगाची व्यवहारी दृष्टी दाखवली आहे; उपेक्षित जीवनावर मोठ्या ताकदीने भाष्य केले आहे, तशीच 'पिपिलिका मुक्तिधाम' ही वैश्विक उपेक्षित समूहाचे जीवन चित्रण करणारी वैश्विक कलाकृती आहे. वास्तवता आणि संभाव्य जगण्याची भाकिते ही कादंबरी मांडत जाते. जीवनाचे उपेक्षित अंग व त्याचे सटायर भारतीय पार्श्वभूमीवर असले तरी तिच्या अनुभवाचे सामान्यीकरण हे वैश्विक अनुभवाशी नाते सांगणारे आहे. या कादंबरीत नवेनवे समकालाचे जगण्याचे स्तर आहेत. काफ्काची कादंबरी नव्या शतकाची सुरुवात आहे. पिपिलिका मुक्तिधाम ही मर्यादित न राहता ती २१व्या शतकाचा मनोधर्म तेवढ्याच संवेदनशीलतेने मांडते. ही कादंबरी एकविसाव्या शतकातील दुसऱ्या दशकाचा परामर्श घेते व पुढील वाटचालीविषयी व कटू सत्य रूपकांच्या आधारे देशाच्या जाणिवा मांडते. अधिक मागे वेदांपर्यंत जाऊन पोहचते. वाचकांच्या कक्षा रुंदावण्याचा प्रयत्न करते. यातील मुंग्या या सर्व देशबांधवांच्या भावनांना वाट करून देणाऱ्या आहेत. त्यांच्या जाणिवा व्यक्त करणाऱ्या आहेत. नुसत्या दोषांना वाट न करून देता पुढच्या वाटचालीविषयी मार्गदर्शन करताना त्या दिसतात. देशाचे भवितव्य चांगले असावे. संकुचित विशिष्टपणाविषयी त्या बोलतात. अभिव्यक्ती स्वातंत्र्याविषयी बोलतात. वर्ण व वर्ग रहित करून त्यांचे स्वातंत्र्य अबाधित राहील. त्या देशात मुक्त संचार करून एक समतावादी, लोककल्याणकारी, आदर्श समाजव्यवस्था, निर्माण करून समानतेची भावना सर्व नागरिकांमध्ये निर्माण करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करताना दिसतात, आणि ती या काळाची गरज आहे. त्यातच आपणास रवींद्रनाथ टागोर यांच्या कवितेची 'विदाऊट फियर' ची आठवण झाल्याशिवाय राहत नाही.

भारतीयांच्या आशा पुन्हा पल्लवित करताना ही कादंबरी दिसते. मुंग्या एकाकी होत्या. समाजात खोलवर रुजलेल्या विषमतेला विरोध करणाऱ्या या मुंग्या प्राणांची तमा करत नाहीत. त्या निर्भीड आहेत. कामकरी मुंगी हे पात्र एका व्यक्तीचे पात्र रेखाटलेले आहे. ती निर्भीड जगते. ती गरीब आहे; पण ती जिद्दी आहे. तिच्यात नेतृत्वगुण, चिकाटी, प्रामाणिकपणा, सचोटी, आहे आणि महत्त्वाचे म्हणजे हे सर्व गुण इतरांमध्ये निर्माण करू शकते. ती माणसे जोडणारी आहे. त्यांना आधार देणारी आहे. मायेचा हात पाठीवर फिरवणारी आहे म्हणून कामकरी मुंगी कादंबरीच्या गळ्यातील ताईत बनते. हे एक वेगळेपण आपल्याला दिसून येते. पहिल्या भागात जगण्याच्या तळाशी हे लेखकाने लिहिलेले प्रकरण आहे. या जगण्याच्या तळाशी त्या चार मुंग्याची ओळख होते. या मुंग्या उपहास, उपरोध, विडंबन, विरूपन करतात. आपली

स्वतंत्र ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. लालीमुंगी पांड्या, काळी मुंगी सख्या, तांबडी मुंगी लाल्या, व कामकरी मुंगी मी म्हणजे स्वतः निवेदिका आहे. या चार जातीच्या चार मुंग्या. जाती व्यवस्थेचे प्रतिनिधीत्व करून तिचे भंजन करतात. यात लेखकाने सामाजिक पातळीवरील जातीय विषमता वर्गीय व वैश्विक पातळीवर विषमता, आणि मानवतावाद रेखाटला आहे. लेखक हा मानवतावादाकडे जातो. तो कुण्याही जातीचा, धर्माचा द्वेष न करता मानवतावाद सांगतो. फ्राईड, मार्क्स, वेद, उपनिषदे, पुराणे, यावर ही मुंगी भाष्य करते. व्यवस्था बदलांवर भाष्य करते. ती कोणत्याही विचारधारेचे समर्थन करत नाही. ती सत्य शोधन करण्यास उत्तेजित करते. मानवी सचेतन असणाऱ्या अनेक गोष्टी आहेत. विज्ञाननिष्ठा रुजविणे हा तिचा हेतू आहे. त्या मुंग्या मानवी दिशा आणि दशाचा शोध घेताना आपणास पाहावयास मिळतात. दिलीप चित्रे यांची 'द फॉलींग ऑफ बन्यान ट्री' या कवितेमध्ये कवी बडोद्यावरून मुंबईला शिफ्ट होतो. तेव्हा त्या बनियन ट्री चे जे काही मानवाच्या संस्कृतीचे प्रतीक आहे ते तोडण्यात येते. अवतीभोवतीचे खरे भेद नष्ट होतात; पण त्या झाडाच्या मुळ्या या आमच्या आपल्या माणसांच्या शोधात असतात. ती माणसे मुंबईच्या मेट्रो पोलिटीयन मध्ये जाऊन मिळतात. येथे माणसे मिळणे अशक्य. फक्त त्या आभासी शोधाचा भाग हा आहे केविलवाणा धागा. त्याचे प्रयत्न त्याच्यामध्ये जाणवतात; पण ते सगळे प्रयत्न निरर्थक वाटतात. या ठिकाणी ही कादंबरी पाश्चिमात्यांच्या अस्तित्ववादाचा पुरस्कार करणारी आहे. मुंग्या असे सांस्कृतिक मिथकांचे अर्थ लावत राहतात. असेच प्रयत्न करत राहतात. त्यांना अभिप्रेत असणारी समाजव्यवस्था ही जोपर्यंत ह्या जगातील वर्गवादी, वर्णवादी, काल मार्क्सला अपेक्षित असणारी; त्याला अभिप्रेत असणारी वर्ग विरहित, वर्ग रहित समाजरचना; लोकशाही अंमलबजावणी करणारी, धर्मवाद, घराणेशाही, स्वार्थ, भ्रष्टाचार, नैतिक अधःपतन, लिंग पूर्वग्रहदूषित, प्रसार माध्यमातील फोलपणा, वंशवाद, इत्यादी संपुष्टात येत नाहीत किंवा ते जोपर्यंत अस्तित्वात आहेत तोपर्यंत आवाज उठवणारी आहे. कादंबरीत लेखकाने लेखनाचा अनोखा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. संवेदनशील, देशप्रेमी, राष्ट्र निर्माण करणाऱ्या युवकांना या कादंबरीत स्वत:ची छबी दिसते हे या कादंबरीचे मोठे यश आहे.

दुसऱ्या भागात लेखकाने 'तळहातावर वारूळ' या भागात वारूळ हे रूपक सूचक रूपकात्मक अर्थाने वापरले आहे. हे रूपक पिळवणूक, शोषण, वेदना, विस्कळीत व्यवस्थेचे मूळ आहे. यास लागलेली कीड या कादंबरीतील मुंग्या काढू पाहत आहेत. त्यांनी या किडीच्या मुळाशी जाण्याचा प्रयत्न केला आहे जो त्यांना मुक्ती मार्ग वाटतो. ही कीड मेली म्हणजे रामराज्य येईल. या सत्याच्या दृष्टीने त्या प्रयत्नशील आहेत. मुंगी ही स्त्रीलिंगी आहे. असाहाय्यतेमुळे ती सामाजिक विषमतेची शिकार होते. तरीही ती परिस्थितीपुढे कणखर उभी राहते व सभोवतालच्या सहकाऱ्यांना धीर देते. आपल्या चारित्र्यासाठी, धर्मासाठी ती उभी आहे. ती गरीब असूनही श्रीमंतीचा लोभ तिला नाही. प्रश्नाच्या मुळाशी जाण्याचा तिचा स्थायिभाव आहे.

लेखक धर्माविषयी आपली भूमिका मांडतो. धर्म ही जगण्याची विचारधारा आहे. त्यात अनेक चांगल्या बाबी आहेत. धार्मिक तेढ व्यक्तींना दूर करते. विविध धर्मातील लोकांची संस्कृती वेगळी असली तरी त्या प्रत्येक व्यक्तीला जोडणारा दैवी अंश प्रत्येकात असतो. हे समजून घेण्याची मानसिकता अजूनही आलेली नाही. याविषयी ही कादंबरी भाष्य करते भारतीय संस्कृतीत विविधतेत एकता आहे. त्यातून भारतीय समाजमन दिसते. सर्व धर्म समभाव हा या कादंबरीचा भाव आहे. 'हत्तीच्या कानातील जाहिरात'मध्ये प्रश्नांची मांडणी करत असताना वाचकांना विचार करण्यास प्रवृत्त करतो. आपल्या देशाची आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक उन्नती एकीमध्ये आहे. विविधतेत एकता हाच आपल्या संस्कृतीचा मूलाधार आहे. या मूलभूत उत्तराकडे

**भारतीयांच्या आशा पुन्हा पल्लवित करताना ही कादंबरी दिसते. मुंग्या एकाकी होत्या. समाजात खोलवर रुजलेल्या विषमतेला विरोध करणाऱ्या या मुंग्या प्राणांची तमा करत नाहीत. त्या निर्भीड आहेत. कामकरी मुंगी हे पात्र एका व्यक्तीचे पात्र रेखाटलेले आहे. ती निर्भीड जगते. ती गरीब आहे; पण ती जिद्दी आहे. तिच्यात नेतृत्वगुण, चिकाटी, प्रामाणिकपणा, सचोटी, आहे आणि महत्त्वाचे म्हणजे हे सर्व गुण इतरांमध्ये निर्माण करू शकते. ती माणसे जोडणारी आहे. त्यांना आधार देणारी आहे. मायेचा हात पाठीवर फिरवणारी आहे म्हणून कामकरी मुंगी कादंबरीच्या गळ्यातील ताईत बनते.**

वाटचाल करायला लावणारी लेखकाची भूमिका स्पष्टपणे जाणवत राहते.

विविध जाती, धर्म या फंडामेंटलिस्ट तयार करतात. आजच्या काळात अनेक ज्वलंत प्रश्न निर्माण झाले आहेत. ते आधी सोडविले पाहिजेत. नंतरच ते इतर गोष्टीचा विचार करू शकतात. हे वास्तवचित्र लेखकाने रेखाटले आहे. रविंद्रनाथ टागोर यांच्या नोबेल विजेत्या गीतांजली या काव्यसंग्रहात म्हणतात.

ज्या प्रकारे पाश्चात्त्य अस्तित्ववाद या संकल्पनेत व्यक्तीची निरर्थकता अल्बर्ट काम्यु त्याच्यामध्ये मांडतो. त्याप्रकारे भारतीय मानसिकतेला जातिधर्मातील निरर्थकता समजूनही तो बदलासाठी तत्पर नाही. त्याला कळते; पण वळत नाही अशा द्वंद्व मानसिकतेमध्ये तो फसला आहे. हे आपल्यास कादंबरी वाचताना जाणवत राहते.

'आमचा घंटानाद' हे प्रकरण कामकरी मुंग्याच्या दृष्टिकोनातून लेखकाने साकारलेले आहे. त्यामध्ये लेखक आजच्या दारिद्र्याचे चित्रण करतो. जनसामान्यांचे प्रतिनिधित्व करणारी ती एक महिला आहे. 'कौसाक्का' तिचे नाव आहे. ती एक साधी कामकरी मुंगी आहे. ज्ञान फक्त तोंडी न सांगता साधू संतांची वाणी तिची कर्मकहाणी बनली आहे. पावलोपावली ती भक्तिमार्ग शिकवते. कष्ट ही तिची वारी आहे. ती म्हणते 'कष्ट प्यारे माणूस नाही' या तत्त्वावर जाते. ती जरी अडाणी असली तरी तिच्या जीवनाचे शहाणपण तिच्याकडे आहे. ती म्हणते,

'माणसाने जादा विचार करू नये जे व्हायचं ते होईल' ती अबला स्त्रियांना आसरा देते आहे. तिच्या शब्दांत सांगायचे, तर 'कोणत्याही वाईट माणसाच्या नादी लागू नये. आपल्या आहे त्या अर्ध्या भाकरीत आपण समाधानी राहावं' सुगंधी नावाच्या घरातून भांडण करून आलेल्या गर्भवती महिलेला फक्त आधार दिला नाही, तर तिने आपल्या मैत्रिणीच्या दिराशी लग्नदेखील लावून दिलेले आहे. तिचा संसार मार्गी लागलेला आहे. कौशी बायकांच्या जीवनात आनंद यावा म्हणून समाजात परिचित असलेली स्त्री आहे. ती झोपडपट्टीत राहते. तिचा नवरा स्वर्गवासी झालेला आहे. तरी ती आपल्या दोन मुली व मुलगा यांचा सांभाळ करते व आपल्या मुलाला ती जिद्दीने मोठे करते. लेखक म्हणतो 'अनेक अनामिक आघातांच्या मालिका सोसून सोसून तिच्या काळजात तुकारामाची गाथा तयार झाली होती. ती तिला कोणाजवळ व्यक्त करता आली नाही.' म्हणजे काही व्यक्ती नुसती बडबड न करता आपल्या कृतीने, कर्मानेच बोलतात. इंग्रजीतील म्हणीप्रमाणे हे खरे आहे. तिचे जगणे जीवनातील मूलतत्त्वांचा शोध घेणारे, अनुभवविश्व समृद्ध करणारे आहे. व्यक्तीचे जीवन हे संघर्षमय असावे. त्यातूनच व्यक्तीची सामाजिक जडणघडण होत असते. कुसुमाग्रज कोलंबसाचे गर्वगीत या कवितेत सांगतात.

'मार्ग आमुचा रोधू शकती ना धन ना दारा
घराची वा वीतभर कारा
मानवतेचे निशाण मिरवू महासागरात
जिंकुनी खंड खंड सारा' दुर्दम्य इच्छाशक्तीने अनंत

अडचणींचा सामना करत असतानाही व्यक्तीत जो कृतज्ञताभाव उरतो तोच व्यक्तीला सक्षम बनवतो. जगण्यासाठी पात्र बनवत असतो. कौशी त्याचे ज्वलंत उदाहरण आहे. ही कादंबरी आपल्यासमोर नवा आदर्श सादर करते. ही कादंबरी स्त्रीवादाची पुरस्कर्ती आहे. स्त्रियांनी आपला वाटा  स्वतः निर्माण कराव्यात. आजची स्त्री ही फक्त परंपरेची नुसती पाईक. परंपरेचा वारसा पुढील पिढ्यांसाठी निर्माण करणारी सृजनशीलतेची प्रतीक आहे. परंपरेने तिला सृष्टी मिळत असली तरी आधुनिक शिक्षण तिला दृष्टी प्राप्त करून देते. कौशीने स्त्रीधर्माकडे आणि परंपरेकडे पाठ फिरवली नाही. भारतीय संस्कृती तिच्या रोमारोमात भिनलेली आहे. ती म्हणजे जणू चालतेबोलते विद्यापीठ आहे. जगण्याचे मर्म आहे. ती नवा वारसा निर्माण करते. जेणेकरून येणाऱ्या आणि भावी पिढ्या तिचे स्मरण करून तिचा प्रताप आठवून जगण्याचा एक छोटासा दिवा जरी असली तरी उद्याच्या मशाली तिने पेटवल्या आहेत. परंपरा जपत असताना भारतीय संस्कृतीचे जतन व संवर्धन करत असतानासुद्धा ती परंपरेच्या जोखडाखाली दबून न जाता स्वतःचा मार्ग स्वतः निर्माण करते. अमेरिकन कवी रॉबर्ट फ्रॉस्ट The road not taken या कवितेत म्हणतो त्याप्रमाणे ती आहे.

"the two road diverged in a wood
i have chosen the one
less travelled by
and that has made all the difference "

तिने निवडलेला मार्ग खूप खडतर आहे. त्या मार्गात अनंत काटे आहेत. पावलोपावली संकटे आहेत; पण तिच्याकडे धर्म नावाचे शस्त्र तेच तिला अनेक घाव सहन करण्याचे बळ देते. आतून ती स्ट्राँग आहे. तिच्याकडे भक्ती, परोपकार, सहानुभूती, प्रेम , आदर, क्षमा, इ. सद्‌गुण आहेत. त्याबरोबर ती प्रसंगी वाघीण होते. आजूबाजूच्या परिसरात तिचा दरारा आहे. पुरुषांच्या वासनेच्या नजराही तिच्यावर पडू शकत नाही. वाकड्या नजरेने पाहिले, तर नजर छाटण्याची तिची ताकद आहे. तिच्या व्यक्तिमत्त्वात नैतिकतेचे अधिष्ठान आहे. ती आधुनिक काळातील सीता आहे. लेखकाने साकारलेली कौसाक्का हे नुसते पात्र न राहता आजूबाजूच्या अशा स्त्रिया स्वत:चे अस्तित्व सिद्ध करताना आपणास पाहावयास मिळतात. सिंधुताई सपकाळ हे एक आपणास उदाहरण सांगता येईल. देसले पुढारी यात आहे. जनतेची दिशाभूल करण्यात तो पटाईत असतो. तो आपल्या भावनिक भाषणांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध करून त्यांची मने जिंकून घेऊन स्वत:ला जशा प्रकारचे राजकारण करायचे आहे तशा प्रकारचे राजकारण करत असतो. 'वार्ट (विजयन)' या कादंबरीमध्ये  नायक स्वत:च्या असलेल्या अहंकारामुळे एकलकोंडा बनतो. त्याला म्हणावे तसे नातेसंबंध नसतात. त्याची पत्नी, मुलगा सर्व त्याला सोडून जातात. सर्वांना त्याचे नैतिक अध:पतन आणि होणारा ऱ्हास दिसत असतो. नानी नावाच्या मुख्य मजुराच्या मेव्हणीवर त्याची वाईट नजर जाते. तीही त्यास शरण जाण्यास विवश होते, आणि नायक तिच्या मृत्यूनंतरही तिचा बलात्कार पुन्हा पुन्हा करतो. एवढा तो नैतिकतेची पातळी सोडून खालच्या पातळीवर जातो आणि अस्तित्वात असणाऱ्या व्यवस्थेलाच आव्हान करतो. त्याच्या चेहऱ्यावर हनुवटीवर वाढणारा वार्ट त्याच्यावर स्वामित्व गाजवतो, लेखक म्हणतो.

बाळासाहेब लबडे यांच्या कादंबरीतही नैतिक-दृष्ट्या अध:पतित झालेले लोक राजकारणात देसले या पुढाऱ्याच्या रूपाने दिसतात. 'पावसाच्या दंगलीत आम्ही' या प्रकरणातील पेड मीडियावर लेखक प्रकाश टाकतो. आज विविध प्रसारमाध्यमे विकली गेल्यामुळे समाजही आपला विवेक हरवून बसला आहे. हे या प्रकरणात लेखकाच्या लेखणीतून प्रकर्षाने जाणवते. विजयन यांनीही आपल्या वार्टमध्ये प्रामुख्याने भारतीय राजकारणावर प्रकाश टाकला आहे. आणीबाणीमध्ये नागरिकांच्या हक्कांची पायमल्ली झाली होती आणि ही राजकारणाची कीड न संपणारी आहे, हे लेखक विजयन रूपकाच्या साह्याने मांडतात.

पाश्चात्त्य लेखक फ्रांझ काफ्का त्याच्या 'द मेटामॉरफॉसिस' कादंबरीमध्ये एका सेल्समनचे रूपांतर किड्यात होताना दाखवतो. लेखक विसाव्या शतकातील विदारक परिस्थितीचे वर्णन करतो. झालेली दोन महायुद्धे, त्यानंतरचे लोकांचे होणारे शहरीकरण, त्यामधून उद्भवणारे एकाकीपण, सामाजिक अंतर ठेवून जगण्याची व्यक्तींची इच्छा, आधुनिक व्यक्तींचे विदारक भाकीत, प्रतिमा प्रत्येकाच्या रूपाने फ्रांझ काफ्का त्याच्या या कथेमध्ये लिखाणामध्ये मांडतो. त्याप्रमाणे लेखक बाळासाहेब लबडे यांनी एकविसाव्या शतकातील दुसऱ्या दशकाचे सामाजिक स्थिती आधारे विदारक चित्र रेखाटलेले आहे. समाजातील ज्वलंत प्रश्नांचे सावट लेखक आपल्या लेखणीच्या आधारे वाचकांसमोर मांडतो. आपल्या शिक्षण क्षेत्रातील कमकुवतपणा, सर्वत्र पसरलेला भ्रष्टाचार, राजकारणातील स्वार्थीपणा, विविध क्षेत्रांतील घराणेशाही, झोपडपट्टीतील अठराविश्व दारिद्र्य, आहे रे आणि नाही रे यातील संघर्ष, आरक्षणाचा प्रश्‍न, इत्यादी गोष्टी आपल्या देशामध्ये आहेत आणि त्या देशाला खात चालल्या आहेत हे जर असेच चालत राहिले, तर वाईट परिस्थितीला सामोरे जावे लागेल. आपल्या भारतातील विकास देशाच्या बाह्यरूपात आनंद देत असला तरी व्यक्तीच्या अंतर्मनात तो समाजभान देऊ शकणार नाही. यासाठी सामान्य व्यक्तींनी सतर्क राहणे आवश्यक आहे. ओ. व्ही. विजयन भारतीय कादंबरीकार यांच्या 'द वार्ट' कादंबरीत एका बड्या जमीनदाराला त्याच्या चेहऱ्यावर वाढणारा वार्ट नेस्तनाबूत करतो. हा वार्ट म्हणजे व्यवस्थेला लागलेली कीड आहे. जी व्यवस्थेमधून फक्त स्वार्थाला जन्म देते, आणि लाखोंना गिळंकृत करून टाकते. पिपिलिकामध्ये भ्रष्ट व्यवस्थेवर प्रकाश टाकला आहे. येथील राजकारण, समाजकारण, शिक्षण, प्रशासन इत्यादी व्यवस्था या किडलेल्या, विदीर्ण झालेल्या व्यवस्थेवर कोणाचाही अंकुश नाही. सत्ता भ्रष्ट करते, आणि निरंकुश सत्ता अति भ्रष्ट करते. याचा प्रत्यय या कादंबरीतून यांच्या व्यक्तिरेखेतून येतो.

निकोलाई गोगोल यांच्या 'द नोज' या कादंबरीमध्ये 'कोवलेव' या प्रमुख पात्राचे नाक गायब होताना दाखवले आहे. हे नाक त्याच्यापासून वेगळे होऊन स्वतःचे अस्तित्व दाखवते. या वेगळ्या होणाऱ्या नाकाच्या रूपकाचा सर्व अर्थाने अभ्यास केला असता असे दिसून येते, की एकोणिसाव्या शतकातील रशियात सत्ता, राजेशाही, लोकांचे नैतिक अधःपतन, समाजात असणाऱ्या अवडंबराचा, खोटी प्रतिष्ठा, इत्यादी गोष्टी दाखविण्याचा प्रयत्न हा वेगळ्या झालेल्या नाकापासून स्वतंत्र रूपात लेखक दाखवितो आहे. तो आपल्या परंपरा विसरतो. त्याप्रमाणे पिपिलिका मुक्तिधाम या कादंबरीतही समाजातील विडंबन, राजकारणी लोकांचा स्वार्थ, प्रसारमाध्यमांचा ढोंगीपणा, धर्मांची पोकळी, गरीब श्रीमंत यातील दरी, प्रकर्षाने जाणवते. पिपिलिकामध्ये व्यक्तीच्या प्रतिष्ठेचा प्रश्न आहे. त्याचे प्रतीक आहे मुंगी. मुंगी ही अशाच अनेक वळणाऱ्या लोकांच्या जगण्याचे, त्यांच्या वृत्तीचे प्रतीक आहे. लेखकाने मुंगी हे रूपकात्मक पद्धतीने वापरलेले आहे कारण लोक मुंगीसारखे जगतात आणि मरतात. जगणे आणि मरणे हा नियतीचा भाग असला तरी त्याला परिस्थिती जबाबदार असते. स्वतःला विकून, स्वतःच्या प्रामाणिकतेशी प्रतारणा करून किड्या मुंग्यांप्रमाणे जगणारे सामान्य आपण सगळीकडे पाहतो आहोत. या मुंग्या मानवी अस्तित्वाच्या मुळाशी आपले बस्तान बांधून बसल्यात. त्या जणू जगण्यासाठी अत्यावश्यक असणारी स्वप्ने, उत्साह आणि आशा हरवून बसल्या आहेत. अशा अनंत मुंग्यांमध्ये एक एखादी दुसरी मुंगी कौशीसारखी आहे. जी लेखकाने मशाल होताना दाखवली आहे. तिला जाणीव असते. तिची संघर्षमय कथा लेखकाने कामकरी मुंगीच्या रूपाने दाखवली आहे. कौशी हे फक्त पात्र नसून तिचा कॅन्सरने मृत्यू होतो. ऊर्जेच्या संकल्पनेचा बोध होईल अशी ती आहे. ती मेणबत्ती होऊन प्रकाशमान होणारी आहे.

आशावादी आहे. कौशी अक्का स्वत:च्या जगण्याचा आलेख तयार करते. गोगेल लेखक आपल्या लिखाणातून परिस्थितीची जाणीव करून देतात तसेच लेखन बाळासाहेब लबडे यांचे आहे. दोघेही भूत आणि वर्तमान, भविष्य दाखवण्याचा प्रयत्न करतात. त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न आंतरीक आहे. सत्य असत्याच्या संकल्पनेचा बोध होईल, त्याची मेणबत्ती होऊन हे जग प्रकाशमय आशामय बनवतील. कौशी आक्का स्वतःच्या जगण्याचा उलगडा आपल्या संघर्षमय आयुष्यात करून देते. गोगोल आणि लबडे हे दोन्ही लेखक आपल्या लेखनातून सद्य परिस्थितीची जाणीव करून देतात आणि वर्तमानातून भविष्याचा मंगलमय मार्ग दाखविण्याचा प्रयत्न करतात. त्यांचे हे यश हे सकारात्मकतेचा शोध घेणारे आहे. अमेरिकन साहित्यकार फिलीप रोथ मानवी अचेतनावर आधारित 'द बिस्ट' (१९७२) लिहिलेली आहे. सिगमंड फ्राईड म्हणतो त्याप्रमाणे अचेतन मन माणसांच्या भावनिक जडणघडणीला आकार देत असते. ते समुद्राच्या खोलीसारखे अथांग असते. त्यात लैंगिक भावना या प्रबळ असतात, आणि त्याचा प्रभाव जाणतेपणी किंवा अजाणतेपणे व्यक्तीच्या सचेतन मनावर होत असतो. अशाच अचेतनपणाचा शोध घेण्याचा प्रयत्न करणारी लघुकादंबरी फिलिप रोथ यांनी 'द बिस्ट' या कादंबरीत डेव्हीड केपिश या इंग्रजीचा प्राध्यापक असणाऱ्या नायकाच्या रूपाने व त्याचे एकशे पंच्चावण्ण पाऊंड बिस्टमध्ये रूपांतर होताना दाखविले आहे. रूपांतर फक्त भौतिक पातळीवर असून एका आधुनिक माणसाच्या अचेतन मनाचा शोध घेणारे आहे. बाळासाहेब लबडे यांच्या कादंबरीमध्ये 'आमचा घंटानाद' या चॅप्टरमध्ये कौशीची लेक देसले नावाच्या या गावच्या पुढाऱ्याबरोबर लग्न न करता त्याच्या सोबत राहते. तिच्या लैंगिक भावना दाबल्या जातात. देसलेच्या रूपाने त्यास ती वाट करून देते. तिच्या आईच्या परिस्थितीमुळे ती योग्य वर शोधू शकत नाही, असे बहिर्गत चित्र आपल्या कादंबरीत प्रकर्षाने दाखविले. चारही लघु कादंबरीकारांनी लहान-लहान पैलू आपल्या कादंबरीतून दाखविले आहेत. The meta morphosis, The nose, The beast, The wart, त्याच्यापेक्षा मोठे पैलू लबडे यांनी 'पिपिलिका मुक्तिधाम' आपल्या कादंबरीत दाखविले आहेत, आणि या लेखकांनी दाखविलेले पैलू लबडे यांनी त्यांच्या एकाच कादंबरीत दाखविले आहेत. उदा o. v. vijayan यांनी 'द वार्ट' राजकारणामुळे लागलेली कीड व्यवस्थेत कशाप्रकारे अक्राळ विक्राळ रूप धारण करते, आणि व्यवस्थेलाच भस्म करू पाहते हे त्यांच्या लघुकादंबरीत सांगितले आहे. तेच लबडे यांच्या पिपिलिकामध्ये राजकारणातील भ्रष्टाचार, वाढणारी बेकारी, स्वार्थ, घराणेशाही, दांभिक नेते, पोलिस यंत्रणा, न्याय व्यवस्था जी गरिबांना न्याय देताना विलंब करते आहे. उदा. कौशीला अनेक वेळा पोलिस स्टेशनला जावे लागते. न्यायालयाचा पाठपुरावा आपल्या लेकीला देसले पुढाऱ्यापासून सोडविण्यासाठी करावा लागतो. देवावरचा विश्वासदेखील कौशीच्या रूपाने पाहावयास मिळतो. तसाच विश्वास काफ्काच्या the metemorphasis मध्ये Gregar samsa च्या आईच्या रूपाने पाहावयास मिळतो. तीदेखील आपल्या मुलाच्या झालेल्या किडयाच्या रूपांतराबद्दल ईश्वराकडे साकडे घालते. samsa हा परिस्थितीमुळे हतबल झालेला दाखविला आहे. हे नुसते पात्र न राहता सामान्य माणूस जशा प्रकारे या जगण्याचे अवलोकन करतो, जाणून घेण्याचा प्रयत्न करतो, तोच प्रयत्न लबडे यांनीही त्यांच्या पिपिलिकामध्ये दाखविला आहे. लेखक परिस्थितीचे अवलोकन करतो आहे. यावरून मार्ग काढण्यासाठी वाचकांना बौद्धिक विचार, विफलता, दांभिकता, चंगळवाद अशा प्रकारे परामर्श ही कादंबरी करून देते. काफ्काही the meta morphesis त्याच्या मध्ये भविष्याचा वेध घेणारे घेताना व्यक्ती ही आपल्या अस्तित्वासाठी मुळापासून संघर्ष करते आहे, आणि एके दिवशी त्याच्यापुढे पात्र संघर्ष करताना हरते. वेळ आणि अवकाश दोन्ही घटक मांडण्याची त्याच्यात

**लेखक धर्माविषयी आपली भूमिका मांडतो. धर्म ही जगण्याची विचारधारा आहे. त्यात अनेक चांगल्या बाबी आहेत. धार्मिक तेढ व्यक्तींना दूर करते. विविध धर्मातील लोकांची संस्कृती वेगळी असली तरी त्या प्रत्येक व्यक्तीला जोडणारा दैवी अंश प्रत्येकात असतो. हे समजून घेण्याची मानसिकता अजूनही आलेली नाही. या विषयी ही कादंबरी भाष्य करते भारतीय संस्कृतीत विविधतेत एकता आहे. त्यातून भारतीय समाजमन दिसते. सर्व धर्म समभाव हा या कादंबरीचा भाव आहे.**

शक्यता आहे असे हे दोन्ही लेखक आहेत. व्यक्तीमध्ये लढण्याची तयारी असली पाहिजे हे पिपिलिका दाखवते आहे. चारही कादंबऱ्यांचा पात्रांच्या दृष्टिकोनाने विचार करत असताना चारही कादंबऱ्यांत कथानक आहे का? मुक्तिधाममध्ये आमचा घंटानाद वगळता इतर कोणतेही कथानक नाही. या पाठीमागचा दृष्टिकोन लेखकाला आपली वाटचाल करण्यासाठी कथानक हे मर्यादित वाटते आहे. सद्य:स्थितीचे ज्वलंत चित्रण केलेले आहे, कथानक दाखवलेले नाही. या कादंबरीमध्ये जुनी परिस्थिती जशी आलेली आहे तशीच नवीन परिस्थितीसुद्धा आलेली आहे. लबडे हे सुद्धा हाच मार्ग अवलंबताना आपल्याला दिसतात. आजच्या हतबल युवकांची मानसिकता आपल्याला कादंबरीतून जाणवते. त्याचप्रमाणे निवेदन समकालीन, मोठे व प्रभावी भाष्य पिपिलिका मुक्तिधाममध्ये लबडे यांनी केले आहे. पिपिलिका मुक्तिधाम ही भारतीय कादंबरीत एक मोठे पाऊल आहे हे आपणास जाणवत राहते.

या पिपिलिकामध्ये काळाबद्दल भाष्य केले आहे. फ्रांझ काफ्कासुद्धा असेच भाष्य करतो. भारतीय पातळीवर प्रसार माध्यमांचा बोलबाला, राजकारणाची उच्च श्रृंखला, धार्मिकता, पोकळ मोठेपणा, मोठे वागणाऱ्या लोकांचे शोषण, छोट्या लोकांची वेदना, लबडे यांनी रेखाटली आहे. या आधारे ही कादंबरी आकार घेते. चारही कादंबऱ्यांत जो विषय येतो तो हा येतो त्याच रांगेत 'पिपिलिका मुक्तिधाम' ही कादंबरी येते आणि ती वैश्विक ठरते. आपल्याला ती लोकल रिॲलिटी जरी वाटत असली तरी ती वैश्विक पातळीवरची अनुभूती वाचकांना देते. जेव्हा आपण या चारही कादंबऱ्यांच्या उत्कंठेबाबत विचार करायला लागतो, या चारही कादंबऱ्या वाचकांची उत्कंठा वाढवितात. त्याप्रमाणे पिपिलिका ही वाचकांची उत्कंठा वाढविते. या चारही कादंबऱ्या नवीन व्यवस्थेची मांडणी करतात. माणसाच्या माणुसकीवर, शुद्धतेवर, समकालीन पारदर्शकतेवर, भाष्य करतात. प्रत्येक नागरिकाची मूलभूत कर्तव्ये आहेत. लेखक निधर्मी भूमिका घेताना दिसतात. तशी पिपिलिकाही काही घेताना दिसते का? जात, धर्म, पंथ या पलीकडे जाऊन ती विचार करते. नुसता विचार नाही तर शिस्तबद्ध चिंतन मांडते. विचार करायला प्रवृत्त करते. पिपिलिका ही नक्कीच वाचकांना प्रेरणा देणारी कादंबरी आहे. जेव्हा आपण सत्य या पैलूचा विचार करतो तेव्हा सत्य चित्रं दाखवण्याचा चारही कादंबऱ्या प्रयत्न करतात. ज्या लेखकाच्या जीवनकार्यात ज्या प्रकारे समाजव्यवस्था होती त्या प्रकारे चित्रण केले आहे. तेन म्हणतो त्याप्रमाणे वंश, काळ, परिस्थिती, याचा परिणाम हा लेखकावर होत असतो. त्याला 'पिपिलिका मुक्तिधाम'ही अपवाद नाही.

जागतिक पटलावर, काफ्का, गोगल, फिलिप रोथ, विजयन हे नव्या व्यवस्थेची मांडणी करताना दिसतात. त्यातही लबडे यांनी नव्या व्यवस्थेची मांडणी करून नव्या धाटणीची शैली विकसित करून नव्या दिशेने वाटचाल केलेली दिसते. ही कादंबरी वाचकाला विचार करायला लावणारी आहे. ती वर्तमानाकडून भविष्याकडे जाते. ती आजची गोष्ट सांगते तशी कालची गोष्ट सांगते. भारताचे विविध

पातळीवर चिंतन करून वाचकासाठी एक मार्गदर्शिका देते आहे. काफ्का, गोगोल, फिलिप रोथ, विजयन यांनी रूपकाच्या आधारे चित्रण केलेले आहे त्याप्रमाणे लबडे यांनीही सध्याच्या परिस्थितीचे अत्यंत प्रभावीपणे पारदर्शक चित्रण केलेले आहे. मुंगीच्या रूपकाच्या आधारे चित्रण केल्यामुळे कथाही अधिक जिवंत व सखोल चिंतन करणारी प्रकर्षाने वाटते. लेखक नवीन व्यवस्थेची संकल्पना मांडतो. नवी विचारधारा स्थापना करण्यात मोलाची भर असणारी वैचारिक बैठक समर्थपणे लबडे यांच्याकडे आहे. वाचकांच्या पुढे ती लेखक ठेवत जातो. परिस्थिती काही शिकवित असते. पिपिलिका शीर्षकाप्रमाणे मानव मुक्तीची गाथा आहे, आणि ही निश्चितच देश, काळ, समाजाच्या सर्व सीमा ओलांडून भौगोलिकतेच्या पलीकडे जाऊन कलेमध्ये नवीन जगाची निर्मिती करणारी कादंबरी आहे. ती एक जागतिक सर्जनात्मक निर्मिती आहे. एक वेगळी शैली निर्माण करणारी कादंबरी. वाचकांना नैतिकतेचे अधिष्ठान शिकवणारी, अत्यंत प्रभावी अशी कादंबरी मराठी साहित्यात आहे. यात शंकाच नाही. मुंग्यांच्या साह्याने लेखक स्थानिक पातळीवरून वैश्विक पातळीवर वाचकांना घेऊन जातो. शोध घेण्यास प्रवृत्त करतो. चार मुंग्या मानवी सचेतनता असणाऱ्या आहेत. या मानवी दशा आणि दिशेचा शोध घेताना आपणास दिसतात.

समाजात रूढी परंपरा आहेत. विश्वास, श्रद्धा, समजुती, संस्कारावर संस्कृती उभी आहे. कादंबरी यांच्या पलीकडे जाऊन पाहते. व्यवस्थेच्या बाहेर जाण्याचा प्रयत्न करणारी ही कादंबरी आहे. जी की माणसांच्या ठायी तरतम भाव आहे, तो रेखाटते. ती एका चौकटीत बसत नाही. सार्वकालिकता या कादंबरीत आलेली आहे, असे पिपिलिकाबद्दल म्हणता येईल. पारंपरिक कथानकाच्या चौकटीत न बसता नवीन व्यवस्थेचा पुरस्कार करणारी. लेखकाने नवीन शैली निर्माण केलेली आहे. प्रतीका, प्रतिमां मधून मांडलेली आहे. लेखक सांगतो आहे ती काँक्रीट रिॲलिटी आहे. वास्तवता ही अधिक प्रकर्षाने आपणास जाणवते. ही कादंबरी मल्टी डायमेन्शनल आहे. तिचे अर्थ अनेक निघतात. एक नवीनच रूप आपणासमोर येते. ते भेदक वास्तववादी आहे. काही वेळा वास्तवता एकसंध नसते. कालपरत्वे बदलत जाते. बदल हा निसर्गाचा नियम आहे. वैश्विक सत्य शाश्वत असले तरी वास्तवता बदलते. या बदलाचा परामर्श घेणारी ही कादंबरी आहे. इतर चार कादंबऱ्यां प्रमाणे ही कादंबरी आपले स्थान निश्चित करते. वाचकांना इतर कादंबऱ्यांप्रमाणेच शोध घेण्यासाठी प्रवृत्त करते. ही  विसंगती आणि विडंबनाच्या आधारे अर्थ आपल्या जाणिवांच्या आधारे विविध पातळ्यांच्या आधारे व्यक्त होते. जगणे हा एक खेळ आहे. योग्य असा खेळ प्रवृत्त करते. शिवाजी महाराज यांच्या विचारांचा नवा विचार घडवू पाहते. मुक्तीचा मार्ग आहे तो लेखकाच्या लेखणीतून नव्या व्यवस्थेची एक वारी आपल्याला घडवतो.


मानवी जीवन आणि त्याचे परिवर्तन हा त्याचा मुख्य धागा आहे. माणूस पशु समान भावनेचे नियंत्रण करू शकत नाही. अनुभवांच्या आधारे कादंबरी सांगण्याचा प्रयत्न करते. फिलीप रोथने एका इंग्रजी प्राध्यापकाचे चित्रण केलेले आहे. तेच काफ्कानी केलेले जे चित्रण आहे ते वेगळे. ते मानवी जाणीव आणि विषय लैंगिक भावनांविषयी आहे. भावना दाबल्याने होणारे दुष्परिणाम रूपकाच्या आधारे त्यांनी दाखवलेले आहेत. पिपिलिकामध्ये लेखकाने आपल्या पात्रांच्या चौफेर बाजूने विचार करून मुंग्यांच्या माध्यमातून आजूबाजूच्या अंतर्गत व बहिर्गत असलेले चित्र आपल्या कादंबरीतून दाखवण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलेला आहे.

▣▣▣

**डॉ. रामेश्वर सोळुंके**
गंगा कॉलनी, छत्रपती नगर जवळ,
पुर्णा रस्ता, नांदेड- ४३१६०५
चलभाष : ९५४५०३४७३६
ईमेल : rssolanke12@gmail.com

# आजच्या ग्रामीण घुसमटीचे प्रत्ययकारी चित्रण : तुडवण

**कैलास दौंड यांच्या सद्यकालीन ग्रामवास्तवाचे प्रत्ययकारी चित्रण करणाऱ्या 'तुडवण' या कादंबरीची डॉ. सुभाष शेकडे यांनी केलेली समीक्षा.**




कादंबरीः **तुडवण**
लेखकः **कैलास दौंड**
प्रकाशनः **मॅजेस्टिक पब्लिशिंग हाऊस, मुंबई.**
प्रथमावृत्ती : **सप्टेंबर**
पृष्ठे : **२४५** मूल्य : **३००/-**

**डॉ. सुभाष शेकडे**

नव्या पिढीतील कसदार ग्रामीण साहित्यिक म्हणून डॉ. कैलास दौंड यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. नुकतीच त्यांची 'तुडवण' ही अस्सल ग्रामीण जीवनाचे दर्शन घडवणारी कादंबरी मॅजेस्टिक पब्लिशिंग हाऊस, मुंबई यांनी सप्टेंबरमध्ये प्रकाशित केली आहे. 'तुडवण' ही त्यांची तिसरी कादंबरी. त्या आधीच्या 'पाणधुई', 'कापूसकाळ' या त्यांच्या कादंबऱ्या वास्तवाच्या काळजाचा ठाव घेणाऱ्या ठरल्या. विशेषकरून 'कापूसकाळ'ची तर अनेक समीक्षकांनी नोंद घेतली. तिच्यावर संशोधनही झाले. मुंबई विद्यापीठाच्या अभ्यासक्रमातही या कादंबरीचा समावेश केला गेला. कैलास दौंड यांचे लेखन म्हणजे ग्रामीण जीवनाचा खळाळता झराच असल्याचा प्रत्यय 'तुडवण' या कादंबरीमधूनही येतो. अनुभवाचा सच्चेपणा, ताजेपणा, वास्तवाला शब्दांतून उभे करण्याचे विलक्षण सामर्थ्य, मानवी स्वभावाची सूक्ष्म जाण, या बाबींमुळे 'तुडवण' कादंबरीने कलात्मक उंची गाठली आहे.

'तुडवण'मध्ये कौटुंबिक नात्याची वीण, शेजाऱ्या- पाजाऱ्यांमधील प्रेम, जिव्हाळा, मायेचा ओलावा, सुशिक्षित बेरोजगारांची होणारी घुसमट, आर्थिक दुबळेपणाने आलेली असहाय्यता, नोकरीसाठी लाखो रुपयांची होणारी मागणी, भाऊ महाराजांचा आध्यात्मिक प्रभाव, अस्मानी - दुष्काळी संकटातही

तग धरणारी माणसं, स्त्रियांवर होणारे अमानुष अत्याचार, नवऱ्या मुलाचे उर्मट वर्तन, सुशिक्षित मुलींची धिटाई, बंधुभाव, जळितासारख्या घटनेतही स्वार्थ जागा ठेवणारी सरपंचाची अप्पलपोटी वृत्ती, वरकरणी हुंडा न घेता आहेरासाठी मागणी करणारी प्रवृत्ती, मनात डूख धरणारी गाव- पुढाऱ्यांची वृत्ती, फसवेगिरी, कठीण प्रसंगातही कुटुंबाला सावरणारी खंबीर स्त्री, झटपट श्रीमंतीपायी चंदनचोरी, बुलेट चोरी करणारी तरुणाई, काळ्याईला जीवापाड जपणारी निष्ठावान माणसं, एकमेकांना आधार देणारी-सावरणारी माणसं, त्याचबरोबर पोटच्या मुलाला सोडणारी माय या सगळ्यांचं हुबेहूब आणि हृदय हेलावणारं चित्र उभं करण्यात लेखकानं कुठेही कसर सोडलेली नाही. 'तुडवण' मधील चित्रणामध्ये येणारे बारकावे आणि विविधता पाहिल्यावर कैलास दौंड यांची 'तुडवण' कादंबरी म्हणजे गाव-पांढरीच्या वाटा-वाटांवरील मातीत गाय- गवाराच्या पडणाऱ्या शेणाच्या पोहटीसारखी सेंद्रिय आणि समृद्ध असल्याची दिसते. पोहटीला उचलताना जसे खडा, माती, पालापाचोळा, काडीकचरा, फुफाटा अलगद चिकटून येतो अगदी तसेच 'तुडवण'मध्ये वरील अनेक प्रसंग स्वाभाविकपणे आलेले आहेत. त्यामुळे कादंबरी पानागणिक उत्कंठा वाढवणारी ठरते.

'तुडवण'मध्ये बदलत्या ग्रामजीवनाचे, तिथल्या समाजव्यवस्थेचे संयमी चित्रण पाहावयास मिळते. नवनाथ, राधाक्का, नारायण, यमुना अशा चौकोनी कुटुंबाभोवती संपूर्ण कादंबरी गुंफली गेलेली असल्यामुळे सहाजिकच त्यांच्या सुख- दुःखाची वीण कादंबरीत पाहावयास मिळते.

नारायण हा या कादंबरीचा नायक शेतकरी कुटुंबातील; सामान्य शेतकरी कुटुंबाची अवस्था ही अगदी शेळीच्या शेपटासारखी! नारायणला नवनाथतात्या व राधाक्का पोटाला चिमटा घेऊन वाढवतात, शिकवतात. तो डी. एड. होतो; सीईटी मात्र अनुत्तीर्ण होतो. वाघळूजच्या शिक्षण संस्थेत तो मुलाखत देतो. इथे लोकमान्य शिक्षण संस्थेचे अध्यक्ष त्याला नऊ लाख रुपये मागतात. तेव्हा तो वडील नवनाथतात्याला 'सिंदाडाची पट्टी' नावाचे शेत विका म्हणतो. नवनाथ मात्र जगण्याचा चिरंतन आधार असणारे शेत विकायला नकार देतो. या घटनेमुळे बाप-लेकात अंतर पडू लागतं, घरात बसण्यापेक्षा नारायण रागानं बाल्या या चंदन चोराबरोबर अंधारात- कुंधारात ओढ्या-नाल्यानं चंदनचोरी करण्यात सहभागी होतो; पण त्यात मन रमत नाही. शिक्षण आणि आई-वडिलांचे संस्कार, भाऊ महाराजांच्या विचारांचा प्रभाव यामुळे तो उल्हासनगरला सुदाम ड्रायव्हरच्या हाताखाली क्लिनरचे काम सुरू करतो. इथे तो खाण्यापिण्याची, राहण्याची आबाळ सहन करतो. डासा - उंदरांचा त्रास सहन करतो. सिंधी शेठची गुलाबी गालाची भारती पाहून त्याला बहिणीची आठवण येते. या ड्रायव्हिंग शिकण्याच्या काळात अधून-मधून गावी जाणे होते. 'गड्या आपला गावच बरा' असं मानून तो कायमचा गावाकडे येतो. आई राधाक्काजवळ टेम्पो घेण्याचा विचार मांडतो. ती नवनाथतात्याचं मन वळवण्याचा प्रयत्न करते. काशिनाथ पाटलाला 'सिंदाडाची पट्टी' अवघी पाऊणे नऊ लाखाला विकून तुकारामाच्या मदतीने कागद करून दिला जातो. त्यासरशी नारायण दिवास्वप्ने पाहू लागतो; पण नवनाथच्या मनाला जमीन विकल्याचं फार लागतं. तो कुणालाही न सांगता घरातून- शेतीतून निघून जातो. नारायण त्याला शोधण्याचा प्रयत्न करतो; पण त्याचा ठावठिकाणा लागत नाही.

नारायण शेती विकून आलेले पैसे स्वतःच्या नावावर बँकेत टाकतो. मेहुणा तुकारामच्या सांगण्यावरून जुनी बुलेट मोटरसायकल स्वस्तात घेतो व ती चोरीची निघाल्याने हातच्या हातावर चाळीस हजाराला फसला जातो. आज ग्रामीण भागात शिक्षित तरुण हौसेपायी वाम मार्गाला लागलेले पाहावयास मिळतात. त्यात अनेक तरुण बरबाददेखील झालेले आहेत हे लेखकाने अचूकपणे टिपले आहे. जमीन विकल्यावर घरातून गेलेले तात्या परत यावेत म्हणून नारायण टेंपो घेण्याचा विचार सोडून जमीन घेण्याचा विचार करतो. जमीन घेतल्याचे कळल्यावर वडील परत येतील, असे त्याला वाटते. मात्र गावगुंडीत तरबेज असणारा, दुष्काळातही गाय- गुरांच्या चारा छावणीत

पाप करणारा आणि नवनाथनं चारा छावणीत गाय न घातल्यामुळे दुखावलेला भास्कर तोडकर नारायणला जमिनीच्या व्यवहारात फसवतो व डाव साधतो. त्यामुळे नारायणचे दिवस फिरतात. बायको, राधाक्का व लहान बाळ यांचा विचार करून तो विहिरीच्या कामावर जातो. 'सिंदाडाच्या पट्टीतच' मोहित्यांच्या विहिरीचे काम रावश्याने घेतलेले असते. तिथं शेवटच्या पाटीचा दोर तुटून पाटीतील दगडाखाली होणारा नारायणचा दुर्दैवी मृत्यू काळीज हेलावून टाकतो. असंख्य प्रश्नांनी, समाजप्रवृत्तींनी आणि एकूणच परिस्थितीने केलेली तुडवण नारायणाची धडपड व्यर्थ ठरवते व मनाला चटकाही लावते. नारायणच्या निमित्ताने डी.एड, बी.एड., एम. फिल., पीएच.डी सारख्या पदव्या प्राप्त असणाऱ्या ग्रामीण भागातील असंख्य तरुणांची प्रातिनिधिक तुडवण दौंड यांनी शब्दबद्ध केली आहे.

'तुडवण' कादंबरीमधील व्यक्तिरेखा वैशिष्ट्यपूर्ण आणि सार्वत्रिक वाटणाऱ्या आहेत. नारायणप्रमाणेच नवनाथतात्या, राधाक्का, यमुनी तिची मैत्रीण रूपली, तुकाराम या अशा काही व्यक्तिरेखा होत.

नवनाथतात्या हा सरळमार्गी, कोरडवाहू शेतीत प्रामाणिकपणे कष्ट करून त्यात समाधान मानणारा, गरिबीत राहून घराला सावरणारा असा सामान्य शेतकरी आहे. तो मुळातच कुटुंबवत्सल आहे, मात्र नारायणच्या जमीन विकण्यानं मात्र तो कमालीचा दुखावला जातो.

शेती विकली गेल्याची सल त्याला सहन होत नाही. त्याला अपमान वाटल्यानं तो रात्रीच्या अंधारात परागंदा होतो. त्याआधी त्याच्या रागानं बोलण्यातून, शिव्यांतून व्यक्त होणारी तुडवण कायमची मुकी होऊन जाते.

या कादंबरीतील सर्व कुटुंबाला प्रेमधाग्यानं आणि जबाबदारीनं एकसंध ठेवणारी राधाक्का ही मुख्य व्यक्तिरेखा म्हणता येते. ती तितक्याच प्रभावीपणानं अवतरली आहे. कादंबरीभर तिचीच सर्वाधिक होणारी 'तुडवण' मनाला चटका लावणारी आहे. नारायणाच्या शेत विकण्याच्या हट्टापायी बाप- लेकांच्यामध्ये होणारी तिची घुसमट, कायमस्वरूपी आघात देऊन गेलेली नराधमांनी केलेली तुडवण; भेटायला येणाऱ्या बायांच्या प्रत्येक शब्दाबरोबर होणाऱ्या वेदना; जावयाच्या आहेरासाठी दारातली एकुलती एक 'हरणी गाय विका' म्हणताना होणारी व्याकुळता; नवनाथच्या एकाकी घरातून जाण्यानं येणारी असहाय्यता; तोडकरानं नारायणला जमीन व्यवहारात फसवल्यानंतर झेलावी लागणारी व्याकुळ अनिश्चितता; हाताशी आलेल्या मुलाचा दुर्दैवी मृत्यू पाहताना तुटून पडणारा दुःखाचा पहाड; सुनेनं दिलेली दूषणं या सगळ्या तुडवणीला झेलत दुधावरच्या सायीला अर्थात दोन वर्षांच्या नातवाला घेऊन उरलेसुरले शेत व घर सोडून शहराची वाट धरताना होणारी तुडवण. या सगळ्या तुडवणीला झेलत आणि तुडवत निघालेली राधाक्का वाचकाच्या काळजात घर करणारी आहे. जातिवंत शेतकरी नवरा आणि जागतिकीकरणाचे वारे लागलेला मुलगा यांच्या विचाराच्या संघर्षांमध्येही घराला जपण्याचा सर्वतोपरी आटोकाट प्रयत्न करणारी राधाक्का ही ग्रामीण भागातील असंख्य माता- माउलींचेच प्रतिनिधित्व करते. ती सर्वसामान्य खेडूत स्त्रीप्रमाणे घरादारावर, मुलांवर, नवऱ्यावर, वावरा- शिवारावर प्रेम करणारी, शेतात कष्ट करणारी, काळोखाला मागे सारून भविष्याचा वंश प्रकाशरूपी दिवा वादळवाऱ्यात पदराआड तेवता ठेवण्यासाठी धडपडणारी धीरोदत्त संयमी, संसारी स्त्री आहे. तिच्या ठायी असणारी सोशिकता, कमालीची जीवननिष्ठा आणि अदम्य आशावाद यामुळे ती नवरा व मुलगा यांच्या जाण्याचे एकापाठोपाठ येणारे दुःखद आघात झेलून जीवनाची लढाई हरत नाही. रूपलीच्या आधाराने कुळा – काळीचा अंकुर अंकुरित करण्यासाठी ती शहराची वाट धरते. राधाक्काची व्यक्तिरेखा दीर्घकाळ स्मरणात राहणारी अशीच आहे. संपूर्ण कादंबरीमध्ये नारायणाबरोबरच राधाक्काची व्यक्तिरेखा रेखाटताना डॉ. कैलास दौंड यांच्या लेखणीला जणू धुमारे फुटले आहेत.

राधाक्कासारखीच प्रेमळ, मनमिळाऊ असणारी यमुना ही नारायणची धाकटी बहीण. आपल्या भावानं आई- वडिलांचा आधार व्हावं, नवनाथ तात्याला त्यानं समजावून घ्यावं, अशी तिची मनोमन इच्छा. नोकरीसाठी देणगी द्यायला पैसे मिळावेत यासाठी शेत विकण्यास तात्या नकार देतात; त्यामुळे दोघांत कुरबूर

होते. नारायण मर्यादा सोडून बोलतो. 'नसलं विकायचं वावर तर घाला तुमच्या आह्मह्मह्म, मी चाललो घरातून निघून. बसा सांभाळीत तुमचं वावर आणि घर.' पोटच्या पोरानं दिलेली शिवी जिव्हारी लागल्यानं तो तडातडा ओढ्याकडेच्या विहिरीकडे जाऊ लागताच यमुनेच्या सारा रागरंग लक्षात येतो. घरापासून ती नांगरटीच्या ढेकळातून आपटत, ठेचाळत, तोंडावर पडत जीवाच्या आकांताने पळत जाऊन स्वतःच्या तंद्रीत चाललेल्या नवनाथतात्याला 'तात्या, थांबा!' म्हणून मिठी मारते. नवनाथच्या डोळ्यातून घळघळा अश्रू वाहतात. इथे यमुनीमुळेच नवनाथ आत्महत्येपासून वाचला जातो. आई-वडील आणि भावावर निर्व्याज प्रेम करणारी यमुना वाचकांच्या मनात घर करते. तुकारामसारख्या ट्रॅक्टर ड्रायव्हरबरोबर आई-वडिलांच्या सांगण्यानुसार लग्न करते. राधाक्काला कठीण प्रसंगातून मैत्रीण रूपलीच्या मदतीने सावरते. नारायणने साडी-चोळी न आणता स्वतःला मोबाईल आणल्याने नाराज होते. आपल्या आहेरासाठी गाय विकावी लागते हे तिच्या मनाला लागते. 'गाईची नि बाईची गत सारखीच. ज्या खुंट्याला बांधील...' अशी मनात तुलना करते. भाऊ नारायणशी बोलताना ती सतत घालूनपाडून बोलते; पण त्याच्याविषयी तिच्या मनात अतीव प्रेम आहे. समंजस आणि आहे त्यात समाधान मानणारी यमुना तुडवणमधून अधोरेखित होते. तिचा पती तुकाराम ही व्यक्तिरेखा नारायणला प्रत्येक प्रसंगात मदत करताना दिसते. वेळेला तो धावून येतो; मात्र कारण नसताना तो नारायणला बुलेट का घेऊन देतो? नारायणला त्याची खरंच गरज होती का? स्वतःच्या आहेरासाठी गाय विकावी लागते हे त्याला दिसत नाही का? जमीन विकत घेताना इतर हक्कातील नावाची सहमती लागते हे त्याच्या लक्षात येत नाही का? या प्रसंगामुळे त्याचा स्वभाव मानभावी आहे की काय असे वाटते.

तुडवणमध्ये नवनाथतात्या शेजारीच एक धनगर कुटुंब राहतं. त्यांची मुलगी रूपली अतिशय समजदार आहे. आपल्या दिव्यांग असणाऱ्या भावाची - बाबल्याची ती मायेने काळजी घेते. आजीच्या आज्ञेत असणारी रुपली यमुनीची जिवलग मैत्रीण आहे. तिचे आई-वडील सहा-सहा महिने मेंढ्यांचे कळप घेऊन भटकत असतात त्या काळात रूपली घरची जबाबदारी सांभाळत असते. यमुना नारायणला तोडून बोलते तेव्हा, 'भाऊ आहे तो तुझा. आता नाही जाणार तुझं लग्न होऊस्तोवर!' असे जिव्हाळ्याने समजावते. राधाक्काला दवाखान्यातून आणल्यापासून लडिवाळपणे धीर देते. आई-वडिलांनी कंपनीत कामावर असलेल्या कोळगावच्या मुलाशी गेटकेन पद्धतीने, सत्यशोधक पद्धतीने लावून दिलेले लग्न ती हसत हसत स्वीकारते. समाधानी व समंजस स्वभावामुळे लग्नानंतरही तिचे चांगले होते. जेव्हा नवनाथतात्या परागंदा होतात, नारायणचा मृत्यू होतो, त्याची बायकोही मुलाला टाकून राधाक्काला सोडून जाते, त्या वेळी राधाक्का एकाकी पडते. तेव्हा माहेरी आलेली रूपली राधाक्काची कर्मकहाणी ऐकून दुःखी होते. 'राधाक्का, चला मपल्यासंग, म्या आता पुण्यात खानावळ सुरू केलीय. शाळा-कॉलेजातले पोरं येतात जेवायला. आमच्या घरातल्या एका खोलीत राहा तुम्ही. जेवूनखाऊन पाच हजार रुपये महिना देईल तुम्हाला. एक बाई ठेवायचीच हे आम्हाला कामाला. तुमच्या नातवालाबी, प्रकाशला शाळेत घाला तिथच जवळ शाळामध्ये.' रुपलीचं असं डोंगराएवढं मन व्यक्त होतं आणि वाचकांच्या डोळ्यात कृतज्ञ भावनांचं पाणी तरळायला लावतं.

'तुडवण' मधील घटना प्रसंगांचे चित्रण आणि त्यातली दृश्यमयता हेदेखील तिचे एक मोठे बलस्थान आहे. सहज आणि कथानकाला पूरक ठरणारे अनुषंगिक प्रसंगही त्यांचा ठसा उत्तमप्रकारे उमटवतात. असाच एक मनाला भावणारा, अभिमान वाढवणारा प्रसंग म्हणजे राधाक्का म्हणते, 'आता यमुनीच्या बस्त्याचं पहावं लागन.' त्यावर नवनाथतात्या म्हणतो, बस्त्याचं नाव काढलं म्हणून आठवलं. मी आज दुकानात गेलतो. आजकालच्या पोऱ्ही लईच स्वाभिमानी आणि हुशार निघाल्यात... अगं कडगावचे माणसं आलते बस्ता बांधायला पोरीचा. पोरगीबी शिकल्यालीच आसन बर्का. कापडं सगळे घेऊन झालते; पण नवऱ्या मुलाने मित्रांच्या नादानं भारीतला सूट पसंत केला. वीस हजार रुपये किमतीचा. तव्हा पोरीचा बाप म्हणला, 'कापडात

कशाला एवढे पैसे घालता? त्या परास एखादा दागिना घ्या;' पण नवरदेव पोरगं डाफरलं ना. पोरीच्या बापाला म्हणालं, 'तुमची माझ्यापुढं उभं राह्यची लायकी नाही.' याचा पोरीला लई राग आला. बापाचा अपमान जिव्हारी लागला. पोरगी लालबुंद झाली, पुढं झाली आणि सणशिरी त्याच्या कानफडात लावली. म्हणाली, 'माझ्या बापाची लायकी काढणाऱ्या सोबत मला नाही लग्न करायचं;व्हा चालते.' अपमानित होऊन खाली मान घालून गेली ती मंडळी. तिने उलट आई-बापाला कपडे घेतले, बस्ता रहित केला,

आजच्या तरुण पिढीला लेखकाने दिलेला एक प्रकारे सणसणीत संदेशच आहे. इथं तर खऱ्या अर्थाने पोरीनं पुरुषी अहंकाराची 'तुडवण' केलेली आहे.

संतोष तोडकर या तरुणाला बढे सरांनी कॉम्प्युटर इन्स्टिट्यूटमध्ये फसवण्याचा प्रसंगही या दुनियादारीत विश्वासाला पायदळी तुडवत पावलापावलावर तरुणांची होणारी फसवणूक दाखवणारा आहे. तर नारायणला डी. एड. ला शिकवणारे रेवदंडे सर नॉन ग्रॅन्ट कॉलेजला होते. कमिशन बंद झाले. मग पगार बंद झाले नि त्यामुळे सरांनी आत्महत्या केली. आज अशा कितीतरी नॉन ग्रॅण्ट शाळांवर दहा-पंधरा वर्षे काम करणारे शिक्षक आहेत. त्यांची लग्नं होत नाहीत. झालेच तर बायकांना रोजंदारीनं गवंड्याच्या, शेतमालकाच्या हाताखाली काम करावं लागतं हे वास्तव आहे.

'तुडवण' मधील अशिक्षित रोह्यल्या व त्याची बायको यांच्यात कुरबुर होते. कारण क्षुल्लकच असते. रोह्यल्या रानात गेल्यावर त्याची बायको रागात कपाशीवर मारायला आणलेलं औषध घेते. त्यातच तिचा मृत्यू झाल्याने सोन्यासारखी लेकरं उन्हात पडतात. आज क्षुल्लक कारणाने नवरा-बायकोंनी एकमेकांना समजून न घेतल्याने असे प्रसंग ओढवले जातात व नंतर रोह्यल्यासारखेच पश्चात्ताप करत बसतात.

सुभाषवाडीत जळिताचं आकांडतांडव घडतं. गुरांचे गोठे, बाजरीची बुचाडं, कडब्याच्या गंजी , दगडाच्या पौळीवरील सपरातले प्रपंच, घरातले धान्य, लहान मुलांची दप्तर, सगळं आगीच्या भक्ष्यस्थानी पडतं आणि जळतं. सहा-सहा महिने आई-वडील व लहान पोरांना टाकून कर्ती माणसं दुन्यादेशावर गेलेली. या वेळी जळिताचा पंचनामा करतांना मात्र बिलंदर सरपंच राम रोकडे त्यातही स्वार्थ साधण्याचा प्रयत्न करतो. मात्र इथे त्याच्याच भावकीतला संत्या त्याला विरोध करतो. हा जळिताचा प्रसंग लेखकाने साक्षात उभा केला आहे. तिथली असहाय्यता अंगावर काटा आणते.

गाव- खेड्यात गावकरी जगण्याला मानसिक आधार मिळावा यासाठी सश्रद्धपणे हरिनाम सप्ताहाचे आयोजन करतात. यातील भाऊ महाराजांचे कीर्तन म्हणजे लोकांना सद्विचारा - आचरणाकडे आणणे, मुला-मुलींना शिक्षणाकडे वळवणे, अंधश्रद्धेला मूठमाती देणे, घरातल्या लक्ष्मीला सन्मानाने वागविणे, कर्ज काढून सण- उत्सव करू नका असे प्रबोधनात्मक असे. हेच काम त्यांनी हयातभर केले. संत गाडगेबाबांचे व्रत त्यांनी निष्ठेने चालवले. ते ब्रह्मचारी होते. त्यांच्या वैकुंठवासानंतर गोडजळगावला हनुमान मंदिराशेजारी त्यांचे मंदिर लोकांनी भक्तिभावाने बांधलेले असते. त्यांची आठवण म्हणूण दरवर्षी हरिनाम सप्ताहाचे आयोजनही करण्यात येते. असाच सप्ताह गोडजळगावात सुरू असताना दुसऱ्या दिवशी समाप्ती असल्यानं सारं-गाव आनंदात देहभान हरपून नियोजनात रममाण झालं होतं. गावात स्वागतोत्सुक तरुणांचे डिजिटल फ्लेक्स झळकत होते. चंदनचोरी करणाऱ्या बाल्यालाही आपला बोर्ड झळकावयाचा मोह होतो. अनीतीचा पैसा हातात होताच. बोर्ड तयार करून आणण्यासाठी रावशासह मोटरसायकल घेऊन सुसाटपणे तो शिरूरचा रस्ता धरतो. जातानाच रस्त्यातील गावात बाल्या एका टपरीवर दारू पितो. तेव्हा त्याला रावश्या म्हणतो , 'अरे बाल्या, आपल्या गावात भाऊ महाराजांचा सप्ता सुरू आहे. आपुण असं नाही केलं पाहिजे. लई कडक काम हे.' तरी तो रावश्याला गाडीवर बसवून सुसाट गाडी चालवतो नि समोर येणाऱ्या ट्रकच्या मधोमध धडकतो. त्यात बाल्याचा जागीच मृत्यू होतो, तर रावश्याचा पाय मोडतो. डोक्याला गंभीर जखम होते. या प्रसंगातून गाव-खेड्यातील श्रद्धाभाव तर दिसतोच त्याचबरोबर दिखाऊपणाचे लागलेले वेड, व्यसनाधीनतेचे दुष्परिणाम, संतांची मूळ शिकवण

ध्यानात न घेणे या बाबीही दिसतात. स्वाभाविकपणे गावात चाललेला चांगल्या आणि वाईट मानसिकतेचा संघर्ष, त्यातून होणारा सार्वजनिक उत्सवाचा बेरंग याकडे हा संपूर्ण प्रसंग अंगुलीनिर्देश करतो.

गावातील न्हाव्याच्या दुकानातील पेपर वाचण्यासाठी होणारी गर्दी, कल्याणला होणारा पीएसआय सुभाष मोहिते यांच्याकडचा पाहुणचार, विष्णू ड्रायव्हरच्या टँकरने जाताना त्याने आपुलकीने दिलेले जेवण, अंकुशानं इमानदारीनं दिलेले कामाचे पैसे, भैरवनाथाचं महात्म्य, गुरुजींचे शाळा सोडून चाललेले शाळा डिजिटल करण्यासाठीचे प्रयत्न, रानातल्या कपाशीची वेचणी, मका, कडवळ, बाजरी इत्यादी पिकांची मशागत असे सर्वच प्रसंग मनाला भावतात.

'तुडवण' कादंबरीमध्ये पाटोदा, शिरूर, आष्टी, राधापूर या विशिष्ट भूभागाचे एक स्वतंत्र, संपूर्ण व प्रत्ययकारी चित्रण येते. हा परिसर निसर्ग व मानवी व्यवहारानिशी कादंबरीतून उलगडला आहे. त्या अर्थाने या कादंबरीला प्रादेशिक कादंबरीही म्हणता येईल. उल्हासनगर, कल्याण सोडले, तर या कादंबरीत कोणत्याही शहराचा उल्लेख आलेला नाही. कोणत्याही खेड्यात, गाव-वस्त्यांच्या समूहात, एखाद्या परिसरात घडू शकेल अशीच ही कादंबरी आहे. तेथील सारा भूप्रदेश स्वतःच्या स्वतंत्र वैशिष्ट्यांनी आपल्यासमोर साकार होतो.


विविध व्यक्तिरेखा, घटना- प्रसंग, बोलीभाषा, जिता नही गोडी, मेलेवं बंधन तोडी', 'वर किणखापाची घोंगडी आत फाटकं अस्तर', 'चुली झाल्या दोन आणि तुम्ही आम्ही कोण' अशा म्हणी यामुळे 'तुडवण' कादंबरी ग्रामीण साहित्यात एक मैलाचा दगड ठरल्याशिवाय राहणार नाही. आजच्या सुशिक्षितांनाही मार्गदर्शन करणारी ठरेल याची मनोमन खात्री पटते. केवळ स्मरणरंजनातले नव्हे तर आजच्या जागत्या खेड्यातील चित्रण, आजच्या तरुणाईच्या मानसिक घुसमटीचेच चित्रण, पालकांची अगतिकता नि खेड्यातील विविधांगी मानसिकता दाखवणारी, विविध अनुभवांची एकसंध वास्तवदर्शी काळानुसारी गुंफण कादंबरीला वाचनीय आणि चिंतनशील तर बनवतेच त्याचबरोबर दखलपात्रही बनवते. एकूणच 'तुडवण' या कादंबरीची प्रादेशिकता, तिच्यातील प्रसंगाइतकीच महत्त्वपूर्ण आहे. नगरी, मराठवाडी भाषा, लोकांची मनं, त्यांचं वागणं, बोलणं, शब्दांतून, म्हणींतून व्यक्त होणारा प्रेम, जिव्हाळा हे सारे मातीतूनच उमलून आल्यासारखे अकृत्रिम असे आहे. या कादंबरीतील माणसं आणि भूप्रदेश यात अभिन्नत्व असल्याचं जाणवतं. कादंबरीच्या यशात महत्त्वाचा वाटा असणाऱ्या बोलीभाषेचा मृदगंध पानापानातून दरवळत राहतो. लेखकाची लेखनशैली विलक्षण चित्रमय आहे. घडणारे प्रसंग इतके जिवंत वाटतात, की हुबेहूब सगळे आपल्यासमोर घडत आहे असा भास होतो. कादंबरीच्या अखेरीस लेखकाने दिलेली बोलीभाषेतील शब्दांच्या अर्थांची सूची महत्त्वपूर्ण आहे. २४५ पृष्ठांच्या या कादंबरीला लाभलेले सतीश भावसार यांनी रेखाटलेले मुखपृष्ठ विषयाला न्याय देणारे आणि खूपच बोलके आहे. 'तुडवण' च्या लेखकाकडून असेच नवनवीन विषयावर लेखन होत राहील ही अपेक्षा !

**डॉ. सुभाष शेकडे**
कुंज विहारी, वामन भाऊ नगर, पाथर्डी,
जिल्हा अहमदनगर- ४१४१०२
चलभाष : ९४२३१६४७६३

महाराष्ट्र साहित्य पत्रिकेच्या
जून-सप्टे अंकात अण्णा भाऊ साठे यांचे
नाव चुकून अण्णाभाऊ साठे असे छापले गेले
चुकीबद्दल दिलगीर आहोत
-संपादक

विलोभनीय आस्वाद प्रक्रिया सांगणारी
आणि कवितेच्या अभ्यासकाला
दृष्टी देणारी समीक्षा

# कवितेचा अंत:स्वर




कादंबरीः **कवितेचा अंत:स्वर**
लेखक: **डॉ. देवानंद सोनटक्के**
प्रकाशनः **पद्मगंधा प्रकाशन, पुणे**
प्रथमावृत्ती : **डिसेंबर २०१८**
पृष्ठे : **२७१** मूल्य : **४०० /–**

## ■ दा. गो. काळे

'कवितेचा अंतस्वर' हा डॉ. देवानंद सोनटक्के यांचा मराठी कवितेच्या आस्वादप्रक्रियेत महत्त्वाची दृष्टी देणारा ऐवज आहे. त्यातील बरेचसे लेख 'सर्वधारा', कविता रती आदी या नियतकालिकांच्या माध्यमातून आधी वाचकांसमोर आलेले आहेत. मात्र त्या सर्व लेखांचे एकमेव सर्वांगसुंदर असे रूप म्हणजे पद्मगंधा प्रकाशनाने दिलेली मोठी भेट म्हणता येईल. या सुट्या लेखांचे पुस्तक करण्याची ही लेखकाची कल्पनाही चांगली आणि वाचकाला सलग विवेचन व विश्लेषण करून देणारी आहे.

आजच्या काळात कविता हा प्रांत आपल्या निर्मितीने काठोकाठ भरून वाहणारा आहे. सगळीकडे भरपूर असे कवितांचे पीक आलेले असून त्यात चांगली कविता कोणती, तिचे निकष काय? या संबंधातील साहित्यशास्त्रीय चर्चा नेहमीच सभा संमेलनातून होत असते. ते अभ्यासकांच्या दृष्टीने महत्त्वाचेही असते; परंतु आपल्या कवितेच्या परंपरेतून, पाठ्यक्रमातून आणि आपला भोवतालात वाढणाऱ्या साहित्य परिघातून काही चांगल्या कविता आपण वाचत असतो. त्या कविता त्यातील शब्दांच्या नजाकतीतून आवडत असतात. त्यातील शब्दकळा भुरळ घालीत असते. त्या चमत्कृतीतून निर्माण होणाऱ्या अर्थाच्या शक्यता अधिक आनंददायी आणि विचारांना चालना देणाऱ्या असतात. समकालीन वास्तवाची नवी मांडणी त्यातून अभिप्रेत असते. सर्व

कवितांची– त्यांच्याबद्दलच्या आदरातून, आस्थेतून साठोत्तरी पिढीची कविता ते नव्वदोत्तर पिढीच्या उत्तरार्धात लिहिणाऱ्या सारिका उबाळे, दिलीप वीरखडे यांच्या कवितेपर्यंत सोनटक्के यांच्या समीक्षेने आपली आस्वादप्रक्रिया ताजी ठेवलेली आहे.

विशेष म्हणजे, ही समीक्षा नुसती कवितेच्या अर्थाच्या शक्यता शोधणारी गोष्ट नाही, तर त्या कवितेच्या अर्थवलयाच्या जवळ जाणारी शास्त्रीय विचारांची चिकित्सा मांडणारी कृती आहे. म्हणजे कविता आणि तिच्या निर्मितीचे, तिच्या उपयोजनाचे काही एक सूत्र यातील काही लेखांमधून काही प्रमाणात मांडले गेलेले आहे. या लेखांमधून 'लयसिद्धांत आणि मराठी कविता', 'उत्तर आधुनिकता आणि नव्वदोत्तर मराठी कविता', 'दलित कविता'– असा काही तात्त्विक विचार आहे. तो या कवितेच्या आस्वादन प्रक्रियेला मदत करणारा नसला तरी, कवितेसंबंधीचा थोडा फार दृष्टिकोन समोर ठेवतो. त्यादृष्टीने या लेखांचा विचार केल्यास ही निखळ आस्वाद प्रक्रिया आहे आणि अर्थाच्या पार्श्वभूमीवर जिवंत राहणारी सुंदर अशी गोष्ट आहे. कवितेचे आणि त्यावर प्रेम करणारे नवे अभ्यासक यांचे खऱ्या अर्थाने टेक्स्टबुक म्हणता येईल अशी या पुस्तकाची मांडणी आहे.

त्यामुळे, या पुस्तकाला, यातील आस्वादयात्रेला वेगळ्या अशा मांडणीतून काही एक नवा अर्थ प्रस्थापित करता आला असता, असे वाचताना वाटत राहते. या ग्रंथाच्या विषयसूत्रांचा विचार करताना वाङ्मयीन सिद्धांत आणि समीक्षा पद्धती हा एक वेगळा भाग अपेक्षित होता व आहे. नाही म्हणायला कवितेला समोर जाताना सोनटक्के यांनी सैद्धांतिक घटितांचा आधार घेतलेला आहेच; परंतु त्यावर स्वतंत्र असा प्रकाश टाकणारा आलेख महत्त्वाचा होता, असे वाचताना वाटत राहते. उदा. यात मानसशास्त्रीय संकल्पनांना समोर जाणारी काही कविता आहे. (उदा. ग्रेस) शिवाय दलित, समाजवादी विचारसरणी, भाषिक अभिसरणाला अनुभवाच्या पातळीवर आणणारी कोलटकरी शैलीची कवितासुद्धा आस्वादाच्या पातळीवर आलेली आहे. त्यादृष्टीने ग्रंथात आधी स्वतंत्र सैद्धांतिक मांडणी व नंतर उपयोजन असे या मांडणीचे सूत्र केले असते, तर ते अधिक सौंदर्य जाणिवेचे झाले असते. म्हणजे या कवितेच्या अर्थाला सिद्धांताच्या आधारावर अभ्यासपूर्णतेने समोर जाता आले असते. त्यामुळे वाङ्मयीन संकल्पना आणि उपयोजन अशा दोन विभागांतून कविता आपल्या अस्तित्वासह आस्वादप्रक्रियेतून रसिकाग्रहीत झाली असती. मात्र लेखसंग्रह असे या ग्रंथाचे स्वरूप असल्याने ते घडून आले नाही.

मात्र तरीही काही बिघडले नाही. या समीक्षाविचारातील कवितेविषयीची आस्था फार मोठ्या कौतुकाला रसिकासमोर ठेवणारी आहे. कवितेवर निरतिशय प्रेम करणारी आहे असे प्रामाणिकपणे वाटते. या पुस्तकाचे वेगळे असे शीर्षक कवितेच्या आस्वादासाठी कविता म्हणून 'अंतःस्वर' हा महत्त्वाचा मानते. ही समीक्षा कवितेचे 'असतेपण' तिच्या संपूर्ण रूपामध्ये एकवटले असते, अशी एक कवितेची रूपवादी मांडणी करणारी आहे. कवितेच्या अर्थाचे घटक कवितेच्या अंतरंगात सामावलेले असतात. तिच्या कविता असण्याचे प्रमाण तिच्या प्रकृतीत वसत असते. त्यादृष्टीने सैद्धांतिक मांडणीचे आकर्षण गैर ठरते, असे मानणारी ही समीक्षा आहे.

या समीक्षा व्यवहारात कवितेचा विचार करताना प्रत्येक कविता उलगडण्याचा वेगवेगळा दृष्टिकोन या आस्वादातून लक्षात येतो. त्यामुळे समीक्षेच्या काही पद्धतीने कविता अनुभवू शकतो असा एक कयास आपणास बांधता येतो. तरीही काही सिद्धांतांचे आरोपण कवितेच्या भावपणाला, त्याच्या अर्थसंरचनेला बाधा आणतात, असे मला वाटते. शेवटी कविता ही भावावस्था आहे. ती कोणत्याही सिद्धांतनाचे बांधील असे स्वरूप नसते कारण कलाकृतीच्या अनवटपणाचे काही एक अनुमान शास्त्र प्रदान करीत असते. तो एक माग असतो; शोधण्याचा सुस्पष्ट असा मार्ग असत नाही. त्यामुळे कविता ही रसिकांच्या मुक्त अशा विचारांचे, कवीप्रमाणे त्याच्या अनुभवाचे स्वतंत्र असे आकलन असते असेही आपणास म्हणता येते. कविता आस्वादताना आपण कविनिष्ठ तर्कदोष किंवा रसिकनिष्ठ तर्कदोष या दोन्हीलाही बळी पडता कामा नये. ह्या अशा गोष्टी टाळल्या, तर आपण कवितेला विशुद्धपणे पुढे जाऊन अर्थाच्या शक्यतेच्या अधिक जवळ जाऊ शकतो, अशी ही भूमिका आहे.

या आस्वादप्रक्रियेची दिशा ठरविताना हा समीक्षक अत्यंत सजग आहे. तो म्हणतो, कवितेच्या आस्वादातून

जाणवणारा अर्थ हे भावसत्य असते, मात्र ते अधिक वस्तुनिष्ठ व मुख्य म्हणजे संहितानिष्ठ असेल याची काळजी घ्यावी लागते. हे करताना कवीच्या चरित्राला वेठीस धरू नये ही माझी भूमिका आहे. कवितेच्या निर्मिती प्रक्रियेतच तिच्या अर्थ–आकलनाच्या शक्यता असतात. कवीचे चरित्र कवितेतील तपशील सांगू शकेल, अर्थ नाही.' अशी एकंदरीत कवितेच्या आकलन, आस्वादनासंबंधी या समीक्षकाची भूमिका आहे. म्हणजे त्यांच्या कविता समजण्याच्या दिशा विशुद्धतेकडे जाणाऱ्या आहेत. त्यामुळे कवितेच्या या आस्वादनाच्या पार्श्वभूमीवर समीक्षक कवितेच्या रूपबंधाकडे अधिक झुकलेले आहेत आणि ही आस्वादन प्रक्रियेतील सुंदर अशी गोष्ट आहे. त्यामुळेच या कवितांच्या बाबतीत होणारे अर्थनिर्णयन कोणत्याही एका टोकाचे उरत नाही. त्यात त्यांची संयत अशी जाणीव स्वतंत्रपणे काम करीत असते.

या ग्रंथात कविता निवडताना विविधता आहे. वेगवेगळ्या भावविश्वांना आपल्या कवितेत त्यांनी स्थान दिलेले आहे. म्हणजे त्यांचा कवितेच्या अर्थासाठी चाललेला शोध विशिष्ट अशा विचारसरणीसाठीचा नाही. या शोधात ग्रेस यांच्या वेगवेगळ्या भावस्थितीचे दर्शन होणाऱ्या कविताही आहेत. ग्रेस यांची सौंदर्यशिल्पाकडे जाणारी प्रेमकविता, 'इराणी..' आणि 'देवी' कविता यांचा शोध असेल, नेमाड्यांच्या 'देखणी'च्या पार्श्वभूमीवर चरित्र आणि भाषाविचारांच्या दृष्टीने घेतलेला शोध असेल. कामगारांचे विश्व कवितेत आणणारे नारायण सुर्वे असतील. नामदेव ढसाळ, अरुण कोलटकर, वसंत आबाजी डहाके ते नव्वदोत्तरी कवितेला समोर जाणारी पिढी अशी सारी कविता त्यांच्या शोधाच्या नजरेतून सुटली नाही; आणि हा शोध केवळ कवितेच्या अध्ययन–अध्यापनासाठी आणि कवितेच्या प्रेमासाठी मांडलेला आहे, असे लक्षात आल्याशिवाय राहत नाही.

सोनटक्के यांच्या दृष्टिकोनातून समीक्षा ही स्वतंत्र निर्मिती असते. तीदेखील कवितेसारखी निर्मितिप्रक्रियेतच आकारास येत असते. त्यासाठी प्रतिभा, वाचन, संस्कार, अभिरुची, अनुभव, व्यासंग पणाला लागत असतो, हे त्यांनी अनुभवले आहे. याचा अर्थ समीक्षा व्यवहार म्हणजे कवितेच्या निर्मितीजवळ जाणारा एक सृजनशील प्रवाह आहे. या प्रवाहाच्या माध्यमातून कवितेच्या अर्थाजवळ जाण्याचा आटोकाट प्रयत्न त्यांच्यातील सृजनबंधाने केलेला आहे, असे या विवेचनावरून म्हणता येते. कवितेचे अर्थांतरण करताना आलेल्या विविध प्रवाहाचे परिशीलन त्यांच्या समीक्षा दृष्टीने मांडलेले आहे. त्यात नव्वदोत्तरी कवितेच्या संबंधी विचार करताना महत्त्वाचे विशेष त्यांनी नोंदविले आहेत आणि ते खरेही आहे. नव्वदनंतरची कविता खूप महत्त्वाची आहे. तिच्यात संख्यात्मकता जास्त आहे. प्रसिद्धीचा सोस आणि माध्यमांची उपलब्धता असल्यामुळे, तिला दर्जा नाही आणि तिने कोणत्याही विचारसरणीचा मागोवा घेतला नसल्याने तिची स्वतंत्र अशी विचारसरणी नाही कारण सगळे प्रवाह एकाच मुख्य सागरावरून क्रमण करताना दिसतात, अशी त्यांची नोंद आहे, आणि ते खरेही आहे असे पाहताना जाणवत राहिले आहे.

अरुण कोलटकरांच्या 'तक्ता' या कवितेचा त्यांच्या आस्वादनाच्या पातळीवर विचार केला तरी, त्यांनी कोलटकरांचे केलेले अर्थनिर्णयन सामाजिक आशयाला जवळ जाणारे त्यांनी सांगितले आहे. त्यातील अस्तित्ववादी दृष्टिकोनही त्यांनी शोधलेला आहे. ही गोष्ट शोधताना त्यांनी एडवर्ड सपीर आणि बेंजामीनली व्होर्प यांचा भाषिक सापेक्षवादाचा सिद्धांतही सांगितला आहे. त्यांच्या मते प्रत्येक अनुभव हा भाषिक अनुभवच असतो. त्यामुळे हा सगळा सैद्धांतिक दृष्टिकोन कोलटकरांच्या कवितेलाही लागू होतो, असे त्यांनी सांगितले आहे. त्यामुळे प्रसंगी कवितेसाठी शास्त्रीय परिमाणाचा आधारही त्यांनी घेतलेला आहे ही गोष्ट प्रामुख्याने सूचित करावयाची आहे.

या सगळ्या अवतरणातून डॉ. देवानंद सोनटक्के यांच्या 'कवितेचा अंतःस्वर' या ग्रंथात समीक्षेच्या आस्वादशील; परंतु कवितेच्या आकलनासाठी उपलब्ध असलेल्या सिद्धांन्तनाला त्यांनी प्रमाण मानून कवितेसाठी अवकाश निर्माण केला आहे. ही वाङ्मय व्यवहारातील अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. आस्वादासोबतच सिद्धांतन करण्याचा त्यांचा प्रयत्न या ग्रंथात महत्त्वाचा आहे.

▣▣▣

**दा. गो. काळे**
रोकडीया नगर, शेगाव, जिल्हा बुलढाणा –४४४२०३
चलभाष : ९४२१४६७६४०
ईमेल : dgkale.atirikta@gmail.com

# कोरोनाच्या कृष्णछायेत : तिसरं महायुद्ध

**कोरोना महासाथीशी लढणाऱ्या व्यक्ती व संस्थांबाबतच्या, डॉ. मृदुला बेळे लिखित 'कोरोनाच्या कृष्णछायेत' या पुस्तकावरील लेख.**


## जुई कुलकर्णी

अगदी नुकतंच घडून गेलेलं वास्तव झटकन एक भयकारी इतिहास होऊन समोर आलंय असं क्वचितच घडतं. सध्याचा काळ हा असाच आहे.

गेले अनेक महिने आपण ज्या गोठवणाऱ्या, गुदमरून टाकणाऱ्या भीषण संकटाला सामोरे जातोय त्या कोरोनाविषयी सबकुछ आहे हे पुस्तक: कोरोनाच्या कृष्णछायेत.

कोरोनाच्या उत्पत्तीपासून या विषाणूच्या दूरगामी आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि जागतिक परिणामाबद्दल हे पुस्तक सांगतं. पुस्तकाची सुरुवातीची काही प्रकरणं तर एखाद्या उत्तम थ्रिलर वेबसिरीजच्या एपिसोडसारखी थरारक, मनोरंजक आहेत.

कोरोनाच्या उत्पत्तीची कथा कशी सुरू झाली. चीनमधली हुकूमशाही, लपवाछपवी, हलकटपणा, तिथल्या सामान्य नागरिकांची, पत्रकारांची मुस्कटदाबी हे सगळं या पहिल्या काही प्रकरणांमधे आलं आहे. हे पुस्तक अर्थातच कादंबरी नाही त्यामुळे दरम्यान भरभरून शास्त्रीय माहितीही येत राहते जे अपेक्षितही आहे; पण तोवर माझ्यासारखा सायन्सची फारशी बॅकग्राउंड नसणारा सामान्य वाचकही या फिक्शनसारख्या वास्तवात गुंतून जातो कारण या मार्च महिन्यापासून जगाचं वास्तव एका भीषण विकृत




**कोरोनाच्या कृष्णछायेत**
लेखक : **डॉ. मृदुला बेळे**
प्रकाशक : **राजहंस प्रकाशन**
प्रथमावृत्ती : **जुलै २०२०**
पृष्ठे : **२४९** मूल्य : **३००/–**

फिक्शनसारखं झालंय.

कोरोनाच्या कृष्णछायेत या पुस्तकाची लेखिका डॉक्टर मृदुला बेळे औषधविज्ञानाच्या क्षेत्रात गेली अनेक वर्षं कार्यरत आहे. तिचा कायद्याचा अभ्यास आहे, पेटंटचाही अभ्यास आहे. सहसा विद्वान माणसं त्यांच्या अभ्यास विषयावर मराठीत लिहताना रटाळ होण्याची शक्यता असते. त्यामुळे ते लिखाण कितीही उत्तम रीतीने, कष्टपूर्वक केलेलं असलं तरी ते सामान्य माणसापर्यंत पोचत नाही; परंतु या पुस्तकात तसे झालेले नाही हे विशेष. सर्वांत महत्त्वाचं म्हणजे पुस्तकाची भाषा सहज, सोपी आहे. मृदुलाने सोशल डिस्टंसिंगसाठी अंतरभान असा साधासा आणि अर्थवाही मराठी शब्द कॉईन केला आहे; पण उगीचच अनावश्यक तिथे जड मराठी शब्द तयार केलेले नाहीत. तिला सांगायचं काय आहे हे निश्चित आहे. रंजक शीर्षकं असलेल्या लहान प्रकरणांमधे ते लिखाण विभाजित केलंय.

शुगर कोटेड कॅप्सूलसारखं आपल्याला कोरोना या विषयावरचं सगळं काही ज्ञान या पुस्तकात मिळतं. विशेष महत्त्वाची गोष्ट अशी, की कुठलाही विषय गाळलेला, टाळलेला नाही. तबलगींबद्दल अत्यंत संयमानं लिहिलंय. रादर कुठल्याच धर्माला सोडलेलं नाही. मजुरांविषयी, स्थलांतराविषयी करुणेनं, माणुसकीनं लिहिलंय.

मोदी सरकारने मार्च महिन्यात घेतलेले निर्णय, भारतातील कोरोना लढाईच्या चांगल्या आणि वाईट गोष्टी यांच्या रोखठोक नोंदी समोर मांडल्या आहेत. आगामी लशीविषयी माहिती आहे. उपकारक औषधांविषयी चर्चा आहे. प्लाझ्मा थेरपीची माहिती आहे. जगभरातील शास्त्रज्ञांच्या एकजुटीचं वर्णन आहे.

खरं तर या पुस्तकात कोरोना काळातल्या संपूर्ण जगाचंच प्रगतिपुस्तक मांडलं आहे. टूंपचा नाचरेपणा आणि थयथयाट, वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशनचा बोटचेपेपणा आणि गोंधळ, इटलीतला ओढवून घेतलेला उद्रेक, जपानमधे अडकलेली क्रूझ, तैवानची चतुराईनं मात, इंग्लंडमधला गोंधळ, स्वीडनचा उलटाच उपाय, इराणी आत्मघाती वेडेपणा हे सगळं काही या कोरोनाच्या कृष्णछायेत आहे.

या पुस्तकात काही फिक्शनल कॅरॅक्टर आणलीयंत आणि काही वास्तव कॅरॅक्टर्स तर आहेतच.

कोरोनानं मानवी आयुष्याला ज्या ज्या प्रकारे बदलून टाकलंय ते सर्व काही या पुस्तकात उल्लेखित झालं आहे आणि हे उल्लेख वरवरचे नाहीत कारण लेखिका मुळात संशोधन प्रवृत्तीची शास्त्रज्ञ आहे.

पुस्तकाचं नाव अगदी समर्पक आहे. इतक्या कमी कालावधीत (त्यातही यातला बहुतेक काळ भारतात कडक लॉकडाऊन असताना) इतकं अभ्यासपूर्ण पुस्तक लिहून दर्जेदार स्वरूपात उपलब्ध करणं हे लेखिका आणि राजहंस टीम या सगळ्यांसाठी जणू शिवधनुष्यच असणार.

हे एकप्रकारे तिसरं महायुद्धच आहे. या लढाईची पद्धत मात्र वेगळी आहे. कोरोनाच्या या काळ्या काळाच्या नोंदी अवश्य वाचा.


▣▣▣

**कोरोनाच्या कृष्णछायेत या पुस्तकाची लेखिका डॉक्टर मृदुला बेळे औषधविज्ञानाच्या क्षेत्रात गेली अनेक वर्षं कार्यरत आहे. तिचा कायद्याचा अभ्यास आहे, पेटंटचाही अभ्यास आहे. सहसा विद्वान माणसं त्यांच्या अभ्यास विषयावर मराठीत लिहताना रटाळ होण्याची शक्यता असते. त्यामुळे ते लिखाण कितीही उत्तम रीतीने, कष्टपूर्वक केलेलं असलं तरी ते सामान्य माणसापर्यंत पोचत नाही; परंतु या पुस्तकात तसे झालेले नाही हे विशेष.**

**जुई कुलकर्णी**
सन रेसिडेन्सी, अ ४०१, धायरी, पुणे– ४१
चलभाष : ९८९०५४४३३६

# ‘ड्रॅगनचे करोनास्त्र’– एका जैविक अस्त्राची शोध यात्रा

**करोना महासाथीची सुरुवात प्रसार आणि जागतिक परिणामाचा वेध घेणाऱ्या ‘ड्रॅगनचे करोनास्त्र’ या पुस्तकावरील लेख.**




लेखसंग्रह : **ड्रॅगनचे करोनास्त्र**
लेखकः **अरविंद व्यं गोखले, वासुदेव कुलकर्णी**
प्रकाशक : **गंधर्ववेद प्रकाशन, श्री खाडिलकर**
प्रथमावृत्ती : जून २०२०
पृष्ठेः**२१६** मूल्य : **२५०/–**

## डॉ. संदीप श्रोत्री

नुकतेच जून २०२० मध्ये माझे मित्र आणि दैनिक ऐक्यचे कार्यकारी संपादक श्री. वासुदेवराव कुलकर्णी आणि त्यांचे गुरू आणि मित्र असणारे ज्येष्ठ संपादक श्री. अरविंद गोखले यांनी लिहिलेले ‘ड्रॅगनचे करोनास्त्र’ हे सुंदर पुस्तक हातात पडले आणि लगेच वाचूनही संपविले. पुस्तकाचे शीर्षक आणि मांडणी अतिशय सुरेख झाली असून एक मित्र आणि वैद्यकीय विषयातील तज्ज्ञ या नात्यापेक्षा एक ‘करोना’ बाबत गोंधळून गेलेला नागरिक म्हणून मला हे पुस्तक जास्त भावले.

जानेवारी २०२० पासून वूहान या चीनमधील शहरामध्ये जन्मलेला करोना नावाचा आजार वेगाने जगभर पसरला, हे खरेच आहे; परंतु त्याहीपेक्षा जास्त वेगात प्रत्यक्ष शारीरिक आजार होण्यापेक्षा मानसिक पातळीवर हा आजार सर्वत्र पसरला, हे जास्त सत्य आहे. या आजाराची मारकक्षमता ही अवघी दोन ते चार टक्के असली तरीही त्याच्याबाबत समज आणि गैरसमज हे अनंत पटीने जास्त आहेत. त्यातून प्रत्यक्ष सत्य जाणून घेऊन मर्यादित स्वरूपाचे भय, मोजकी काळजी आणि स्व–निर्बंध घालून या आजारावर मात करणे शक्य आहे, हे ठासून सांगण्याचा अतिशय स्तुत्य प्रयत्न या संपादक जोडीने या पुस्तकातून केला आहे,

यात शंकाच नाही. एक विशेष म्हणजे मराठी भाषेतच नव्हे तर मला वाटते, की सर्व भारतीय भाषांमध्ये या जगभर धुमाकूळ घालणाऱ्या महामारीबाबत अतिशय साध्या, सोप्या; परंतु शास्त्रीय भाषेमध्ये प्रकाशित झालेले हे पहिलेच पुस्तक आहे, त्या बाबत उभयता लेखक आणि 'गंधर्ववेद' प्रकाशनाचे श्री. खाडिलकर आणि त्यांचा सर्व कर्मचारी वर्ग अभिनंदनास पात्र आहेत.

या आजाराबाबत व्हॉट्स अप, फेसबुक आदी सोशल माध्यमे आणि गुगल, विकीपिडिया सारखे माहितीचे महाकोश आणि रोजच्या वाचनात येणारी वर्तमानपत्रे ही कोणत्या थराला जात गैरसमज पसरवत आहेत, त्याला तोड नाही. त्यामध्ये जागतिक आरोग्य संघटना, राष्ट्रीय आणि प्रादेशिक पातळीवरील अपरिपक्व नेते मंडळी आणि काही वैद्यकीय क्षेत्रातील महाभागदेखील सामील आहेत. संपूर्ण जगभरातील जनता गोंधळून गेली आहे; परंतु त्याच वेळी एखाद्या दीपस्तंभासारखे हे पुस्तक मराठी साहित्यामध्ये वाचकांच्या हाती आले आहे. 'गुगल'चा उदय होण्याअगोदरच्या काळामध्ये ज्यांनी खऱ्या अर्थाने बहुश्रुत राहून विविध विषयांवरील असंख्य संदर्भ ग्रंथ वाचून गेली पन्नास-साठ वर्षे सर्व विषयावर सखोल आणि विपुल लेखन केले आहे आणि ते वाचकांच्या पसंतीस उतरले आहे, अशा दोन व्यासंगी पत्रकार-संपादक महाशयांनी हे पुस्तक सर्वार्थाने सर्व समावेशक असे लिहिले आहे. 'करोना' या आजाराला नुसताच एक वेगात फैलावणारा विषाणूजन्य आजार इतकाच संदर्भ नाही. त्याला अनेक पैलू आहेत. अगदी 'हत्ती आणि सात आंधळे' या गोष्टीसारखा. एकमेकांवर कुरघोडी करण्यासाठी धडपडणारे आंतरराष्ट्रीय राजकारण, पृथ्वीच्या पाठीवर अत्यंत वेगात असणारे दळणवळण आणि आंतरराष्ट्रीय व्यापार, जबाबदारीचे भान न राखता देश-परदेशात फिरणारे धार्मिक प्रसारक, वैद्यकीय अभ्यासामध्ये कायम दुर्लक्षित ठेवलेला 'रोग प्रतिबंधक आणि सामाजिक औषध वैद्यक (जन वैद्यक) शास्त्र' हा विषय आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे विषाणूंना मारक ठरणारी एक ना धड भाराभर चिंध्या असणारी अनेक औषधे यांचा (काळा) व्यापार अशा अनेक अंगाने हे पुस्तक लिहिले गेले आहे. दोघांचा पिंड हा पत्रकारिता हाच असल्यामुळे साहजिकच करोनाच्या जन्म आणि प्रसारामागील राजकीय संदर्भ आणि त्याचा भविष्यातील वेध यावर जास्त भर दिला गेला आहे, हे अपेक्षित आहे.

या पुस्तकाला श्री. अभय टिळक यांची प्रस्तावना लाभली आहे. इतिहासकार आणि पत्रकार यांचे नाते जवळचे असते, हे सांगून त्यांनी या पुस्तकाचे 'समकालीन इतिहासाचे एक यथार्थ मॉडेल' असे वर्णन केले आहे. अमेरिका आणि चीन या दोन मदमस्त हत्तींची ही झुंज आहे आणि त्यांच्या पायाखाली उद्ध्वस्त होणाऱ्या गवताप्रमाणे बाकीचे जग आहे, असे त्यांनी सांगितले आहे. ती झुंज संपली, की उभारू बघणाऱ्या नव्या जगाला पायाभूत खतपाणी पुरवणारे हे पुस्तक असेल, असे त्यांनी समर्पक वर्णन केले आहे.

सुरुवातीलाच मनोगतामध्ये लेखकांनी या पुस्तकाच्या शीर्षकातच चीन, करोना आणि त्याचा संहारक अस्त्र म्हणून केलेला वापर हे सर्व आपोआपच लक्षात येते, असे सांगितले आहे. साथीचे रोग किंवा एकूणच वैद्यक शास्त्र आणि आमचा संबंध फारसा नसला तरीही ही महामारी आंतरराष्ट्रीय झाल्यामुळे त्याचे परिणाम हे बऱ्याच काळापर्यंत वैश्विक राहणार आहेत, म्हणूनच या समस्येचा उगम आणि वास्तव तसेच भविष्य यांचा वेध आम्ही घेत आहोत, असे अतिशय प्रांजळपणे लेखकांनी नमूद केले आहे.याच मनोगतामध्ये सर्वांत शेवटी लेखकांनी मराठी माणसासाठी (म्हणजे वाचकांना) एक इशारेवजा भविष्य सांगितले आहे, ते म्हणजे, करोनाच्या भीतीने लक्षावधी मजुरांचे तांडे त्यांच्या राज्यात मुंबई-पुणे येथून गेले आहेत, ते परत येतील न येतील; पण त्यांची जागा घेण्यासाठी मराठी माणूस आढळणार नाही.

एकूणच या २१६ पानी पुस्तकामध्ये एकूण अकरा

प्रकरणे असून दोन परिशिष्टे अंतर्भूत आहेत. पहिल्या परिशिष्टामध्ये करोना विषाणूचा शोध पंचावन्न वर्षांपूर्वी लावणाऱ्या डॉ. जून अल्मेडा यांची माहिती आहे, तर दुसऱ्यामध्ये जगात यापूर्वी आलेल्या साथरोगांच्या महामारीचा दोन हजार वर्षांचा इतिहास आहे. त्याला आधार म्हणून सर्वांत शेवटी संदर्भ ग्रंथ सूचीदेखील आहेत.

पहिल्या दोन प्रकरणांमध्ये वूहान शहरातील करोना विषाणूची सुरुवातीची लागण आणि त्याच्यामुळे निर्माण झालेली त्या शहरातील भयावह परिस्थिती याचे सत्य (चीनने लपविले असले तरीही) वर्णन आहे. करोना हे जैविक अस्त्र म्हणून जगभरातील प्रगत राष्ट्रांच्या विरुद्ध कसे वापरले गेले, आणि त्यामुळे त्यांचे अब्जावधी डॉलर्सचे नुकसान झाले, याचे आकडेवारीसह दाखले दिलेले आहेत. जैविक अस्त्रे म्हणजे काय आणि त्यांचा युद्धामधील वापर यांचा इतिहास वाचनीय आहे. 'मर्कजचे महापाप' या प्रकरणामध्ये लेखकांनी एखादा अग्रलेख लिहावा या शैलीमध्ये तबलिगी समाज आणि त्यांच्या जगभर पसरलेल्या मशिदी, दिल्लीमधील अधिवेशनामुळे भारतीय उपखंडात करोना पसरण्यासाठी झालेली मदत याचा समाचार घेतला आहे. अतिशय संवेदनशील असा हा विषय सडेतोड भाषेमध्ये शब्दबद्ध करण्यात आला आहे.

करोनाचा उदय झाल्यापासूनच जागतिक आरोग्य संघटना आणि चीनचे अध्यक्ष शी जीनिपिंग यांचे वर्तन संशयास्पद आहे, त्यातच अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप हे आपल्या मूर्ख विधानांनी त्यात भर घालत आहेत. हा सगळा सावळा गोंधळ जगाला आणखीनच बुचकळ्यात टाकणारा होता, त्याचे अतिशय मार्मिक वर्णन 'रोगट आरोग्य संघटना' या प्रकरणामध्ये आलेले आहे. जागतिक आरोग्य संघटनेला जगाचे आपण काही देणे लागतो याचा विसर पडला, असे स्पष्ट विधान लेखक करतात. शी जीनिपिंग हे चीनच्या इतिहासातील तिसरे सम्राट बनले आहेत. आल्या आल्या त्यांनी चीनच्या लष्करामध्ये जैविक अस्त्रांची नवी शाखा सुरू केली. या संदर्भात लेखकाने अतिशय चपखल बसणारे वाक्य टाकले आहे, 'शस्त्र आणि शास्त्र यात मराठी भाषेत असणारा एक कान्याचा फरक त्यांनी (जीनिपिंग) संपवून टाकला.' वूहान शहरात विषाणू संशोधन केंद्राशेजारीच 'साथ-रोगप्रतिबंध संस्था' आहे. करोना विषाणू याच संस्थेतून सुरुवातीला वूहान शहरामध्ये आणि नंतर जगभर पसरला असा संशय आहे, आणि त्या कारस्थानात खुद्द शी जीनिपिंग यांचा हात असावा. या संस्थेची तपासणी करून ती आजाराचा प्रतिबंध करणारी संस्था आहे का प्रसार करणारी? असा प्रश्न चीनच्या अध्यक्षांना लेखकांनी केला आहे.

या पुस्तकातील सर्वांत महत्त्वाचे आणि चिंतनीय असे प्रकरण आहे 'निसर्गाचा धडा.' निसर्ग हाच अंतिमदृष्ट्या महान आहे, मानवाची वाढती लोकसंख्या ही मर्यादित नैसर्गिक साधनसंपत्ती ओरबाडू लागली आणि असमतोल सुरू झाला. इसवी सन १७९८ साली माल्थस नावाच्या शास्त्रज्ञाने असा सिद्धांत मांडला होता, की निसर्गावर विजय मिळविण्याच्या नादात मानवाने कितीही प्रगती केली तरी निसर्ग हाच पृथ्वीचा नियंत्रक होता, आहे आणि भविष्यातदेखील असेल. करोना नावाच्या चिमुकल्या विषाणूने हाच धडा आपल्याला दिला आहे. प्राणी, पक्षी आणि वनस्पती हे अन्नासाठी धडपडत असतात, पुरेसे अन्न मिळाले की गप्प बसतात; परंतु मानव हा 'सुधारित' (?) प्राणी मात्र अन्नाबरोबरच वस्त्र आणि निवारा यासाठी सतत संशोधन करत असतो आणि त्याच्या जोडीला मनामध्ये राक्षसी महत्त्वाकांक्षा ठेवून साम्राज्यवादी बनतो. हीच हाव त्याच्याच अस्तित्वावर घाव घालणारी आहे, हे विदारक सत्य लेखक अधोरेखित करताना माल्थसपासून नंतरच्या अनेक पर्यावरण शास्त्रज्ञांचे दाखले देतात. सुखासीन होण्यासाठी नवे नवे शोध लागत असताना कित्येक कोटी लोक हे अद्यापही दारिद्र्य रेषेच्या खाली आहेत. हेच दारिद्र्य वांशिक, धार्मिक आणि सामाजिक

विषमता वाढवते आणि दंगली घडवून आणते. ह्या सगळ्याला कारणीभूत निसर्गाचा 'मानवनिर्मित' असमतोल आहे हे नक्की. करोना साथीच्या पार्श्वभूमीवर माल्थसच्या सिद्धांताचा व्यापक अर्थ आपण नव्याने समजून घ्यायला हवा आणि त्यावर मूलभूत संशोधन व्हायला हवे, असे लेखकाचे आग्रही सांगणे आहे. याच उपभोगी वृत्तीमुळे पर्यावरणाचा नाश होत आहे आणि त्याचे परिणाम जागतिक तापमानवाढीच्या रूपाने आपल्याला भोगावे लागत आहेत. दरवर्षी जंगलतोडीमुळे जंगलातील वाघ-बिबट्यांसारखे प्राणी गावांमध्ये शिरत आहेत, त्यांच्या पाठोपाठ बाकीचे पशुपक्षी बाहेर पडत आहेत, आणि दुर्दैवाने त्यांच्या संगतीने वाढणारे असंख्य सूक्ष्म जीवाणू-विषाणू मानवाच्या शरीरात घुसत आहेत. हवा आणि पाण्याच्या प्रदूषणामुळे दर वर्षी सव्वा कोटी लोक आपले प्राण गमावत आहेत, बाकीचे साथीचे आजार त्यात भर टाकत आहेत. पृथ्वीवरील मानवाचे अस्तित्व पुसले जाण्याची ही नांदी ठरावी, असा धोक्याचा इशारा लेखक आपल्याला देतात.

या साथीमुळे जगाचे व्यवहार ठप्प झालेले आहेत. कोट्यवधी कामगारांचे रोजगार बंद पडले आहेत. त्याचा आर्थिक परिणाम पुढील अनेक वर्षे आपल्या सर्वांना भोगावा लागणार आहे. सर्वांत भीषण तीव्रता ही अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेला बसणार असून आत्तापर्यंत चिनी वस्तूंच्या व्यापाराला अमेरिकेकडून सातत्याने खतपाणी घातले गेल्यामुळे आता कावेबाज चीन आर्थिक महासत्ता नंबर एक बनू पहात आहे, त्यासाठी चीनला संपूर्ण जगातील इतर राष्ट्रांच्या रोषाला बळी पडावे लागत असले तरी चीन त्याला भीक घालेल असे वाटत नाही; पण या सगळ्या पार्श्वभूमीवर उभे जग भारताकडे एक नवी महासत्ता म्हणून बघू लागणार, अशी भविष्यवाणी या पुस्तकात केली गेली आहे. करोनाच्या संकटामुळे ब्रह्मांडाला गवसणी घालू पाहणारी मानवजात किमान शंभर वर्षे मागे गेली आहे. चंगळवादी जीवनशैलीला हा मोठा लगाम घातला गेला आहे. तुमच्याकडे कितीही पैसा असला तरी निरोगी आयुष्य तुम्हाला विकत घेता येत नाही, हा मोठा अनुभव आपणा सर्वांना मिळाला आहे. पैसा हेच सर्वस्व मानणाऱ्या नव-श्रीमंत लोकांना बंद सदनिकेमध्ये कोंडून घेतल्यावर, निसर्गामधील मुक्त जगणे किती अमूल्य आहे याची खात्री पटली आहे. 'करोनानंतरचे जग' या प्रकरणामध्ये याच मुद्द्यावर भविष्यातील माणसाचे जीवन कसे असेल याचे अंदाज लेखकांनी मांडले आहेत, केवळ मुखपट्टी (मास्क) आणि सामाजिक सहा फुटांचे अंतर इतक्यावर भागणार नसून गरजेपुरतेच बाहेर पडणे, गरजेपुरतेच खाणे आणि अनावश्यक चैन हे कायमचे बंद करायला हवे. धार्मिक, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, कृषी, शिक्षण आणि पर्यटन यांच्यासह राजकीय क्षेत्रात प्रचंड आणि अनपेक्षित बदल या करोनाच्या साथीमुळे होणार आहेत, याचे चित्र आपल्यासमोर लेखकांनी उभे केले आहे.

या पुस्तकाच्या शेवटच्या 'करोना आता जा ना!' या प्रकरणामध्ये शेवटी एक भाकीत केले आहे, ते असे की आपली गेलेली पत परत आणण्यामध्ये चीनचे अध्यक्ष शी जीनिपिंग यांना अपयश येणार आणि कदाचित ते तैवान आणि भारत यांच्याशी असणारे जुने वैर जागृत करून पुन्हा भांडण उकरून काढतील. पुस्तक प्रकाशित झाल्यानंतर दोनच महिन्यांमध्ये हे भविष्य खरे ठरेल असे वातावरण आहे. द्रष्टे लेखकद्वय जणू राजकीय भविष्यवेत्तेच आहेत! आणि त्यामुळेच हा ग्रंथ म्हणजे इतिहासाचे योग्य अवलोकन करून भविष्याचा अचूक वेध घेण्याची शोध-यात्रा असे सार्थ वर्णन करावे लागेल. केवळ वाचनीय नव्हे तर संग्रही ठेवून संदर्भ म्हणून घरातील ग्रंथालयात ठेवावे असे हे पुस्तक आहे.


▣▣▣

**डॉ. संदीप गजानन श्रोत्री**
इला बंगला. ४७६/७ सदर बाझार,
शाहू स्टेडियम समोर, सातारा ४१५००२
चलभाष : ९८२२०५८५८३

वंचितांच्या जीवनातील
काळोखाच्या कवितांवरील
समीक्षा लेख.

# काळोखाच्या कविता : अस्तित्वाचा अन्वयशोध


## डॉ. चंद्रकांत चव्हाण



**काळोखाच्या कविता**
कवी: **नामदेव कोळी**
प्रकाशक: **वर्णमुद्रा पब्लिशर्स, शेगाव**
प्रथम आवृत्ती: **जुलै २०२०**
पृष्ठे: **११६** मूल्य: **२५०/-**


अनुभवांचे संचित हाती देऊन काळ पुढे निघतो. वळताना मागे काही प्रश्न ठेवून जातो. काळाने समाजजीवनावर ओढलेल्या रेषांचा शोध साहित्यिक सतत घेत असतो. संवेदनांच्या प्रतलावरून वाहणाऱ्या प्रवाहात जगण्याच्या गुंत्याची उकल करू पाहत असतो. व्यवस्थेच्या वर्तुळात जगताना हरलेल्या, हरवलेल्या समूहाची विखंडित स्वप्ने अधोरेखित करणारी साहित्यकृती व्यवस्थेने नाकारलेल्या उत्तरांचा शोध असते. काळाचे किनारे धरून उत्तरांच्या शोधात ती पुढे जात असते. काळाचे गुंते उकलत प्रश्नांना सामोरे जाणाऱ्या साहित्यामध्ये आश्वस्त करणारा आशावाद कायम असतो. आस्थेचा ओंजळभर ओलावा घेऊन वेदनांची उत्तरे शोधू पाहणाऱ्या प्रवाहात नामदेव कोळींच्या कवितेचा अंतर्भाव आवर्जून करता येईल.

पद, पैसा आणि प्रतिष्ठेच्या चौकटींमध्ये बेगडी अस्मिता मिरवणारा एक वर्ग व्यवस्थेत वास्तव्याला असतो. संकुचित विचारांना व्यापकतेचे परिमाण देऊन सामान्यांना आपल्या प्रभावात आणण्याची कोणतीही संधी हा वर्ग सहसा सोडत नाही. स्वहित हाच याचा प्राधान्यक्रम असतो. स्वार्थ हीच सेवा असते. काळाच्या कोणत्याही तुकड्यात याला शोधला, तरी त्याच उन्मादात जगताना तो आढळतो, तर दुसरीकडे अभावाचाच प्रभाव असणारा आणखी एक वर्ग

जगण्याशी दोन हात करत आयुष्याचे अर्थ शोधत असतो. व्यवस्थेच्या वर्तुळात हरवलेल्या समूहाचे आवाज ही कविता मुखरित करते. वर्गीय चौकटींच्या परिघांना ओलांडून नव्या परगण्यांचा शोध घेत वास्तवाच्या प्रांगणात येते. व्यवस्थेतील वैगुण्ये मांडतांना विचारप्रवृत्त करते. आत्मनिष्ठेकडून समाजनिष्ठेकडे वळताना नव्या क्षितिजांचा शोध घेऊ पाहते.

परिसरातून प्राप्त होणाऱ्या अनुभवांचे पाथेय सोबत घेऊन साहित्यिक व्यक्त होत असतो. त्याचे व्यक्तिमत्त्व, जीवनदृष्टी साहित्यनिर्मितीच्या केंद्रस्थानी असते. ती वेगळी गृहीत धरता येत नाही. जगणं काळाशी अन् परिसराशी निगडित असतं. समाजातून मिळालेलं संचित दिमतीला घेऊन कविता स्व शोधता शोधता साकार होते, व्यक्तीकडून समष्टीकडे नेते. नामदेव कोळींची कविता यास अपवाद नाही. या कवितेतून प्रकटणारे प्रश्न भले प्रासंगिक असतील, सीमित असतील; पण प्रकृतीनुसार तसे सार्वत्रिकच आहेत. त्यांना समजून घेताना कवी त्यांच्याशी भिडतो. त्यांची उकल करू पाहतो. आपल्या अस्तित्वाचे अन्वयार्थ त्यात शोधू पाहतो.

साहित्यातून साहित्यिकाला शोधण्याचा प्रयत्न होतच असतो. त्याच्या भूमिका त्यातून पडताळून पाहता येतात. कवीच्या अंतर्यामी भावनांची अनेक आंदोलने स्पंदित होत राहतात. त्यांचा नाद संवेदनशील वाचकाला टिपता येतो. काळोखाच्या कातळावर काव्यतीर्थे कोरण्याची कवीच्या अंतर्यामी असणारी आस साक्षात्कार बनून प्रकटते. कवितेचे कडवे धरून अधिष्ठित झालेल्या अनुभवांची, प्रश्नांची दाहकता आकळत जाते. आसपास नांदणाऱ्या परिस्थिती एकेक अर्थ उलगडत जातात. काळोखाचे कोपरे कोरत कवडसे शोधू पाहताना कवी म्हणतो,

**साधूचे कुळ पुसू नये,**
**नदीचे मूळ पुसू नये,**
**काळोखाचे गूढ पुसू नये.**
(काळोखाच्या कविता: पृ.१३)

कवितेची सर्वमान्य व्याख्या करणे एक अवघड प्रकरण असते. काळाच्या गर्भातून उगवणाऱ्या वाटेने येणाऱ्या असंख्य प्रश्नांचा तो शोध असतो. कविता वाचताना आपलं असं काही हाती लागलं, की वाचकाला ते आपलेच वाटायला लागते. परकेपणाच्या सीमा धूसर होत जातात. शब्द कुणाचेतरी; पण अनुभव आपले, असे लेखन म्हणजे कविता, असे म्हटले तर नामदेव कोळींच्या कवितेतून वाचकाला आपलं असं काही गवसल्याने ती आपलीच वाटू लागते.

इतिहास संस्कृतीचे अपत्य आहे. इतिहासच संस्कृतीच्या चौकटींमध्ये स्वातंत्र्याला संकुचित करू पाहतो, तेव्हा अंधाऱ्या वाटांवरून चालणारा कोणीतरी पथिक संदर्भांना असणारे पदर उलगडू लागतो. इतिहासाची पाने तपासून पाहत शब्द वास्तवाला सामोरे जातात, तेव्हा काळोखात कुणीतरी खोदकाम करून पलीकडचा उजेडाचा काठ शोधण्यासाठी किनारे कोरत राहतो. कवी म्हणतो,

**इतिहासात काळोखाचे संदर्भ आहेत**
**अर्थात ...**
**काळोखालाही इतिहास आहे.**
(काळोखाच्या कविता: पृ.१३)

व्यवस्थेत शतकांपासून चालत येणारी विषमता काही अद्याप संपवता आली नाही, भलेही त्याचे पीळ जरा सैलावले असले तरी. अशा व्यवस्थेत स्वतःचा शोध घेऊ पाहणारा कवी विषमतेची दाहकता विसरू शकत नाही. खरं तर काळोखाचा इतिहास स्वतःहून कधीच बदलत नसतो. तो प्रयत्नपूर्वक बदलावा लागतो किंवा घडवावा तरी लागतो. जगण्याच्या अनेक प्रश्नांच्या गुंत्यात गुरफटलेला फाटका माणूस अवस्थ पातळीवर उभं राहून ती बदलण्याची आस ठेवतो.

परिस्थिती परिवर्तनाचे प्रयोग केल्याच्या कितीही वार्ता घडत राहिल्या, तरी सामान्य माणसांच्या जगण्यातले भोग काही केल्या मिटत नाहीत. मूठभरांच्या सुखांच्या संकल्पित संकल्पना म्हणजे जगणं नसतं. जगण्याला अनेक कंगोरे असतात. त्यांचे परीघ असतात. प्रगतीच्या स्वप्नांना सामान्यांच्या ओंजळभर आकांक्षा का पूर्ण करता येत नसतील, हा प्रश्न अधिक अस्वस्थ करीत जातो. खूप मोठ्या अवकाशाला आपल्यात सामावणारी

त्यांची सरकारी दवाखाना ही कविता जीवनाच्या संगती-विसंगतीवर प्रखर भाष्य करते. कवी म्हणतो,

**शहरातल्या सरकारी दवाखान्यात**
**भरती झालंय गाव,**
**कुणीतरी वयात आलेली पोरगी**
**मोजतेय शेवटच्या घटका**
**आयसीयूच्या पलंगावर**
**आवडत्या जोडीदाराशी**
**थाटता आला नाही संसार**
**अन् परक्या जातीतल्या**
**मुलाशी नाव जुळल्यानं**
**बदनामीच्या भीतीपोटी**
**जीव संपवण्याचा प्रयत्न केलाय तिनं**

(सरकारी दवाखाना: पृ. ५५)

ज्यांच्या जगण्यात सदैव अंधारच साचलाय, त्यांचं जगणं मुखरित करणाऱ्या नामदेव कोळींच्या काळोखाच्या कवितेचं नातं सतत भळभळणाऱ्या जखमांशी आहे. सर्वसामान्यांच्या जगण्यात असणारी असुरक्षिता, अस्वस्थता, अगतिकता घेऊन कवी व्यक्त होतो. गाव, समाज, तेथील माणसे, त्यांचे जगण्याचे प्रश्न, आयुष्यातले गुंते, समस्यांशी त्यांच्या लेखणीचं सख्य आहे. काळ बदलला, त्याची परिमाणे बदलली, तरी परंपरेच्या धाग्यांपासून तुटून दूर जाणे अवघड असल्याची जाणीव या कवितेतून व्यक्त होत राहते.

बापाला परिस्थितीच्या चक्रात फिरण्याचा शाप नियतीने दिलेला आहे. नियतीच्या अभिलेखांना नाकारून परिस्थितीवर स्वार होत लढण्याचे वरदानही अभावग्रस्त जगण्याने दिले आहे. बापाचं नातं गावातील मातीशी घट्ट जुळलं आहे. परिस्थितीची दाहकता सहन करूनही न मोडणारा, एकाकी झुंज देणारा योद्धाच जणू. आयुष्याच्या उतरणीवर लागूनही बापाचं संस्कृतीशी, संस्कारांशी असणारं नातं दोलायमान होत नाही. शेत, शिवार, गुरावासरांशी त्याच्या मर्मबंधाच्या गाठी बांधल्या आहेत; गोठ्यात एकही ढोर शिल्लक नसले तरीही. कवी याच विजिगीषू संस्कारात वाढला, घडला आहे. परिस्थितीच्या परिघात स्वतःचा शोध घेत राहिला आहे. त्यांचे अनुभव, दुःख नुसते परिघाभोवतीच्या प्रदक्षिणा नाहीत म्हणूनच त्यांचे शब्द अंगभूत सामर्थ्य घेऊन अभिव्यक्त होतात. गावमातीच्या गंधाची सोबत करीत राहतात.

महात्मा गांधींनी खेड्यांना सक्षम करण्याचे स्वप्न पाहिले; पण काळाचा रेटाच मोठा असल्याने त्यांच्यात घडणारे बदल थांबवता आले नाहीत. साठ-सत्तर वर्षांपूर्वी दिसणारी गावे आज गावपण विसरून शहरी सुखांच्या उताराने वाहत आहेत. परिस्थितीच्या आवर्तात सापडलेली गावं जागतिकीकरणाच्या वाटांनी चालताना अगतिकीकरणाच्या वळणावरून वळत आहेत; पण व्यवस्थेच्या चौकटी अभेद्यच आहेत. त्यांना उद्ध्वस्त करण्यासाठी अनेक आघात करूनही त्यांचा टवकासुद्धा उडत नाहीये. मूठभर लोकांच्या खिशात आलेल्या पैशाने देशाला महासत्ता होण्याची स्वप्ने येत आहेत; पण सर्वसामान्यांच्या जगण्याच्या स्वप्नांची वाताहत होते आहे. माणसं सैरभैर झाली आहेत. शोषण काही संपले नाही. हा विचार व्यक्त करताना पडीक या कवितेत कवी म्हणतो,

**घर चालावं म्हणून**
**बाप**
**दुसऱ्याच्या वावरात**
**राबराब राबला**
**रेताड बखळ जमीन**
**रक्ताचं पाणी**
**हाडांची काडं होईस्तोवर**
**आतड्यांना पीळ देत**
**सुपीक केली**
**घराची बिघाभर जमीन मात्र**
**शेवटपर्यंत**
**पडीकच राहिली.**

(पडीक: पृ. ३२)

व्यवस्थेने ललाटी लेखांकित केलेला हा अध्याय अद्याप बदलत नाही. यालाच कोणी प्रारब्ध, प्राक्तन वगैरे असे काही म्हणत असतील, तर काहींच्याच वाट्यास हे भोग का असावेत? दुसऱ्याचं जगणं सावरताना स्वतःचं जगणं उद्ध्वस्त झालेला बाप व्यवस्थेने आखून दिलेल्या

वर्तुळाभोवती गरगर फिरतो आहे, आणि त्याच्यासोबत सप्तपदी करून आलेली माय अस्तित्वात नसणाऱ्या क्षितिजावर सुखाचा सूर्य शोधत आहे. जो तिच्या सरणापर्यंत कधीच येणार नाही, हे माहीत असूनही. म्हणूनच कवितेतल्या या नोंदी नुसत्या नोंदी राहत नाहीत, तर वाचकास प्रश्न विचारतात. गरिबांना स्वप्ने पाहण्याचा अधिकार आमच्या व्यवस्थेत आहे का? असेल तर किती? मनात निर्माण होणाऱ्या अशा प्रश्नांनी वाचक अस्वथ होत जातो. अंतर्मुख होताना विचारचक्रात फिरत राहतो.

व्यवस्थेने अन्याय करूनही कोणताही आक्रस्ताळेपणा, आक्रोश, आक्रंदन आदी भावनांचा हात न धरता कवितेतले शब्द संयतपणे जगणं सांगण्याचा, समजून घेण्याचा प्रयत्न करतात. तरीही मनाच्या मातीत दडलेला वणवा दाहकता घेऊन नांदता राहतो. हिशोब कवितेत ते म्हणतात,

**पाटलाच्या पोरीनं वापरलेली पुस्तकं**
**मला मिळावीत म्हणून**
**खंडीभर ढोरं गव्हाऱ्यात फुकट वागवलीत बापानं**
**त्याच पुस्तकातून शिकलो**
**इतिहास नागरिकशास्त्र मूल्यशिक्षण**
(हिशेब: पृ.४५ )

जुनी पुस्तके आपल्या मुलास शिकण्यासाठी मिळावीत, म्हणून बाप पाटलाची खंडीभर ढोरे कोणत्याही मोबदल्याशिवाय चारतो आहे. उद्याचे उज्ज्वल भविष्य पाहताना, आजच्या शोषणास विसरू पाहतोय. पुस्तकातल्या अक्षरातून इतिहास बदलण्याची स्वप्ने पाहत कवी शिकतो आहे. अभावाच्या अंधारल्या क्षितिजावर परिवर्तनाची नवी पहाट आणण्यासाठी व्यवस्थानिर्मित चौकटींच्या तुकड्यात नवी मूल्ये शोधतो आहे; पण येथला इतिहास बदलण्यास तयार नाहीच. व्यवस्था कूस बदलायला तयार नाही. इतिहासच शोषणाचा असेल, शास्त्र नागरिक म्हणून सन्मान देण्यास सक्षम नसेल आणि मूल्य मूठभरांची मिरासदारी असेल, तर कोणत्या क्षितिजाला इमानी सूर्याचे दान आपण मागावे, असा प्रश्न नकळत कवी उपस्थित करतो.

उदात्त, उन्नत मूल्यांची आणि जगण्याची प्रयोजने ज्या मास्तराने आपल्या आचरणातून मनात रुजवावीत. सत्शील विचारांची दीक्षा द्यावी, त्या गुरूने गुरुकुलाचा वारसा विसरणे विपर्यस्त वाटते. ज्ञानासाठी आसुसलेल्या एकलव्याला दिलेल्या विद्येचे मोल म्हणून घरातील अठराविश्वे दारिद्र्याशी झगडणारी आई गुरुदक्षिणा म्हणून डाळ-दाणा देत राहिली. हे वास्तव वाचून व्यवस्थेत माणूस पराभूत असतो, यावर विश्वास ठेवावाच लागतो. अक्षरशून्य माय-बापाला जगण्याच्या प्रश्नांची उत्तरे शोधताना हिशोब कदाचित कळला नसेल; पण शोषण हाच पाया असणाऱ्या व्यवस्थेला मात्र ती संधीच वाटत राहिली. परिस्थितीने अगतिक झालेल्यांना हिशोब कळेलच कसा? परंपरेचे पायबंद पडल्यावर प्रगतीचे पथ आक्रसत जातात. या मार्गाला प्रशस्त करण्याचा उपाय शिक्षण असल्याचं निरक्षर माय-बापाला ठाऊक आहे म्हणूनच पोरगं शिकताना आभाळभर आनंद ही माणसे शोधत आहेत.

अडचणी कष्टकऱ्यांच्या पाचवीलाच पूजल्या आहेत. कधी अस्मानी, कधी सुलतानी संकटांशी दोन हात करताना शेतकरी, शेतमजूर हवालदिल होतो आहे. कुणाचा बाप गेला, कुणाचा बैल गेलेला. प्रत्येक जण आपले मरण आपल्यात अन् जगणं आशेच्या कवडशात शोधतो आहे. निरक्षरता कष्टकऱ्यांच्या जीवनाला मिळालेला शाप आहे. अज्ञानाने केलेले अनेक आघात झेलत, ते नियतीशी लढत आहेत; पण धनदांडग्यांच्या दांडगाई विरोधात अवाक्षर उच्चारण्याचा या माणसांना धीर होत नाही. हाताला काम, कामाला दाम आणि दामाला सन्मान असे काहीसे विचार समाजवादी व्यवस्थेत चांगले वाटत असले, तरी भांडवलशाहीच्या दमननीतीत सगळे वाद संपतात. मागे उरतो तो केवळ निराशावाद. निढळाच्या घामाचा पैसाही राबणाऱ्यांच्या हाती वेळेवर मिळत नाही. हे वास्तव अंतरंगात झिरपत जाते. ही कुठली दहशत? या कवितेतला प्रत्येक शब्द अंगार बनून समोर येतो. ढोर मेहनत करणारा बाप, धसकटे वेचताना अर्धमेली होणारी माय, सगळं काही करूनही मुलांच्या शाळेची फीसुद्धा वेळीच देऊ शकत नाहीत. अन्यायाविरोधात कोणीच कसे बोलत नसेल,

या विचाराने वाचकाला अस्वस्थ करणारी, ही कविता शब्दांची शस्त्रे यत्ने करायला लावणाऱ्या तुकाराम महाराजांच्या शब्दांशी नाते शोधू पाहते.

कष्ट, उपेक्षा, अभाव या साऱ्या घटनांना घेऊन कवी आपल्या जगण्याचे वास्तव अधोरेखित करीत जातो. आटोपशीर असणाऱ्या या कविता संग्रहात शब्द मात्र ताकदीने समोर येतात. कदाचित त्यांनी मांडलेलं दुःख, ते व्यक्त करण्यासाठी निवडलेले शब्द वैयक्तिक असतील. अनुभवांचे प्रयोजन वैयक्तिक असेल, ते प्रासंगिकही असू शकते; पण अनुभवाची चिंतनशीलता, खोली वैश्विक आहे. काव्यलेखनात कवी अनुभवांची अलिप्तता जपत असतो, असे म्हणतात. या कवितेतून कवीला वाचक वेगळे काढूच शकत नाहीत, इतका तो वास्तवाशी एकजीव झाला आहे.

मायबाप कष्टात जगणारे. रात्रंदिन श्रम करून आपापला विठोबा शोधणारे. उद्याच्या सुंदर दिवसांची कामना करणारे. कवी कधीतरी तारुण्यसुलभ भावनेतून या साऱ्या कष्टांना विसरतो. माध्यमांच्या मायाजालात गुंततो. या मोहमयी रंगबेरंगी दुनियेत हरवतो. वास्तवाच्या विखारातून निसटण्याचा प्रयत्न म्हणूनही असेल कदाचित. मृगजळी सुखाला आपलं समजून जगाशी कनेक्ट राहताना आपल्यांच्या दुःखाशी डिसकनेक्ट होत राहतो.

बाप फाटक्या कपड्यानिशी देहाची दुखणी सोबत घेऊन शेतात राबतो. माय पायात काट्यांनी केलेल्या कुरूपांची वेदना घेऊन शेतातून घरी परतणारी. आयुष्याच्या वाटेने चालताना परिस्थितीने दिलेली अनेक कुरूपे वागवणारी. वेदना चेहऱ्यावर दिसू न देता, देव आणि दैवाशी झगडणारी. माणसं सगळीकडे देहाने सारखीच; पण मनाच्या वेदना भिन्न असतात. या वेदनांशी नातं सांगणारी ही कविता काळजावर ओरखडे ओढत राहते.

घर, गाव, परिसर, श्रद्धा, समस्या, संकटे, आस्था, अपेक्षा अशा अनेक पातळ्यांवर वावरणारी ही कविता माणसांच्या मनात उदित होणाऱ्या भावांदोलनांना नेमकेपणाने पकडते. मनात आस्थेचा ओंजळभर उजेड घेऊन येणारी ही माणसे परिस्थितीचे वारंवार पडणारे तडाखे झेलूनसुद्धा न मोडणारी. झुंजारपण दिमतीला घेऊन जगण्याच्या प्रश्नांशी भिडतात. या सगळ्याच कवितांतून एकेक सत्य वास्तवाच्या गाभ्यातून अंकुरित होते. वरवरचे अनुभव घेऊन शब्दांशी केलेली ती झटापट नाही. वास्तवाला भिडणारा अनुभव, हेच या कवितेचे बलस्थान आहे. माय कवितेत कवी म्हणतात,

**माय**
**बापाला आंधणासोबत मिळालेली**
**जिवंत वस्तू**
**माय**
**सदा खुंट्यांवर बांधलेलं**
**गरीब जित्राब.**
**माय**
**वास्तवाच्या विस्तवावर भाजलेली**
**गवरीची राख...**
**माय**
**सासरच्या आगीत जळलेली**
**अधमेली चिता.**
(माय: पृ.१९)

महिला सक्षमीकरणाच्या, हक्कांच्या कितीही वार्ता केल्या, तरी बदलाचा वारा येथल्या मानसिकतेला अद्याप स्पर्शून गेलाच नाही असेच अजूनही वाटते. या ओळींमधून जाणवणारी धग संवेदनशील मनात कालवाकालव करते.

प्रेम, प्रणय, हृदयातील गुंता या भावनांपासून अलिप्त असणारी कवीची लेखणी हृदयातील आग धगधगत ठेवते. वास्तवाच्या वेदनाच इतक्या मोठ्या आहेत की, त्यांना प्रणयातल्या धुंदपणाचं अप्रूप वाटत नसेल. संघर्ष करीत जगणारी माणसे कष्टालाच रोमान्स समजतात. हताश होऊनही अंतरी वाहणारा आस्थेचा ओलावा जपत पुढे चालण्याची उमेद ही माणसे नाही सोडत. भरारी घेण्याचं सामर्थ्य अंगी असणारी वृत्ती माणसांचे मोल वाढवते. आपत्तीचे आघात सतत झेलणाऱ्या या माणसांविषयी म्हणूनच आपलेपणा वाटतो.

पाण्याच्या प्रश्नांनी वैतागून शिव्या घालणाऱ्या

बाया, मोडका संसार सांभाळून झुंजणारी माय, शिक्षणासाठी धडपडणारा पोरगा ही कष्टाची अधोरेखिते समोर रोजच दिसत असताना साहजिकच वास्तवाच्या वाटेने अनुभव शब्दांकित झाले आहेत. समकालीन वास्तवाचे भान ठेवीत चिंतनाच्या वाटेने कवी एकेक अनुभव शब्दांकित करून काही सांगू पाहतो. अनुभवाचं आकाश आपल्या कवेत घेऊ पाहतो.

मूल्यांनी परिपोषित होणारी ही कविता जगण्याचे उमदेपण घेऊन येते, तशी माणसाला त्याच्या सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव करून देताना विचार करायलाही भाग पाडते. सातपुडा या कवितेत ते म्हणतात,

**उडत चाललेल्या हिरवळीसारखी**
**निघून चाललीयेत सातपुड्यातून माणसं**
**भाकरीच्या शोधात**
**विखूरलीयेत शेतमाळावर**
**गावोगावच्या गावदरीवर**
(सातपुडा: पृ.५९ )

गावपरिसरात प्रगतीच्या पाऊलखुणा दिसू लागल्या, त्या पावलांचे ठसेही तेथल्या मातीत गोंदले गेले; पण त्यासाठी मोल चुकवणाऱ्या माणसांचं काय? पुसल्या जाणाऱ्या त्यांच्या पाऊलखुणांना कुठलेच आयाम का नसावेत? विस्थापित होणं हेच प्राक्तन असेल, तर व्यवस्थेनेच ते यांच्या ललाटी लेखांकित केले आहे. वैधव्य भोगणारा यांचा वर्तमान वळचणीला, तर भविष्य अंधारात विसकटलेलं जगणं शोधत आहे.

अश्वत्थाम्याची भळभळणारी जखम घेऊन येणारी ही कविता अस्वस्थ वेदना व्यक्त करते. मूल्यप्रेरित जगण्याला समजून घेताना समाजातील दुरितांचे सम्यक भान राखणारी नामदेव कोळींची कविता मांगल्याची प्रतिष्ठापना करू पाहते. प्रश्नांचं मोहळ, भंगतीचा पाय, पाण्याचा धर्म या कविता वाचकाला नुसते सजगतेचे भान देत नाहीत, तर नेणिवेच्या पातळीवरून जाणिवेच्या पातळीवर आणून उभं करतात.

कालोपघात बदल घडणे अनिवार्यच. त्यांना टाळून किंवा वळसा घालून मार्गस्थ होणे अवघड. काळ बदलतो आहे, तशी माणसेही बदलत आहेत. त्यांच्या जगण्याची, वागण्याची प्रयोजने आणि उद्दिष्टेही बदलत आहेत. वर्तनाचे सारे व्यापार स्वार्थाच्या दिशेने मार्गस्थ होताना आदर्शांचे अर्थ सोयीच्या समीकरणात शोधले जातायेत. उदात्तपण घेऊन आलेली मूल्ये जगण्यातून कापरासारखी उडत आहेत. पडझड अभिशाप ठरू पाहते आहे. समस्या, संबंध, साधने, साध्य, संस्कार, संस्कृतीकडे बघण्याची परिभाषा बदलली आहे. नव्वदनंतरच्या काळातील प्रश्नांचा आलेख अधिक अस्थिर आणि दोलायमान झाला आहे. प्रगतीच्या वाटेने दारी आलेल्या जागतिकीकरणाने तर माणसांच्या जगण्याची प्रयोजने आणि प्रश्नही बदलले आहेत. साहित्यही यास अपवाद कसे असेल? साहित्यातला आदर्शवाद कायम असला, तरी त्याची जागा समकालीन वास्तवाने घेतली आहे. वास्तवाच्या वर्तुळाभोवती ही कविता प्रदक्षिणा करते.


एक समृद्ध; तरीही अस्वस्थ करणारा अनुभव नामदेव कोळींची कविता वाचकाला देते. भाषा सहज आविष्कृत होणारी आणि साधेपणाचे साज घेऊन आलेली. अलंकारिकता, अतिशयोक्ती, अभिनिवेशांचे कोणतेही अवडंबर नसणाऱ्या या कविता प्रांजळ मनातून प्रकटलेली भाषिते वाटतात. मूल्यव्यवस्थेवर भाष्य करणारी ही कविता जशी प्रतिमांच्या माध्यमातून प्रकटते तशीच माणसांच्या आणि कवीच्या मनातील श्रद्धांचाही वेध घेते. निसर्ग, पर्यावरण, पाणी, गावाचं दुभंगलेपण, शहरी सुखांची आस, निसटलेलं बालपण या साऱ्यातून कवी उजेडाची एक तिरीप शोधू पाहतो आहे.

ज्याच्या साहित्याकडे आश्वासक भावनेतून पाहता येईल, असे हे एक नाव मराठी काव्यविश्वात आपली नाममुद्रा अंकित करीत आहे. एक आश्वासक चित्र मनःपटलावर रेखांकित करण्याचे सामर्थ्य नामदेव कोळींच्या कवितेकडे आहे, हे म्हणणं काळोखाच्या कवितेचे किनारे धरून वाहताना प्रत्ययास येते हे म्हणणे अतिशयोक्त ठरणार नाही, नाही का?

**डॉ. चंद्रकांत चव्हाण**
चलभाष : ९४२०७८९४५५

# आचार्य अत्रे आणि द हार्ट माईंड मॅट्रिक्स

आचार्य अत्रेंच्या
उत्तुंग व्यक्तिमत्त्वाची
जडणघडण उलगडून दाखवणारा
ललित लेख.



## निखिल कुलकर्णी

I have never let my schooling interfere with my education... ~ Mark Twain

मराठी साहित्यातले एक उत्तुंग (खरे तर दांडगेच म्हणायला हवे!) व्यक्तिमत्त्व म्हणजे आचार्य अत्रे...

हा मनुष्य सर्वोत्कृष्ट वक्ता आहे. राष्ट्रीय पुरस्कार मिळवणाऱ्या सिनेमांचा आणि नाटकांचा निर्माता, दिग्दर्शक आणि लेखक आहे. अव्वल दर्जाचा संपादक आहे. राजकीय नेता आहे. मर्मभेदी प्रश्न विचारून पंडित नेहरूंपासून ते सावरकरांपर्यंत सर्वांना प्रसंगी घाम फोडणारा पत्रकार आहे. उत्कृष्ट कवी आहे, आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे भल्या भल्या कवींना त्यांच्याच कवितांचे विडंबन ऐकवून खळखळून हसवणारा हा अवलिया आहे.

स्वातंत्र्यापूर्वी हिंदुस्थानचा २/३ पेक्षा जास्त भूभाग परकीय आक्रमकांपासून मुक्त करणाऱ्या आणि त्यासाठी हरेक उंबऱ्यामागे निदान एकतरी कपाळ पांढरं करून घेतलेल्या मराठी माणसाला, स्वातंत्र्यानंतर निपाणी, खानापूर, भालकी, बिदर, बेळगाव अशा छोट्या मोठ्या मराठी गावांसाठीदेखील झुलवत ठेवणाऱ्या कृतघ्न राजकीय नेतृत्वाला (?), आणि त्या नेतृत्वाच्या मराठी माणसाविषयीच्या अपरंपार आकसाला, तितक्याच तडफेने उत्तर देऊन, आपल्या मराठामधून सिंहगर्जना करत मराठी माणसाला एका

झेंड्याखाली आणणारे, दिल्लीकरांशी उभा दावा मांडून मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झगडून मिळवणारे, आणि मग चांद्यापासून बांद्यापर्यंत पसरलेल्या या विशालकाय राज्याला महाराष्ट्र हे सार्थ नाव देणारे आचार्य अत्रे हे खरे तर मला नव्या काळातले शिवाजीच वाटतात.

एका बाजूला मराठी माणसाला एकत्र आणून आजवरच्या ज्ञात इतिहासातला सगळ्यात मोठा राजकीय मुखभंग घडवून आणणारे योद्धे अत्रे आणि दुसऱ्या बाजूला साने गुरुजींच्या शामची आईने कासावीस होणारे आणि मग त्या भाबड्या शामला आणि त्याच्या भावुक आईला मराठी पडद्यावर मूर्त रूप देत त्यांचे अश्रू अजरामर करणारे अत्रे.

एका बाजूला रविकिरण मंडळाच्या कवितांची विडंबने वाचून दाखवून १९२६ सालचे पुण्यातले मराठी साहित्य संमेलन दणकावून सोडणारे अत्रे, आणि मग त्याच संमेलनाचे अध्यक्ष श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांनी केलेल्या जाहीर कानउघाडणीनंतर, गुरूच्या गुरूने केलेल्या टिकेने कमालीचे व्यथित होणारे अत्रे... आणि या माणसाची सलगी तर अशी की, पुढे जाऊन याच श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांकडून झेंडूची फुले या विडंबनात्मक काव्य संग्रहाला मनमोकळी प्रशस्ती असणारी प्रस्तावना मिळवणारे अत्रे...

'सभ्य स्त्री पुरुष हो' म्हणत हसतखेळत खरमरीत कानउघाडणी करणारे अत्रे. आवडलेल्या कुठल्याही गोष्टींचा अद्‌भुत आणि न आवडलेल्या कुठल्याही गोष्टीला भिकार अशी दोन टोकाची प्रशस्ती देणारे अत्रे. हे सगळे विसंवादी किंवा टोकाच्या अभिव्यक्तीचे आविष्कार पाहिले की, हा एकच माणूस होता यावर विश्वास बसणे अवघड आहे.

प्रत्येक छोट्या मोठ्या गोष्टीला दहा हजार वर्षांचा दाखला देणारे अत्रे मला तरी दहा हजारच काय पण त्याच्याही आधीपासून, अगदी मनुष्याच्या उगमापासून या पृथ्वीवर अखंड वास करत असलेल्या, सर्व विद्या, सर्व शास्त्रे, सर्व कलांमध्ये पारंगत असलेल्या अनादी आदियोग्याचा लौकिक अवतारच वाटतात.

त्यांच्या साहित्यावर, कवितांवर, भाषणांवर म्यां पामराने काय लिहावे... त्यापेक्षा आज मी या आदियोग्याच्या जडणघडणीचा, त्याच्या उत्क्रांतीचा आणि त्या उत्क्रांती मागच्या प्रेरणांचा एक थोडासा आढावा घेणार आहे. अत्रे नावाचे रसायन नेमके कशातून तयार झाले असावे याचा एक शोध म्हणू हवे तर...

अमेरिकेत जोसेफ चिल्टॉन पियर्स नावाचा एक प्रख्यात लेखक होऊन गेला. 'The Crack in the Cosmic Egg: Challenging Constructs of Mind and Reality', किंवा 'The Biology of Transcendence: A Blueprint of the Human Spirit' या सारख्या त्याच्या पुस्तकांतून त्याने माणसाच्या उगमाचा, उत्क्रांतीचा आणि आजच्या अवस्थेचा एक अतिशय समग्र आढावा घेतलेला आहे.

आपण आज माणूस म्हणून जे काही आहोत ते तसेच का आहोत, माणूस म्हणून आपण एका विशिष्ट पद्धतीनेच का विचार करतो आणि एखाद्या माणसाची प्रगल्भ होण्याची नेमकी कारणमीमांसा काय याचा शोध घेण्याचा त्याचा प्रयत्न हा अद्वितीय आहे.

पण त्याचे अजून एक पुस्तक आहे जे माणसाच्या उत्क्रांतीमधला, माणसाच्या मेंदूच्या विकासाचा प्रवास आणि त्यातली मेंदूची नेमकी भूमिका विशद करून सांगते. एखादा माणूस आयुष्याच्या, कलेच्या, आणि एकूणच अभिव्यक्तीच्या क्षेत्रात अतुलनीय अशी प्रगती का करतो आणि दुसरा एखादा बापडा खुजा का राहतो याचे एक प्रमेय त्याने या पुस्तकात मांडून दिले आहे. त्याचे लिखाण आजच्या प्रगत विज्ञानाच्या शास्त्र काट्यावर तावूनसुलाखून निघालेले आहे. या पुस्तकाचे नाव आहे 'The Heart-Mind Matrix: How the Heart Can Teach the Mind New Ways to Think.'

या पुस्तकात लेखक म्हणतो की, माणसाच्या मेंदूच्या उत्क्रांतीचे एकूण चार थर असून ते हजारो वर्षांपासून एकमेकांवर वाढत गेलेले आहेत. मानवी मेंदूची वाढ किंवा उत्क्रांती ही एखाद्या मोत्यासारखी आतून बाहेर 'culture' होत आलेली आहे.

अगदी आतला आणि पहिला थर, ज्याला म्हणतात, तो आहे सापाचा किंवा मगरीचा मेंदू. याला फक्त 'Fight or flight इतकेच कळते. इथे संवाद, भावना, ओळख, क्षमा वगैरे असली काही भानगड

नाही. एक तर मी तुला मारणार, नाहीतर तुझ्या भयाने मी पळून जाणार असा हा प्रकार आहे.


मग त्याच्यावरचा जो दुसरा थर आहे तो सस्तन प्राण्यांचा (old mammalian) आहे. त्यांना भावना आहेत; पण त्या भावना व्यक्त करण्यासाठी लागणारी पुरेशी साधन सामग्री, म्हणजे वाचा अजून पूर्णपणे तयार झालेली नाही. त्यामुळे इथेदेखील संवादाची शक्यता फारच कमी आहे. म्हणजे उदाहरणच द्यायचे झाले, तर मालकाला काही होत असेल किंवा मालक दगावला, तर त्या घरातील गाय रात्र रात्र रडते; पण ती का रडते हे तिला शब्दांतून व्यक्त करून सांगता येत नाही.

त्याच्या नंतरचा जो थर आहे तो म्हणजे 'Neo cortex' चा. इथे भावना आहेत. विचार आहेत. आवाज आहेत, आणि ते व्यक्त करण्याची क्षमतादेखील आहे. संवादाच्या आणि अभिव्यक्तीच्या प्रक्रियेतलं हे अतिशय महत्त्वाचे स्थानक आहे.

तरी देखील याच्या पुढचा जो भाग आहे तो सर्वांत महत्त्वाचा आहे. ज्याला आपल्या शास्त्रात आपण आज्ञा चक्र असे म्हणतो तो 'prefrontal cortex' चा हा भाग आहे. इथे, माणसाला व्यक्त होण्यासाठी लागणारे सर्व काही आहे. भाषा आहे, विचार आहे, भावना आहे, काव्य आहे, कला आहे, नाट्य आहे, आवड आहे, आसक्ती आहे, विनोद आहे, अभिलाषा आहे, पराक्रम आहे, आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे साधक-बाधक विचार करून योग्य निर्णय घेण्याचा विवेकदेखील आहे.

पण मूळ मुद्दा असा आहे की, प्रत्येक माणसात जर हे चारही मेंदू असतीलच, तर मग सगळीच माणसे भीमसेनजींसारखे गाऊ का शकत नाहीत? किंवा सगळीच माणसे सचिन तेंडूलकरसारखी क्रिकेट का खेळू शकत नाहीत? किंवा सगळीच माणसे धीरूभाई अंबानीं सारखे यशस्वी उद्योजक का होऊ शकत नाहीत? किंवा एखादाच माणूस खोटे का बोलतो? आणि दुसरा एखादा माणूस खोटे का बोलू शकत नाही? एखादा माणूस सभेत उत्तम बोलू शकतो मग दुसरा एखादा त्याचे नावदेखील नीट का सांगू शकत नाही?


तर या सगळ्या प्रश्नांची अतिशय मार्मिक उत्तरे



आणि त्याला लागणारी शास्त्रीय पद्धती लेखकाने या पुस्तकात मांडलेली आहेत. तो म्हणतो, की गेल्या हजारो वर्षांच्या उत्क्रांतीमधे हे चार मेंदू माणसाला मिळणार हे निश्चितच झालेलं आहे. हे चार मेंदू ही माणसाच्या मेंदूची Blue print झालेली आहे. त्यामुळे कुठल्याही माणसाला इतर कुठल्याही माणसापेक्षा काही कमी मिळालेले आहे असे नाही. त्याचे असे निरीक्षण आहे कि, कुठल्याही क्षेत्रात यशस्वी झालेल्या बहुतेक लोकांचा 'Prefrontal Cortex' हा इतरांपेक्षा जास्त प्रगल्भ आणि विकसित झालेला असतो. त्यामुळे आयुष्याच्या वेगवेगळ्या प्रसंगात हे लोक अतिशय समर्पकपणे व्यक्त होत जातात. अतिशय योग्य निर्णय घेतात, आणि हे निर्णय मग त्यांना अजूनच यशस्वी करत राहतात. तर हा 'Prefrontal Cortex' जितका जास्त विकसित तितकी त्या माणसाची आकलनाची, निर्णयाची आणि अभिव्यक्तीची प्रगल्भता अधिक, असे ढोबळ मानाने म्हणता येईल.

तर आता 'Prefrontal Cortex' विकसित कसे करता येईल ते सांगताना लेखक म्हणतो कि,

एका बाजूला रविकिरण मंडळाच्या कवितांची विडंबने वाचून दाखवून १९२६ सालचे पुण्यातले मराठी साहित्य संमेलन दणकावून सोडणारे अत्रे, आणि मग त्याच संमेलनाचे अध्यक्ष श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांनी केलेल्या जाहीर कानउघाडणीनंतर, गुरूच्या गुरूने केलेल्या टिकेने कमालीचे व्यथित होणारे अत्रे... आणि या माणसाची सलगी तर अशी की, पुढे जाऊन याच श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांकडून झेंडूची फुले या विडंबनात्मक काव्य संग्रहाला मनमोकळी प्रशस्ती असणारी प्रस्तावना मिळवणारे अत्रे...



आपल्या हृदयाचा या कार्यात फार मोठा हात आहे. माणसाच्या हृदयाचे एक 'msgnetic field' सदैव आपल्या मेंदूवर कार्य करत राहते. आणि त्यातून माणसे अंतर्बाह्य बदलतात. अधिकाधिक संस्कारित होत जातात. आपले हृदय अव्याहतपणे एक प्रकारचा संस्कार आपल्या 'Prefrontal Cortex' वर आणि एकूणच मनावर करत राहते. हृदयाचा मनावर होणारा परिणाम इतका संतत आणि दीर्घगामी असतो की, त्यामुळे एखाद्या माणसाची विचार करायची पद्धत कधी कधी संपूर्णपणे बदलून जाऊ शकते. कित्येक 'hard line communist लोक capitalist झाल्याची किंवा कित्येक leftist democratic लोक rightist autocratic झाल्याची उदाहरणे आपण पाहतो ती याचेच द्योतक आहे. अर्थात अशा प्रकारच्या संस्कारासाठी गरज असते. ती त्या माणसाने त्याच्या हृदयाचा आवाज सतत ऐकत राहण्याची आणि कुठलाही निर्णय घेण्यात हृदयाला संपूर्ण मुभा देण्याची. एखादा माणूस त्याच्या हृदयाचे जितके जास्त ऐकत जातो तितके त्याचे हृदय त्याच्या prefrontal cortex ला प्रगल्भ करत जाते, आणि मग त्यायोगे त्यांची अभिव्यक्तीदेखील अधिकाधिक प्रगल्भ होत राहते. जगद्विख्यात डच चित्रकार व्हिन्सेंट व्हॅन गॉग म्हणतो कि,

I put my heart and my soul into my work, and i have lost my mind in the process... Vincent van Gogh एखाद्या कलेशी मैत्री करण्यासाठी हे mind हरवणे फार महत्त्वाचे आहे. सदैव आपल्या मनापेक्षा हृदयाचा आवाज ऐकत गेलेले आचार्य अत्रे हे याचे सर्वांत उत्तम उदाहरण ठरावे, लोक काय म्हणतील?' हा विचार मनातून येत असतो, आणि 'लोकांना काय म्हणायचे ते म्हणू देत' हा विचार हृदयातून येत असतो. यातला कुठला विचार ऐकायचा ते ज्याचे त्याने ठरवायचे आहे. आचार्य अत्र्यांचा अगदी लहानपणापासूनचा आयुष्याचा पट पाहिला तर त्यांनी बहुतेक सगळ्याच वेळेला 'लोकांना काय म्हणायचे ते म्हणू देत' हाच विचार केल्याचे आपल्याला दिसते. मग ते शाळेतल्या मास्तर मित्रांना सोबत घेऊन दिवस दिवस रंगवलेली गप्पाष्टके असोत, किंवा रविकिरण मंडळांच्या कवींची विडंबने लिहून काढून मग ती पुढे साहित्य संमेलनात त्याच कवींना जाहीरपणे वाचून दाखवायचा प्रसंग असो, सावरकरांच्या हिंदुत्वावर घेतलेले आक्षेप असोत किंवा नेहरु, स. का. पाटील आणि मोरारजींचे 'मराठा' तून काढलेले जाहीर वाभाडे असोत, 'लोकांना काय म्हणायचे ते म्हणू दे' हाच एकमेव विचार सदैव

त्यांची सोबत करत आलेला आहे असे दिसते. 'हे बोलू का नको?', ' हे लिहू का नको?', ' हे बोलावे तर या पक्षाला काय वाटेल?', ' ते केले तर त्या नेत्याला काय वाटेल?' असल्या लेच्यापेच्या आणि नेभळट विचारांची हृदयाला कमकुवत करणारी जळमटे आणि त्याचे गुंते त्यांनी त्यांच्या आचारात कधीही अडसर ठरू दिलेले नाहीत. आवडेल त्याला 'अद्भुत' आणि न आवडलेल्याला 'भिकार' म्हणून मोकळे होण्याचा साळढाळपणा हा देखील आचार्य अत्र्यांच्या विचारांवर आणि आचारांवर त्यांच्या हृदयाचा किती अंमल होता याचा निदर्शक ठरावा. त्यामुळे आलेल्या प्रत्येक प्रसंगाला हृदयातून निघालेले उत्तर देत हा सारस्वत प्रत्येक प्रसंगाने अधिकाधिक समृद्ध होत गेला आहे. आचार्य अत्रेंनी केलेल्या सरस्वतींच्या प्रत्येक आविष्कारावर त्यांचे अंतः करणापासून प्रेम आहे. श्रोत्याला जिंकण्याची आणि त्यासाठी आपले अंतरंग जास्तीत जास्त उत्कटतेने उलगडून दाखवण्याची त्यांना जबरदस्त महत्त्वाकांक्षा आहे, आणि त्यातूनच मग एक स्पष्टवक्ता, समर्थ निर्माता, कुशल दिग्दर्शक, निर्भीड पत्रकार, स्वतंत्र विचारांचा राजकीय नेता आणि अतिशय प्रतिभाशाली आणि मिश्किल असा विडंबन कवी तयार झालेला आहे, आणि तो प्रत्येक आविष्कारानंतर अधिकाधिक स्वतंत्र, समर्थ आणि समग्र होत गेलेला आहे असे दिसते.

Life is short. So break the rules.
Forgive quickly and kiss slowly. Love truly and laugh uncontrollably.

And never regret anything that makes you smile... Mark Twain

छायाचित्रे सौजन्य : जया दडकर

▣▣▣

**निखिल कुलकर्णी**
सॅन होजे, कॅलिफोर्निया
ईमेल : nskulkarni@gmail.com


## जाहिरातीचे दरपत्रक

**सप्रेम नमस्कार!**

महाराष्ट्र साहित्य पत्रिका हे महाराष्ट्र साहित्य परिषदेचे मुखपत्र असून मराठी साहित्य-संस्कृतीचे प्रतिनिधित्व करणारे त्रैमासिक आहे. म.सा.पत्रिकेला १०४ वर्षांची दीर्घ परंपरा लाभली आहे. म.सा.पत्रिकेत मराठी साहित्याच्या विविध प्रवाहांचा आणि प्रकारांचा परामर्श घेतला जातो. पत्रिकेने विशेषांकही प्रकाशित केले आहेत. साहित्यसंशोधनविषयक लेख पत्रिकेतून नियमितपणे प्रकाशित केले जातात.

ग्रंथपरीक्षणे आणि वाङ्मय समालोचन करणारे लेख पत्रिकेमध्ये प्रसिद्ध होतात. समकालिन साहित्य व्यवहारावर म. सा. पत्रिकेतून भाष्य केले जाते. संशोधक, विद्यार्थी आणि मराठी रसिक यांनी सदैव पत्रिकेला उदंड प्रतिसाद दिला आहे. महाराष्ट्रातील सर्व थरांतील रसिक वाचक पत्रिका वाचतात. १३,५०० प्रती इतक्या संख्येने पत्रिका छापली जाते आणि आजीव सभासदांना अंक मोफत पाठविला जातो. महाराष्ट्र साहित्य पत्रिकेला आपल्या व्यवसायाची, प्रकाशनांची अथवा शुभेच्छापर संदेशांची जाहिरात देऊन पत्रिकेला आर्थिकदृष्ट्या सक्षम करावे, ही विनंती.

**– प्रकाशक आणि संपादक**
**(म. सा. पत्रिका)**

| जाहिरातीचे दरपत्रक | |
|---|---|
| कव्हर २ (रंगीत) | रु. १०,०००/- |
| कव्हर ३ (रंगीत) | रु. १०,०००/- |
| मलपृष्ठ ४ (रंगीत) | रु. १०,०००/- |
| आतील पान (कृष्णधवल) | रु. ४,०००/- |
| आतील अर्धे पान (कृष्णधवल) | रु. २ ,०००/- |
| आतील पाव पान (कृष्णधवल) | रु. १,०००/- |

दशरथ चौरे यांच्या ‘विळखा’
कादंबरीवरील समीक्षा लेख.

# ‘विळखा’: समस्याप्रधान तरीही कलात्मक!

## डॉ. विलास राशिनकर

रंजनवादी व करमणूकप्रधान नव्हे, तर प्रबोधनवादी व समस्याप्रधान असा या दशरथ चौरे लिखित व संस्कृती प्रकाशनद्वारे प्रकाशित ‘विळखा’ कादंबरीचा विषय व आशय आहे. त्यावर थोडीथोडकी नव्हे तर तब्बल साडेतीनशे पाने खर्ची घातलेली आहेत. हा सगळा प्रकार पाहता लेखकाने एक मोठे धाडस केले आहे व आपले अपयशही निश्चित केले आहे असे सकृतदर्शनी कोणाही जाणकाराला वाटेल. मलाही तसेच वाटले. हाती सदैव (२४X७) मोबाईल धारक माणूस ही साडेतीनशे पाने वाचणे शक्यच नाही. असाच कोणाचाही ग्रह होईल, माझाही झाला; पण ही कादंबरी संपूर्ण वाचून काढल्यावर लेखकाने धाडस केले हे माझे मत कायम राहिले; परंतु त्याने आपले अपयश निश्चित केले हे मत मात्र ढेकळागत ढेपाळले. लेखकाने या कादंबरी लेखनात कमालीच्या उंचीचे कलात्मक यश प्राप्त केले, काबीज केले असेच म्हणावे लागेल. मग व्यावहारिक पातळीवर, लौकिक पातळीवर या कलाकृतीचे काय ‘भाग्य’ असेल ते असो. मला तरी त्याची विशेष चिंता नाही.

आजच्या या चंगळवादी व खुशालचेंडू जीवनाच्या पर्यावरणात काही समस्याप्रधान वाचन-विचार-चिंतन-मनन करण्याची माणसांची वृत्तीच पूर्णतः लयाला, रसातळाला गेलेली आहे. हीदेखील एक आजची समस्या आहे. अशा एक नव्हे; अनेकानेक




कादंबरी : **विळखा**
लेखकः **दशरथ चौरे**
प्रकाशक : **संस्कृती प्रकाशन**
प्रथमावृत्ती : **ऑक्टोबर २०१९**
पृष्ठेः **३५१** मूल्य :४२५/-

अघोर समस्या सद्य काळाने निर्माण केल्या आहेत. प्रदूषण; हीदेखील अशीच एक आधुनिक भीषण समस्या आहे. आणि या समस्येवर आधारीतच ही विळखा कादंबरी आहे. 'विळखा' म्हणजे मानवी जीवनाला आधुनिक काळी पडलेला हा प्रदूषणाचा अजगरी विळखा.

या कादंबरीचादेखील 'प्रचारा'चा असाच जीवघेणा विळखा पडून ही कादंबरीही घुसमटून गतप्राण होते की काय असे भय होते; परंतु लेखकाने या कादंबरीला कला संजीवनीचे यथोचित घोट जागजागी दिल्याने ही केवळ जगलीच नाही तर कलात्मक उंचीवर जाऊन विराजमान झाली.

प्रदूषण हे या कादंबरीत एक प्रतीक म्हणून एक उपमान म्हणूनही आले. नव्हे, तीच या कादंबरीत प्रदूषणाची प्रमुख भूमिका आहे, आणि त्यामुळेच या कादंबरीचे कलात्मक मूल्य वर्धिष्णू व्हायला मदतही झाली आहे.

आज आपण पाहतोच की केवळ राजकारण नव्हे, तर राजकारणापासून अध्यात्म, धर्म इत्यादि पवित्र व पवित्रतम क्षेत्रापर्यंतही या प्रदूषणाची लागण जाऊन पोहचली आहे. धर्म आणि अध्यात्म क्षेत्रातील तथाकथित थोर आणि मूर्धन्य मंडळी आज कोर्टाच्या आरोपीच्या पिंजऱ्यात हसतमुखाने उभी असल्याचे चित्र आहे. तिथे खेड्यातील दीन, दरिद्री, दुबळा, दुर्दैवी असा शेतकरी आत्महत्या करतोय हे तर ओघाने येणारेच आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या भारतीय शेतकऱ्याचे वर्णन करताना जे शब्द वापरले ते मोठे धक्कादायक व कारुण्यमय आहेत. त्यांनी म्हटलंय, 'शेतकरी हा शेतातील तिसरा बैल आहे.' भारतीय शेतकऱ्याची दैन्यमय वस्तुस्थिती बाबासाहेबांनी यथार्थपणे व्यक्त केली, अधोरेखित केली. बैल हे निर्बुद्धपणाचे व अघोर जीवघेण्या कष्टाचे प्रतीक आहे. शेतकरी कष्टात कमी पडत नाही, बुद्धीत कमी पडतो. हे तर आहेच शिवाय तो शासन, प्रशासन, जनता, व्यापारी आणि विशेषतः निसर्ग यापुढे कमालीचा अगतिक व दुबळा आहे, म्हणून त्याला सांघिक आत्महत्या कराव्या लागतात.

या 'विळखा' कादंबरीतील दामूअण्णा ज्या वेळी प्रदूषणाच्या विरोधी तक्रार करायला, दाद मागायला नाईलाजाने जिल्हाधिकारी कार्यालयात जातो त्या वेळी त्याला जे भ्रष्टाचाराचे भीषण दर्शन घडते ते सार्वत्रिक आहे, सार्वजनिक आहे, व सार्वकालीक आहे म्हणून त्यातून सुटका करून घेण्यासाठी दामूअण्णाचा मोठा भाऊ आपली खेड्याशी, शेतीशी, सोन्यासारख्या बंधूंशी, मातृवत्सल वहिनीशी असलेली नाळ तोडून कायमचा शहरात जातो व चंगळवादी होतो.

अर्ज विनंत्या करून दीन-दुबळयांचे प्रश्न वा समस्या सुटत नाही, ह्या भीषण परिस्थितीचा याही-पेक्षा भयंकर परिणाम म्हणजे काही मंडळी ह्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी शस्त्रास्त्रांचा व दहशतीचा मार्ग पत्करू लागली आहेत, आणि समाजाचे सांस्कृतिक, नैतिक आणि चारित्रिक पतन होऊ लागले.

ह्या सर्व परिस्थितीचा मार्मिक आणि कलात्मक वेध विळखा कादंबरीत घेतला गेला. दादा, दामू-अण्णा, किसन, बापू ह्या जाधव बंधूंच्या घरसंसाराचे यथार्थ चित्रण करून हे सारे लेखकाने आपल्या समोर मांडले आहे. त्यांच्या निमित्ताने समाजातील भ्रष्टाचाराचे, दांभिकतेचे, अगतिकतेचे व दैन्याचे एक करुण-गंभीर भीषण चित्र वाचक-विचारकासमोर सादर केले आहे.

या कादंबरीतील राजकारण, राजकारणी लोकांच्या खेळी, कपट कारस्थाने, डावपेच स्ट्रॅटेजी इत्यादीं बाबत वाचताना कादंबरी लेखकाचे या क्षेत्रातील निरीक्षण व अभ्यास किती चौफेर स्वरूपाचा, किती सूक्ष्मातिसूक्ष्म व मौलिक स्वरूपाचा आहे हे सारखे जाणवत राहते. किंबहुना लेखक स्वतःच एक मुरब्बी व मातब्बर असा पट्टीचा व प्रवाहातला प्रत्यक्ष राजकारणीच असावा असेही वाटत राहते. ही कादंबरी वाचताना यापूर्वीच्या अरुण साधूंच्या 'सिंहासन' कादंबरीची अनेकदा आठवणदेखील येत राहते. सिंहासनची आठवण करून देणारी म्हणून अप्रतिम व कमालीची यशस्वी अशी ती आहे; पण मर्यादित अर्थाने कारण सिंहासनचा स्पॅन/पैस फार विस्तृत व व्यापक आहे. तिचा आवाका फार जबरा

व सर्वंकष आहे. 'विळखा' कादंबरी मात्र त्यामानाने फारच मर्यादित परिघात फिरत राहते.

प्रस्थापित-विस्थापित, पांढरपेशे-मलिनपेशे, आदिवासी, दलित, ग्रामीण, असे साहित्याचे कप्पे करण्याची सवय व सराव अंगवळणी पडणाऱ्या वाचक अभ्यासकांचा विळखा कादंबरीला 'ग्रामीण साहित्य' प्रकारात समाविष्ट करण्याचा मोह होण्याची एक शक्यता संभवते. तो मोह टाळलाच पाहिजे कारण या कादंबरीची पार्श्वभूमी ही ग्रामीण असली तरी तिची बैठक विशुद्ध कलात्मक आहे. जीवन आणि कला ह्यांचे एक अद्भुत एकजीव रसायन म्हणजे ही कादंबरी आहे. ती एका अंगाने सौंदर्यदर्शी, ॲस्थेटिक आहे, तर दुसऱ्या अंगाने ती जीवनदर्शी, वास्तवदर्शी रिॲलिस्टिक आहे. दोन्ही अंगे परस्पर पूरक व पोषक आहेत. 'विळखा' कादंबरीवर 'ग्रामीण वाङ्‌मय' म्हणून शिक्का मारणे हे तिचे 'बिलो इस्टिमेशन' आहे, म्हणून हा अविचार करू नये. तशी ती केवळ ग्रामीण संदर्भात तुलनेतच उंचीची आहे असे नाही, तर एकूण समग्र जीवनदर्शन संदर्भातदेखील उंचीची आहे. गौरवास्पद व प्रशंसनीय आहे.

या कादंबरीचे एक ठळक, गौरवास्पद आणि उल्लेखनीय वैशिष्ट्य म्हणजे यात साकार झालेली जिवंत आणि कमालीची नितांत स्वाभाविक अशी पात्रे. एक दोन नव्हे, तर अगदी झाडून सर्व पात्रे. कादंबरीतील पात्रे लेखकाहातची कळसूत्री बाहुली नाहीत. तशी ती कळसूत्री बाहुली असतीलच, तर ती नियतीच्या हातची आहेत. या इतकीच दुसरी बाब म्हणजे ही पात्रे जशी पपेट नाहीत, तसेच त्यांचा जन्मदाता पिता, म्हणजे लेखक हाही कोणी प्रॉफेट, देवदूत नाही. म्हणजे त्याचा तसा अजिबात आव नाही. तो येथे केवळ एक द्रष्टा आहे. ऑब्जर्व्हर आहे. तो उपदेशक तर नाहीच; पण भाष्यकारही नाही. तो आहे केवळ एक निवेदक. तटस्थ, त्रयस्थ व अलिप्त वार्ताकार. त्यामुळेच हे अवघे लेखन एका कलात्मक उंचीवर जाऊन पोहोचले आहे. हा केवळ योगायोगाचा भाग नसून लेखकाची ही प्रयत्नसाध्य कमाई आहे.

कादंबरीतील प्रसंग अर्थात काल्पनिक असले तरी विश्वासार्ह आहेत. वास्तवदर्शी, अकृत्रिम व तेही स्वाभाविकच जाणवतात. बनावटगिरी, बनवेगिरी, दाखवेगिरी, मिरवेगिरी इथे औषधालाही आढळत नाही. कथानक वाचकाला थेट भिडते, भिनते, झोंबते आणि झपाटतेही. कोणत्याही पात्राचे वागणे, बोलणे, दिसणे, हसणे, रडणे हे बेगडी, नकली वाटत नाही. अस्सल व क्रमप्राप्तच वाटते.

लेखन पवित्रा असा, की त्यात कोणतीही पोज नाही. प्रचार नाही. पक्षपात नाही. अकांडतांडव नाही, आदळ आपट नाही, की कसला आक्रस्ताळेपणा नाही. लेखनशैली इतकी सहज, सुंदर, सुहृद, सुस्पष्ट की तिच्यात संदिग्धता, गोंधळ, उपहास, उपरोध वा छद्म नाही. 'गुंतुनी गुंत्यात साऱ्या पाय माझा मोकळा' याचा एक कलात्मक, गौरवास्पद व आनंददायक प्रत्यय म्हणजे लेखकाची अप्रतिम अशी जागृत आणि प्रभावी लेखन भूमिका. परिणामी कादंबरीचा नियोजित आशय थेट वाचकाच्या मनाला, बुद्धीला मोहित करतो.

कादंबरी बरीच पसरट व पाल्हाळीक झाली आहे. ती संक्षिप्त व संपृक्त व्हायला हवी होती. तसे करणे शक्यही होते व आवश्यकही होते. तसे झाले असते, तर ती आहे त्यापेक्षा अधिक परिणामकारक व कलात्मक झाली असती कारण 'सारं च अल्पाक्षरं च रसं !' असे कलासूत्र आहे.

या कादंबरीचे चटकन जाणवणारं एक मनोवेधक वैशिष्ट्य म्हणजे यातील पात्रे बोलत असलेली जिवंत आणि रसरशीत भाषा. सहज-सुंदर आणि स्वाभाविक भाषा. ही पात्रे ग्रामीण म्हणून अर्थातच त्यांची भाषा देखील ग्रामीण. त्याचे लेखकही ग्रामीण विभागातील म्हणून या पात्रांच्या ग्रामीण भाषेचा बाज आणि साज यथोचित समर्पक स्वरूपात सिद्ध आणि यशस्वी झाला आहे. ग्रामीण वाचकाला तो कदाचित जाणवणारही नाही; परंतु शहरी वाचकांना ही ग्रामीण बंदिश कमालीची जाणवेल व पराकोटीची अपिल होईल. या जिवंत व अकृत्रिम भाषाशैलीमुळे यातील एकूण एक पात्रे तितकीच जिवंत व अकृत्रिम झालेली आहेत. ती बेगडी, बनावट, नाटकी तीळभरही वाटत नाहीत. पात्रांची सहज सुंदर, स्वाभाविक-वेधक भाषा हे या कादंबरीचे एक

फार मोठे बलस्थान आहे. त्यामुळे केवळ ही पात्रेच नव्हे तर एकूण घटना-प्रसंग-संघर्ष संबंध व एकूण कादंबरीच जिवंत व रसरशीत, प्रभावी व परिणामकारक झाली आहे. अर्थात ही कांदबरी लेखकाच्या कला प्रतिभेची प्रशंसनीय अॅचिव्हमेंट तर आहेच, आहे.

कादंबरीकाराच्या लेखनाचा झपाटा आणि सपाटा अवाक् करणारा आहे. हे लेखन आवेशी नसले तरी आवेगी आहे. पल्लेदार नसले तरी रुबाबदार, डौलदार आहे. मोजके माफक नसले, भरपूर-भरघोस असले तरी कसदार-रसदार आहे. पोकळ व निष्फळ नाही. नुसतेच फापटपसारा व वायफळ नाही. त्याचा दर्जा आणि इयत्ता फार वरची आहे. त्याचा प्रभाव परिणाम फार गहिरा आहे कारण लेखकाची भाषेवर व शैलीवर पक्की पकड आहे. शब्दांची पारख व प्रयोग अतिशय नेमका व नेटका आहे म्हणून ते इच्छित उंचीपर्यंत सहज पोचते.

"SUGGESTIVENESS IS AESTHETICAL, BUT TOO EXPLANATION IS NOT ARTISTIC' म्हणजेच 'सूचकतेत सौंदर्य असते, मात्र अति स्पष्टीकरण अकलात्मक असते.' तेव्हा अति स्पष्टीकरणाचा अवलंब करून लेखन विस्तार करण्यापेक्षा सूचकतेची इष्ट भूमिका अंगीकारून कलात्मकता साधणेच गरजेचे. 'विळखा' मध्ये घटना आणि प्रसंग मोजके आणि मर्यादित आहेत. त्यांची तिथे रेलचेल व दाटीवाटी नाही, खच नाही; परंतु त्या घटना प्रसंगाचे वर्णन व विवेचन मात्र विस्तृत व अनावर आहे. अशा प्रसंग-वर्णन प्रसंगी, घटना-विशद प्रसंगी लेखकाला जणू स्फुरण चढते असे सारखे वाटत राहाते. तो त्यात नुसताच रमून-रंगून जात नाही, तद्रूप-तन्मय होतो.

निसर्ग आणि माणूस, २१ व्या शतकात, प्रदूषणाच्या भयंकर विळख्यात सापडला आहे, हा या कादंबरीचा विषय आहे. गाभा आहे, आणि त्याचे जळजळीत आणि जिवंत असे कलात्मक दर्शन घडविणे हे या कादंबरीचे उद्दिष्ट स्वरूप आहे. हे सारे इथे यशस्वीपणे साकारले आहे.

वाचकाला विचार करायला भाग पाडण्याचे सामर्थ्य या कादंबरीत आहे. प्रदूषण हे अपघाती आहे की आमंत्रित? ते निवार्य आहे की अनिवार्य? त्याला कोणी

**लेखन पवित्रा असा, की त्यात कोणतीही पोज नाही. प्रचार नाही. पक्षपात नाही. अकांडतांडव नाही, आदळ आपट नाही, की कसला आक्रस्ताळेपणा नाही. लेखनशैली इतकी सहज, सुंदर, सुहृद, सुस्पष्ट की तिच्यात संदिग्धता, गोंधळ, उपहास, उपरोध वा छद्म नाही. 'गुंतुनी गुंत्यात साऱ्या पाय माझा मोकळा' याचा एक कलात्मक, गौरवास्पद व आनंददायक प्रत्यय म्हणजे लेखकाची अप्रतिम अशी जागृत आणि प्रभावी लेखन भूमिका. परिणामी कादंबरीचा नियोजित आशय थेट वाचकाच्या मनाला, बुद्धीला मोहित करतो.**

व्यक्ती, संस्था, शासन, प्रशासन कारणीभूत आहे की केवळ आधुनिक काळ? ते अटळ अनिवार्य म्हणून सहन केले पाहिजे, की ते इष्टोचित उपाय योजना राबवून रोखता येईल? ...असे अनेकानेक प्रश्न सुजाण वाचकांच्या मनात उदयाला येऊन ते त्याचे काळीज कुरतडू लागतात. त्याला अस्वस्थ करतात. भारताची प्रत्यक्ष राजधानी दिल्लीच या प्रदूषणाच्या जीवघेण्या विळख्यात सध्या सापडल्याचे आपण पाहतोच आहोत. त्यापुढे कादंबरीतील गोरेगाव सुलतानपूर किस झाड की पत्ती!

याबाबत स्थूलमानाने असे वाटते की, देशोदेशी पूर्वी प्रबोधनाचे युग येऊन गेले. तसे सांप्रत 'प्रदूषणाचे युग' येऊन धडकले आहे. यातही दुर्दैव असे, की प्रबोधनाचे युग आले नि आल्या पावली निघूनही गेले. प्रदूषण युगाबाबत मात्र असे होणे संभवतच नाही. 'THERE IS NO SOLUTION TO THE POLLUTION' असे मजेने जे म्हटले जाते त्यात बरेच तथ्य आहे.

आधुनिक उद्योगधंदे, कारखानदारी, विज्ञान-तंत्रज्ञानाची झालेली प्रचंड वाढ, परिणामी माणसांच्या गरजांचीही तशीच व तितकीच झालेली राक्षसी वाढ, ह्याला आता अंत राहिलेला नाही. परिणामी उद्योगधंदे व

कारखानदारी अमर अटळ होऊन बसली म्हणून त्याचेच बायप्रॉडक्ट प्रदूषणही अमर अटळ आहे. साखर कारखाना हवा, तर मळी, मळीचा जीवघेणा दर्प व वैताग अपरिहार्य ठरतो. 'विज्ञानाने रिटेलमध्ये माणसे जगवली व सुखावली; परंतु ती त्याने होलसेलमध्ये मारली व नष्ट केली,' असे म्हणतात. प्रदूषण हीही विज्ञानाची आनुषंगिक निर्मिती आहे. ती क्रमप्राप्त व अटळ आहे. ती आज जाचक वाटते याचे कारण त्याची व्हावी इतकी सवय व ओळख आपल्याला झाली नाही. ती झाली – आणि होणारच– की तिचा जाच नष्ट नाही; परंतु कमी होईल. 'मेहतराला मैल्याचा दुर्गंध येत नसतो' असे पूर्वी ज्या अगतिकतेतून म्हणत, त्याच अगतिकतेतून पुढे प्रदूषण सुसह्य होऊ शकते.

निरनिराळे औद्योगिक प्रकल्प, आणि त्यांना विविध भूमिकांतून झालेला विरोध, त्यातून उद्‌भवलेली आंदोलने, त्यांना लाभलेले यशापयश परिणामस्वरूप घडून आलेले पर्यावरण–प्रदूषण, वाताहात आणि विस्थापन इ. इ. ह्या समस्त घडामोडीमुळे अवघा समाज औद्योगिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक संदर्भात ढवळून निघाला आहे. गढूळला गेला आहे, असे सद्यकालीन चित्र आहे.

एन्रॉन प्रकल्प–रत्नागिरी, नॅनो प्रकल्प–सिंगूर, डाऊ प्रकल्प–पुणे, नर्मदा सरोवर प्रकरण–गुजरात ही त्यांपैकी काही स्फोटक, खळबळजनक, औद्योगिक प्रकरणे. त्यामुळे बरेच भडके भडकले व वातावरण तप्त–तीव्र झाले होते.

या आंदोलनांची नोंद त्यातील पर्यावरण–प्रदूषणाची खंत, विस्थापितांच्या दैन्य–दुःख, अघोर फरपटीची दखल थोड्या प्रमाणात का होईना; परंतु मराठी साहित्यानेही घेतली आहे. त्यांपैकी एक ठळक कादंबरी म्हणजे माधव कोंडविलकर लिखित 'एक होती कातळवाडी'(२००४) ही मराठीतील एक आठशे पानाची बृहद कादंबरी आहे. ती रत्नागिरी येथील एन्रॉन वीज प्रकल्पावर आधारीत आहे. तिच्या कलात्मक स्वरूपाविषयी बरेच मतभेद संभवत असले तरी पर्यावरण–प्रदूषण व त्या विरोधी जनआंदोलनाविषयक मराठीतील पहिली कादंबरी म्हणून ती प्रतिष्ठित झालेली आहे. याच प्रकल्पात समाविष्ट होईल अशी दुसरी कादंबरी २००८ साली लिहिली असून तिचे लेखक आहेत सखाराम शंकर. SEZ (स्पेशल इकॉनॉमिक झोन) ह्या संकल्पनेला कडाडून विरोध करणारी आहे. आणि याच परंपरेतील पुढची महत्त्वाची व भूषणावह कादंबरी म्हणजे ही प्रस्तुतची दशरथ चौरे लिखित कादंबरी 'विळखा.'


विळखा कादंबरीला भूषणावह ह्यासाठी म्हणायचे, की ती या आधीच्या या विषयक कादंबरीच्या तुलनेत कमालीची कलात्मक व यशस्वी कादंबरी आहे. ती आशय आविष्कारासंदर्भात अतिशय काटेकोर, अतिशय डोळस, अतिशय संयमी, अतिशय प्रभावी व अतिशय निर्दोष आहे. तिचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे ती पूर्णतः काल्पनिक आहे. वास्तविक नाही, म्हणजे ती ऐतिहासिक नाही. तिचे अवघे पात्र–प्रसंग–संघर्ष काल्पनिक आहेत. IT IS TOTALLY FICTION, NOT FACT म्हणून ती कलात्मक उंचीवर पोचली आहे. ही कादंबरी म्हणजे लेखकाच्या प्रतिभेचा रम्य विलास आहे, आणि त्याच्या प्रज्ञेचा तो नेत्रसुखद प्रकाश आहे. त्याच्या लेखनकलेचा तो प्रसन्न, मनोरम पिसारा आहे.

बरे, ह्या कादंबरीचे आणखी एक उल्लेखनीय वैशिष्ट्य म्हणजे ही लेखकाची पहिलीवहिलीच कादंबरी आहे. इतर लेखन प्रकारात त्याने बरेच लिहिले असले व तेही यशस्वीपणे लिहिले असले तरी, कादंबरी म्हणून ही पहिलीच, आणि तिनेही यशाची पूर्वपरंपरा सांभाळली आहे. कोणाकोणाला लेखनाचे वर्म गवसते, कलेचा आत्मा सापडतो. अशा लेखकांपैकी हे एक लेखक आहेत म्हणून ते इथेही धाडस करायला धजावतात व यशश्रीला खेचून आणतात. त्यांना प्रतिभा जन्मजात लाभली असली तरी परिश्रम, दुर्दम्य परिश्रम करण्याची त्यांची तयारी आहे. या परिश्रमातून त्यांच्या प्रतिभेला पैलू पडतात व त्यामुळे कलात्मक प्रभा दुणावते. अशा वेळी यशश्री धावून आली नाही तरच आश्चर्य म्हणायचे!

**डॉ. विलास राशिनकर**
३१, सविकल्प, इंद्रप्रस्थ कॉलनी, बुऱ्हानगर, अहमदनगर
चलभाषः– ८४२१३५५९९६
ईमेल : vilasrashinkar1939@gmail.com

# जातीपल्याडची अंतर्मुख करणारी साहित्यकृती

## सत्य चिरंतन





पुस्तकाचं नाव : **'चोळी'**
लेखक : **सुरेश कृष्णाजी पाटोळे**
प्रकाशक : **यशोदीप पब्लिकेशन्स पुणे**
प्रथमावृत्ती : **डिसेंबर २०१९**
पृष्ठे : २८० किंमतः ३०० /-


गंगाधर गाडगीळांचा साहित्याचे मानदंड नावाचा एक ग्रंथ आहे. त्यात लेखकाचे निवेदन या प्रकरणात पहिल्याच परिच्छेदात गाडगीळ लिहितात, साहित्याच्या क्षेत्रात जेव्हा नव्या प्रवृत्ती निर्माण होतात तेव्हा त्यांच्याबरोबर एक नवी अभिरुचिदेखील निर्माण होते. ही अभिरुचि निर्माण झाल्याशिवाय त्या नवप्रवृत्तींतून निर्माण झालेल्या साहित्याचे यथार्थ रसग्रहण मुळी होऊ शकत नाही. ही नवी अभिरुचि निर्माण करण्याचे कार्य नवसाहित्यच करते आणि नवसाहित्य जोम धरून विकास पावते ते या अभिरुचीच्या निर्मितीमुळे.

'चोळी' ही सुरेश कृष्णाजी पाटोळे लिखित कादंबरी नवसाहित्य आणि नवअभिरुचीचे नवे दालन अनावृत्त करणारी साहित्यकृती आहे. साहित्यात कप्पेबंद विभाजनाच्या काळात ही कादंबरी वंचित-उपेक्षितांच्या साहित्याला वैश्विकतेकडे नेण्याच्या दिशेने एक पाऊल टाकते आणि त्याचवेळी समग्र साहित्य व्यवहाराच्या प्रांतातील केवळ माजघरातील विषयांत अडकून पडलेल्या पांढरपेशी विषयांमध्ये रमलेल्या विभूतींचा तळातल्या सामाजिक-साहित्यिक अनुभवांशी थेट परिचय करून देते. असे अनेक विषय अद्यापही अस्पर्शित राहिल्याचेही या कादंबरीतून अधोरेखित होते. आदिम परंपरांची मानवी मूल्यांच्या कसोटीवर तपासणी करणारी ही कादंबरी केवळ साहित्यकृती म्हणून नव्हे तर

सामाजिक-साहित्यिक दस्तावेज म्हणूनही ठसा उमटवणारी आहे.

'चोळी' ही कादंबरी शीर्षकावरूनच वाचकाचे लक्ष वेधून घेते. रूढी-परंपरा आणि सुधारणा यांच्या संदर्भातला हा एक महत्त्वाचा दस्तावेज आहे. या कादंबरीत स्त्री-पुरुष विषमता विरुद्ध समतेचे मूलाधिकार, अंधश्रद्धा विरुद्ध वैज्ञानिकता, जातवास्तव विरुद्ध आत्मभान आणि पशुत्वभावावर माणूसपणाच्या विजयाची गोष्ट आहे. जगन हा या कादंबरीचा नायक आहे. या जगनचा टेक्सास गायकवाड हा पुरोगामी विचारांचा मित्र आहे. वास्तवातल्या माणसांची गोष्ट असल्यामुळे मुळात ही जिवंत कथा आहे. या कादंबरीत लेखकाने उत्तम कथानक आणि जागोजागी पेरलेले विषयोचित शब्द-भावाचे आविष्कार यामुळे ती वाचकाच्या भोवताली फिरते. यातून वेगळ्या जगाची नि वास्तवाची ओळख झाल्यामुळे तो सुखावतो.

वडार समाजातील स्त्रिया चोळी घालत नव्हत्या त्या काळातली ही पुण्यातली गोष्ट आहे. तिथपासून जगनच्या क्रांतीमुळे वडार स्त्रियांनी चोळी घालायला सुरुवात केली इथपर्यंतची. त्या क्रांतीमुळे समाज परिवर्तन घडलेल्या बदलाची ही कथा आहे! यात मुख्यत्वे वडार समाजाची बोलीभाषा आहे, संस्कृती आहे, प्रथा, रुढी, परंपरा आहेत, रीतीरिवाज आहेत. नात्याचे बंध आहेत. जातीला असणाऱ्या गौरवशाली इतिहासाची घमेंड आहे. त्यामुळं अंगी बाणलेला जातीबद्दलचा दुराभिमानही आहे. या साऱ्याबद्दल तर्क - वितर्काने त्या विरोधात बंडही आहे. वडार समाजाच्या सामाजिक उत्थानाचा एक लघुआलेखही यात आहे. कादंबरीत अनेक ठिकाणी थेट वडार समाजाची भाषा वापरल्याने तिचे साहित्यिक आणि सामाजिक मूल्य अनेक पटीने वाढले आहे.

जगन हा पारंपरिक व्यवसाय न करता महार (मादगी) पोरांच्या नादाला लागून शाळा शिकतो, तो वाया गेला असं चुलता चिमाप्पाचं मत आहे. त्याने सुतकी, घण, छिन्नी, हातोडा घेऊन दगड फोडावे, शिकून बालीस्टर थोडाच होणार? आपल्या जातीत दगड फोडून पोट भरतात. जगन त्याला त्याच्याबद्दल विचारतो तेव्हा चिमाप्पा अबोल होतो, कारण तो गुंडगिरी करत असतो. त्यानेही सुतकीला हात लावलेला नसतो. हा तात्विक वाद रंगतदार आहे. जगन, टेक्सास व मित्र अमावस्येच्या दिवशी हॉटेलमध्ये मटण खाऊन फर्ग्युसन कॉलेजच्या पटांगणातून रात्री जातात तेव्हाच्या भूताच्या प्रसंगात वाचकांना गुंतवून ठेवण्यात लेखक यशस्वी ठरतो. जगनचा चुलत चुलता सिदप्पाचा तिथं खून झालेला असतो. त्याने जगनला झपाटलंय म्हणून तो वडारी भाषेत बरळतोय असा साऱ्यांचा समज होतो नि मग हणमा देवऋष्याला बोलवून उतारा केला जातो. तो उतारा ठेवून चुलता यशवंत परत येतो. त्याला टेक्सास भेटतो. भूत उतारा खात नाही यावर पैज लागते नि गुंड असणाऱ्या यशवंताला मादगीच्या (महार) पोराने डिवचल्यामुळे तो पण इरेला पेटतो नि उताऱ्याजवळ ते दोघे येतात तर तो कावळ्यांनी विस्कटलेला असतो. इथं यशवंताचं मत परिवर्तन होतं. तो पुढे देव व भूत दोन्ही दाखवा असं जातीतल्या लोकांना खुलं आव्हान करतो.

जगनने त्याची वहिनी व बहिणींना सिनेमा दाखवला म्हणून जातपंचायत बसते तेव्हा जगनला मनाबाईचा प्रसंग आठवतो, तिचा बाप टीबीने आजारी असल्याने ती रोजच सकाळी माहेरी जाते नि दुपारी माघारी येते. एक दिवस ती आली नाही म्हणून नवरा बघायला जातो. मनाबाईची आई ती घरी गेल्याचं सांगते. तो परत घरी जायला माघारी फिरतो तर मनाबाई एका पुरुषाच्या सायकलच्या नळीवर बसून येताना दिसते. तिच्या अंगाशी चाळे करणारा पुरुष आणि त्याला हसून प्रतिसाद देणारी मनाबाई बघून त्याच्या मस्तकात तिडीक जाते. तिला पापी ठरवून तो पंचायत बसवतो. पंचांचे व लोकांचे जोडे डोक्यावर घेऊन तिला अनवाणी उभी केली जाते. उकळत्या कढईतल्या तेलातला पैसा काढायला सांगतात, तो काढताना तिचा हात भाजतो म्हणून पंच तिला दोषी ठरवून तिच्या नवर्या ला तिचं नाक व एक स्तन कापायला सांगतात. खरं तर तो अन्याय असतो, पण पंचांपुढे कुणी बोलायचं नाही हा रिवाज आहे. तरीही यशवंत या रिवाजाला विरोध करतो, प्रश्न विचारुन पंचांना पेचात पकडतो. त्यामुळं पंच गांगरून जातात, निरुत्तर होतात, म्हणून पंचायत बापूच्या

कुटुंबाला दंड करून माफ करते.

या प्रसंगामुळे जगन जातपंचायत या प्रथेविरुध्द बंड करायला प्रवृत्त होतो. इथून खरी बंडाची ठिणगी पडते. पितृसत्ताक वर्चस्वाच्या या समाजरचनेत बायकांना चोळी घालता यावी यासाठी संघर्ष करणाऱ्या जगनचे व्यक्तिमत्व या पार्श्वभूमीवर स्त्री-पुरुष यांच्या तुलनेत उत्तुंग असल्याचे अनुभवाला येते. या क्रांतीसाठी खरंतर टेक्सास त्याला प्रोत्साहित करतो. तुमच्याच बायका चोळी का घालत नाहीत? तुमची आई, बहीण चोळी घालत नाही याची लाज कशी वाटत नाही तुम्हा लोकांना? त्याच्या या प्रश्नाने जगन व्याकुळ होतो. हे चित्र बदललं पाहिजे. कोण ऐकणार आपलं? हा बदल घडणार कसा? असे अस्वस्थ करणारे प्रश्न त्याला सतावत असतानाच या बदलाची सुरुवात आपल्या आई-बहिणीपासून करावी असं जगन मनाशी ठरवतो. त्याच्या मनाची याबद्दलची तगमग आणि आईने चोळी घातल्यानंतर जगनच्या आणि आईच्या आनंदाचे वर्णनही लेखकाने अत्यंत समर्पक शब्दांत केले आहे. सीताक्काने चोळी घातल्यानंतर नणंद भावजयीत त्यावर वादावादी होते. त्यात जगन आत्याला घरातून हाकलून देतो. चोळी घातल्यामुळे नात्यातला दुरावा सहन न झाल्यामुळे सीताक्का चोळीच काढून ठेवते.

सीताक्काने चोळी घातल्याची बातमी वाऱ्यासारखी वडारवाडीत पसरते. जातीतले लोक या पापाचा जाब विचारण्यासाठी तिच्याकडे येतात तर सीताक्काला बिनचोळीची बघून ही अफवा असल्याचं समजून लोक सुटकेचा निश्वास टाकतात. द्विधा मनःस्थितीमुळं ती चोळी काढून टाकते. परंपरा आणि विद्रोह याचं द्वंद्व कादंबरीत अत्यंत प्रखरपणे मांडलं आहे. त्यातलं नाट्य वाचनीय आहे. सीताक्काने चोळी घालूनही काही अघटित घडत नाही. तेव्हा अनेक स्त्रियांना चोळी घालावीशी वाटते पण समाजाच्या भीतीमुळे त्या धजावत नाहीत. सीताक्काचा नामदेव ढसाळांच्या सल्ल्यानुसार रायगडावर हिरोजी इटाळकरांच्या पायरीवर केलेला सत्कार ही घटना वडार समाजातल्या पुरोगामी चळवळीतला एक अत्यंत महत्त्वाचा कालखंड दर्शवते. सीताक्काच्या रायगडावरच्या सत्काराच्या वेळी सगळ्या लोकांची ने-आण करण्यासाठी कात्रजचे कदम (मराठा) त्यांचा ट्रक विनामोबदला देतात, ही घटना पुरोगामी चळवळीतल्या व्यापक जातविरहीत समन्वयाचे उदाहरण आहे.

सीताक्काच्या पुढच्या पिढीतल्या स्त्रिया वैमानिक आणि हवाई सुंदरी बनतात इथपर्यंतचा हा परिवर्तनाचा प्रवास आहे. पुराण काळापासून अत्याधुनिकतेपर्यंत आणि विवेकशून्य रूढी-परंपरांच्या जोखडाखाली स्वतःला चिरडून घेण्यापासून ते विवेकी चिकित्सेद्वारे मुक्त विचारांच्या आकाशातल्या भरारीपर्यंतचा हा प्रवास वास्तव, जिवंत आणि समाजाला खडबडून जागे करणारा आहे.

सीताक्काच्या अंगात घातलेली चोळी बघून मग पुढे कैक स्त्रिया चोळी न घालण्याची प्रथा मोडून रंगीबेरंगी, नवनव्या डिझाईनच्या चोळ्या घालू लागतात. हा बदलाचा आलेख या कादंबरीतूनही चितारला आहे. लेखक समाज परिवर्तनाचा आलेख मांडत असताना त्यातील बदल वाचक नजरेने अनुभवतो. वडार समाजातल्या पोटजातीतही रोटीबेटी व्यवहार होत नाही, हे जगनच्या लग्न जुळवण्याच्या प्रसंगातून आपल्याला समजते. पण त्यातून जगन ज्या तर्कबुद्धीने मार्ग काढतो, तेही वाचण्यासारखे आहे.

'माझ्याच जातीला हा शाप का असावा? हे आणि कादंबरीतली जगनची सारीच स्वगते कादंबरी आणि वाचकाला परमोच्च बिंदूवर नेऊन ठेवतात, नव्हे भारतीय समाजालाच परखड जाब विचारतात.

चिमाचा पार या ठिकाणाचा संपूर्ण कादंबरीत अत्यंत कल्पकतेने वापर करून घेतला आहे. हा पार चिमा तुरुंगात गेल्यामुळे कसा पोरका होतो आणि त्यानंतर वडार समाजाने सुधारणा स्वीकारल्यामुळे काळानुसार कसा भकास होत जातो हे लेखक चितारतो. तिथल्या दत्ताच्या फोटोच्या काचा फुटल्या आहेत. तो फोटो रोज थोडी थोडी जागा बदलतो आहे, याद्वारे हा पार वडार समाजाच्या बदलत्या मानसिकतेचं प्रतीक बनला आहे.

लेखनकौशल्याचा अप्रतिम आविष्कार या कादंबरीत ठिकठिकाणी वाचायला मिळतो. जेलमधून

सुटून आल्यानंतरच्या दिवसाचं चिमाच्या आयुष्यातलं वेगळेपण सांगताना लेखक उगवणाऱ्या सूर्यामुळं चिमाचं काळं तोंड जांभळं भासत होतं..., असं लिहितो. दत्तूच्या साखरपुड्यात किरकोळ कारणावरून यशवंत वाद घालतो. तो वाद शमल्यानंतर साखरपुड्यातला मिठाचा खडा अलगद बाजूला सारल्यासारखा यशवंत लांब जाऊन बसला...,असे वाक्य लेखक वापरतो. आईने चोळी घालावी, यावरून घरात झालेल्या वादामुळे जगन रात्री हनुमान टेकडीवर जाऊन झोपतो त्यावेळी लेखक रात्रीच्या अंधारात काळवंडलेली हनुमान टेकडी जगनला पोटात घेऊन झोपली होती...,असे लिहितो. यशवंतचा पाय खुब्यापासून काढावा लागेल असं सांगितल्यानंतर टेक्सास आणि जगनचे मित्र धडपड करून पैसे जमवतात. ऑपरेशनला जाण्यापूर्वी यशवंत जगनच्या गळ्यात पडून रडतो. त्यावेळी यशवंतच्या मनातले भाव टिपताना जगन डोंगराएवढा तर टेक्सास आणि जगनचे मित्र सह्याद्रीच्या पर्वतरांगांसारखे भासत होते...,असे वर्णन लेखक करतो. आईने चोळी घातल्यामुळे जातपंचायत तुम्हाला वाळीत टाकेल! मग तुझ्याशी लग्न कोण करेल? असा प्रश्न जगनला विचारल्यावर तो म्हणतो, मी बजरंगासारखा ब्रह्मचारी राहीन. त्यावेळी पिकलेल्या हशाचे वर्णन करताना त्या हशामुळे घर टम्म फुगल्यासारखं भासलं..., असा भन्नाट वाक्यप्रयोग लेखकाने केला आहे.

सुरेश पाटोळे हे सिद्धहस्त लेखक, दिग्दर्शक आहेत. ज्येष्ठ दिग्दर्शक राजदत्त यांचे सहाय्यक म्हणून त्यांनी बरीच वर्षेकाम केले आहे. त्यामुळे कादंबरीतील पात्राच्या मनातले भाव शब्दांतून वाचकांपर्यंत पोचवण्याची उत्तम हातोटी त्यांच्याकडे आहे. अनेक प्रसंगांमध्ये ते सहजच वाचकाच्या डोळ्यासमोर चित्र उभे करतात. लेखनकौशल्याचा अप्रतिम आविष्कार असलेल्या या साहित्यकृतीत ओघवती निवेदन शैली, वर्णनशैलीतून साकारणारी दृश्यात्मकता, प्रतिमा-उपमा-म्हणी यांचा समर्पक वापर लेखकाने लीलया केला आहे. व्यक्तिचित्रणातील सजीवपणा, प्रसंग खुलवताना घटनांची मालिका, घटनेतून निर्माण होणारे नाट्य, नात्यांची भावनिक गुंफण आणि वास्तव यातील नाट्य सामाजिक सत्यता पडताळायला लावते.

ही कादंबरी केवळ वडार समाजाची न राहता संपूर्ण भारतीय समाजाची भासते हे कादंबरीचे खरे यश आहे. माणसा-माणसातील संवेदनशीलता, नीती, नाती, मूल्य, मोल, व्यवहार यातील सामाजिक भान लौकिक अर्थाने यात दिसते. त्यामुळे कादंबरीच्या आकृतीबंधाची लेखकाची समज ठसठशीतपणे अधोरेखित होते. एक उत्तम साहित्यकृती त्यांनी या कादंबरीद्वारे मराठी साहित्याच्या प्रांगणात ठेवली आहे. नावडकर बंधूंनी चितारलेले कादंबरीचे मुखपृष्ठही कथानकाला साजेसे आहे.

सर्वांत महत्त्वाचे सांगायचे तर वंचित, उपेक्षित साहित्याची प्रस्थापित चौकट सर्वार्थाने मोडण्याचे काम या कादंबरीने केले आहे. उपेक्षितांच्या साहित्यातील विषय, आशय, भाषा, मांडणी याला छेद देत केवळ दुःख कुरवाळत न बसता सकारात्मक उपायाच्या दिशेने अंगुलीनिर्देश करण्याचे कामही ही कादंबरी करते. स्वजातीपल्याडच्या व्यथा समरस होऊन मांडणारा लेखक म्हणून पाटोळेंची झलक त्यांच्या 'पुळका', 'आभिमान' या कादंबऱ्या व 'पाढ', 'ताव', 'वाण', 'जकात', 'रापी' या कथालेखनामधून दिसते.

'पितृसत्ताक परंपरेचं जोखड ज्यांच्या मानगुटानं बिनबोभाट पेललं, अशा समाजातील तमाम माउल्यांना अर्पण केलेली ही साहित्यकृती केवळ स्त्रियांनाच नव्हे तर माणूस म्हणून जगणाऱ्या प्रत्येकाला अंतर्मुख करून जाते.

कादंबरीचा मूळ विषय आणि कादंबरीलेखनाची मूळ प्रेरणा अण्णाभाऊ साठे असल्याचं ही कादंबरी वाचताना जाणवतं. अण्णाभाऊंची 'माकडीचा माळ' ही कादंबरी आणि 'बरबाद्या कंजारी' कथेची आठवण झाल्याशिवाय राहात नाही. अण्णाभाऊंच्या वाटेने जाताना साहित्याच्या सर्व चौकटी मोडण्याचे मोठे आव्हान पाटोळेंच्या लेखणीने समर्थपणे पेलल्यामुळं अण्णाभाऊंचे वाङ्मयीन वारसदार असे पाटोळे यांचे वर्णन केल्यास ते उचितच ठरेल.

साहित्यिक मूल्यांच्या आधारावर कादंबरीचे

आणखी मूल्यमापन करताना बा. भ. बोरकरांच्या साहित्य आणि सौंदर्य या पुस्तकाची आठवण होते. या पुस्तकात बोरकर लिहितात, सौंदर्यवाचक विधान हे फक्त अनुभवनिष्ठच असू शकते, वर्णनात्मक नाही; ह्याच्या उलट, तर्कवाचक विधान हे अनुभवनिष्ठ त्याचप्रमाणे वर्णनात्मक असू शकते. एकात अनुभवसिद्ध आशय ( ) ग्रथित केलेला असतो, उलट दुसऱ्यात अनुभवसिद्ध आशयाप्रमाणे वर्णनसिद्ध आशयही ( ) ग्रथित होऊ शकतो. थोडक्यात म्हणजे प्रत्यक्ष अनुभवावाचून सौंदर्यवाचक विधानाला गत्यंतर नाही, पण तर्कवाचक विधान मात्र प्रत्यक्ष अनुभवावाचून करता येते.

बोरकरांच्या वरील विधानांच्या संदर्भाच्या कसोटीवर 'चोळी' या कादंबरीचा विचार केल्यास ही कादंबरी अनुभवनिष्ठ विधानांतूनच साकारलेली आहे हे नमूद करायला हवे. कारण या कादंबरीचा नायक असलेला जगन आणि केंद्रबिंदू असलेला वडार समाज, त्याचं जीवनमान, त्या समाजाची इथे थेट वापरलेली भाषा, त्यातून तीन गोष्टी स्पष्ट होतात. पहिले म्हणजे वडार समाजाची भाषा लेखकाने लीलया अवगत केली आहे. दुसरे म्हणजे वडार समाजाच्या सामाजिक–सांस्कृतिक परंपरांचा लेखकाने केलेला सखोल अभ्यास. आणि तिसरे म्हणजे एखाद्या जातीच्या, समाजाच्या पलीकडे जाऊन आपल्या सभोवतालच्या व्यक्ती, घटना आणि संदर्भ यांच्याकडे माणूस म्हणून समग्रपणे पाहण्याची अनुभवनिष्ठ सौंदर्यदृष्टी लेखकाकडे आहे. त्यामुळे विशेषतः या कादंबरीत तर्क लावण्याची गरज लेखकाला भासलेली नाही. परंतु कथानक म्हणून, मनोविश्लेषणात्मक संदर्भ म्हणून आणि सामाजिक–सांस्कृतिक नोंदी म्हणून मोजक्या, समर्पक शब्दांत लेखकाने अक्षरपेरणी केली आहे. या कादंबरीचा नायक आणि अन्य पात्रे ही खरी आणि जिवंत आहेत. त्यांच्यासोबत लेखकाची अनेक वर्षे जगली असावीत, याचा प्रत्यय या कादंबरीत जवळपास प्रत्येक परिच्छेदातून येतो.

जगनविषयीचे लिखाण वाचताना ते कोणी दुसऱ्या लेखकाने लिहिले आहे, असे मुळीच वाटत नाही तर जणू जगन थेट वाचकाशी संवाद साधतो आहे असे वाटते. टेक्सास, भारत, ताराचंद, यशवंत, चिमा, बापू, हणमा, शांताक्का, विमल, आणि अन्य पात्रांसोबतही असाच अनुभव वाचक घेऊ शकतात. बोरकरांच्या वाक्यांत सौंदर्य हा जो शब्द आला आहे, त्याचे अनेक कंगोरे आहेत. इथे वडार समाज आणि संस्कृतीचा अनुभव म्हणून त्याचा अर्थ घ्यावा लागेल. त्या पातळीवर अनुभवातले सौंदर्य, सच्चेपणा आणि लिखाणातील निरागसता या कादंबरीला, बोरकरांच्याच शब्दांत सांगायचे तर अनुभवसिद्ध आशयघन साहित्यकृती बनविते.

दि. के. बेडेकर त्यांच्या साहित्य निर्मिती व समीक्षा या पुस्तकात लिहितात, नुसता इंद्रियगम्य व भावनात्मक अनुभव कितीही तीव्र असला तरी कमी अधिक खोल ठसा उमटविण्यापलीकडे त्याचे सामर्थ्य नसते. समजा, अनुभवातच कलात्मक सृजनाचे सामर्थ्य असते, तर काय झाले असते? प्रत्येक मनुष्यच कलावंत झाला असता. कारण सखोल, तीव्र अनुभव प्रत्येकालाच येतात. पण कलावंत निराळाच असतो. येथे अनुभव घेण्याचा किंवा तो तीव्रपणे व प्रामाणिकपणे घेण्याचा प्रश्न नाही, तर कलात्मक कल्पकतेचा आहे.

बेडेकरांना अभिप्रेत असलेली कलात्मक कल्पकता पाटोळे यांच्यामध्ये ओतप्रोत भरलेली आहे, हे कादंबरी वाचल्यावर निर्विवादपणे सिद्ध होते. डोळ्याने पाहिलेले दृश्य कथा, पटकथेत कसे मांडायचे आणि तेच पडद्यावर कसे साकारायचे, याचा अनुभव त्यांना दस्तुरखुद्द राजदत्त यांच्यासारख्या ऋषीतुल्य दिग्दर्शकांकडून अनेक वर्षेमिळालेला आहे. त्यातून अंगवळणी पडलेल्या चित्रभाषेचा वापर करीत त्यांनी 'चोळी' ही कादंबरी लेखणीच्या माध्यमातून कागदावर उतरवली आहे. या कादंबरीची भाषा ही शब्दांची जरी असली तरी लिपी ही चित्रांची आहे. त्यामुळे कादंबरीतील प्रत्येक प्रसंग राजमुद्रेसारखा ठळकपणे वाचकाच्या काळजावर उमटतो. कित्येकदा चरेही काढतो. पाटोळे हे या कादंबरीतील प्रत्येक घटना आणि क्षण अक्षरशः जगले असावेत! त्यामुळे बेडेकरांनी केवळ कमी अधिक खोल ठसा उमटविण्यापलीकडे त्याचे

सामर्थ्य नसते, असे म्हटले असले तरी पाटोळे यांचे या कादंबरीच्या कथानकाशी आणि पात्रांशी एकजीवत्वाचे नाते आहे, हे वाचकाच्या लक्षात आल्यावाचून राहात नाही.


इथे बेडेकर म्हणतात त्याप्रमाणे अशा एकजीवत्वाच्या नात्यातून घेतलेल्या इंद्रियगम्य व भावनात्मक अनुभवातून पाझरणारे उच्च दर्जाचे अनुभवजन्य कलात्मक सृजनाचे सामर्थ्य पाटोळे यांच्यात दिसते. एक लेखक, चळवळीतील कार्यकर्ता आणि त्याहून महत्त्वाचे म्हणजे संवेदनशील माणूस म्हणून त्यांची केलेले हे सृजन आहे. मानवी समाज, मन आणि संस्कृतीचा वडार समाजाच्या संदर्भात वास्तवाचा उभा-आडवा छेद घेणारे हे सृजन आशय, लेखन आणि दस्तावेज या तिन्ही पातळ्यांवर अत्यंत श्रेष्ठ दर्जाचे आहे. या कादंबरीद्वारे पाटोळे यांनी आणखी काही अत्यंत महत्त्वाच्या गोष्टी साकारल्या आहेत. त्यांचा उल्लेख करावाच लागेल. मराठी साहित्याच्या पालखीत वडारी भाषेला विराजमान करण्याचे अनन्यसाधारण काम कादंबरी आणि लेखक या दोघांनी केले आहे.

उपेक्षित, वंचित समाजातल्या अनेक अनवट, आजवर प्रकाशात न आलेल्या व्यक्ती, घटना, प्रथा, परंपरा आणि संस्कृतीचे कंठ साहित्याच्या रूपाने व्यक्त होण्यासाठी कलकल निनाद करू लागले आहेत. वर्षानुवर्षे वंचितांपेक्षाही वंचित राहिलेल्या समाजासाठी अभिव्यक्तीचे नवे दालन खुले होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अत्यंत धैर्याने, सचोटीने आणि प्रामाणिकतेने उपेक्षित, वंचितांच्या साहित्याची ही ज्योत पाटोळेंनी वडार समाजाच्या अंगणात चेतवली आहे. या ज्योतीचा उजेड वंचित समाजातील अन्य दुर्लक्षित जाती-जमातीच्या अंगणात मशाल बनून तेवत ठेवण्याची प्रेरणा यातून नवलेखकांनासह प्रस्थापितांनाही मिळो हीच या निमित्ताने सदिच्छा!

◘◘◘

**सत्य चिरंतन**
बी/४०२, श्री लक्ष्मी रेसिडन्सी, सर्व्हे नं. १०९, रायकर मळा, धायरी, पुणे- ४११०४१ चलभाष :९८८१०९८४३५
इ-मेलःbhalchandrasauthor@gmail.com

साहित्य वैभव २०२०




या दिनदर्शिकेत दिवंगत साहित्यिकाचे छायाचित्र असते. त्यामागे त्या साहित्यिकाच्या वाङ्मयीन कर्तृत्त्वाचा नेटका परिचय करून देणारा लेख आणि ठळक ग्रंथांची नोंद असते.

किंमत ५० रु.

गमभन प्रकाशन
३७९ शनिवार पेठ, कन्याशाळेसमोर,
पुणे ४११०३० भ्रमणध्वनी : ९८२३१०५४५७
gamabhanaprakashan@gmail.com
www.gamabhana.in

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे
# इतर शाखा कार्यवृत नोंद

## नंदुरबार

कोरोनाच्या महामारीत घरी सुरक्षित राहून दि.२१ जुलै ते २८ जुलै २०२० दररोज फक्त ४० मिनिटे महाराष्ट्र साहित्य परिषद, नंदुरबार शाखेतर्फे ऑनलाईन झूम ॲपवर राज्यस्तरीय व्याख्यानपुष्प आठ दिवस संपन्न झाले. महाराष्ट्र साहित्य परिषद आजीवन सदस्य व साहित्यप्रेमींनी व्याख्यानाचा लाभ घेतला. डॉ. उमेश शिंदे यांनी नियोजन केले व यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले.

१. दि. २१जुलै २०२०
मा. प्रा. डॉ. सत्यवान मेश्राम
राष्ट्रीय उपाध्यक्ष, भारतीय शिक्षण मंडळ, भारत, साहित्य कार्यकर्ता, नागपूर.
विषय – भक्तिमीमांसा १२वा अध्याय ज्ञानेश्वरी ग्रंथ

२. दि.२२ जुलै २०२०
मा. डॉ. शिवाजीराव पाटील
अध्यक्ष, महाराष्ट्र साहित्य परिषद नंदुरबार शाखा
विषय – परदेशात जाताना...

३. दि.२३ जुलै २०२०
मा. डॉ. धन्यकुमार बिराजदार
सोलापूर साहित्य कार्यकर्ता
विषय – कोरोना काळात साहित्य आणि समाज

४. दि.२४ जुलै २०२०
मा. प्रा. स्वाती कान्हेगांवकर
नांदेड साहित्य कार्यकर्त्या
विषय – स्त्रिया लिहित्या का झाल्या?

५ . दि. २५ जुलै २०२०
मा. प्रा. मिलिंद जोशी
कार्याध्यक्ष, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे मुख्य शाखा, स्थापत्य अभियंता, संपादक, मूळचे उस्मानाबाद.
विषय – जीवनातील विनोदाचे स्थान

६. दि. २६ जुलै २०२०
मा. श्री. देवीदास फुलारी
उपाध्यक्ष, मराठवाडा साहित्य परिषद, नांदेड व साहित्यिक, नांदेड.
विषय – ग्रंथांच्या गावावरून

७. दि.२७ जुलै २०२०
मा. प्रा. डॉ. शशिकला पवार
धुळे–नंदुरबार जिल्हा प्रतिनिधी मुख्य शाखा पुणे, पदाधिकारी महाराष्ट्र साहित्य परिषद, धुळे शाखा, जयहिंद महाविद्यालयात धुळे.
विषय – प्रसार माध्यमाचा वाढता प्रभाव

८. प्रा. डॉ. बबनराव पवार
का.स.वाणी प्रगत मराठी अध्ययन संस्था, धुळे.
विषय – म्हणी अनुभवाच्या खाणी

शाखा डोंबिवली

१) १जुलै २०२०: आषाढी एकदशीच्या निमित्ताने डोंबिवली शाखेच्या कार्यवाह डॉ. धनश्री साने यांनी 'पंढरीची वारी –एक मुक्त चिंतन' या विषयावर आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस सुरेश देशपांडे यांनी कोरोनामुळे जाहीर कार्यक्रम करणे शक्य नसल्यामुळे नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून फेसबुक पेज तयार केले आणि त्यावरून कार्यक्रम सादर करत आहोत, असे सांगितले. कार्यक्रमास श्रोत्यांचा उत्तम प्रतिसाद होता.

२) १ ऑगस्ट २०२०: डोंबिवलीतील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि टाटा आस्थापनेतील उपाध्यक्ष पदासारखी महत्त्वाची जबाबदारी पार पाडणारे, डोंबिवलीतील ४५ व्या महानगर साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष भूषविणारे मा. माधवराव जोशी यांच्या मुलाखतीचा 'माधव ते माधवराव' कार्यक्रम करण्यात आला. मसाप डोंबिवली शाखेचे कार्याध्यक्ष सुरेश देशपांडे यांनी त्यांच्याशी सुसंवाद साधला. याही कार्यक्रमाला प्रचंड प्रतिसाद लाभला.

३) १२ सप्टेंबर २०२०: मुंबईतील 'प्रीतम' या पंचतारांकित हॉटेलचे धनी श्री. कुलवंतसिंह कोहली यांनी लोकसत्तेत लिहिलेल्या 'ये है मुंबई मेरी जान' या अतिशय लोकप्रिय झालेल्या सदरातील लेखांमागचे रंजक किस्से डॉ. नितीन आरेकर यांनी आपल्या खास शैलीत सादर केले. चित्रपटसृष्टी, राजकारण इत्यादी क्षेत्रातील नामवंत व्यक्तींचे रंजक अनुभव श्रोत्यांना भावले. डॉ. नितीन आरेकर यांचा परिचय डॉ. वृंदा कौजलगीकर यांनी करून दिला.

४. दि. २६ सप्टेंबर २०२० : रोजी 'साहित्यिक आणि कायद्याची चौकट' या विषयावर ॲड. शशांक देशपांडे यांचे माहितीपूर्ण व्याख्यान झाले. सुरेश देशपांडे, धनश्री साने आणि वृंदा कौजलगीकर यांनी कार्यक्रमासाठी सहकार्य केले.

धन्यवाद!
सुरेश देशपांडे /कार्याध्यक्ष, मसाप, डोंबिवली

## महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली



**ॲड. भास्करराव आव्हाड**
७-९-१९४३ ते २४-७-२०२०

पुण्यात कायद्याचे प्राध्यापक म्हणून कायद्याच्या सर्व विषयांचे अध्यापन ३० वर्षे केले.
त्यांनी ५२ वर्षे वकिली व्यवसाय केला तसेच दिवाणी, फौजदारी, महसूल, वगैरे विविध प्रकरणे जिल्हा न्यायालय, उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयात चालविली. अर्बिट्रेशन व चौकशी आयोगासमोर प्रकरणे चालविली.
'मरूद्यान' व 'उद्यानविश्व' हे दोन कवितासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत.
'क्षितीजापार', 'कोलंबसाचा मागोवा' व 'शोध कांगारूंचा' ही तीन प्रवास वर्णने प्रसिद्ध झाली आहेत.

● **त्यांनी आजवर भूषविलेली महत्त्वाची पदे :**
● अध्यक्ष, महाराष्ट्र व गोवा बार कौन्सील–१९८९–९०
● सदस्य, महाराष्ट्र राज्य कायदा साहाय्य व सल्ला महामंडळ– १९९२–९५
● सदस्य, महाराष्ट्र टेलिफोन सल्लागार समिती
● अध्यक्ष, विश्वस्तमंडळ, महाराष्ट्र साहित्य परिषद– २००७–२०१६
● अनेक मोठ्या संस्थांचे कायदा सल्लागार म्हणून त्यांनी काम केले.
'गुरू माहात्म्य पुरस्कार', 'बंधुता पुरस्कार', 'डॉ. आंबेडकर पुरस्कार' असे अनेक सामाजिक पुरस्कार त्यांना मिळाले.


# महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली



**मा. मधुकर अनंत मेहेंदळे**

१४-२-१९१८ ते १९-८-२०२०

संस्कृत, प्राकृत, निरुक्त, महाभारत, तसेच अवेस्ता या पारशी धर्मग्रंथाचे अभ्यासक, आंतरराष्ट्रीय ख्याती असलेले 'डिक्शनरी ऑफ संस्कृत ऑन हिस्टॉरिकल प्रिन्सिपल्स' आणि 'कल्चरल इंडेक्स ऑफ महाभारत' हे ग्रंथ विद्वानांनी वाखाणले आहेत. भांडारकर प्राच्यविद्या संस्थेनं प्रकाशित केलेल्या महाभारताच्या चिकित्सक आवृत्तीच्या संपादनामध्ये मोलाचं योगदान दिले. वेद, महाकाव्य, महाभारत, निरुक्त, ऐतिहासिक भाषाशास्त्र हे त्यांच्या अभ्यासाचे विषय होते. त्यांनी संस्कृत, इंग्लिश आणि मराठी या तिन्ही भाषांमध्ये लेखन केले. 'प्राचीन भारत : समाज आणि संस्कृती' या बहुमोल ग्रंथाचे लेखक.



**मा. प्रणव मुखर्जी**

११-१२-१९३५ ते ३१-८-२०२०

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे नेते, परराष्ट्र, संरक्षण आणि अर्थ खात्यांचे मंत्रीपद भूषविलेले मुखर्जी योजना आयोगाचे उपाध्यक्ष होते. यु.पी.ए सरकारच्या काळात अनेक पेचप्रसंगातून मार्ग काढल्यामुळे 'संकटमोचक' म्हणून ख्याती. २५/७/२०१२ रोजी राष्ट्रपतीपदाची शपथ घेतली. सर्वपक्षीय नेत्यांमध्ये आदरस्थानी असलेल्या मुखर्जींनी द कोएलिशन इयर्स १९९६-२०१२' हा ग्रंथ लिहिला. त्यांना पद्मविभूषण आणि देशाचा सर्वोच्च 'भारतरत्न' हा सन्मान त्यांच्या कार्यासाठी मिळाला. इंदिरा गांधी, राजीव गांधी आणि डॉ. मनमोहन सिंग या पंतप्रधानांच्या मंत्रिमंडळात अर्थमंत्रीपद, डॉ. मनमोहन सिंग यांच्या मंत्रिमंडळात संरक्षणमंत्रीपद आणि पी. व्ही. नरसिंहराव यांच्या मंत्रिमंडळात परराष्ट्रमंत्रीपद भूषविले.



**प्रा. पुष्पा भावे**

२६-३-१९३९ ते ३-१०-२०२०

प्रख्यात विचारवंत, नाट्यसमीक्षक आणि लेखिका असलेल्या प्रा. पुष्पा भावे यांचा विद्यार्थीदशेपासूनच लोकशाहीवादी चळवळींशी संबंध होता. सिडनहॅम, दयानंद, डहाणूकर, चिनॉय आणि रामनारायण रुईया महाविद्यालयात त्यांनी मराठीचे अध्यापन केले. संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन, दलित पँथरची चळवळ, हमाल पंचायत, देवदासी मुक्ती अशा विविध चळवळींमध्ये योगदान देतानाच शेतकरी, कामगार, आदिवासी, दलित आदी घटकांच्या लढ्यामध्ये त्यांनी सक्रिय सहभाग दिला. 'लढे आणि तिढे' 'आम्हाला भेटलेले डॉ. श्रीराम लागू' हे ग्रंथ प्रसिद्ध 'माणूस' मध्ये लिहिलेल्या समीक्षा लेखांचे पुस्तक राजहंस प्रकाशनातर्फे प्रसिद्ध. निडर आणि निर्भीड स्वभावाच्या पुष्पाताईंनी मुंबईतील मराठी माणूस कमी होतोय आणि त्यासाठी राजकीय पक्षच जबाबदार आहेत असे पंचवीस वर्षांपूर्वीच निरीक्षण नोंदवले. अनेक सामाजिक कार्यकर्त्यांची प्रेरणा असलेले गुरुतुल्य व्यक्तिमत्त्व हरपले.

# संकल्प ज्ञानाचा मोबाईल दानाचा उपक्रम
# कोरोना टाळेबंदीतील शैक्षणिक सेवेचा उपक्रम

सन २०२० वर्षाची सुरुवात समाजातील सर्व घटकांच्या अभूतपूर्व गळचेपीने झाली आहे. जागतिक महामारीने, यंदा कोरोनाचे रूप धारण करून सगळ्या जगाला वेठीस धरले आहे. भीतीमुळे उद्धभवलेल्या परिस्थितीत शैक्षणिक संस्था सुरू होण्याची हालचाल अद्यापदेखील होताना दिसत नाही. एकीकडे पालक मुलांना शाळेत पाठवायला तयार नाहीत, तर दुसरीकडे प्रशासनदेखील पारंपरिक शिक्षण पद्धतीस परवानगी देत नाही. अशा परिस्थितीत शालेय विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून बहुतेक विद्यालयांनी 'ऑन लाईन' अध्यापन सुरू केले आहे. त्यास मोठा प्रतिसाद मिळतोदेखील आहे; परंतु जे त्यापासून वंचित आहेत, त्या विद्यार्थ्यांमध्ये एक प्रकारचा न्यूनगंड निर्माण होतो आहे. असे घडू न देण्याची जबाबदारी सर्वांची आहे.

भारतीय घटनेनुसार प्रत्येकाला शिकण्याचा समान हक्क आहे; परंतु आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थी आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना 'ऑन लाईन' शिक्षणाचा लाभ घेणे शक्य होताना दिसत नाही. स्मार्टफोन उपलब्ध नसणे हे त्याचे प्रमुख कारण म्हणून पुढे आले आहे. महाराष्ट्र साहित्य परिषद - शाखा नाशिकरोडने अशा विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून त्यांना स्मार्टफोन उपलब्ध करून देण्याचा उपक्रम सुरू केला आहे.

संकल्प ज्ञानाचा मोबाईल दानाचा उपक्रमात नागरिकांकडून जुने स्मार्टफोन दान म्हणून घेतले जात आहेत. आवश्यकता असल्यास ते दुरुस्त करून चालू स्थितीतील मोबाईल मराठी माध्यमातील गरजू विद्यार्थ्यांना मोफत वाटप केले जात आहेत. उपक्रमाचे संयोजक सभासद वैद्य विक्रांत जाधव आहेत. गोदावरी मोबाईल्सचे सुशांत उबाळे हे विनामोबदला मोबाईल दुरुस्त करून देत आहेत.


## उपक्रमात मोबाईल संकलन करणाऱ्या व्यक्ती


- विक्रांत जाधव ९४२२०५४३०० ( अशोक स्तंभ )
- सुशांत उबाळे ९७६४०२४४२४ ( देवळालीगाव )
- बाळासाहेब गणोरे ९८५०४४१२१३ ( रेल्वे स्टेशन )
- एजाज पिरजादे ८२७५२५२१२३ ( जेल रोड )
- राहुल बोराडे ७७४४९९९१११ ( जेल रोड )
- प्रतिक दुसाने ९४२३०३६१६७ ( कॉलेज रोड )
- तुषार सोनावणे ९५७९४२७०३० ( म. गांधी रोड )
- शौनक तनपुरे ९६२३२८९९२९ ( अशोक रोड )
- मनोज नागपुरे ९४२२२५८७४८ ( तिडके कॉलनी )
- अंबादास गोडसे ९२२५१४९८५० ( शालीमार )
- प्रशांत कापसे ९५४५४१५६७७ ( भगूर )
- केशव कदम ९९२१६९४४७७ ( सायखेडा )
- योगराज निगळ ९५५२८०२३२३ ( दिंडोरी )
- डॉ. प्रताप गुजराती ९२२६७९६९९३ ( मनमाड )
- श्रीराम वारुंगसे ८८८८८४८१११ ( इगतपुरी )
- राजेंद्र देशपांडे ९९२२९१०७२६ (सिन्नर)

या उपक्रमात कार्याध्यक्ष उन्मेष गायधनी, कोषाध्यक्ष सुदाम सातभाई आणि कार्यकारणी सदस्य श्री. दशरथ लोखंडे यांचा सक्रिय सहभाग आहे.

Maharashtra Sahitya Patrika Quarterly : September 2020
Registered with the Register of Newspaper for India under No 6398/57
Book Pkt. Periodical category. Publishing Date : 30 September 2020




# पुस्तक सूची

- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड १ : रु. ५००/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड २ (भाग १) : रु. ७००/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड २ (भाग २) : रु. ७००/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ३ : रु. ३५०/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ४ : रु. ४००/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ५ (भाग १) : रु. ३५०/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ५ (भाग २) : रु. ३५०/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ६ (भाग १) : रु. ३५०/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ६ (भाग २) : रु. ३००/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ७ (भाग १) : रु. ७००/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ७ (भाग २) : रु. ८००/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ७ (भाग ३) : रु. ७००/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ७ (भाग ४) : रु. ७००/-
- भारतीय भाषांतील स्त्रीवादी साहित्य : रु. ८००/-
- भाषा व साहित्य संशोधन खंड १ : रु. ५००/-
- भाषा व साहित्य संशोधन खंड २ : रु. ३००/-
- भाषा व साहित्य संशोधन खंड ३ : रु. २००/-
- म. सा. पत्रिका लेख - सूची : रु. ४००/-

**सर्व खंड २५ टक्के सवलतीत!**

## महाराष्ट्र साहित्य परिषद

**डिमांड ड्राफ्टने आगाऊ पैसे पाठविण्यास संपूर्ण संच** आमच्या खर्चाने रेल्वे अगर एस.टी. पार्सलने पाठवू. (वरील संचातील सुटे भाग हवे असल्यास ग्रंथविक्रेत्यांना २५ टक्के सूट. व्यक्तिगत ग्राहकांना व संस्थांना १५ टक्के सूट. टपालखर्च वेगळा.)

मागणीसाठी संपर्क : महाराष्ट्र साहित्य परिषद, टिळक रस्ता, पुणे ४११ ०३०
दूरभाष : ०२०- २४४७ ५९ ६३

प्रेषक ।
**प्रमुख कार्यवाह,**
**महाराष्ट्र साहित्य परिषद,**
टिळक रस्ता, पुणे ४११०३०,
दूरभाष : ०२०-२४४७ ५९ ६३